१६३३
म. ग्रं. सं. ठाणें
विषय प्रवास
सं. नं. १९



# माझ्या हिमालयांतील यात्रा.

REFBK-0005024

ले.:-मो. गो. काळे, पुणें ]

[ किंमत १ रु.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.
ठाणे,

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
नं.
ता.
ठाणे.

# माझ्या हिमालयांतील यात्रा.

लेखक—

श्रीयुत मोरेश्वर गोपाळ काळे,

शिक्षक, नूतन मराठी विद्यालय हायस्कूल, पुणें

" माझा काश्मीरचा प्रवास " व " आमची म्हैसूरची सफर. "
या पुस्तकांचा कर्ता.

मुद्रक व प्रकाशक

रा. रा. शंकर नरहर जोशी, १०२६ सदाशिव पेठ,

REFBK-0005024

REFBK-0005024

१९३३

किंमत १ रुपाया

स्थळ प्रत



लेखकः -मोरेश्वर गोपाळ काळे, पुणे.

# प्रस्थान

( लेखक-**श्री. रा. प्र. कानिटकर**, एम्. ए. संपादक चित्रमयजगत् पुणें. )

**हीं** छोटी प्रस्तावना म्हणजे प्रवासप्रिय श्रीयुत मोरोपंत काळे यांच्या पुढील प्रवासाचें प्रस्थानच होय. श्री. काळे यांनीं आतांपर्यंत हिंदुस्थानच्या पूर्व पश्चिम व वायव्य, उत्तर ईशान्य या बाजूंना सफरी मारल्या आहेत. आतां राहिलेल्या दिशांकडे प्रवास करून त्यांनीं अष्टदिग्गजांवर आरूढ होण्याचें पुण्य संपादन करावें, अशा सदिच्छेनें त्यांच्या वतीनें मी हें प्रस्थान ठेवीत आहे.

प्रवासप्रवृत्ति ही देशाच्या भाग्योदयाची एक खूण म्हणतां येईल. कूपमंडूक वृत्तीच्या पोटीं अहंभावना व निरर्थक आत्मगौरवाची वृत्ति उत्पन्न होत असल्यामुळें प्रगतीचें पाऊल खुंटल्यास नवल नाहीं. आपले गुणावगुण समजून घ्यावयास व आपल्या यशापयशाची पारख करावयास प्रवासानें उत्पन्न होणाऱ्या व्यापक दृष्टी-सारखा दुसरा आरसा नाहीं. ज्यानें आपल्या हिंमतीवर हा आदर्श संपादन केला त्याच्या भाग्योदयाचें कोण वर्णन करूं शकेल ?

ज्या लोकांना प्रवासाची आवड नाहीं ते दुर्बळ, उत्साहशून्य, आळशी, अहंमन्य व कर्तृत्वशून्य ठरल्यास मुळींच नवल नाहीं. आपण आपल्या घरून उठून दुसरीकडे–दुसऱ्याच्या दारीं जावयाचें म्हणजे त्यांत कमीपणा व मानहानी नाहीं काय ? दुसऱ्यांनीं आपल्याकडे यावें, आपण आपल्या जागेवरून हालूं नये हाच खरा थोरपणा किंवा खानदानीपणा नव्हे काय ? अशा आकुंचित वृत्तींच्या लोकांची कींव करावी तेवढी थोडीच. बाहेरून येणारे लोक आपल्याला लुबाडून जातात हें ज्यांना कळत नाहीं त्यांच्या खानदानीपणाची तारीफ करावी कीं त्यांना महामूर्ख म्हणावें ? दुसऱ्यांच्या मुलुखांवर स्वाऱ्या करण्याचे व गडगंज लूट मिळवून आणण्याचे दिवस आतां संपले. तरी त्यांतील अंतर्गत तत्त्व नामशेष झालें नाहीं. परदेशांत प्रवास करून त्या देशांतल्या चांगल्या कल्पना, चांगले रीतिरिवाज व उपयुक्त सुधारणा आपणांस उचलतां येणार नाहींत काय ? प्रवासानें नवी दृष्टि प्राप्त होते याचा अर्थ तरी हाच आहे. म्हणून ज्याला आत्मोन्नती साधून घ्यावयाची इच्छा असेल त्यानें प्रवास करून नवी दृष्टि, नवें ज्ञान व नवा अनुभव मिळविल्याशिवाय त्याचा हेतु साध्य होणार नाहीं. जी गोष्ट व्यक्तीची तीच राष्ट्राची. ज्या राष्ट्रांतील लोक प्रवासप्रिय किंवा भटके आहेत त्या राष्ट्रांचा कसा उत्कर्ष झालेला आहे किंवा होत आहे हें आपल्याला प्रत्यक्षच दिसत आहे. हिंदुस्थानचें उदाहरण तर ढळढळीतपणें आपणांपुढें उभेंच आहे.

श्री. काळे यांनीं पायीं प्रवास केल्यामुळें व स्वतः प्रत्येक प्रकारचा अनुभव घेतल्यामुळें त्यांचीं प्रवासवर्णनें जशीं मनोरंजक, माहितीपूर्ण व उद्बोधक झालीं आहेत तशीं तीं नमुनेदारही आहेत. त्यांच्या लिहिण्यांत जो एक अत्यंत महत्त्वाचा गुण आढळतो त्यामुळें त्यांचें लिहिणें मनोवेधक व आकर्षक झालें आहे. हा गुण म्हणजे जिव्हाळा होय. त्यांच्या वर्णनांतील प्रत्येक वाक्यनृवाक्य जिव्हाळ्यानें ओथंबलेलें असल्यामुळें वाचक त्यांत अगदीं रंगून जातो. प्रवासाची हकीगत देतांना इतरांनीं दिलेल्या माहितीवर विसंबून जर एकादा प्रवासी आपलें प्रवासवृत्त कथन करूं लागेल तर त्यांत एक प्रकारचा जिव्हाळा किंवा जिवंतपणा अनुभवास येणार नाहीं. शिवाय त्यामुळें वाचकाच्या अहंवृत्तीची तृप्ति होणार नाहीं. हा लेखक आपले स्वतःचे अनुभव केवळ माझ्यासाठींच व मलाच निवेदन करीत आहे असें वाचकाला वाटलें म्हणजे त्याच्या लिहिण्यांत जिव्हाळा आहे असें निःसंशय समजावें. व अशा लेखनपद्धतीमुळेंच वाचकाला लेखकाविषयीं आत्मीयता वाटूं लागतें. लेखक जर आपल्या विद्वत्तेचें प्रदर्शन करूं लागला तर हा आत्मीय भाव प्रगट होत नाहीं असा अनुभव आहे. प्रवासवृत्तांतलि अर्धे माधुर्य व अर्धे सौंदर्य त्यांत निवेदन केलेल्या आत्मानुभवावर व स्मृतिफलकांवर उमटलेल्या चित्रांवर अवलंबून आहे हें विसरतां कामा नये. पायीं प्रवास करणारा व वाहनांतून प्रवास करणारा या दोघांत जमीनअस्मानाचें अंतर असतें. याचा प्रत्यय आजपर्यंत प्रसिद्ध झालेलीं प्रवासवर्णनें व प्रस्तुतचें प्रवासवर्णन यांतील तफावतीवरून कोणालाही सहजच येईल.

प्रवासाची खरीखुरी व मनापासून इच्छा असली म्हणजे त्यास द्रव्यबलाचीच मोठीशी आवश्यकता आहे असें नाहीं, हें काळे यांनीं आपल्या स्वानुभवानें सिद्ध करून दाखविलें आहे. काळ्यांच्यासारखा मोठा हौशी प्रवासी विरळा. काग्याकुच्यांतून, दऱ्याखोऱ्यांतून व बर्फप्रदेशांतून हवा तसा स्वेच्छेनें व आनंदानें कोण प्रवास करील ? श्री. काळे यांजजवळ अशा प्रकारच्या सर्व अनुभवांचा जो संग्रह जमला आहे तो अमूल्य नाहीं असें कोण म्हणेल ?

श्री. काळे यांचीं हीं प्रवासवर्णनें प्रवासवृत्ति नसलेल्या घरबशांना सुद्धां स्फूर्ति व उत्तेजन देणारीं असल्यामुळें त्यांचें मोल विशेषच आहे. त्यांनीं केलेल्या ह्या कामगिरीबद्दल मी त्यांचें अभिनंदन करतों, व त्यांच्या हातून उत्तरोत्तर अशींच जिव्हाळ्याचीं प्रवासवर्णनें लिहिलीं जावींत असें मनःपूर्वक इच्छितों.

चित्रमयजगत् कार्यालय,
पुणें. १।२।३३

रा. प्र. कानिटकर.



# अर्पण-पत्रिका.

ज्यांच्या कृपेमुळें मला ह्या कठिण यात्रा घडल्या व ज्यांच्या प्रेमळ छत्राखालीं त्या सुखरूप पार पडल्या त्या तीं० रा. रा. **नारायण सदाशिव** ऊर्फ **नानासाहेब जोग** वकील भिवंडी ह्यांस हें पुस्तक अत्यादरपूर्वक अर्पण केलें आहे.

# लेखकाचे चार शब्द.

**हिंदुस्थानच्या** हितकर्त्या **हिमालयाचें** नांव आज जगांत गाजत आहे. इंग्रजींत **हिमालयास** World's museum " **जगांतील अजबखाना** " म्हणतात. अशा तऱ्हेचा ह्या नगाधिराज हिमालय पाहून येण्याची इच्छा होऊन ती परमेश्वरी कृपेनें पूर्णहि झाली. परंतु बुद्धीचें व शिक्षणाचें भांडवल फारच तुटपुंजें असल्यामुळें हिमालयवर्णन लिहून मराठी वाचकांस स्वतः अनुभवलेल्या सुखदुःखाचे भागीदार करण्याचें धाडस होईना. पण परमेश्वरी इच्छा तशी नव्हती. १९३१ च्या जूनमध्यें गंगोत्रीच्या यात्रेहून परत आल्याबरोबर **चित्रमयजगत्चे** त्यावेळचे संपादक **दे. भ. त्र्यंबकराव देवगिरीकर** बी. ए. ह्यांनीं आगष्टच्या अंकाकरितां यात्रेचा पहिला हप्ता आणून देण्याचा जवळजवळ प्रेमाचाच पण हुकूमच सोडला. पहिला हप्ता दिला म्हणून दुसरा द्यावा लागला. तिसरा दिल्याशिवाय भागेना.तीन हप्ते देऊन पुढें थांबणें बरें नव्हें. म्हणून चौथा ओघानेंच देणें प्राप्त झालें व पांचव्या हप्त्यांत पहिला भाग संपविला व मार्चपासून दुसऱ्या भागास सुरवात करून सुरवातीपासून १४ लेख लिहून ही माला पुरी केली. श्री. देवगिरीकर ह्यांनीं जर त्यावेळीं आग्रह केला नसता तर आज हें पुस्तक तयार झालेंच नसतें. अर्थात् ह्या पुस्तकापासून कोणास कांहीं फायदा झाल्यास त्याचें श्रेय श्री० देवगिरीकर यांजकडेच आहे.

आतां नवीनच ह्या प्रवासवृत्तकथन क्षेत्रांत पाऊल टाकणाऱ्या व स्वतः मुंबई ते **लक्ष्मणझूला** इतकाच श्रीमंती प्रवास करूनही सर्व लोकांचा दृष्टिकोन पुढें ठेवून **लक्ष्मणझूला** ते **बद्रीनाथ** ह्याही न प्रवासिलेल्या भागाचें वर्णन करण्याची उमेद बाळगणाऱ्या श्री. **वि. ज. घारपुरे** बी. ए. ह्यांच्या **ज्ञानप्रकाश** २६-७-३२ मधील तक्रारीप्रमाणें " स्वतःच्या दृष्टी कोनांतून " हें प्रवासवृत्त लिहिलें गेलें आहे हें खरें आहे व त्यामुळें जर कोणाची गैर सोय होत असेल तर तीबद्दल मात्र लेखक सर्वस्वी जबाबदार आहे. सर्वांचा दृष्टिकोन पुढें ठेऊन श्री. घारपुरे ह्यांनीं सुरवात केलेल्या प्रवासवृत्ताची गाडी आजच्याच वेगानें पुढें चालल्यास तें प्रवासवृत्त पुरें होण्यास व **बद्री केदार**कडे मोटार चालू होण्यास एकच गांठ पडेल व तोंपर्यंत वाचकांची कांहीं तरी सोय व्हावी म्हणून हें प्रवासवृत्त प्रसिद्ध करण्याचें धाडस करीत आहे. Something is better than nothing हा न्यायच ह्या ठिकाणीं लागू केला आहे.

श्री. **गो. ह. फडके** यांनीं ह्यापूर्वी हिमालयाच्या यात्रा १९१६ सालीं करून त्यांचें एक प्रवासवृत्त १९२३ सालीं प्रसिद्ध केलें आहे. या यात्रा केल्यास जवळ जवळ १७ वर्षे झालीं व पुस्तकही छापून १० वर्षे झालीं तेव्हां वाटेंत कांहीं फरक हा पडणारच. पुस्तकाची दुसरी आवृत्ति काढून पुस्तकांत नवीन गोष्टींची भर घालण्याचाही त्यांचा विचार दिसत नाहीं. कारण ते मला पाठविलेल्या पत्रांत म्हणतात " पुस्तकाच्या वारंवार आवृत्त्या काढून पैसे किंवा लब्धप्रतिष्ठितपणाची कीर्ति मिळविण्याची मला बिलकूल हांव नाहीं." ( अर्थात् हे विचार त्यांना अनुभवानें शहाणपण प्राप्त झाल्यानंतरचे आहेत. ) प्रथमावृत्ति प्रसिद्ध केल्यावेळीं ते दुसऱ्या आवृत्तीची उमेद बाळगून होते. ( माझी तीर्थयात्रा भाग १ प्रस्तावना पान ७ ओळी १८ व १९ ) त्यांच्या पुस्तकाची पहिली आवृत्ति संपत आली आहे; म्हणून तरी मीं हें काम हातीं घेतलें आहे.

१९१४ सालीं बदरीकेदारची यात्रा करून त्याचें वृत्त नुकतेंच ५।६ महिन्यांपूर्वी पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालें आहे. शिळ्या चांगल्या कढीस ऊत आणल्यानंतरही ती चवीनें खाणाऱ्या वाचकांप्रमाणें कदाचित् बेचव परंतु गरमागरम ताज्या कढीसही वाचक मिळतील अशा भरंवशानेंही मी ह्या कामास हात घातला आहे. कारण मी केलेले प्रवास सन १९३०-३१ व ३२ सालांतील आहेत व त्यांचें वृत्तही लगेंच प्रसिद्ध करीत आहे.

माझ्या काश्मीरप्रवास-वृत्ताबद्दल मनोरंजनाच्या आक्टोबर १९३१ च्या अंकांत " **मध्यम**स्थितींतील लोकांस जवळजवळ **निरुपयोगी** " म्हणून तक्रार करणाऱ्या व बऱ्याच वेळां सेकंड क्लासांतूनही प्रवास करणाऱ्या, एका वेळच्या न्हाणास सहज बारा आणे खर्च करण्याची ऐपत असलेल्या, श्री. सौ. **अवंतिकाबाई गोखले** ह्यांच्या सारख्या मध्यम (!!!) स्थितींतील लोकांकरितां माझा जीव मुळींच तुटत नाहीं. त्यांस उपयोगी भाग ह्या प्रवासवृत्तांत सापडला नाहींतर मला मुळींच वाईट वाटणार नाहीं. तर ज्यांस मधल्या वेळेची भ्रांत आहे अशा जिज्ञासू प्रवाशांकरितांच मी हें वृत्त लिहिलें आहे. लहान खाणावळी ज्याप्रमाणें विद्यार्थी, प्रवासी, नोकर इ० लोकांची सोय पाहाण्यास तयार असतात तसेंच हें प्रवासवृत्त बायका, मुलें, वृद्ध, तरुण, इतिहासाभ्यासी, राजकारणी इत्यादि सर्वांची जिज्ञासा तृप्त करण्याच्या हेतूनें लिहिलें आहे. हिमालय हा जसा अजबखाना आहे, त्यांत जसे सर्व ऋतु व सर्व वस्तु दृष्टीस पडतात, तशीच सर्व गरिबांची सोय पाहाण्याचा प्रयत्न केला आहे. मुलांकरितां चित्रें आहेत. बायकांकरितां गंगोत्रीचें गाणें आहे. प्रवाश्यांकरितां

नकाशे व चढ्यांच्या याद्या आहेत. फार काय भिक्षेकऱ्यांकरितां सदावर्तांची यादीसुद्धां आहे.

हिमालयांत दगड, धोंडे, काटेकुटे आहेत. तसे कांहीं लोकांस बोचणारे कांहीं कांटेही ह्या प्रवास वृत्तांत आहेत. परंतु There is no rose without a thorn. " कांट्याशिवाय गुलाब नाहीं " ह्या म्हणीप्रमाणें ते कांटे दूर करितांच येत नाहींत. संभाळूनच प्रवास केला पाहिजे. कांहीं कांटे लेखकास बोचले तसे कांहीं वाचकांस बोचणारच. कांटेरी प्रदेशांतून कांटे न बोचतां वाचकांस पार नेण्याची **महात्मा गांधींची** हातोटी प्रस्तुत लेखकास साधली नाहीं, हें तो प्रांजलपणें कबूल करण्यास तयार आहे. One cannot please all. सर्वांस खूष करणें अशक्य आहे.

ज्या मनुष्यास जो अनुभव एकाद्या गोष्टीसंबंधीं असतो तसें तो आपलें मत बनवितो व लोकांस सांगतो, ह्यावरून आपल्या मताशीं ज्याचें मत जुळत नाहीं तो चुकलाच असेल अगर त्यानें लोकांची भलतीच कल्पना करून दिली असेल असें समजण्याचें कारण नाहीं. Everything has two sides, माझे स्नेही श्री. **लक्ष्मण कृष्ण फडके**, शिक्षक भावेस्कूल पुणें, हे यंदाच बदरी-केदारच्या यात्रेस जाऊन आले. ते म्हणाले, " अहो तुम्ही बर्फाचें वर्णन केलेंत परंतु बर्फानें आमच्या पायास स्पर्शसुद्धां केला नाहीं. आम्हांस दूर दिसणाऱ्या बर्फाकडे मुद्दाम जावें लागलें " तर त्यांच्या थोडे अगोदर त्याच यात्रेस गेलेले आमचे नेपाळच्या प्रवासांतील सहप्रवासी श्री. **भास्कर दामोदर पटवर्धन** शिरस्तेदार डि. कोर्ट ठाणें व भिवंडी येथलि श्री. **नरसिंह गोपाळ किंजवडे-करशास्त्री** म्हणाले " तुम्ही केदारनाथला असलेल्या थंडीचें पुरेसें वर्णन केलें नाहीं. तेथें आम्ही राहिलों होतों त्या दिवशीं बर्फाचा पाऊस पडला व कमरे-इतके बर्फ रस्त्यावर पडून घराच्या बाहेर पडणें अशक्य झालें. " अर्थात् दुस-ऱ्याच्या अनुभवाशीं आपला अनुभव जमला नाहीं म्हणून तो खोटेंच सांगत असला पाहिजे, त्यानें वर्णन कांहीं तरी केलें असलें पाहिजे असें समजण्याचें कारण नाहीं.

ह्या प्रवासवर्णनांत नकोत त्या गोष्टी आहेत असा कांहीं लोकांचा आक्षेप आहे. परंतु प्रवासवृत्तें कशीं असावीं ह्या संबंधीच्या शास्त्राचें पुस्तक अद्याप मराठींत तयार झाल्याचें मजला माहित नाहीं. इंग्रजींत कदाचित असेल परंतु तें माझ्यापर्यंत येऊन पोहोंचलें नाहीं.प्रो.भाटे ह्यांच्या प्रवासवर्णनांत श्रीकृष्ण एक कीं दोन ह्याची चर्चा

केली आहे व ती विद्वन्मान्यही झाली आहे. दुसरें, मराठींत अधिकारी प्रवासवृत्त-लेखक फारसे नाहींतच; पुस्तकी विद्येवर वाजवीपेक्षां जास्त भर दिल्यामुळें कादंबऱ्या, नाटकें व काव्यें लिहिणारांचे नुसतें, पेंव फुटलें आहे. पुस्तकी विद्या संपादन करण्याची ज्ञानी कला तरुणांनीं आतां वायकांवर सोंपवून देशपर्यटनाच्या मर्दांनी कले–कडे लक्ष देण्याचा काळ आतां येऊन ठेपला आहे. श्रीसमर्थांच्या काळापासूनची हीच तक्रार आहे. समर्थ म्हणतात 'कविता गवता ऐसी । उदंड माजली असे "' प्रवासाचा ज्यांना अत्यंत कंटाळा आहे असें कूपमंडूक वृत्तीचें व निव्वळ पुस्तकी ज्ञानावर विसंबून देशाच्या राजकारणांत तोंड घालणारे वशा प्रवृत्तीचें पुढारी महाराष्ट्रांच्या दुर्दैवानें महाराष्ट्राच्या वाट्यास आल्यामुळें नेहमीं हिंदुस्तानच्या राजकारणांत अघाडीवर असलेला महाराष्ट्र ह्या लव्यांत पिछाडीस सुद्धां नाहीं! तेव्हां तरुणांनीं स्वतःच्या डोळ्यांनीं देश पाहून कार्यास लागावें, अशी परिस्थिति असल्यामुळें जसें वाटलें तसें लिहिलें. मिशन हास्पिटल मध्यें जाऊन औषध घेणें असेल तर जशी येशूची प्रार्थना करावीच लागते व बालगंधर्वांचें नाटकांतील गाणें ऐकावयाचें असेल तर नाटकांतील इतर वृद्ध गंधर्वांचें ओरडणें ऐकणें भाग पडतें, तसेंच प्रवासांतील इतर माहितीची जरूर असल्यास लेखकाचे वाचकांस नापसंत असलेले कांहीं विचार वाचणें भाग आहे. लेखकास मजूर, आचारी, भिक्षेकरी, सेक्रेटरी इत्यादि अनेक कामें करावीं लागली आहेत, तर त्याचे अनुभव निरनिराळ्या क्षेत्रांतील असणारच. अर्थात् ह्या वृत्तांत कोणास कांहीं त्रास होण्यासारखा मजकूर असल्यास त्याबद्दल लेखक अत्यंत दिलगीर आहे परंतु मजकूर बदलण्यास तो आज तरी तयार नाहीं. काळाच्या उदरांत काय सांठविलें आहे हें कोणास माहीत आहे?

" हीं यात्रा आपणांस करितां येईल काय ? " असे बरेच लोक विचारतात. मी त्यांस सांगतों " तुम्ही जरूर जा, तुम्हांस ही यात्रा होईल. " हिंदुस्थानचे लोक काटकपणांत जगांत कोणत्याही लोकांस हार जाणार नाहींत, हें मागील इतिहासच नव्हे तर आजचाही इतिहास सांगत आहे. ज्यांनीं आजन्मांत भाकरी चाखली नाहीं व ज्यांस गादीवर ती मऊ नसल्यास झोंप येत नाहीं, ज्यांचें प्रत्येक काम करण्यास नौकर सर्वदा तयार आहेत अशा लोकांनींसुद्धां सत्याग्रह संग्रामांत उडी टाकून हरभरे भरडून, कच्च्या भाकरी खाऊन व तरटावर झोंपून आपली कामगिरी बजावली व शीरसलामत तुरुंगांतून ते बाहेर आले. मग हिमालयाच्या यात्रेची त्यांच्यापुढें मातब्बरी काय व जर हीं कामें शेंकडो नव्हे, हजारों नव्हें, लाखों लोक करूं शकतात, मग ते हिमालयाचा प्रवास कां करणार नाहींत.

वेरें मृत्यूची भीति म्हणावी तर त्यानें येथें कोठें आपणांस जगविण्याची हमी दिली आहे. तिसरें, सामान्य हाल सोसण्याचेंही सामर्थ्य ज्या देहांत नाहीं तो हिंदुस्तानचा उद्धार तरी काय करणार ! व अशा निर्बल लोकांनीं आज खायला काळ न भुईला भार अशा परिस्थितींत हिंदुस्थानांत जगावें तरी कशाला ! प्राचीन स्पार्टन लोक अशक्त मुलांस समुद्रांत फेकून देत असत. म्हणून त्यांचें राष्ट्रांत बलवानच शिलक राहिले व त्या राष्ट्राचा सर्व जगास दरारा बसला.

पूर्वकाळीं आमच्याकडेसुद्धां मुलांस मुंजीनंतर काशीस विद्या शिकण्याकरितां एकटाच पाठवीत असत असें सोडमुंजीच्या वेळीं जो विधि करितात त्यावरून दिसून येतें व तो जगून वाचून विद्या शिकून परत आल्यासच त्याचें लग्न होण्याचा संभव असे. परंतु कोणातरी एका देशबुडव्या मामानें काशीस जाऊन विद्याभ्यास न करितां येथेंच **ठोंब्या** राहिलास तरी मी आपली मुलगी तुला देईन असें आपल्या भाच्यास आश्वासन देऊन परतविल्यापासून नुसतें देवळापर्यंत जाऊन परतण्याची चाल पडली व आम्ही धाडसास पारखें झालों. पुष्कळ वाचकांस माहितही नसेल कीं पानांच्या अगर कागदांच्या द्रोणांत सुद्धां भात शिजतो. अर्थात् प्रवासांत संकटें आलीं कीं मार्ग सुचतो. संकटांना धैर्यानें तोंड देण्याची तयारी असली पाहिजे. परंतु वाजवीपेक्षां जास्त भर पुस्तकी शिक्षणावर आम्ही देत असल्यामुळें व सर्वच कर्तबगार लोक त्याच क्षेत्रांत नांव कमावण्यास जाऊं लागले म्हणून तिकडे अत्यंत गर्दी झाली व धाडसी प्रवासवृत्तीस आम्ही पारखें झालों म्हणून माझ्यासारख्या सामान्य प्रवाशास आपले अनुभव प्रसिद्ध करावे लागले. ह्यापुढें तरी शक्य तितक्या जास्त तरुणांनीं देशाच्या निरनिराळ्या भागांत प्रवास करून देशजागृति केली पाहिजे व स्वतःची ओळख करून घेतली पाहिजे. नुसत्या बुद्धिवादानेंच इंग्रज कधींही जिंकले जाणार नाहींत.

नुसत्या पुस्तकी शिक्षण घेणाऱ्या निःसत्व आणि निःशक्त तरुणांची स्वातंत्र्योत्सुक हिंदुस्थानास आज मुळींच जरूर नाहीं. त्यांनीं घर सोडून कसें फिरावें ह्यासंबंधीं शक्य तितकी माहिती प्रसिद्ध केली आहे. सवडीनें आणखीहि प्रसिद्ध करणार आहे, कांहीं व्यावहारिक अडचणी कोणास असल्यास त्यानें समक्ष भेटून अगर पोस्टेजसुद्धां पत्रव्यवहार करून खुलासा मागविल्यास तो करण्यास तयार आहे परंतु तरुणांनीं आतां फिरण्यास आरंभ करावा इतकीच त्यांस विनंति आहे.

गरिबांकडे कनवाळुपणानें पहाणारे चित्रशाळेचे मालक दे. भ. **वासुकाका जोशी** व सामान्यलेखकांससुद्धां प्रोत्साहन देऊन त्याचें काम हातीं घेणारे चित्र-

शाळेचे मॅनेजर श्री. **शंकरराव जोशी**, ह्यांनी जर मनावर घेतलें नसतें तर हें पुस्तक बाहेर पडलें असतें कीं नाहीं ह्याची शंकाच आहे. त्याबद्दल त्यांचे आभार कोणत्या शब्दांनीं मानावें तेंच कळत नाहीं.

चित्रमयजगत्चे संपादकद्वय दे. भ. त्र्यंबकराव देवगिरीकर B. A. व दे. भ. राजाराम प्रल्हाद कानिटकर M.A. ह्यांनीं लेखांत दुरुस्त्या सुचवून व श्री. कानिटकर ह्यांनीं त्याशिवाय पुस्तकास विद्वत्तापूर्ण प्रस्तावना लिहून देऊन जी अमूल्य मदत केली त्याबद्दल मी त्या उभयतांचा अत्यंत ऋणी आहे.

माझे स्नेही श्री. यशवंतराव रानडे, ज्योतिर्षी निळकंठराव लवाटे, सुप्रसिद्ध चित्रकार श्री. नाडगौडा, पुस्तकांत घालण्याकरितां उत्तम नकाशा तयार करून देणारे माझे समव्यवसायी मित्र श्री. गोपाळ श्रीनिवास निंबवीकर व श्री. मनोहर बळवंत पुराणिक या सर्वांचा मी फार आभारी आहे.

प्रवासाची संधि देणारे श्री. नानासाहेब जोग वकील, भिवंडी, प्रवासाकरितां लागणारी रजा व इतर सर्व प्रकारची मदत करणारे आमच्या शाळेचे चालक मे. प्रो. पोतदार B. A. मे. प्रो. गोडबोले M. A. B. T. मे. प्रो. परांजपे M.A. B. Sc. . व मे. तहाहयात सभासद मंडळांतील सर्व सभासद ह्यांचाही मी फार ऋणी आहे. त्यांनीं जर रजा दिली नसती तर हे प्रवास घडलेच नसते.

शेवटीं ज्या जगन्नियंत्या परमेश्वराच्या कृपेनें हे सर्व प्रवास व प्रवासवृत्तकथन पार पडलें त्याची करुणा भाकून माझ्या काश्मीरच्या व म्हैसूरच्या प्रवासवृत्तांप्रमाणें याही प्रवासवर्णनास मराठी वाचकांनीं उदार आश्रय द्यावा अशी त्यांस नम्र विनंति करून ही प्रस्तावना पुरी करितों.

खालील पुस्तकांचा व मासिकांचा मला प्रवासवर्णनांतील भौगोलिक ऐतिहासिक माहिती, चित्रें वगैरेकरितां फार उपयोग झाला आहे व त्याबद्दल त्या त्या लेखकांचा व प्रकाशकांचा मी अत्यंत आभारी आहे.

1 Indian Year Books ( by Times of India ).
2 London Illustrated Weekly.
3 Sphere Magazine.
4 Badrinath Yatra by sister Nivedita.
5 With Kelley to Chitral.
6 Indian State Railway Magazine.

7 Badrinath Yatra (B. Chakradhar Sharma)
8 Imperial Gazetteer.
9 Simla ,,
10 Macmillan's Indian Geography.
11 Peoples of all Nations.
12 India Magazine.
13 Simla Guide.

हिंदी—

१४ उत्तरा खंड रहस्य ( शालिग्राम वैष्णव )
१५ भूगोल गढवाल जीला,
१६ ,, अलमोडा ,,
१७ ,, नैनीताल ,,

मराठी—

१८ श्री. गो. ह. फडके. माझी तीर्थयात्रा. भाग १ ला.
१९ श्री० रामेकर वकील अकोट—चित्रमय जगत् मधील लेखमाला.

नूतन मराठी विद्यालय
हायस्कूल पुणें. २
ता० १।३।३३

सर्वांचा नम्र,
**मोरेश्वर गोपाळ काळे.**

---

**सूचना**—पुढें पृष्ठ १२५ वर आलेल्या मजकुरावरून पं. रामभरोसे मोतीलाल त्यांजबद्दल यात्रेकरूंनीं आपला गैरसमज करून घेऊंनये. त्यांनीं आमची व्यवस्था फार चांगली ठेवली होती. सर्वांनीं त्यांजकडेच उतरण्यास जावें, ते सर्व यात्रा संतोषपूर्वक पार पाडतील अशी माझी खात्री आहे.

# अनुक्रमणिका.

## माझ्या हिमालयांतील यात्रा.

### भाग पहिला


| विषय | पानें. |
|---|---|
| यात्रेची तयारी व प्रयाण ... ... ... ... | १ |
| दिल्ली ते हरिद्वार ... ... ... ... ... | ३ |
| हरिद्वार ... ... ... ... ... .... | ६ |
| कालीकमलीवाले बाबा ... ... ... ... | ८ |
| नकाशा चारीधाम. ... ... ... ... | १० |
| हृषीकेशचे स्वामी गुलामा नंद ... ... ... | १२ |
| स्वर्गाश्रम व लक्ष्मण झूला ... ... ... ... | १३ |
| कुलींशीं करार ... ... ... ... ... | १४ |
| नरेंद्र नगर ... ... ... ... ... | १५ |
| चट्टी ... ... ... ... ... ... | १८ |
| पुण्याच्या दरबारी दे. भ. चे पुढारी ... ... ... | १८ |
| हिमालयांतील स्वयंपाक ... ... ... ... | २० |
| गंगोत्री चहा ... ... ... ... ... | २२ |
| टिहरी ... ... ... ... ... | २२ |
| बोलका बदरीनाथ ... ... ... ... ... | २४ |
| उच्च दानतीचे गढवाली ... ... ... ... | २६ |
| सिलक्यारीची अंधार कोठडी ... ... ... ... | २९ |
| पगडंडीचा प्राणघातकी प्रवास ... ... ... ... | ३० |
| हिमालयांतील फुकट मेणबत्त्या ... ... ... ... | ३१ |
| पहाडी स्त्रिया ... ... ... ... ... | ३२ |
| खरसाळी ... ... ... ... ... | ३४ |
| जन्मोत्री ... ... ... ... ... | ३७ |
| सभ्य गृहस्थ कोण ! ... ... ... ... ... | ४१ |
| उत्तर काशी ... ... .... ... ... | ४३ |
| तिबेटी व्यापाऱ्यांकडे पाहुणचार ... ... ... ... | ४५ |
| कोल्हापूरचे नाराणदास ... ... ... ... | ४७ |
| पहाडी मनुष्याची मुलाखत ... ... ... .... | ४८ |
| राजवाडे व हांजीहांजीखोर रावबहादूर ... ... ... | ४९ |
| तिबेटी लोकांचें गांव हर्सिल ... ... ... ... | ५२ |

# कै० रघुनाथ विठ्ठल खरे.

( शिक्षक, नू. म. वि. हायस्कूल, पुणें. )



हाय ! वरील माझे तरुण मित्र हे गेल्या सप्टेंबरांत ( १९३२ ) एकाएकीं हृदयक्रिया बंद पडून स्वर्गवासी झाले ! सदर पुस्तक तयार करण्याचे कामीं त्यांनीं बहुमोल साह्य केले आहे. पुस्तक प्रकाशित झालेलें पाहण्यास ते राहिले नाहींत ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय.

—मो. गो. काळे,

## कविता.

अंतश्चक्षुपुढें सजीव दिसते मूर्ती तुझी सोज्वल  
वाटे अस्खलित प्रवाह झरतो वाणींतला उज्वल  
—' कर्तृत्वावर–कल्पनेवर नव्या आत्मोन्नती साधणें  
राष्ट्राला स्वकुलास भूषवुनया भूमीवरी नांदणें  
—मित्रा, जो सहवासलाभ मजला होता तुझा लाभला  
व्हावा जो दृढ तोंच निघृर्ण यमें मध्यंतरीं तोडिला  
येती आठवणी जमून हृदयीं कोणास त्या सांगणें  
एकांतीं करतों तुझ्यासह पहा हीं व्यर्थ संभाषणें—

———

## भाग दुसरा


गंगोत्री ... ... ... ... ... ५४
मसुरीहून घरीं ... ... ... ... ... ६४
मुंबई ते कोटद्वार ... ... ... ... ... ६५
नकाशा चारी धाम ... ... ... ... ६९
वेठींची पद्धत ... ... ... ... ... ७०
दरबारी देशभक्त ... ... ... ... ... ७१
पहाडी ब्राह्मणाची मुलाखत ... ... ... ... ७२
पौडी ... ... ... .... ... ... ७५
पौडींतील लब्धप्रतिष्ठित ... ... ... ... ७६
श्रीनगर ... ... ... ... ... .... ७८
रुद्रप्रयाग ... ... ... ... ... ८१
स्वार्थत्यागी शिक्षक व स्वार्थी पालक ... ... ... ८२
भंग्याची मुलाखत ... ... ... ... ... ८५
गुप्त काशी .... ... ... .... ... ८६
त्रिजुगिनारायण ... ... ... ... .... ९०
मुंडकटागणेश ... ... ... ... ... ९१
गौरीकुंड ... ... ... ... ... ९२
रामवाडा ... ... ... ... ... ९३
कुलींची करुण कहाणी ... ... ... ... ९४
केदार नाथ ... ... ... ... ... ९६
उखी मठ ... ... ... ... ... ९८
तुंगनाथाची तक्रार ... ... ... ... ... ९९
माझ्यावाचून जग अडेल ! ... ... ... ... १००
तुंगनाथ ... ... ... ... ... १००
माशांचा हल्ला ... ... ... ... ... १०१
चमोली ... ... ... ... ... १०३
डॉ० काळे ... ... ... ... ... १०४
गोव्याचा प्रोफेसर ... ... ... ... ... १०५
पिपल कोटी ... ... ... ... .... १०६
जोशी मठ ... ... .... ... ... १०९
स्वेच्छाचारी रावळ ... ... ... ... ... ११०
महावीर कारखाना ... ... ... ... ११३
पहाडांतील परी ... ... ... ... .... ११४
भूवैकुंठ बदरीनाथ ... ... ... ... ११५

रावळांची मुलाखत ... ... ... ११९ ते १२२
ब्रह्मकपाल ... ... ... ... ... १२२
पागलपूरचा मूरखलाल ... ... ... ... १२५
अलवारचा संस्थानिक ... ... ... ... १२६
श्रीमदाद्यशंकराचार्य ... ... ... ... १२७
प्राथमिक शिक्षण व नादानसंस्थानिक ... ... ... १२७
घरची खुशाली ... ... ... ... ... १२८
पुण्यांतील कण्वाश्रम ... ... ... ... १२९
कर्णप्रयाग ... ... ... .... ... १३०
जुलमी रिक्रूटभरती .... ... ... ... १३१
देशभक्तांचीं स्मारकें ... ... .... ... १३१
मैल-चौरी ... ... ... ... ... १३२
द्वाराहाट ... ... ... ... ... १३७
राणीखेत ... ... ... ... ... १३८
अलमोडा ... ... ... ... ... १४०
नैनीताल ... ... ... ... ... १४१
कायगोदाम, काशीपूर, रामनगर ... ... ... १४४
मसूरी ... ... ... ... ... १४५
सिमला ... ... ... ... ... १४६
मूर्खांचा बाजार ... ... ... ... ... १४९
तृतीयपंथी देशभक्त ... ... ... ... १५०
१८५७ चें स्वातंत्र्ययुद्ध ... ... ... ... १५२
सांची ... ... ... ... ... १५२
पुण्यास परत ... ... ... ... ... १५४

## हिंदुस्थानची आशा नेपाळ भाग ३ रा.

नेपाळ .... ... ... ... ... १५५
परमहंस प्रज्ञानेश्वर यति ... ... ... ... १५६
प्रवासांतील स्नेही ... ... ... ... ... १५७
माझी किंमत .... ... ... ... ... १५८
नरकांतील संस्थानिक ... ... ... ... १५९
एक ढोंगी देशभक्त ... ... ... ... ... १६०
मोरेश्वर देव ब्रह्मचारी ... ... ... ... १६३
ब्रह्मा मूर्ख महा. ... ... ... ... ... १६५
नेपाळांतील शिक्षण ... ... ... ... १६६

स्थळ प्रत

बद्रीकेदारचे तीन यात्रेकरू.



श्री. गणेश बाळकृष्ण ऊर्फ दादासाहेब गाडगीळ. भिवंडी.    श्री. नारायण सदाशिव ऊर्फ नानासाहेब जोग, वकील·भिवंडी.    श्री. मोरेश्वर गोपाळ काळे, पुणें.

आमची अनास्था ... ... ... ... १६७
लष्करचा उपयोग ... ... ... ... १६७
नेपाळांतील महाराष्ट्रीय ... ... ... ... १६९
नेपाळची राज्यव्यवस्था ... ... ... ... १७१
श्रीमंत नानासाहेब पेशवे ... ... ... ... १७३
इंग्रज वकील ... ... ... ... ... १७४
जरुरीचे हिंदी शब्द ... ... ... ... १७५
नेपाळचे महाराज ... ... ... ... १७६
नेपाळसंबंधीं कांहीं उपयुक्त माहिती ... ... ... १७७
कैलास व मानसयात्रा ... ... ... ... १७८
यात्रेकरूंस कांहीं सूचना ... ... ... ... १८१
गंगोत्री गाणें ... ... ... ... ... १८२
हिमालयांतील सदावर्तें ... ... ... ... १८५
हिमालयांतील चट्टया ... ... ... ... १९२
आमच्या प्रवासाची रोजनिशी ... ... ... ... २००
खर्चाचा तपशील ... ... ... ... २०४
काश्मीर व म्हैसूरवरील अभिप्राय ... ... ... २०५
नकाशा ... ... ... ... ... २०९

नागपूरच्या अभिनव ग्रंथ–मालेनें प्रसिद्ध केलेलीं व इतर सर्व प्रकारचीं मराठी पुस्तकें मिळण्याचें एकच ठिकाण. वाचनालयें व व्यापारी यांस भरपूर कमिशन. उत्तराच्या तिकिटांसह पत्रव्यवहार करावा.

# आमचेकडे मिळणारीं कांहीं उपयुक्त मराठी पुस्तकें.

| | |
|---|---|
| १ अमेरिकेंतील गरीब विद्यार्थी ( स्वामी सत्यदेव ) | ०–६–० |
| २ राजर्षि भीष्म ( स्वामी सत्यदेव ) | ०–५–० |
| ३ आदर्श शिक्षण ( स्वामी सत्यदेव ) | ०–६–० |
| ४ कै० इतिहासाचार्य राजवाडे ( श्री. साने ) | ०–१०–० |
| ५ शासनसंस्था भाग १ ( श्री. हुद्दार ) | ०–१०–० |
| ६ हिंदुसंघटन ( स्वामी श्रद्धानंद ) | १–०–० |
| ७ दे. म. लालालजपतराय (श्री. आपटे) | १–०–० |
| ८ चुकलेला इतिहास. ( श्री. सावळापूरकर ) | १–४–० |
| ९ चातुर्वर्ण्य ( श्री. ओक ) | ०–४–० |
| १० महाराष्ट्राचा स्मृतिकार ( श्री. आपटे ) | ०–१०–० |
| ११ शासनसंस्था भा. २ ( श्री. हुद्दार ) | ०–१२–० |
| १२ सुलभ राजकारणशास्त्र ( ” ) ( शासन संस्थाभाग. १।२ ) | १–४–० |
| १३ स्वातंत्र्य कथा ( श्री. हुद्दार ) | ०–४–० |
| १४ आर्यसमाज व राष्ट्रीय सभा ( भाई परमानंद. ) | ०–६–० |
| १५ माझा काश्मीरचा प्रवास. ( काळे ) | ०–८–० |
| १६ आमची म्हैसूरची सफर. ( काळे ) | ०–४–० |
| १७ माझ्या हिमालयांतील यात्रा ( काळे ) | १ रु. |

एकदम ५ रुपयांचीं पुस्तकें मागविणारास टपालखर्च माफ.

**मोरेश्वर गोपाळ काळे,**
३८२ शनवार पुणें.

स्थळ प्रत
सं. ... नं. ९३६
ता. ~1/4/33

# माझ्या हिमालयांतील यात्रा

ग्रं. नं. 1028
ग्रं. नं. ६०१८

लहानपणीं शाळेंत शिकत असतांना जगांतील सात आश्चर्यांचीं नांवें पाठ केलीं होतीं व त्यांपैकीं दोन (एक **आग्र्याचा ताजमहाल** व दुसरें **हिमालय**पर्वत) आपल्याच देशांतच आहेत, हेंही पाठ केलें होतें. तेव्हांपासून हीं दोन आश्चर्यें तरी एकवार दृष्टीखालून घालावीं अशी फारच इच्छा उत्पन्न झाली होती व परमेश्वरी कृपेनें ती सध्यां पूर्णही झाली आहे. पैकीं पहिलें आश्चर्य आग्र्याचा ताजमहाल हें रेल्वेचें स्टेशनच आहे तेव्हां त्याची माहिती वाचकांस देऊन त्यांचा अमोलिक वेळ मी घेऊं इच्छित नाहीं. मात्र त्यासंबंधीं दोन आश्चर्यकारक गोष्टी सांगतों कीं मजला **आग्र्यास** एक मनुष्य **ताजमहाल** न पाहिलेला भेटला होता व एका गांवांत माझ्या चांगल्या माहिताचे एक कवडीचुंबक लक्षाधीश सावकार आहेत ते **आग्र्यास** गेले होते तेथून ते **ताजमहाल** न पाहातांच परतले. त्यांस विचारिलें असतां ते म्हणाले, ती मशीद, तीस काय पाहावयाचें आहे ? देऊळ असतें तर दर्शनास गेलों असतों. ते देवदर्शन मात्र रोज नेमानें करितात. बिनखर्ची देवदर्शनानें स्वर्ग मिळाल्यास तो मिळविण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. असो.

दुसरें आश्चर्य **हिमालय** पर्वत. तो पाहाण्याचा योग प्रथम १९१७ सालच्या मार्च महिन्यांत आला. त्यांतही एक विघ्नसंतोषी गृहस्थ खो घालण्याच्या विचारांत होते; परंतु मी त्यांचें कांहीं चालू दिलें नाहीं. **पुण्याहून** चालत १९१६ सालीं नववरात निघालों तों मजल दरमजल करीत फेब्रुवारी १९१७ मध्यें **काशीस** पोहोंचलों. तेथें गेल्यानंतर महाशिवरात्रीकरितां **नेपाळमध्यें** जाणाऱ्या मंडळींची गांठ पडली, तेव्हां यात्रेसंबंधीं चवकशीस लागलों. एक जाऊन आलेले गृहस्थ भेटले. त्यांस आपण **नेपाळांत** जाऊन आलों हें एक फारच मोठें व सामान्य जनांस अशक्य असें कृत्य केलें असें वाटत होतें. अर्थात् दुसरें जाऊन आल्यास आपलें महत्त्व कमी होणार म्हणून ते मला म्हणाले," अहो, तुम्ही कसले **नेपाळांत** जातां ? यात्रा किती अवघड ! चढाई भयंकर. पाणी


मिळत नाहीं. आम्ही आपले काटक म्हणूनच जाऊन आलों. भलत्याच भानगडींत पडूं नका. " मीं त्यांस लगेच सांगितलें कीं तुमच्यासारखा अन्नछत्रांत जेवून जन्म काढण्यास सवकलेला मनुष्यही जर **नेपाळची** यात्रा सहज करूं शकतो तर माझ्यासारखा मनुष्य तो खात्रीनें करूं शकेल. तुम्ही छत्रांत जेवतांच आहां, निदान दुसऱ्याचे पाय मागें ओढण्याच्या पापाची त्यांत भर तरी टाकूं नका. माझ्या मतें **हिमालयांतील** कोणतीच यात्रा अशक्य कोटींतील नाहीं. सामान्यतः शेंकडा ८० लोकांस **हिमालयांतील** मुख्य यात्रा थोडया फार त्रासानें करितां येतील. मात्र ह्या यात्रांस एक पैशाची तरी बळकटी पाहिजे अगर शरीरप्रकृति तरी चांगली पाहिजे. त्यांच्या अभावीं मात्र त्रास होतो. तरुणांस शरीरप्रकृति उत्तम असेल, तरच गेलें पाहिजें असें नाहीं; कारण तारुण्यांतील जोम ह्या यात्रांस पुरेसा होतो. कित्येक तरुणांनीं मला जेव्हां जेव्हां मुख्य तयारी काय करूं व विशेषतः कठीण घाट कोणते असा प्रश्न केला, तेव्हां तेव्हां मी त्यांस सांगितलें कीं, प्रथम मनाची पूर्ण तयारी करा व सर्व घाटांत कठीण असा घराच्या दरवाजांत असेला उंबरघाट ओलांडा म्हणजे कांहींहि अशक्य नाहीं. माझ्यासारख्या गरीब माणसास सुद्धां **हिमालयांतील** सर्व यात्रा घडल्या. पहिली **नेपाळची** यात्रा मी अगदीं निर्धन स्थितींत केली. **काश्मीर, डेहराडून, हरिद्वार** ह्या यात्रा फार कमी खर्चांत केल्या व **बद्री, केदार, सिमला, मसुरी, नैनीताल, गंगोत्री, जम्नोत्री** ह्या यात्रा श्री. नानासाहेब जोग वकील ह्यांच्या कृपेमुळें घडल्या. त्यांचें वर्णन मात्र मी उलट्या क्रमानें वाचकांस सादर करणार आहे.

मी गंगोत्रीच्या यात्रेस जाण्याकरितां म्हणून ता. २९।४।३१ रोजीं **पुणें** सोडून **भिवंडीस** गेलों व श्री. **नानासाहेब जोग** वकील ह्यांस भेटून ता. ३०।४।३१ रोजीं रात्रीं ९॥ वाजतां **मुंबई सेंट्रल** स्टेशनवरून बी. बी. सी. आय्. नें **मुंबई** सोडण्याचें निश्चित करून मुंबईस प्रवासांत लागणाऱ्या सामानाच्या खरेदीकरितां आलों. औषधाच्या दुकानांतून इसानोफेल १ बाटली, कोयनेल २ बाटल्या, शौचास साफ होणाऱ्या व बंद होणाऱ्या गोळ्या वगैरे औषधें खरेदी केलीं. गरम हातमोजे, पायमोजे, मेणकापड, कॅनव्हासची पाण्याकरितां पिशवी, गरम माकडटोपी, बॅन्डेज, रबरी बूट वगैरे जिन्नसही घेतले. स्वयंपाकाकरितां अल्युमिनियमचीं दोघांचा भातभाजीचा स्वयंपाक होईल अशीं ३ पातेलीं, तीन झांकण्या, वाट्या वगैरे भांडींहि घेतलीं. तिखट, मसाला, मेतकूट,

लोणचें वगैरे खाण्याचे जिन्नस व कांहीं दिवस पुरण्याइतकें फराळाचें सामान घेऊन ठेवलें. **हिमालयांत** पाऊस, थंडी, वारा व ऊन ह्यांचा ताप केव्हां होईल ह्याचा नियम नसल्यामुळें सर्वांच्यापासून बचावाचीं साधनें जवळ बाळगावीं लागतात. पावसाकरितां रेनकोट, घोंगडी, मेणकापड व छत्री ह्यांपैकीं कांहीं अगर सर्व जवळ असावीं. पांघरण्याकरितां २ ब्लँकेटें बरोबर घ्यावीं, कारण थंडीचें मान दिवसेंदिवस वाढतें असतें. पायांत घालण्याकरितां रबरी बूट खरेदी करावा. तसेंच बर्फावरून चालण्याकरितां एक निमुळत्या लोखंडी शेंबीची काठीही खरेदी करावी. ही मात्र हरिद्वारास मिळते. त्याचप्रमाणें **मुंबईहून** निघतांना थंड पाण्याकरितां मातीचा खुजा बरोबर जरूर घ्यावा. उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळें गाडींत तहानेनें जीव व्याकुळ होतो. स्टेशनवर मिळणारें पाणी सर्व ठिकाणीं थंड असतेंच असें नाहीं व पाण्याकरितां लोकांची गर्दी होत असल्यामुळें तें मिळतही नाहीं. मिळेल तेव्हां खुजांत पाणी भरून ठेवावें व सारखें थोडें थोडें पाणी प्यावें म्हणजे उन्हाळा बाधत नाहीं. आयत्या वेळीं श्री. **नानासाहेब** हे ता. २९ रोजीच आजारी पडले म्हणून बेत लांबला व आम्हीं ( मी व श्री. **नानासाहेब जोग वकील भिवंडी** अशा दोघांनीं ) ता. ४।५।३१ रोजीं सोमवारीं रात्रीं ९॥ वाजतां **मुंबई** सोडली. गाडी चांगली नसल्यामुळें बुधवारीं सकाळीं **दिल्लीस** पोहोंचलों. येथें गाडी बदलावी लागते.

गाडींत फार त्रास झाला असल्यास येथें एकादा दिवस विश्रांति घ्यावी. **दिल्लीस** महाराष्ट्रीय मंडळींची उतरण्याची फार चांगली सोय तेथील महाराष्ट्रीयांनीं केली आहे. मोठ्या **दिल्ली** स्टेशनपासून सुमारें अर्ध्या मैलावर **बर्न ब्यास्टिन रोड** नांवाच्या रस्त्यावर **महाराष्ट्रीय स्नेहसंवर्धक समाज** ह्या नांवाचें ठिकाण आहे. टांगा केल्यास ४ आणे व चित्रांत दाखविल्याप्रमाणें एक्का केल्यास २ आणे भाडें पडतें. पत्ता लक्षांत ठेवून ह्याच ठिकाणीं जावें. गैरमाहितगार माणसांस फसविण्याकरितां प्रयत्न करणारे पुष्कळ लोक **दिल्लीस** भेटतात त्यांची मदत नाकारावी. समाजाजवळच एका महाराष्ट्रीय गृहस्थांनीं एक खाणावळ उघडली आहे. त्यामुळें आपण आपल्याच भागांत आहोंत असा भास येथें आल्यानंतर होतो. मराठी वर्तमानपत्रें येथें वाचावयास मिळतात. महाराष्ट्रांतून आलेली पुष्कळ मंडळी भेटतात. त्यामुळें पुढच्या प्रवासास सोबत


मिळण्याचाही संभव असतो. १ दिवस **दिल्लीस** राहून किल्ला, **जुम्मामशीद, चांदणीचौक**, वगैरे ठिकाणें पाहून दिल्लीहून **हरिद्वारलाच** जाणाऱ्या गाडींत बसावें म्हणजे चढण्याउतरण्याचा त्रास होत नाहीं. आम्हीं ५।७ वेळां **दिल्ली** पाहिली असल्यामुळें उतरण्याच्या भानगडींत पडलों नाहीं. मात्र आमची गाडी सुटण्यास अवकाश असल्यामुळें स्टेशनच्या बाहेर जाऊन भात जेऊन आलों. गाडींत दोन दिवस पुऱ्याच चालल्या होत्या. **दिल्लीस** स्टेशनच्या बाहेर किर-कोळ भातभाजी वगैरे जिन्नस विकत मिळतात. भात खाण्याची संवय असलेल्या मंडळींचे **उत्तर हिंदुस्थानांत** थोडे हाल होतात. वाटेल त्याच्या हातचें



दिल्लीचा एक्का.

खाण्याची तयारी असल्यास मात्र हाल होत नाहींत; परंतु यात्रेस जाणारे लोक दुसऱ्याच्या हातचें ( ब्राह्मणाच्या सुद्धां ) खाण्यास तयार नसतात. कारण यात्रेस जाऊन परान्न कसें घ्यावयाचें, ते अब्राह्मणाच्या हातचें कसचें खातात ! मग त्यांचे खाण्यापिण्याचे हाल होतात, प्रकृति बिघडते, व प्रसंगीं प्राणासही मुकावें लागतें; परंतु माझी कोठेंच गैरसोय होत नसे. असो तिकीट एकदम **हरिद्वारचेंच** घेतलें होतें; परंतु सकाळीं जाणारी गाडी एकदम **हरिद्वारला** जाणारी नव्हती म्हणून आम्हांस प्रथम **दिल्लीहून सहराणपूरला** उतरावें लागलें.व तेथून गाडी बदलून लकसरच्या गाडींत बसलों.लकसरला गाडी बदलावी

लागते. येथें २॥ तास थांबावें लागलें. लकसर हें एक लहानसेंच गांव आहे, परंतु येथें धर्मशाळा फार सोइस्कर व स्टेशनच्या जवळच आहे. तसेंच तद्देशियि ब्राह्मणांच्या खाणावळीहि आहेत. मीं त्यांत जाऊन भोजन उरकलें व **हरिद्वारच्या** गाडींत येऊन बसलों. येथून **हरिद्वार** १७ मैल आहे. संध्याकाळीं ५ वाजतां हरिद्वार स्टेशनवर येऊन सुखरूप पोहोंचलों. तोंच पाऊस पडण्यास सुरवात झाली. जिकडे तिकडे पाणीच पाणी झालें गाडींत २ दिवस उन्हाचा फार त्रास झाला होता, म्हणून त्या पावसापासून आनंदच झाला टांगा करून प्रथम **रोहतकच्या** धर्मशाळेंत गेलों. रितीप्रमाणें चौकीदारानें जाग




**मसुरी व टेहरीमधील यमुनेवरील दोरीचा झुलता पूल.**

भरपूर असूनही जागा नाहीं म्हणून स्वच्छ सांगून पाहिलें. माझा त्याजपाशीं भांडण करण्याचा विचार होता. कारण १९२८ व १९३० सालीं दोन्ही वेळां भांडण करून रस्त्यावर लोक जमवून, मीं ह्याच धर्मशाळेंत जागा मिळविली होती. परंतु समोरच असलेल्या **बिकानेरच्या** धर्मशाळेंत जागा मिळते कीं काय ह्या तपासास श्री. **नानासाहेब** गेले व तेथें जागाही मिळाली. म्हणून भांडणाचा बेत रहित केला व **बिकानेरच्या** धर्मशाळेंत बिऱ्हाड लावलें.

## हरिद्वार

**उत्तर हिंदुस्थानांत** रेल्वेचें स्टेशन असून गंगेच्या **कांठावर**

**हिमालयाच्या** पायथ्याशीं वसलेलें असें हेंच एक ठिकाण आहे. रोज हजारों यात्रेकरू हें ठिकाण पाहण्याकरितां **हिंदुस्थानच्या** निरनिराळ्या भागांतून येथे येतात. त्यांना आपल्या घरी नेऊन लुबाडण्याकरिता पंड्यांची स्टेशनवर गर्दी झालेली असते. " कहांके रहिनेवाले " ह्या प्रश्नाचें उत्तर देतां देतां जीव थकून जातो. **हरिद्वार हें हिमालयाच्या** पायथ्याशीं आहे. येथून सपाट प्रदेश सुरू होतो. त्यापूर्वी सुमारें २०० मैल **गंगा** पर्वतप्रदेशांतून वाहात येत असल्यामुळें तिच्या पाण्यास फार वेग असतो. प्रवाहांत स्नान करणें धोक्याचें असतें म्हणून येथें



हिमालयांतील सामान वाहणारे कुली.

**गंगेच्या** पात्रांतच एक मोठें सपाट बेट बांधलें आहे व पाण्याच्या प्रवाहास थोडा अडथळा केला आहे म्हणून मुख्य ठिकाण जें हरीची पायरी त्या ठिकाणीं पाण्यास ओढ नाहीं. इतर ठिकाणीं स्नान करणें असल्यास घाटांवर साखळदंड ठोकून ठेविले आहेत त्यांस धरून स्नान करावें लागतें. **गंगेस** जिकडे तिकडे घाट बांधले असून त्यावर कथा-कीर्तन, पुराण वगैरे कार्यक्रम इतके चाललेले असतात कीं तेथून हलूंच नये असें वाटतें. संध्याकाळीं **गंगेची** आरती होते. त्यावेळीं पानांच्या द्रोणांत फुलें घालून त्यावर दिवे लावून ते द्रोण हजारों

यात्रेकरू पाण्यांत सोडतात, त्यामुळें जिकडे तिकडे दिवेच दिवे दिसतात. आरती संपल्यावर सर्व यात्रेकरू यथाशक्ति पैसे पुजाऱ्याच्या तबकांत टाकीत होते. पुजारी तबकांतील तांबड्या रंगाचे पैसे उचलून घेई व पांढऱ्या रंगाचे ( रुपये वगैरे ) पैसे तसेच तबकांत ठेवून देई. परंतु जर कोणी तबकांत पै टाकिली तर मात्र त्यास फार राग येई व तो ती पै **गंगेंत** भिरकावून देई व यात्रेकरूस शिव्या देई. त्याच्या ह्या क्रमाचा समाचार घेण्यास तयार असणारा एकही इसम तेथें दिसला नाहीं. जो तो जाऊं द्या, परमेश्वराची मर्जी असेल तसें होईल असें म्हणून पुढचा रस्ता काढीत होता. **हरिद्वार**पासूनच गंगानदीचा कालवा काढला आहे. जवळच **कनखल, ऋषिकुल, गुरुकुल** वगैरे ठिकाणें पाहण्यासारखीं आहेत. असो. आमचा ता. ७।५।३१ हा संपूर्ण दिवस कुली हुडकण्यांत गेला. कारण पहाडी यात्रा खांद्यावर सामान घेऊन करणें फार कठीण. नुसती चालत करणेंही कठीण आहे. आम्हांस दोन कुलींची जरूर होती—१ सामान घेण्यास व दुसरा श्री. **नानासाहेब** यांस पाठीवर घेण्यास.

**हिमालयांतील** सर्व यात्रांत **जम्नोत्रीची** यात्रा अत्यंत कठीण. तिच्या खालोखाल क्रमानें **गंगोत्री, केदारनाथ** व **बद्रीनाथ**, ह्या यात्रा कठीण आहेत. सामान्यतः अशी समजूत आढळून येते कीं हीं चारी ठिकाणें एकमेकांच्या जवळ असावीं; परंतु ह्यांतील कोणत्याहि दोन ठिकाणांमध्यें १०० मैलांपेक्षां कमी अंतर नाहीं. ह्या चारी ठिकाणची यात्रा एकदम करणें असल्यास कमींतकमी २ महिन्यांची फुरसद पाहिजे. जास्त असल्यास चांगलें. सर्व यात्रा एकाच वर्षी न करितां २ हप्त्यांनीं केल्यास जास्त सुखावह होतें.

आम्हीं गेल्या वर्षी **बद्रीकेदारची** यात्रा केली व चालू सालीं **गंगोत्री-जम्नोत्रीची** यात्रा केली. **हरिद्वारला** रोजीं सरासरी ३००० यात्रेकरू येतात, त्यांपैकीं फक्त २५० यात्रेकरू **बद्रीनाथच्या** यात्रेस, २०० **केदारनाथच्या** यात्रेस, ५० **गंगोत्रीच्या** यात्रेस व सुमारें १५ **यमुनोत्तरीच्या** यात्रेस जातात व त्यांपैकीं शेंकडा ६० साधूच असतात. इकडे जाणाऱ्या यात्रेकरूंचें प्रमाण इतकें थोडें असल्यामुळें **यमुनोत्तरी** पाहून आलेले कुलीच आढळतना. २।४ आढळले ते भलतीच मजूरी मागूं लागले. कुली मिळवून देणाऱ्या “ कुली एजन्सी ” नांवाच्या संस्था येथें आहेत; परंतु

त्यांच्यामार्फतें कुली महागच मिळतात, म्हणून आम्ही स्वतंत्रपणेंच कुली पहाण्याचें ठरविलें. संध्याकाळपर्यंत ज्यानें १५ वर्षांपूर्वी एकदांच फक्त **गंगोत्री-जम्नोत्रीची** फेरी केली होती, असा कुली आमच्या अंदाजपत्रकांत दाखल झालेल्या पैशास मिळाला. त्यानें **श्री. नानासाहेब** यांस पाठीवर घ्यावयाचें, त्यांच्या २ लहान भावांनीं ( ज्यांचीं वयें सुमारें १७।१८ होतीं ) सर्व सामानाचें २ भाग करून निम्में निम्में सामान घ्यावयाचें व तिघांना उक्ते मसुरीपर्यंत ८५ रु. मजुरीदाखल द्यावयाचे असा **हरिद्वार** येथें तोंडीच करार झाला. कांहीं लोक येथेंहि लेखी करार करतात. कारण पुढें कुली भानगड करण्याचा संभव असतो. परंतु आम्ही माहीतगार असल्यामुळें आम्हांस लेखी कराराची जरूरी भासली नाहीं. शुक्रवार ता. ८ रोजी सकाळीं कुलीसुद्धां **मोटारनें हरिद्वारला** राम राम ठोकून निघालों तों **हिमालयांतील** लहान लहान नद्या, ओढे ओलांडीत ओलांडीत **हृषिकेशला** येऊन दाखल झालों. ह्या ठिकाणीं येण्यास आगगाडी सुद्धां आहे. परंतु मो[illegible]क्षां आगगाडीनें येणें महाग पडतें, म्हणून बहुतेक यात्रेकरू मोटारनेंच [illegible] येथें धर्मशाळेचा त्रास नाहीं. येथें सुप्रसिद्ध **बाबा कालीकमलीवाले** [illegible]नाथ ह्यांची फार मोठी सर्व सोईंनीं सुसज्ज अशी धर्मशाळा असून धर्मशाळेचे नोकर यात्रेकरूंच्या स्वागताकरितां दारापाशीं उभेच असतात. येथें हरिद्वारप्रमाणेंच ब्राह्मणाच्या खाणावळी वगैरे असल्यामुळें भोजन तयार करण्याच्या भानगडींत पडलों नाहीं. भोजन करून धर्मशाळेंत आलों. ह्या प्रांतांत **बाबा कालीकमलीवाले** यांचें नांव आबालवृद्धांस माहित आहे.

बाबाजींचें खरें नांव स्वामी **विशुद्धानंदजी** असें होतें, तरीही ते एका काळ्या घोंगडीशिवाय दुसऱ्या कशाचीही अपेक्षा न करितां फिरत असत म्हणून त्यांस सर्व लोक काली**कमलीवाले बाबा** ह्या नांवानेंच ओळखतात. त्यांनीं इ. स. १८८४ मध्यें **गंगोत्री, जम्नोत्री, केदार, बद्री** ह्या यात्रा प्रथम केल्या त्यावेळीं रस्ते चांगले नव्हते. वाटेंत शिधा मिळत नसे. पाण्याचे दुर्भिक्ष असे, म्हणून यात्रेकरूंचे फार हाल होत. ही परिस्थिति सुधारण्याच्या उद्योगास बाबाजी लागले. इतर साधूंप्रमाणें स्वतःच्या देहाचें सार्थक झालें, बस झालें, अशा स्वार्थी वृत्तीचे ते नसल्यामुळें त्यांनीं यात्रेकरूंचे हाल दूर करण्याचा निश्चय केला व यात्रेस येणाऱ्या उदार धनिकांकडून पैसे घेऊन यात्रेकरूंकरितां

नाना प्रकारच्या सोई केल्या. **बाबाजींच्या** आगमनापूर्वी **हिमालयांतील** यात्रा करणारांस अतिशय कष्ट सोसावे लागत. प्रथम त्यांनीं **हृषिकेश** येथें **धर्मशाळा** व **अन्नछत्र** यांची स्थापना केली. आज बाबाजींच्या नांवाचीं ५७ सदावर्तें, ६५ **धर्मशाळा**, १२ **दवाखाने**, ४२ **पाणपोया**, ६ **गोशाळा** व ३ **पाठशाळा** आहेत. बाबाजींच्या पश्चात् त्यांचे शिष्य **स्वामी रामनाथजी**




**श्री वैकुंठवासी सुप्रसिद्ध बाबा कालीकमलीवाले**
**स्वामी विशुद्धानंदजी.**

हेही निःस्वार्थी वृत्तीनें ह्या सर्वांची व्यवस्था पाहात असत. त्यांचा काळ इ. स. १९२६ मध्यें झाला. त्यांच्या मागून ही संस्था **बाबा मणिरामजी** यांजकडे आली. त्यांनीं ही संस्था एकाच्या मालकाची होऊं नये म्हणून सर्व इष्टेटीचा **ट्रस्ट** करून टाकिला आहे व ट्रस्टी म्हणून मोठया वजनदार व निःस्वार्थी लोकांची नेमणूक केली आहे.

मला वाटतें त्यांच्या सर्व संस्थांचा दरमहाचा खर्च लाख, दीड लाख तरी असेल. धर्मशाळेंत ७।८ कारकून आलेल्या पैशांचा हिशेब करीत बसले होते. ज्या यात्रेकरूंस **हिमालयांतील** यात्रा तर करावयाच्या आहेत, परंतु जवळ पैसा तर नाहीं, त्यांस येथून निघाल्यापासून परत येऊन पोहोंचेपर्यंत वाटेंत १५।२० मैलांवर असलेल्या गांवीं सदावर्तें ( साधारण पोटास

पुरेल इतका शिधा ) मिळण्याकारितां चिठ्ठ्या दिल्या जातात, व त्या त्या ठिकाणीं चिठ्ठी देऊन विनतकार फुकट शिधा मिळतो. मात्र हिमालयांत सर्व जिन्नस




महाग असतात. मिळालेला शिधा कधीं अपुरा पडण्याचा संभव असतो, म्हणून यात्रेकरूंपाशीं स्वतःचे निदान „ १५ रु. तरी असल्याशिवाय चिठ्ठ्या देत नाहींत, त्यामुळें यात्रेकरू उपासानें मरण्याची फारशी भीति उरत नाहीं. वाटेंत कोणत्या

१८.३.३३


ठिकाणीं काय सदावर्त मिळतें ह्यासंबंधाची यादी **हृषिकेशला** पत्रव्यवहार केल्यास मिळूं शकते. वाटेंत कोणत्या गोष्टीस जपलें पाहिजे त्यासंबंधीं सूचना येथें मिळतात. मुख्य मुख्य औषधें फुकट मिळतात. बरोबर पैसे असल्यास ते चोरीस जाण्याचा संभव असतो म्हणून **हृषिकेशला** पैसे ठेवले असतां ते वाटेंतील ठराविक ठिकाणीं मिळण्याची सोयहि ह्या संस्थेमार्फत होते; अशी ही संस्था निव्वळ लोकाश्रयावर चालली आहे, ही किती आश्चर्याची गोष्ट आहे ?

**हृषिकेश** हें ठिकाण इतर अनेक दृष्टींनींही फार महत्त्वाचें आहे. ह्या ठिकाणीं **काली कमलीवाल्यांच्या** अन्नछत्राशिवाय **सिंधपंजाब-क्षेत्र** नांवाचें एक मोठें अन्नछत्र असून इतरही बरींच लहान लहान अन्नछत्रें आहेत. गंगानदीच्या दोन्ही तीरांवर गर्द झाडीनें भरलेला प्रदेश असून त्यास तपोवन अशी संज्ञा आहे. त्यांत थोड्या थोड्या अंतरावर हजारों झोंपड्या असून त्यांत साधु नांवाचे लोक तपश्चर्या करीत बसलेले आढळून येतात. मात्र ह्या लोकांस पाहून एक प्रकारचा उद्वेग उत्पन्न होतो. ह्यांचें लक्ष स्वतःच्या देहाचें सार्थक करून घेण्याकडे असतें. अर्थात् तो त्यांचा स्वार्थच होय. अशा लोकांस साधू कसें म्हणतात तेंच कांहीं कळत नाहीं. हिंदुस्थानांत आज एकंदर ५२ लाख साधू जनतेच्या श्रमावर पोसले जात आहेत. ते जर गरिबांचे कष्ट दूर करण्याच्या कामाकडे लक्ष देतील तर हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा दिवस नजीक आल्याखेरीज खात्रीनें राहणार नाहीं. एवींतेवीं ते जनतेवर फुकट भार टाकतातच; मग त्यांजकडून कामाची मागणी जनतेनें कां करूं नये ? हिंदुस्थानांत धर्मादाय पैसा पुष्कळ खर्च होतो; परंतु त्यांतला शें.। ९० भाग अनाठायीं खर्च होतो. हा एक आमच्या देशास लागलेला रोगच आहे यांत संशय नाहीं. ह्या साधूंच्या गळीं

**न त्वहम् कामये राज्यम् ॥**
**न स्वर्गम् न पुनर्भवम् ॥**
**कामये दुःखतप्तानाम् ॥**
**प्राणिनाम् आर्तिनाशनम् ॥ १ ॥**

ह्या श्लोकांतील तत्त्व जर उतरेल तर देशाचें कितीतरी कल्याण होईल परंतु त्याकरितां धर्मांत क्रांति घडवून आणणाऱ्या पुरुषांची जरूरी आहे. अ

छत्रांत फुकट जेवावयास मिळतें तेथें जेवावें, झोंपडींत राहावें, गांजा ओढावा, वाटल्यास थोडा वेळ नामस्मरण करावें, असल्या लोकांचा भरणाच येथें फार आहे. कांहीं लोकांनीं जन्मभर सरकारी नौकरी करून अनेक पापें करून आतां संन्यास घेतला आहे व तेही येथें येऊन काळ काढीत आहेत. त्यांतील एका संन्याशाकडे बोट दाखवून एक गृहस्थ अगदीं आश्चर्यचकित झाल्यासारखे होऊन म्हणाले, अहो ते पाहिलेत कां, स्वामी "**गुलामानंद?**" हे पूर्वी डेप्युटी कलेक्टर होते परंतु आतां त्यांनीं पेन्शन् सोडून दिलें आहे. कारण त्यांनीं नांव बदलल्यामुळें पूर्वीची सही करावयाची नाहीं असें त्यांनीं ठरविलें आहे व आतां एका छत्रांत बशिल्याची चिठ्ठी मिळवून ते हरिहरी म्हणत काळ



**श्रीमंत यात्रेकरूकरितां उपयोगांत येणारें 'दांडी' नांवाचें वाहान.**

काढीत आहेत. मुलगा कर्तासवर्ता आहे, त्याच्याकडे जातसुद्धां नाहींत! मी म्हणालों "अहो ह्यांत आश्चर्य कसलें? नौकरींत अनेक पापें केलीं त्यामुळें मनःस्वास्थ्य नाहींसें झालें; तेव्हां तुमच्यासारख्या भावड्या लोकांनीं तरी चांगलें म्हणावें म्हणून हीं भगवीं वस्त्रें परिधान केलीं आहेत. ह्यांनीं जर मिळालेलें पेन्शन गरिबांच्या दुःखनिवारणाच्या कामीं खर्च केलें असतें व काळाचा व्ययही एकाद्या सार्वजनिक संस्थेंत फुकट काम करण्यांत केला असता, तर खात्रीनें त्यांच्या पापाचें क्षालन झालें असतें. आतां तोही मार्ग खुंटला आहे.

पेन्शन सोडून दिल्यामुळें सरकारची मात्र तिजोरी निष्कारण भरली जाते. मी १९१६ सालीं साधूच्याच वेषानें हिंदुस्थानभर फिरत होतों; त्यावेळीं हें वेषांतर केलेले अनेक लोक माझ्या नजरेस पडले. परंतु त्यांतील हजारीं एक तरी खरा साधु असेल तर शपथ! वेष न बदलतां संसारांत राहून ज्यांची वृत्ति साधूची आहे, असे सज्जन लोक मात्र गरीब लोकांत पुष्कळ आढळले. श्रीमंतांत त्यांचा पूर्ण अभाव दिसला." असो. **हृषिकेशपासून गंगानदीच्या** काठानें सुमारें १।। मैल गेल्यानंतर **मौनीकीरेती** नांवाचें ठिकाण लागतें. ह्या ठिकाणीं पूर्वी **रैम्य** मुनींनीं मौन व्रत धारण करून तपश्चर्या केली होती, म्हणून ह्या ठिकाणास **मौनीकीरेती** म्हणतात. येथें **दशरथाचा** मुलगा **शत्रुघ्न** ह्यानें तपश्चर्या केल्याचा पुराणांतरीं उल्लेख आहे. तसेच आधुनिक काळांतील सुप्रसिद्ध **स्वामी रामतीर्थ** हेही ह्या ठिकाणीं कांहीं दिवस राहात असत. म्हणून येथें **शत्रुघ्नाचें** मंदीर आहे व **स्वामी रामतीर्थांचें** स्मारक म्हणून एक मोठें **रामाश्रम** ह्या नांवाचें संस्कृत वाचनालयही येथें आहे. येथून यात्रेकरू गंगानदी नावेनें ओलांडून पलीकडे गेला म्हणजे तेथें एक **स्वर्गाश्रम** नांवाचें ठिकाण लागतें. ह्या ठिकाणीं एक मोठें अन्नछत्र असून तेथें तपोवनांत राहाणारे साधू भोजनाकरितां येतात. स्वर्गाश्रम सोडून गंगानदीच्या किनाऱ्यानें सुमारें १।। मैल चालत गेल्यानंतर सुप्रसिद्ध **लक्ष्मण झुला** नांवाचा गंगेवर बांधलेला तारांचा झुलता पूल येतो ह्या ठिकाणीं दोहों कांठावर असलेल्या गर्द झाडीमधून नागमोडीप्रमाणें वाहाणारें तें गंगेचें पात्र पाहून मन अतिशय आनंदित होतें. पुलावरून गंगा ओलांडून अलीकडच्या तीरावर आल्यानंतर **लक्ष्मणाचें देऊळ** लागतें. चौदा वर्षें रामाबरोबर वनवास भोगून कंटाळल्यानंतर विश्रांति मिळवावी व तपश्चर्या करावी ह्या दोन्ही हेतूंनीं लक्ष्मणानें ह्या ठिकाणीं वास्तव्य केलें म्हणून ह्या ठिकाणास **लक्ष्मण झूला** म्हणतात.

हें ठिकाण खरोखरच फार रम्य आहे. प्रत्येकानें एकवार हें ठिकाण जरूर पाहावें. **लक्ष्मण झूला** ओलांडून पलीकडे गेल्यानतर पायवाट लागते. **लक्ष्मण झूल्यापर्यंत** मोटारची सडक आहे, म्हणून सुखाचा गाडीघोड्याचा प्रवास करणारे यात्रेकरू येथपर्यंत येऊन परत फिरतात. **लक्ष्मण झूल्यावरून** पायवाटेनें बहुतेक यात्रेकरू **देवप्रयाग** येथें जातात येथून **देवप्रयाग** ५२ मैल आहे. तेथून दोन रस्ते फुटतात. **गंगोत्री-जम्नोत्री**कडे जाणारे यात्रेकरू **टिहरीस**

जातात व **बद्रीकेदारकडे** जाणारे यात्रेकरू **श्रीनगरास** ( हें काश्मीर-मधील नव्हे. ) जातात. **देवप्रयागहून टिहरी** ३४ मैल आहे. आम्हांस **टिहरीस** जावयाचें होतें. परंतु दिवस थोडे असल्यामुळें चालण्यांत थोडी वचत होणारा नवीनच रस्ता आम्हीं धरला. आम्ही **मौनीकीरेती** येथें जाऊन तेथून **नरेंद्रनगरच्या** रस्त्यास लागलों. **मौनिकीरेती** येथें सुमारें ३॥ वाजतां येऊन पोहोंचलों. येथून **टिहरी** संस्थानची हद्द सुरू होते. **हृषिकेश** हें मात्र ब्रिटिश हद्दींत आहे. येथें संस्थानचें एक जकात ऑफिस आहे. ह्या ठिकाणीं आम्हांस कुलींशीं लेखी करार करावा लागला. **बद्रीनाथ** व **केदारनाथाची** यात्रा आम्हीं गेल्याच वर्षी केली होती. तेथें आमचा करार अवघ्या आठ-आण्यांत झाला होता. परंतु येथें मात्र करारादाखल कुलीस ५ रु. ५ आणे भरावे लागले. **बद्रीकेदार** हीं ठिकाणें ब्रिटिश हद्दींत येतात. तेथें जितके पैसे लागले, त्याच्या दसपट पैसे संस्थानांतील करारास लागले ! व हेही पैसे संस्थानिक मोठे कावेबाज असल्याकारणानें कुलींकडून घेतले जातात. कारण ' **देवो दुर्बलघातकः** ' ह्या म्हणीप्रमाणें त्या बिचाऱ्यांस संस्थानांत राहावयाचें असतें. ते तक्रार कशी करणार ? यात्रेकरूकडे मागितले असतां तो कदाचित् विचारूं शकेल कीं रुपयास १ आणा कर घेतां त्याचा मोबदला आम्हांस काय देतां ? म्हणून गरीब विचाऱ्या कुलींच्या पोटावर पाय देऊन संस्थानिक पैसे काढतो. कांहीं कुलींनीं मजला मी प्रवासाचीं टिपणें घेत असतांना, काकुळतीस येऊन सांगितलें सुद्धां कीं, तुम्ही देशांत गेल्यावर आमच्याकडून घेतल्या जाणाऱ्या ह्या जुलमी कराची हकीकत **महात्मा गांधींच्या** कानावर घाला, म्हणजे ते हा दूर करण्याचा प्रयत्न करतील. मीं त्यास ह्या गोष्टीस प्रसिद्धि देण्याचें अभिवचन दिलें. व पुढें कोणीतरी अधिकारी पुरुष हें काम करील, असेंही सांगितलें. जुलमी संस्थानिक हे ब्रिटिश सरकारचें राज्य टिकण्याच्या दृष्टीनें त्यांस आवश्यकच आहेत. त्याशिवाय त्यांस " तुमच्या जातच्या संस्थानिकांपेक्षां आम्ही किती तरी चांगले आहों तें पहा, मग तुम्ही आमच्याविरुद्ध ओरड कां करितां ? " असें हिंदी प्रजेस कसें हिणवतां येईल ? परंतु इंग्रजांस ह्याची माहिती अद्याप झाली नाहीं कीं, हिंदुस्थानांतील बहुजनसमाज त्यांच्याबरोबर ह्या संस्थानिकांचेंही उच्चाटण करण्यास तयार होत चालला आहे ! कारण हिंदुस्थानच्या लोकांची दृष्टि आतां जगाच्या राज्यकारभाराकडे वळली आहे. ते ब्रिटिशांच्या राज्याची जगांतील इतर स्वतंत्र देशांतील राज्यांशीं तुलना करितात. संस्थानिकांशीं तुलना करीतच नाहींत.

**मौनीकीरेती** येथून **नरेंद्रनगरला** जाण्यास दोन रस्ते आहेत. एक मोटारचा रस्ता आहे. त्यानें **नरेंद्रनगर** १० मैल पडतें. पायवाटेनें तें ५ मैल पडतें. वरती मोटारी जाऊं शकतात; परंतु **नरेंद्रनगर** ते हृषिकेश अशी मोटार सर्व्हिस नसल्यामुळें जाणें असल्यास स्वतंत्र मोटार काढून जावें लागतें. तें भारी खर्चाचें असल्यामुळें आम्ही पायवाटेनें चढण्यास आरंभ केला. रस्ता चांगला रुंद नसून कांहीं ठिकाणीं २ तें ४ फूट तर कांहीं ठिकाणीं ½ फुटापर्यंत अरुंद रस्ता आहे. सारखा पांच मैल चढावच चढावा लागतो. सुमारें २ मैल चालल्यानंतर मोठ्या पावसास सुरवात झाली. वाऱ्यामुळें खालीं पडतो कीं काय अशी भीति वाटूं लागली. पावसानें भिजून चिंब झालों. परंतु सुमारें १५।२० मिनिटांत पाऊस थांबला, म्हणून थोडा आराम वाटला. कारण प्रवासाचा पहिला दिवस तरी सुखानें पार पडतो कीं नाहीं अशी शंका उत्पन्न झाली. आणखी सुमारें २ मैल चढल्यानंतर मात्र जिकडेतिकडे हिरवीगार झाडें असून वळणावळणांनीं वाहाणारें गंगानदीचें सुरम्य पात्र दिसूं लागलें. आल्हादकारक वारा सुटला. त्यामुळें सर्व ' शीण ' नाहींसा झाला. ह्या डोंगरावर पिण्याच्या पाण्याचा मोठा दुष्काळ आहे. परंतु राजानें मौनिकीरेतीपासून सुमारें ३ मैलांवर एक पाणपोई उघडल्यामुळें प्रवास बराच सुखद होतो. सुमारें ७ वाजतां नरेंद्रनगराजवळ येऊन पोहोंचलों. अगदीं आरंभींच गावांत शिरतांना आम्हांस T. G. S. धर्मशाळा अशी पाटी आढळली. आंत जाऊन पाहातों तों धर्मशाळा सरासरी १५ प्रवाशांच्या सोईची. तर आंत अगोदरच ३० प्रवाशी बसलेले. अर्थात् धर्मशाळेचा नाद सोडून आम्ही गांवांत गेलों. गांव बांधण्याचें काम अजून सुरूच आहे. बरेचसे लोक लहानलहान झोपड्यांत राहिलेले आढळले. उतरण्यास योग्य असें घर कोठेंच दिसेना. कारण हें गांव वसविण्यास हल्लींच्या राजानें सुरवात केली आहे व त्यास आपलें नांव दिलें आहे. **टिहरीच्या** राजांस आपल्या नांवांचीं गांवें वसविण्याचें मोठें वेड आहे. एका राजानें **कीर्तिनगर** तर दुसऱ्यानें **प्रतापनगर**, तर सध्यांच्या राजानें ( **नरेंद्रशहानें** ) **नरेंद्रनगर** वसविण्याचें ठरविलें आहे. त्याप्रमाणें सरकारी कामाकरितां लागणाऱ्या इमारती बांधल्या व त्यांत ऑफिसें आणून भरलीं. श्रीमंतांनीं वाड्यांतून ठाणें दिलें. गरीब नोकर लोक पत्र्यांच्या झोपडींत अगर काटक्यांच्या खोपटींत काळ कंठूं लागले. त्यांनाच पुरेशी ( निवाऱ्याची ) जागा नाहीं ते आम्हांस कोठून देणार ? सरते-

शेवटीं इंग्रजीचा उपयोग करण्याचें ठरवून एका पोलिसांकरितां बांधलेल्या इमारतींत वकीलसाहेब शिरले. एक मोठे ऑफिसर वर्तमानपत्र वाचीत बसले होते. त्यांच्या कानावर आमच्या जागेच्या शोधाचें वर्तमान घातलें. ते म्हणाले दुसरे कोठेंही जागा मिळणें शक्य नाहीं. ह्याच खोलींत या. त्यांचें नांव श्री. **लक्ष्मीनारायण** असून ते **टिहरी** संस्थानचे इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस होत, असें मागाहून आम्हांस समजलें. आम्ही ओले कपडे वाळत टाकले. समोरच एक रोटीवाल्याचें दुकान होतें त्यांत जाऊन फराळ उरकला व इन्स्पेक्टर साहेबांशीं गप्पा मारीत बसलों. ते म्हणाले " थंडीच्या दिवसांत **टिहरीस** बर्फ फार पडतें, म्हणून ह्या ठिकाणीं राजधानीचें दुसरें शहर वसविलें आहे. फक्त हिवाळ्यांत येथें राजाचा मुक्काम असतो. गांवाची वस्ती सध्यां सुमारें १॥ हजार आहे. **हृषिकेशाहून** मोटारनें येथें येतां येत असल्यामुळें पुष्कळ श्रीमंत लोक येथें येऊन राहाण्याचा संभव आहे व अशा तऱ्हेनें ह्या शहराची पुढें चांगलीच भरभराट होईल असें दिसतें. सध्यां पाण्याची गैरसोय आहे; परंतु ती लवकरच दूर होईल अशी आशा आहे. "—माझ्या मतानें **टिहरीच्या** राजास रेल्वेपासून दूर जंगलांत राहाण्याचा कंटाळा आला असेल, म्हणून मोटार व रेल्वे ह्यांच्या साहाय्यानें कोठेंही राजधानी सोडून थोडक्या काळांत चैन करण्याकरितां जाऊन येतां यावें, म्हणून हें शहर वसविलें असावें. कारण ह्या फुकटखाऊंना चैनीशिवाय उद्योग काय आहेत ?

दुसऱ्या दिवशीं ता. ९।५।३१ रोजीं सकाळीं **श्री. लक्ष्मीनारायण** यांचा साभार निरोप घेऊन **नरेंद्रनगर** सोडलें. आतां सारखी डोंगरी रस्त्यास सुरवात झाली. एका हातास उंच कडा व दुसऱ्या हातास खोल दरी, असा प्रवास सुरू झाला. **हरिद्वार**पासून सुमारें ७५ मैलपर्यंत हिमालयांत पाण्याचे फार हाल आहेत. वाटेवर दोनदोन चारचार मैल पाणी आढळत नाहीं. तहानेनें जीव व्याकूळ होऊन जातो कारण प्रथम प्रथम लागणाऱ्या सर्वच डोंगरावर झाडी नाहीं बरेचसे डोंगर अगदीं रुक्ष आहेत. छायेकरितां सुद्धां झाड मिळण्याची मारामार असते. सरासरी २ मैल चालल्यानंतर पाण्याचा एक झरा लागला. तेथें शौचमुखमार्जनादि विधि उरकले व पुढें चालू लागलों, तों सुमारें १२ वाजतां **नरेंद्रनगर**पासून १० मैलांवरील **फकोट** नांवाच्या चट्टीवर मुक्काम केला पाणी बरेंच लांब होतें. परंतु चट्टीवाल्यानें पाण्याकरितां मोठें भांडें दिल्यामुळें कुलींकडून पाणी आणविलें. **हिमालयांतील** यात्रांत महत्वाची गोष्ट म्हणजे **चट्टी.**




मसुरी येथील धबधबा.

**चट्टी** म्हणजे भोजन करण्याकरितां जागा, भांडीं व शिधा पुरविणारें दुकान. अशीं दुकानें **हिमालयांत** सारखीं अंतराअंतरावर आहेत. कांहीं ठिकाणीं तीं अर्ध्या मैलावर आहेत, तर कांहीं ठिकाणीं दोन दुकानांमध्यें अंतर १० मैल सुद्धां आहे. **जम्नोत्रीच्या** वाटेवरील प्रत्येक गांवीं बहुधा एकच दुकान आहे. दोन अगर जास्त दुकानें असलेलीं गांवें फार थोडीं आहेत. दुकान अगर गांव वसविण्यास साधारण तरी सपाटी लागते; परंतु जेथें सपाटी असते तेथें पाणी नसतें. व पाणी असतें तेथें सपाटी नसते. या दुहेरी पेंचामुळें गांव वसविण्यास योग्य स्थळ फार थोड्या ठिकाणीं असतें. म्हणून प्रथम पाणी १ ते १॥ मैलांवरून आणून स्वयंपाक करावा लागला. **हिमालयांत** दोन घरें एका ठिकाणीं असलीं कीं लगेच त्यास गांव ही संज्ञा प्राप्त होते. ह्या चट्ट्या साधारणपणें बदलत नाहींत. परंतु जर एकाद्या ठिकाणीं दुकान चाललें नाहीं, तर दुकानदार ती जागा सोडून दुसऱ्या ठिकाणीं दुकान घालतो. ह्या चट्टीवर साधारण सामान्य शिधा मिळतो. डाळ, तांदूळ, तूप, मीठ, मिरची, बटाटे, गूळ इतके जिन्नस साधारणपणें सर्वत्र मिळतात. मात्र ते थंड हवेंत असल्यामुळें बुरसल्यासारखे असतात; परंतु ते जिन्नस घेतल्याशिवाय गत्यंतर नसतें. एक तर सर्व शिधा आपल्या जवळचा काढून स्वयंपाक करूं म्हटलें, तर चट्टीवाला स्वयंपाकाला जागा देत नाहीं; शिधा घेतला तरच जागा मिळते. तांदुळ तूप वगैरे जिनसांचा तो सांगेल तो भाव देऊन ते जिन्नस घ्यावे लागतात. अर्थात् तो जागाभाड्याची कसर शिध्यांत काढतो. म्हणून त्यास जागाभाडें स्वतंत्र द्यावें लागत नाहीं. **टिहरी** संस्थानांत जिनसांचे दर संस्थानिकानें ठरवून दिलेले असतात. त्याप्रमाणें जिन्नस विकावे असा कायदा आहे; परंतु वहिवाट तशी नाहीं. अगदींच कोणी हातघाईवर आला, तर दुकानदार तो कागद दाखवितो. नाहीं तर त्याच्या मनाप्रमाणेंच भाव सांगतो. संस्थानिक आपल्या प्रजेचा तोटा करून बाहेरच्या लोकांचीं तोंडें बंद करण्यांत दक्ष आहे. ही भावांची सोय इंग्रजांच्या राज्यांत **बद्रीकेदारकडे** नाहीं. पुष्कळ वेळां चट्टीवाल्यास गिऱ्हाईकच मिळत नाहीं. मग त्यास चट्टी उठवावी लागते. एका चट्टीवाल्यानें मजपाशीं तक्रार सुद्धां केली कीं, " मी यात्रेकरूंच्या सोईकरितां येथें नवीन चट्टी उघडली आहे. परंतु येथें कोणीच थांबत नाहीं. जो तो यात्रेकरू पुढच्या चट्टीवर मुक्कामास जातो. काय करावें? " मी त्यास म्हणालों, " बाबारे, हें जाहिरातीचें युग आहे, तुझ्या चट्टीचें नांव यात्रांच्या माहितीपत्रकांतून नाहीं. लोकांस तूं येथें चट्टी उघडली आहेस, हें कसें कळणार? तूं आपल्या

चट्टीचा उद्घाटनसमारंभ कोणा मोठ्या मनुष्याच्या हातून केला असतास, तर तुजला चांगला फायदा झाला असता. मजला जर तूं पुण्यास पत्र टाकिलें असतेंस, तर मी सुद्धां × ×साहेबांस तुझ्या चट्टीच्या उद्घाटनसमारंभास हजर रहाण्याची विनंति मोठ्या आनंदानें केली असती, कारण त्यांस सध्यां श्रीमंत संस्थानिकांच्या नीरस-काव्य-समर्पण समारंभास हजर राहून मेजवान्या झोडण्याशिवाय दुसरें कांहीं काम शिल्लक राहिलेलें नाहीं.

**या निशा सर्वभूतानाम् तस्याम् जागर्ति संयमी।**
**यस्याम् जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥ १ ॥**

ह्या संस्कृत वचनाप्रमाणें शांततेच्या काळांत ते अत्यंत धडाडीनें काम करीत असतात. परंतु सध्यां धामधुमीचा काळ असल्यामुळें ते अगदीं शांत आहेत. फक्त त्यांच्या जाण्यायेण्याकरितां लागणाऱ्या रेल्वे खर्चाकरितां सेकंड क्लास डबल फेअरची सोय तुजला करावी लागेल. तसेंच वांग्याची भाजी व खिचडी हाच बेत तुला करावा लागेल. कारण प्रदेश थंड, तेव्हां धनुर्मासाचा बेतच उत्तम. मात्र खिचडीच्या मुदीवर समोरच्या डोंगरावर “ जसें पांढरें शुभ्र बर्फ पसरलें आहे तसें खोबरें ” पसरण्यास विसरूं नको. ज्या मानानें मेजवानीचा बेत होईल, त्या मानानें तुझ्या चट्टीचें वर्णन महाराष्ट्रांतील प्रमुख वर्तमानपत्रांत येईल व तुझा झालेला खर्च महाराष्ट्रांतून अलोट यात्रा तुझ्या चट्टीवर लोटून एका वर्षांत सहज निघून येईल. आरंभीं मात्र तुला थोडेसें साहस केलें पाहिजे. परंतु बाबारे, ‘ साहसे श्रीः **प्रतिवसति** ’ ह्या म्हणीप्रमाणें साहस केल्याशिवाय काय होणार ? ” तो म्हणाला “ तुमचें म्हणणें मजला पटतें; परंतु इतका पैसा माझी सर्व इस्टेट विकूनही उत्पन्न होणार नाहीं. आम्हां गरिबांस कर्ज तरी इतकें कोण देणार? परंतु मी एका नवीन **फंडाच्या** योजनेंत आहे. जर ती योजना यशस्वी झाली, तर बराच बिनहिशेबी पैसा माझ्या हातीं येईल. मग मात्र मी तुम्हांस जरूर पत्र लिहीन. तुम्ही त्यांस माझ्या तर्फें आमंत्रण करा व तुम्हीहि या. ” मी त्याची विनंति आनंदानें मान्य केली व मोठ्यांच्या बरोबर चट्टीवाल्याकडे धनुर्मासांतील खिचडीच्या भोजनास जाण्याचा योग आणून देण्याबद्दल गंगोत्रीची मनांतल्या मनांत प्रार्थना केली. व शेवटीं त्यास असें सांगितलें कीं, “ प्रथम तूं निदान इतकें तरी कर. तुझ्या चट्टीची यात्रेकरूंस माहिती नाहीं. तरी तूं एक आपल्या चट्टीची माहिती देणारा बोर्ड घरासू येथें लावून ठेव व त्यावर लिही कीं, ‘ निर्मळ लोकाश्रयाखालील ’

सुंदर झऱ्याच्या कांठावर अगदीं नवीन सर्व साहित्यानें भरलेली, अशा सुंदर चट्टींत एकच दिवस मुक्काम केल्यानें प्रवासाचे सर्व श्रम नाहींसे होतील. यात्रेकरूंनीं एकवार जरूर अनुभव घ्यावा.' म्हणजे तुजला गिऱ्हाईक मिळेल. **माल पिकविण्यापेक्षां विकण्यास जास्त अक्कल लागते.**" त्यानें ह्या सर्व गोष्टींचा विचार करण्याचें कबूल केलें व मी पुढचा रस्ता धरला.

दुकानदाराकडून शिधा घेऊन स्वयंपाक करून भोजन उरकलें. मी सर्व प्रवास पायांनींच करीत असे. त्यांतहि मध्यें विश्रांति घेण्यास फारसा बसत नसे. कारण मुक्कामावर पोहोंचण्यास उशीर झाल्यास भोजनास उशीर व्हावयाचा व पुढें रात्रीच्या मुक्कामास काळोख व्हावयाचा; म्हणून मजला सकाळीं सारखें चालावें लागे. **श्री. नानासाहेब** शक्य तितकें चालत व थकल्यास करंडींत बसत. तरीहि त्यांची रोज सरासरीं ७।८ मैल चाल होई. माझी मात्र रोज १५ ते १८ मैल चाल होई. करंडीवाल्यास बोजा घेऊन चालावयाचें असे. त्यांतहि ते दर दीड दोन मैलांवर तंबाखू ओढण्यास थांबत म्हणून मी रोज बहुधा त्यांच्या पूर्वी सुमारें एक तास मुक्कामावर अगोदर पोहोंचत असे. गेल्याबरोबर दुकानदाराकडून शिधा घेऊन स्वयंपाकास आरंभ करावयाचा माझा कार्यक्रम होता. कुली येईपर्यंत अर्धा स्वयंपाक तयार असे. रोजच्या चालण्यामुळें भूक अगदीं तयार असे. स्वयंपाकास आरंभ करण्यापूर्वीच भूक लागलेली असल्यामुळें लवकर होणारा पिठलें व भात हाच स्वयंपाक बहुधा रोज असे. स्वयंपाक तयार झाल्यानंतर तो निवण्याइतकी सुद्धां वाट पहाण्यास कधींच सवड मिळाली नाहीं. इतकी घाई जेवणाची होई. **हिमालयांत बद्रीकेदारच्या** यात्रेस दूध मिळे; परंतु **गंगोत्रीच्या** यात्रेंत सबंध महिन्यांत अवघें तीन दिवस दूध मिळालें. ताक व दही हे शब्दच विसरून गेलों होतों; म्हणून ताकाऐवजीं चिंचेचें सार, कधीं कधीं बटाट्याची भाजी व इतर वेळीं पिठलें. सर्व महिन्यांत आम्हांस एकदां तांबडा भोपळा व दोनदां कसलीशी पालेभाजी मिळाली होती. परंतु भुकेमुळें तोंडास चव चांगली असे त्याचा म्हणून कंटाळा मात्र कधीं आला नाहीं. भोजन तयार करण्याचें काम माझ्याकडे असे. परंतु भोजन उरकल्यानंतर भांडीं घासणें, अन्नाची व्यवस्था लावणें वगैरे कामें **वकीलसाहेबांकडे** असत. मी मग विश्रांति घेत असे. चहा तयार करणें माझ्याकडे, भांडीं विसळणें त्यांच्याकडे अशी कामाची वांटणी करून टाकिली होती. **फकोटहून** सुमारें ३॥ वाजतां बाहेर पडलों, तों डोंगर चढत उतरत संध्याकाळीं ६ वाजण्याच्या सुमारास



हिमालयांतील लांकडें वाहणारा मजूर.

**जाजुआ** नांवाच्या गांवीं येऊन दाखल झालों. दुधाची चवकशी केली; पण दूध मिळालें नाहीं. अर्थात् येथें " **गंगोत्री चहा** " बनविला. ह्या चहाची रीत खालीं दिल्याप्रमाणें आहे.

चांगलें २।३ कप पाणी चुलीवर ठेवावयाचें त्यास उकळी आल्यानंतर त्यांत २।४ चमचे कसलें तरी पीठ टाकावयाचें आम्ही बहुधा सत्तूचें पीठ टाकीत असूं. तें पीठ पाण्याशीं मिळालें कीं **अश्वत्थामा दुग्ध** तयार होतें. नंतर तें खालीं उतरून दुसऱ्या भांड्यांत कपभर पाणी टाकून त्याचा चहा बनवावयाचा व तो **अश्वत्थामा** दुधांत गाळावयाचा. चहाची संवय आहे, थंडी वाजत आहे, दूध मिळत नाहीं, अशा वेळीं हा चहा फारच चांगला लागतो. ह्या चहाचा आम्ही शोध लावला आहे. परंतु निव्वळ लोकोपकारार्थ त्याचें पेटंट न घेतांच तो प्रसिद्ध करीत आहोंत. कधीं कधीं ह्या चहांत आम्ही तूपही मिसळीत असूं. **जाजुआ** येथें रोटीचीं दुकानें आहेत. त्यांत १ पैशास एक प्रमाणें रोट्या मिळत होत्या. त्या खाल्ल्या. निजण्यास एक अगदीं वाईट झोपडी मिळाली होती. एक विंचू माझ्या आंगावर चढला होता. परंतु परमेश्वरी कृपेनें तो चावण्यापूर्वींच मी त्यास झाडून टाकिलें. त्यामुळें रात्रीं विंचवाची भीति सारखी वाटत होती. सकाळ उजाडली ५ वाजतां चालण्यास आरंभ केला वाटेंत एक रोटीचें दुकान लागलें तेथें रोट्या खाऊन **जाजुआपासून** सुमारें १२ मैलांवर असलेल्या **चमुआ** गांवीं भोजन करण्यास आलों. **चमुआ** येथें पोष्ट ऑफिस आहे. आठवड्यांतून दोनदां येथून **मसुरीस** टपाल जातें. येथून एक रस्ता परस्पर ' **भलड्याणा** ' येथें गेला आहे व दुसरा **टिहरीस** गेला आहे. आम्हांस **टिहरी** पाहावयाची असल्यामुळें आम्ही **टिहरीच्या** रस्त्यास लागलों. **चमुआहून टिहरीस** जातांना रस्त्याच्या डाव्या हातास हिरवीगार शेतें सारखीं लागत होतीं. मधूनमधून शेतांतून गहूं मळण्याचें काम करतांना शेतकरी आढळून येत होते. संध्याकाळीं ७ वाजतां **टिहरीच्या** अलीकडे ६ मैलांवर एका दुकानांत मुक्काम केला. व दुसऱ्या दिवशीं ता. ११ मे सोमवारीं **टिहरीस** जाऊन पोहोंचलों. पोहोंचण्यापूर्वींच मजला थकल्यासारखें वाटूं लागलें होतें. मुक्कामावर जाऊन शीखांच्या धर्मशाळेंत बिऱ्हाड लाविलें. तोंच मला ताप आल्याचा भास झाला. म्हणून तसाच पडलों. संध्याकाळीं ५ वाजेपर्यंत बराच ताप आंगांत होता. तेव्हां ताप कां आला असावा, ह्याचा विचार करतां, कोठचास संवय नसतांना वाटेंत बरेच वेळां पोळ्या खाल्ल्या म्हणून ताप

झाला, अशी मनाची खात्री आल्यामुळें दाभाडे तळेगांव येथील माझे स्नेही **डॉ. यशंवतराव परांजपे** ह्यांनीं दिलेल्या औषधाच्या पेटींतून इपसम् सॉल्ट काढून तें घेतलें. तें २ तासांत लागू पडल्यामुळें एक प्रकारची हुषारी वाटूं लागली. त्यापूर्वी मात्र आतां हा ताप असाच राहिल्यास काय करावयाचें, कशाला ह्या भानगडींत पडलों, वगैरे अनेक विचार मनांत येऊन गेले, परंतु कांहीं झालें तरी परत फिरावयाचें नाहीं, असा पक्का निर्धार करून गेलों होतों व तो परमेश्वरानें सिद्धीस नेला. त्याची इच्छा नसती तर यात्रा घडलीच नसती. त्यावेळीं माझे स्नेही श्री. **नीलकंठराव लवाटे** ज्योतिषी, यांची आठवण झाली. कारण त्यांनीं अगाऊच सांगितलें होतें कीं, संकटें वरींच येतील, परंतु यात्रा घडेल. संध्याकाळीं सात च्या सुमारास थोडा फेरफटका करण्यास बाहेर पडलों.

## टिहरी.

**टिहरी** हें गांव **टिहरी गढवाल** संस्थानची राजधानी आहे. इ. स. १८०३ पर्यंत **नेपाळच्या** सरहद्दीपासून **काश्मीरपर्यंत गढवाल** हें संस्थान एका राजाच्या हाताखालीं होतें. १८०३ मध्यें गुरख्यांनीं **गढवाल** संस्थानवर स्वारी करून तें संस्थान जिंकलें व तेथील राजास देशोधडीस लाविलें. १८१५ मध्यें **इंग्रजांनीं नेपाळशीं** कुरापत काढली. त्याच वेळीं **गढवालच्या** राजास मदत करण्याच्या हेतूनें त्या प्रांतावर स्वारी करून गुरख्यास हांकून लाविलें व आपण सर्व प्रांत आपल्या ताब्यांत घेतल्यास लोक नाराज होतील, म्हणून अर्धा भाग आपल्या राज्यास जोडला व अर्धा पूर्वीच्या राजास परत दिला. त्यास मुळींच राज्य मिळणार नव्हतें, तें अर्धें मिळालें म्हणून तोही खूष झाला. व इंग्रजांस परोपकाराचें पुण्य लाभून राज्याचा लाभ झाला, म्हणून ते खूष झाले ! परंतु ह्यामुळें एका **गढवालाचे** दोन **गढवाल** झाले. ब्रिटिशांच्या **गढवालास—पौडिगढवाल** व **राजाच्या गढवालास टिहरी गढवाल** अशीं नांवें आहेत. **टिहरी** हें गांव **गंगा** नदीच्या कांठावर आहे; परंतु येथें **गंगेस** जाण्यास वाट मात्र अतिशय वाईट आहे. वाट चांगली तयार करून घाट बांधून लोकांची सोय करण्याची राजास इच्छा नाहीं. गावांत बाजार बराच मोठा आहे. गांव वसविण्याकरितां जागाही चांगली शोधून काढली आहे. इतकी मोठी सपाटी ह्या डोंगराळ प्रदेशांत फारच थोड्या ठिकाणीं आहे त्यामुळें बाजारांतून चालले असतां आपण एकाद्या पहाडी गांवांतून चाललों

आहोंत असा भासही होत नाहीं. बाजारांत बहुतेक सर्व जिन्नस मिळतात- मी येथें सुंठ खरेदी करून ठेविली. गांवांत एक मोठा घड्याळाचा मनोरा आहे- त्यावरूनच हें एक मोठें गांव असावें, अशी दुरूनच कल्पना होते. यात्रेकरूंकरितां दोन तीन धर्मशाळाही आहेत. पोष्ट आणि तार ऑफीसही आहे. **गंगोत्रीच्या** यात्रेच्या वाटेवरचें हेंच शेवटचें तार ऑफीस. पुढें तार ऑफिस नाहीं. पोष्टाची ही अत्यंत अव्यवस्था आहे. म्हणून ह्या भागांत येणाऱ्यानें घरच्या मंडळींस अगाऊ बजावून यावें कीं महिन्यांतून एकादें पत्र मिळेल; वाट पाहूं नका व काळजी करूं नका. टिहरीची समुद्रसपाटीपासून उंची सुमारें २९०० फूट आहे म्हणून येथील हवा उन्हाळ्यांत थंड नसते त्यामुळें उन्हाळ्यांत राजाचा मुक्काम **टिहरीच्या** उत्तरेस नऊ मैलावर समुद्र सपाटीपासून ७८०० फूट उंचीवर असलेल्या **प्रतापनगर** नांवाच्या गांवीं असतो. **टिहरीहून** मोटारची सडक **नरेंद्रनगरपर्यंत** बांधण्याचें काम सुरूं आहे. राजा आपली थोडीसुद्धां गैरसोय होऊं देत नाहीं. राजाच्या ह्या खर्चाच्या योजनांपायीं प्रजा कंगाल बनली आहे. तरीही ह्या राजास मूर्ख भाविक यात्रेकरू "**बोलका बद्रीनाथ**" समजतात व त्याचें दर्शन घेण्यास भाविकपणें जातात; व तोही आनंदानें दर्शन देतो! त्याच्या बायकोस "बोलकी गंगोत्री" म्हणावें अशी माझी शिफारस आहे. राजापाशीं **गंगोत्री-जम्नोत्रीचा** रस्ता दुरुस्त करण्यास पैसा नाहीं; त्या रस्त्यानें प्रवास करतांना खालीं नदींत पडून यात्रेकरू मेले तरी त्याची त्यास पर्वा नाहीं; अशा लोकांनीं स्वतःला देव समजणें ही धर्माची विटंबना आहे. याच कारणास्तव **बोलशेविक** जे म्हणतात कीं "**धर्म हें श्रीमंतांनीं स्वतःची चैन चालावी म्हणून गरिबांस पाजलेलें मादक पेय आहे**" हें खरें ठरतें. **रावणासारखें** राज्य करून **रामनवमीचा** मात्र ८ दिवसांचा उत्सव करणारे एक संस्थानिक माझ्या माहितीचे आहेत. त्यांचेच 'बंधु' **टिहरीचे** महाराज असावेसे वाटतात. असो. ता. १२ रोजीं सकाळीं कोठा साफ झाल्यामुळें हुषारी वाटली, म्हणून **टिहरी** सोडली. जातांना वाटेनें डाव्या हातास कांटे निवडुंगानें भरलेले डोंगर व उजव्या हातास **गंगा** असा चढउताराचा रस्ता सुरूं होता. झाड क्वचितच दृष्टीस पडे; परंतु हवा कुंद असल्यामुळें उन्हाचा त्रास झाला नाहीं. वाटेंत मुक्कामाची चांगलीशी सोय नसल्यामुळें **भलड्याणा** येथें एकदम १२ मैलांवर मुक्कामास गेलों.


**भलड्याणा** हें एक ह्या प्रांतांतलें लहानसें जंक्शनच आहे. कारण येथून एक रस्ता **मसुरीस** जातो व एक रस्ता **नरेंद्रनगरला** परस्पर **चमुआवरून** जातो. म्हणून येथें बावा. का. क. वाल्यांची मोठीच धर्मशाळा असून दुकानें दोन आहेत. व लहानसें पोष्ट ऑफिसही आहे. डाक आठवड्यांतून फक्त दोनदां जाते. धर्मशाळेंत उतरल्यानंतर शिधा कोणत्याहि दुकानदाराकडून घेतलेला चालतो. स्वतःचा शिधा काढून स्वयंपाक केल्यासही हरकत नाहीं; परंतु धर्मशाळेच्या व्यवस्थापकानें दुकानदाराशीं संधान बांधलेलें असतें. ह्यास चौकीदार ही संज्ञा आहे. त्यानें आम्हांस एका दुकानदाराकडे बोट दाखवून त्याच्याकडे शिधा घ्या असें सांगितलें. अर्थात् त्यामुळें दुसऱ्या दुकानदारास बराच राग आला. येथें पाणी सुमारें एक फर्लांगावरून आणावें लागतें. **खालीं** खोल **गंगानदी** वाहातांना दिसते; परंतु तिचें पाणी आणणें शक्य नसतें. भोजन उरकलें. धर्मशाळेंत चांगली स्वतंत्र खोली—हिंदींत '**कमरा**'—मिळाली होती, म्हणून येथेंच मुक्काम केला. आदल्याच दिवशीं ताप आला होता, तेव्हां एकदम जास्त चालणें सोसणार नाहीं, हीही भीति होतीच. ता. १३ रोजीं सकाळींच **भलड्याणा** सोडलें. येथून सुमारें ५ मैलांवर '**छाम**' नांवाची चट्टी आहे. ही चट्टी नेपाळच्या राजाची एक मुलगी **टिहरीच्या** राजास दिली होती, तिच्या स्मरणार्थ बांधिली आहे. **चट्टी** फारच चांगली आहे. पाण्याची मात्र थोडी गैरसोय आहे. तरीही ५ मैलांवर भोजनासाठीं मुक्काम करणें युक्त नसल्यामुळें मुक्कामास **नगूळचट्टीवर** गेलों व रात्रींच्या वस्तीस **धरासूस** निघालों. **धरासूच्या** अलीकडे सुमारें २।३ मैल एक मनुष्य कसलीशी भट्टी लावून बसला होता. तेव्हां सहाजिक काय आहे म्हणून पृच्छा केली. तो म्हणाला "यह तो शराब का ठेका है" ही दारूची भट्टी आहे—ह्याजकडून बरीच माहिती मिळाली. ठेकेदारास सरकारास सालिना ६२० रुपये द्यावे लागतात त्याच्याशिवाय इतरांस दारू विकतां येत नाहीं. लोक अत्यंत दरिद्री आहेत. महागाई फार. ज्यांना आंगभर वस्त्र व पोटभर अन्न मिळतें असे लोक शें. ५ तरी असतील कीं नाहीं ह्याची शंकाच आहे. जरूरीचेही जिन्नस विकत घेण्याचें त्यास सामर्थ्य नसल्यामुळें, वाटेंतील लोक आमच्या जवळचे सर्व जिन्नस मागत. परंतु आपणास जरूरी आहे व जिन्नस मिळत तर नाहीं; म्हणून तो हाताशीं आल्यास चोरावा अशी त्यास कधींच बुद्धि होत नसे.! **हिमालयांतून** अगदीं एकटयानें फिरे जंगलांतून बरेच वेळां जावें लागे. रात्रीं झोपण्याकरितां बंद

खोली सबंध महिन्यांत ४ वेळां सुद्धां मिळाली नाहीं. सामान नुसतें उशाशीं ठेवून उघड्या जागेवर झोंपावें लागे. तरीही आमचा एकही जिन्नस चोरीस गेला नाहीं. एका पहाडी मनुष्यानें विक्रीकरितां अदपावाचे पेढे मांडले होते. मी त्यास हिशेबाप्रमाणें पैसे देऊन पेढे मागितले. त्यानें ते वजन न करितांच दिले. तेव्हां मी सहजच नेहमींच्या सरावाप्रमाणें तोलून दे म्हणून म्हटलें. तेव्हां त्यानें तोलले. तों ते जास्तच भरले परंतु तोलण्यापूर्वी तो म्हणाला "हम् पाहाडी आदमी है, हम् झूटी बात कवी नही कहेगा" मजला त्याचें मोठें कौतुक वाटलें. परंतु अशा सत्यनिष्ठ लोकांस पोटभर अन्नाची ददात असून खोटीं कर्मे करणारांनीं चैनींत राहावें, असा न्याय परमेश्वराच्या घरीं कां असावा हें एक गूढ पडलें.

**गढवाली** लोकांच्या सारखे उच्च दानतीचे लोक जगाच्या कोणत्याहि भागांत पाहाण्यास सांपडणार नाहींत. आपल्या निःशस्त्र देशबांधवांवर गोळ्या झाडण्याचें नाकारून स्वतःच्या प्राणावर संकटें ओढवून घेतल्यामुळें ज्यांचें नांव आज जगांत गाजत आहे, व ज्यांची हकीकत **हिंदुस्थानच्या** इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखी आहे, अशा **गढवाली** पलटणींतील लोक ह्याच प्रांतांतील आहेत. म्हणून देशद्रोह्यांची अवलाद उत्पन्न केलेल्या म्हाताऱ्या कोताऱ्यांनीं, देशद्रोही उत्पन्न झाल्यामुळें ज्यांच्या कुलास कलंक लागला आहे अशा तरुणांनीं व देशद्रोहाचें पातक आपणाकडून होऊं नये अशी इच्छा करणाऱ्या विद्यार्थ्यांनीं, **गंगोत्री जम्नोत्रीच्या** यात्रेकरितां नव्हे, तर **गढवाली** लोकांच्या पायाचें तीर्थ घेऊन पवित्र होण्याकरितां इकडे जरूर यावें. म्हणजे आपण होतों कसे व झालों आहोंत कसे, ह्याचें ज्ञान त्यास झाल्याशिवाय राहाणार नाहीं. व अशा लोकांकरितां दारूची सोय करून त्यांच्या दारिद्र्यांत भर टाकणाऱ्या राजाबद्दल अत्यंत तिटकारा उत्पन्न झाल्याशिवाय राहाणार नाहीं. असो. वस्तीस **धरासूस** गेलों.

**धरासू** हें गांव गंगानदीच्या कांठावर वसलें आहे. येथून एक रस्ता **गंगोत्रीस** व दुसरा **जम्नोत्रीस** व तिसरा **मसुरीस** जात असल्यामुळें येथेंही यात्रा फार असते. **धरासू** येथें आठवड्यांतून दोनदां टपाल नेणारी पेटी आहे. येथून पुढें पोष्टाची पेटीही सुमारें ४० दिवस नजरेस पडली नाहीं. येथें **बाबा काली कमलीवाल्यांची** मोठी धर्मशाळा आहे. हलवायाचें एक दुकानही आहे. शिधा विकणारीं तीन चार दुकानें आहेत. त्यामुळें ह्या गावास महत्त्व प्राप्त झालें आहे. येथें सुमारें २० बायका व ८ पुरुष अशी कोल्हापूर

येथील **श्री. देवधरस्वामी** यांच्याबरोबर प्रवास करणारी **इचलकरंजी, पुणें, सातारा, कोल्हापूर** वगैरे ठिकाणची महाराष्ट्रीय मंडळींची यात्रा भेटली. हा मंडळी रोज साधारणतः एकच वेळ चालत. त्यामुळें रोजीं कमींत कमी ५ ते



**हिमालयांतील एक उंच खिंड.**

जास्तींत जास्त १२ मैलांपेक्षां जास्त त्यांस चालावें लागत नसे. असें थोडें चालल्यानें दिवस जास्त लागतात. परंतु प्रवासाचा खरा आनंदही उपभोगण्यास सांपडतो. आम्हांस तितका अवधी नसल्यामुळें जास्त चालावें लागे. इतकी थोडी चाल होती तरीही संपूर्ण चालत यात्रा त्यांपैकीं फक्त २ पुरुष व दोन बायका यांनींच केली. बाकी सर्वांस कंडी, दांडी, झंपान ह्यांपैकीं कशाचा तरी आश्रय प्रसंगाप्रसंगानें करावा लागला व सर्व प्रवासास सुमारें २॥। महिने लागले. परंतु परमेश्वरी कृपेनें सर्व मंडळी सुखरूप परत आली. **धरासूस** लवकर पोहों-

चलों असल्यामुळें व गंगानदी अगदीं जवळ असल्यामुळें कपडे धुण्याचा कार्यक्रम येथें उरकून घेतला. इकडील प्रवासांत कपडे धुणें म्हणजेसुद्धां मोठें संकट असतें. पाणी इतकें थंड असतें कीं त्यानें हात बधीर होऊन जातात. कपडे वाळविण्यास चांगलें साधन नसतें. धुळीनें व एकसारखे आंगावर असल्यामुळें कपडे मळूनही जातात व त्यांत उवाही पडतात. कपडे धुऊन खोलींत वाळत टाकले. भोजन तयार करण्यास कुलींनाच सांगितलें होतें, रात्रीं भोजन उरकून झोंपीं गेलों. ता. १४।५ रोजीं सकाळीं ५ वाजतां आम्हीं **धरासू** सोडलें.

रोजचा कार्यक्रम सकाळीं उठल्याबरोबर चूळ भरून सामानाची बांधाबांध करावयाची, कुलींच्या ताब्यांत सामान देऊन त्यांस चालूं करावयाचें व मुक्काम सोडावयाचा, असा असे. प्रातर्विधीकरितां आरंभीं वेळ मोडावयाचा नाहीं, वाटेंत जेथें प्रथम पाणी भेटेल तेथें सर्व प्रातर्विधी उरकावयाचे. त्यानंतर थोडासा अल्पाहार करून चालूं लागावयाचें. मी बहुधा रोज सकाळीं सत्तूचें पीठ खात असे. क्वचित प्रसंगीं दूध मिळाल्यास चहाही बनवीत असे. धर्मशाळा सोडल्याबरोबर एक पूल ओलांडावा लागतो. त्यानंतर दोन रस्ते फुटतात. त्यांपैकीं गंगोत्रीचा रस्ता उजव्या हातास सोडून डाव्या हाताच्या रस्त्यास लागलों, तोंच चढावास सुरवात झाली. जवळजवळ सारखा चार मैल चढाव होता. चढावाच्या वेळीं चालण्याचा वेग अत्यंत कमी म्हणजे ताशीं एक मैलपर्यंत उतरतो. ह्या चार मैलांत पाण्याचा पूर्ण अभाव आहे, म्हणून अतिशय त्रास झाला. हवा साधारण कुंद असल्यामुळें उन्हाचा मात्र त्रास झाला नाहीं. मधूनमधून पाऊस भेटीस येत होतांच. त्यामुळें पाण्याचें दर्शन फक्त होई, परंतु उपयोग मात्र होत नसे. **धरासू**पर्यंत रस्ता साधारण बरा आहे. पुढें रस्ताही वाईट होत गेला आहे. वाटेंत सारखे दगड पायांस त्रास देत होते. पाय मुरगळून चालणें बंद होईल कीं काय अशी भीति क्षणोक्षणीं वाटत होती. तरीही तसा कांहीं त्रास सर्व यात्रेंत झाला नाहीं. सुमारें १० वर्षांपूर्वीं ह्या रस्त्यानें यात्रा फार थोडी जात असे म्हणून **धरासूच्या**पुढें शिधा विकत मिळणें सुद्धां मोठ्या मुष्किलीचे असे; परंतु आतां बरावाईट शिधा वाटेंत सर्वत्र मिळतो. मात्र राहाण्याच्या जागेची गैरसोय कायमच आहे. कारण असते त्या दिवशीं ५० पर्यंत यात्रा असते, नाहीं तर पांच माणसेंही येत नाहींत. **धरासूहून** ६ मैलांवरील **गेवला** चट्टीवर गेलों. गेवला ही चट्टी लहानशीच असल्यामुळें तेथें **देवधर स्वामींच्या** यात्रेस जागा पुरेशी नव्हती. म्हणून थोडे जास्त चालून तेही **सिलक्यारीस** मुक्कामास गेले. आम्ही

मात्र तेथें भोजन उरकून पुढें जाण्याचें ठरविलें. पावसानें सर्वत्र ओलें झालें होतें. लांकडेंही ओलीं मिळालीं म्हणून भोजन तयार करण्याचा बराच त्रास झाला. पुढें वस्तीस चांगली जागा मिळते कीं नाहीं, अशी शंका असल्यामुळें भोजन झाल्याबरोबर मुक्काम हालविला.

पूर्वीची इतर मंडळी, मागाहून आलेली देवधर स्वामींची यात्रा, यांमुळें सिलक्यारी चट्टीवरील सर्व जागा भरून गेली. हिमप्रदेश जवळ जवळ येत चालल्यामुळें थंडीचें मान वाढत चाललें, म्हणून उघड्यावर झाडाखालीं निजून रात्र काढणेंही अशक्य. तेव्हां काय करावें हा मोठा विचार पडला. समोरच एक डोंगर दिसत होता, त्यावर पांच सहा पत्र्याचीं घरें आढळलीं. तीं घरें सिलक्यारीपासून फार तर २ फर्लांग असतील, असा अंदाज करून त्या घरांचा रात्रींपुरता आश्रय करण्याचें ठरविलें व पहिला डोंगर उतरण्यास आरंभ केला सुमारें अर्धा तास उतार उतरून पुन्हां पाऊण तास चढावें लागलें तेव्हां तीं घरें आलीं. जाऊन पाहातों तों त्यांत माणसांची वगैरे कांहीं वस्ती नव्हती. फक्त पेंढा पसरला होता व जिकडे तिकडे शेण पडल्यामुळें घाण येत होती. परंतु त्या घरांचाच आश्रय करण्यावांचून गत्यंतर नव्हतें. देवधरस्वामींच्या बरोबरचे कुलीही याच ठिकाणा झोंपण्यास आले होते. चवकशी करितां हिवाळ्यांत गुरांस सुद्धां घराबाहेर पडणें शक्य नसतें व बऱ्याच लोकांचा धंदा मेंढ्या पाळण्याचा असल्यामुळें त्यांची सोय व्हावी म्हणून हीं घरें बांधली असल्याचें समजलें. सध्यांचे दिवस थंडीचे नसल्यामुळें घरें ओसाड होतीं. प्रत्येक घराची लांबी सरासरी ४०।५० फूट असून रुंदी १० फूट असेल. अशा घरास फक्त २ फूट रुंद व ४ फूट उंच असें एकच दार होते. खिडक्या वगैरे कांहीं नव्हत्या. आंत अंधार काळाकुट्ट पडला होता. कुलींनीं मध्येंच एक मोठी शेगोटी पेटविली होती, त्यामुळें खोली धुरानें भरून गेली होती. मी संध्याकाळीं एकटाच जेवत असे. **श्री. नानासाहेब** बहुधा चहा पिऊनच झोंपत असत. म्हणून कुलींनाच मी आपला स्वयंपाक करण्यास सांगितला. भोजन उरकून घरांत शिरलों तों धुरानें जीव गुदमरून गेला. आजुबाजूस पसरलेली घाण नाकांत जात होती. धूर डोळ्यांत जात होता. जागा ओसाड असल्यामुळें त्यांत कांहीं जीवजंतू वस्ती करून राहिले असतील अशी भीति वाटत होती, तरी तसाच आंत शिरलों व पथारी पसरून पडलों. थंडीचें निवारण व्हावें, म्हणून कुली शेगोटीच्या सभोंवती पडले होते. त्याजपाशीं वस्त्र पुरेसें नसल्यामुळें त्यांस शेगोटीचा आश्रय

करणें प्राप्तच होतें. परंतु थंडीचें प्रमाण फार वाढल्यास व कुलींनीं दार बंद केल्यास धुरानें सर्वांचाच जीव जावयाचा अशी भीति उत्पन्न झाली. म्हणून दार बंद न करण्याबद्दल कुलींस सूचना देऊन झोंपीं गेलों. स्वस्थ झोप लागली. नाहीं. मधूनमधून कुलींनीं, दार तर बंद केलें नाहींना, हें पहात असे, म्हणून सकाळीं उठण्यास उशीर झाला. इतर सर्व कुली ती जागा सोडून निघून गेले होते. आम्हीच एकटे राहिलों. उठण्यास उशीर झाल्यामुळें लवकर मुक्कामास पोहों-चतां यावें म्हणून आमच्या कुलींनीं जवळचा पायवाटेचा रस्ता धरला. ते म्हणाले वाट सोपी असून जवळच मोठा रस्ता लागेल. चला. ह्या पायवाटेनें— हिंदींत-**पगडंडीनें**-जाऊं नये असा ब्रह्मचारी **चक्रधरशर्मा** यांनीं आपल्या पुस्तकांत स्पष्ट इशारा दिला असतांही कुलींनीं हा रस्ता धरला. त्यांच्या दृष्टीनें हा रस्ता अगदीं सोपा होता. परंतु पायरस्ता सोडून मुख्य रस्त्यास लागेपर्यंत माझ्या जिवांत जीव नव्हता. क्षणोक्षणीं रस्ता कठीण आल्यानंतर मजला थांबावें लागे व नंतर कुलीची मदत घेऊन पुढचा रस्ता मी सुधारीत असे. इतक्यांत पावसाला सुरवात झाली. आतांपर्यंत पावसानें फारसा त्रास दिला नव्हता, तो आजच देण्यास सुरवात केली. मोठ्या जिकिरीनें सुमारें तीन तास पाऊलवाटेनें चालून मोठ्या रस्त्यास लागलों. तो सर्व दिवस अत्यंत त्रासाचा गेला. दुपारच्या मुक्कामास **डंडालगाऊ** चट्टीस गेलों. चट्टी बरी असून पाण्याची सोयही चांगली आहे. **डंडालगाऊ** सोडून सुमारें एक मैल गेल्यानंतर प्रथमच हिमालयाच्या वर्फाच्छादित शिखरांचें दर्शन होतें व देखावाही पालटतो. डाव्या हातास शांतपणें वाहाणारी यमुना नदी असून पलीकडील डोंगर सुरूच्या झाडांनीं भरलेले होते. त्यांवर झाडें तोडून फळ्या तयार करण्याचें काम चालूं असलेलें दुरूनच दिसत होतें. यमुना नदीस पूर आल्यानंतर तिच्या पात्रांतून त्या फळ्या वाहून नेतात असें समजलें. जों जों पुढें पुढें जाऊं लागलों तों तों देखावाही फार मनोवेधक दिसूं लागला.

डाव्या हातास खोल दरींतून वाहाणारी ती यमुना नदी, तिच्यांत रुप्याप्रमाणें चमकणारे पांढरे गोटे, तिच्या कांठच्या प्रदेशांत वसलेलीं तीं लहान लहान गांवें, एका गांवाहून दुसऱ्या गांवांस जाण्याकरितां उपयोगांत येणारे ते लहान लहान पायरस्ते, त्यावरून जाणारे व दूरपणामुळें मुंग्याप्रमाणें दिसणारे ते पहाडी लोक, डोंगराच्या उतरणीवरचीं तीं हिरवीं गार शेतें वगैरे देखावा पाहून तेथून हलूंच नये असें वाटत होतें. परंतु पुढें जाण्याची घाई



हिमालयांतील एक कठीण रस्ता.

असल्यामुळें तसेंच चालावें लागे. रस्ता बहुतेक चढावाचाच असल्यामुळें चालतांनाही फार त्रास होई. चढाव संपला कीं उतारास सुरवात व्हावयाचीच. ह्याप्रमाणें उतार उतरून **सिमलीचट्टीवर** आलों. येथून एक नवीन रस्ता **गंगोत्रीकडे** जाण्यास नुकताच तयार केला आहे. ही चट्टी एका सुंदर ओढ्याच्या कांठावर वसली आहे. दिवस अंगावर असल्यामुळें पुढें झटकलों तों **गंगाणीस** येऊन दाखल झालों.

## गंगाणी.

ही चट्टी अतिशय रमणीय आहे. यमुना नदीच्या कांठावर असलेल्या गर्द झाडांनें भरलेल्या ठिकाणीं ही चट्टी वसल्यामुळें येथें बहुतेक यात्रेकरू मुक्कामास असतात. परंतु **देवधरस्वामींचा** मुक्काम येथें होता म्हणून आम्ही पुढल्या चट्टीवर मुक्कामास जाण्याचें ठरविलें. **गंगाणीस गंगेचें** देऊळ असून एक मोठी धर्मशाळा व दोन दुकानेंही आहेत. गंगाणीपासून २ मैलांवरील **खैरात चट्टीवर** मुक्कामास गेलों. जों जों बर्फप्रदेश जवळ येत चालला तों तों पाण्याचा सुकाळ झाला.

## खैरात चट्टी.

ही लहानशीच नवीन तयार झालेली चट्टी आहे. येथें जवळच एक मोठा धबधबा पाहाण्यासारखा आहे थंडीचें प्रमाण वाढल्यामुळें व चट्टी अगदींच उघडी असल्यामुळें शक्य तितके कपडे पांघरण्यास घ्यावे लागले, म्हणून अंथरुणाखालीं सुरूच्या झाडाच्या सुंभाप्रमाणें असणाऱ्या काड्या पसरून त्यांची गादी बनविली व तीवर सतरंजी पसरली. सुरूच्या झाडाचे अनेक उपयोग इकडील लोक करितात. त्यांतील एक म्हणजे सुरूच्या झाडाच्या खोडांतील भागाचे धलपे मेणबत्तीसारखे जळतात, त्यामुळें ह्या प्रदेशांतील लोक दिव्याकरितां तेलाचा उपयोग न करितां ह्या धलप्यांचाच उपयोग करितात. सकाळीं उठून चढण्यास सुरवात केली. सुमारें दोन मैल चढाव दोन उतार उतरून **जमना चट्टीवर** आलों.

## जमना चट्टी.

येथें एकच लहानसें दुकान असून यात्रेकरूंच्या वस्तीकरतां सर्व बाजूंनीं उघडी अशी झोपडी बांधली आहे आहे. जणूं कांहीं पुढें ह्याहून जास्त थंडीस तोंड द्यावयाचें आहे, हें जाणून चट्टीवाल्यानें ह्या झोपडीची योजना केली आहे. येथें यमुना नदी लाकडी पुलावरून ओलांडावी लागते. तो पूल इतका वाईट होता

कीं परत येतांना पूल शिल्लक राहील किंवा नाहीं, ह्याची शंकाच वाटत होती. कारण पार होतांनाच तो सारखा लटलट हालत होता.

**जमुना** चट्टी सोडल्यानंतर अत्यंत सुंदर प्रदेशास सुरवात झाली. यमुनोत्तरीच्या यात्रेंत हाच भाग फार मनोरम आहे. उजव्या बाजूस यमुना नदी फार जोरानें वाहात असून पलीकडे मोठमोठे गगनचुंबी पहाड दिसत होते. त्यांवर मनुष्याचा त्रास होणें अशक्य असल्यामुळें निर्धास्तपणें घरटीं करून राहिलेल्या पक्षांची किलबिल ऐकू येत होती. पलीकडे सुरूच्या झाडांनीं भरलेले डोंगर दिसत होते.

## ओझरी चट्टी.

दुपारीं वस्तीस **ओझरी**चट्टीवर गेलों. दुकानदार कोठें बाहेर गेला होता. तेव्हां काय करावें ह्या विचारांत पडलों. बराच वेळ वाट पाहिल्यानंतर दुकानदार परत आला. त्याच्या दुकानांत असलेल्या जिनसांच्या चवकशीस लागलों. प्रत्येक प्रश्न विचारल्याबरोबर हात जोडून होय महाराज आहे, असें सांगण्याची त्याची लकब पाहून हा गोड बोलून पैसे जास्त काढणार हें तेव्हांच मीं ताडलें. व त्याप्रमाणें झालेंही. त्यानें जिनसांचे भाव शें ३३ नीं वाढविले होते. भोजन उरकून चालण्यास सुरवात केली. सुमारें १॥ मैल चालल्यानंतर पुन्हा यमुना नदी पुलावरून ओलांडण्याचा प्रसंग आला. हा पूल यंदाची सर्व यात्रा सुखरूप पार पाडील कीं नाहीं याची शंकाच आहे. पूल उतरून पलीकडे गेल्यानंतर वेळूच्या जंगलास सुरवात होते. येथें वेळू फार मोठे वाढत नाहींत. करंगळीइतक्या जाड वेळूचीं बेटें सर्वत्र पसरलीं होतीं व मधूनमधून रंगीबेरंगी फुलझाडेंही उगवलीं होतीं. फुलांच्या वासानें वातावरण भरून गेलें होतें. हवा तर अत्यंत स्वच्छ व थंड होतीच. अशा सुखकर प्रदेशांतून प्रवास करीत वस्तीस **राणागाऊ** येथें गेलों.

## राणागाऊ.

हें **जम्नोत्री**च्या वाटेवर लागणारें सुमारें २५।३० घरांचें मोठें गांव आहे. प्रदेश थंड असल्यामुळें माणसें सर्व गोरीं दिसत होतीं. बायका तर फारच सुंदर होत्या. इकडील बायकांचा पोषाख म्हणजे आंगांत एक घोंगडीचा आंगरखा, त्याखालीं घोंगडीचा अगर दुसऱ्या गरम कापडाचा घागरा. नाकांत मधल्या पडद्यावर भलें मोठें सुमारें ३ इंच व्यासाचें सुंकलें. हातांत सुमारें अर्धा इंच जाडीचे जड थाळे व गळ्यांत आंगठ्याएवढी जाड चांदीची

ठुशी. मोठा गांव असल्यामुळें दुधाची चवकशी केली. तेव्हां थोडेसें दूध एका बाईनें ६ आणे शेराच्या भावानें मोठ्या जिकिरीनें दिलें; मात्र दूध देतांना तिनें तापावर कांहीं औषध आहे कां, म्हणून चवकशी केली. कारण थंड हवा व पानें कुजणें, ह्यामुळें इकडे इतर रोग फारसे नसले, तरी हिंवताप ब-याच जणांस येतो. पण वैद्य डॉक्टरांचें नांव नाहीं. मी आपल्या जवळच्या कोयनेलच्या दोन गोळ्या तिजला दिल्या व तिजपाशीं तुमचा रोजचा उद्योग काय वगैरे चवकशी केली. ती म्हणाली, " आम्हांस रोज सकाळीं उठल्याबरोबर पाठीस करंडी अडकवून जनावरांस खाण्याकरितां पाला आणण्यास जावें लागतें. तसेंच शेतांतहि काम करावें लागतें. गाईम्हशी वळणें, स्वयंपाक करणें, वगैरे कामें आमच्याकडेच असतात. रोज वेळ मिळेल तेव्हां लोकरीचे दोरे तयार करावे लागतात, व त्याचेच विणलेले कपडे आम्ही घालतों. इ. इ. " इकडे साधारण कोणताही पहाडी मनुष्य रिकामा बसत नाहीं. प्रत्येकाच्या एका हातांत एक लोकर भरलेली परडी असून दुसऱ्या हातांत लोकरीचा दोरा तयार करण्याची टकळी असावयाचीच. ह्या गांवांत प्रत्येक घरीं थोड्याफार मेंढ्या आढळून येत होत्या. ह्या गांवच्या लोकांचा मेंढ्या पाळणें हा मुख्य धंदा आहे. आमच्या उतरण्याच्या जागेजवळच एके ठिकाणीं एक मोठा मेंढ्यांचा कळप बसला होता. मेंढ्यांस निवाऱ्याच्या जागेची जरूर इतर जनावरांसारखी भासत नाहीं. त्या उघड्यावरच पडतात. त्यांचे रक्षण करणारे मेंढपाळ एक मोठी झगरी करून गुडगुडी ओढीत तेथें बसले होते. सकाळीं **राणागाऊ** सोडलें व कठीण रस्त्यास सुरवात झाली. **राणागाऊहून जम्नोत्री** १० च मैल आहे परंतु रस्ता वाईट असल्यामुळें एकदम जाण्याचा त्रास झाला असता व जम्नोत्रीस धर्मशाळाही लहान होती त्यामुळें भरपूर जागाही निवाऱ्याची मिळाली नसती, म्हणून मुक्कामास राणागाऊपासून ६ मैलावरील **खरसाळी** चट्टीस जाण्याचें ठरविलें. **खरसाळीच्या** अलीकडे सुमारें १॥ मैलावर एक रस्ता डाव्या हातास फुटला. हा रस्ता परस्पर **जम्नोत्रीस** जातो. तसेंच ह्या रस्त्यानें गेलें असतां **मार्कंडेयतीर्थ** नांवाचा गरम पाण्याचा एक झरा, धर्मशाळा व लहानसें दुकानही आहे. ज्यांस एकदम **जम्नोत्रीस** जावयाचें होतें, ते त्या रस्त्यानें गेले. आम्हीं मात्र **खरसाळीस** प्रथम गेलों.

## खरसाळी.

हें ह्या भागांतील मनुष्यवस्तीचें शेवटचें ठिकाण. ह्यापुढें कायमची मनुष्य-

वस्ती असलेलें गांव नाहीं. जम्नोत्रीचे पंडे येथें राहातात. आम्हांस एका पंड्यानें **टिहरीच्या** रस्त्यावरच गांठलें होतें व पत्ताही दिला होता. अर्थात् **पण्डा हरिकृष्ण वैजनाथ** ह्याच्या घराचा तपास करीत खरसाळींत प्रवेश केला. पण्ड्यानें आम्हांस एक स्वतंत्र घर राहाण्याकरितां दिलें, दूधही आणून



**कुलीच्या पाठीवरील कंडी.**

दिलें. त्यामुळें तो दिवस चांगला गेला. थंडी मात्र मनस्वी वाजत होती. सभों-वतीं बर्फानें पूर्ण आच्छादिलेल्या पर्वतांचा वेढा पडला होता. मधून मधून

पाऊसही त्रास देत होता. इकडील घरें बहुतेक दोन मजली असतात. खालच्या मजल्याचा उपयोग जनावरें बांधणें, वैरण ठेवणें व घरास लागणारा लांकूड-फाटा सांठविण्याकडे होतो व वरच्या मजल्यावर माणसें राहतात. घर जरी दोन मजली असलें तरी त्याची उंची आपल्याकडील बैठ्या घराइतकीच असते. आम्हांस मिळालेल्या घरास एकच लहानसें १॥ फूट रुंद व २॥ फूट उंचीचें दार होतें व आंतील भागाची उंची सुमारें ३॥ फूट होती. आंत बसूनच शिरावें लागे व आंत ओणव्यानें अगर बसूनच काम करावें लागे. संवय नसल्यामुळें चुकून २।४ वेळां उभे राहिल्यामुळें मला डोक्यास चांगलेंच लागलें. आमच्या घराची लांबी व रुंदी सुमारें १४।१४ फूट असेल. इतरही घरें तशींच होतीं व त्यांत एकाच खोलींत ८।१० माणसें सुद्धां असत. मोठ्या श्रीमंताचें धान्य वगैरे ठेवण्याकरितां स्वतः-च्या मालकीचें एकादें कोठारही असें. मी पण्ड्यास विचारलें कीं; " घरें इतकीं ठेंगणीं कां व तुम्ही अशा हालांत कां राहातां ? " तो म्हणाला थंडीच्या दिवसांत सर्व गांव बर्फानें भरून जातो, तेव्हां आम्ही सर्वकाळ बहुधा घरांत शेगोटीच्या शेजारीं बसूनच काढतों. घरें उंच बांधल्यास त्यांस ऊब राहात नाहीं म्हणून तीं आम्ही ठेंगणी बांधतों. आमचा जन्मच इथला. येथील राहणी आमच्या आंगवळणीं पडली. आम्ही सपाट प्रदेशांत गेलों म्हणजेच आमची प्रकृति बिघडते. पण्ड्यास मामुली हिंदी फक्त येतें. संस्कृत वगैरेचा गंध नाहीं. तो म्हणाला आजपर्यंत येथें कोणी संस्कृत शिकविणारा नव्हता. नुकताच एक संस्कृत शिकलेला ब्राह्मण येथें आला आहे, त्याजपाशीं माझा भाऊ संस्कृत शिकतो. खरसाळी हें डोंगराच्या एका मोठ्या पठारावर वसलें असल्यामुळें गांव मोठें असून सुद्धां येथें पोष्ट-ऑफिस नाहीं. गांवांत एक मोठें तीन मजली लांकडी शनीचें देऊळ आहे. देवळाच्या दारास एक मोठी साखळी बांधून ती लांबवर नेली आहे व तीस लहान लहान घंटा अडकावल्या आहेत, त्यामुळें देवळाचें दार उघडतांना त्या घंटा एकदम वाजतात. आम्हांस देऊळ दाखविण्याकरितां पंड्याची बहीण पार्वती ही आली होती. परंतु घंटा वाजल्याबरोबर गांवच्या मुलांनीं कोणीतरी देवळांत गेल्याचें ताडलें व पैसा मागण्याकरितां शेंकडों मुलांचा घोळका आमच्या भोंवतीं जमला. इकडे वाटेंत एकादा पहाडी पुरुष-स्त्री, मुलगा, मुलगी कोणीहि भेटो, यात्रेकरूपाशीं कांहीं तरी मागितल्याशिवाय पुढें जावयाचें नाहीं असा त्यांचा सांप्रदायच आहे. सुई, दोरा, टिकल्या हे जिन्नस मागण्याचा तर त्यांचा जन्मसिद्ध हक्कच आहे.

मी माझ्या तोंड धुण्याच्या ब्रश ठेवण्याच्या पेटीस एक दोरी बांधली होती ती पंड्यानें सोडूनच घेतली. मी तक्रार केल्यावर तो म्हणाला साधी ४ फूट दोरी तुम्हांस देववत नाहीं. देशांत गेल्यावर तुम्ही दुसरी घ्या, आम्हांस येथें मिळत नाहीं. मी सांगितलें कीं दोरीची किंमत नाहीं परंतु आम्हांस देशांत जाईपर्यंत दोरी मिळणार नाहीं व तिच्या अभावीं गैरसोय सोसावी लागेल तिची वाट काय? शेवटीं ती दोरी त्यास द्यावीच लागली. देवळांत एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यास एकाच वाशास खोवण्या पाडून तयार केलेले लांकडी जिने आहेत. मला त्या जिन्यांनीं वरती जाऊन खालती येणें मोठें संकटच वाटलें;परंतु मोठमोठ्या डोंगरावरून चढणाऱ्या पहाडी मुलांस ते जिने अगदीं सोपे वाटले. तिसऱ्या मजल्यावरून सर्व गांवाची शोभा फार चांगली दिसते. वरती देवाची पूजा वगैरे रोज नियमानें करण्याचीं कांहींच चिन्हें दिसलीं नाहींत. संकटकाळीं देवास नवस करण्यापुरताच देवाचा उपयोग लोक करीत असावे असें वाटलें. इकडे बहुतेक रोगांवर डाग देणें हेंच औषध उपयोगांत आणतात असें आढळून आलें. रात्रीं झगरी करून झोंपीं गेलों.

सकाळीं लवकर उठून निघण्याचा विचार होता, परंतु भयंकर थंडी वाजत असल्यामुळें सुमारें ८ वाजतां **खरसाळी** सोडली. पंड्या अगोदरच वर गेला होता. त्यानें आपल्या बहिणीस आम्हांस घेऊन येण्यास सांगितलें होतें. तिचें वय सरासरी १२ वर्षांचें असेल. त्याप्रमाणें ती आमच्याबरोबर वाट दाखविण्याकरितां आली होती. मुख्य रस्त्यास लावून दिल्यानंतर ती परत गेली. आम्हीं जर आग्रहच केला असता तर ती वरहि आली असती. परंतु त्या लहान मुलीस ४ मैलांचा चढाव चढावयास लावणें आम्हांसच श्रेयस्कर वाटलें नाहीं. खरसाळी, पर्यंत बरीच चढण आहे, परंतु खरसाळीपासून मात्र सारखा ४ मैल चढावच आहे. सर्व रस्त्यांत खरसाळीपासूनचाच रस्ता अतिशय बिकट आहे. बिकट रस्त्यानें जाणें म्हणजे मला तर प्राणसंकट वाटे. कारण इतर सर्व साधारण मनुष्यांत असणारी समतोलशक्ति ( Power of balance ) माझ्यांत नाहीं. मला सायकलवर बसावयास शिकण्यास २० दिवस लागले. इतर सर्व यात्रा जो कठीण रस्ता थोड्याशा त्रासानें परंतु कोणाची मदत न घेतां ओलांडून जाई तो रस्ता मजला कुलीच्या मदतीशिवाय ओलांडतां येत नसे. रस्ता कठीण आला कीं मी चालणें थांबवीत असे व मागून एकादा पहाडी मनुष्य अगर कुली आला कीं त्याचा हात धरून त्या रस्त्यानें पलीकडे जात असे. लोक भित्रा म्हणत परंतु

अंगीं नसलेलें सामर्थ्य उत्पन्न करणें शक्य नव्हतें, व खालीं नदींत पडून जीव देण्याची तयारी नव्हती. अर्थात् **जम्नोत्रीच्या** रस्त्याचें वर्णन अगोदरच फार कठीण म्हणून ऐकिलें होतें, तेव्हां त्या रस्त्यास लागल्यावर वधस्तंभाकडे नेत असलेल्या बोकडाप्रमाणें मनःस्थिति झाली; परंतु आम्ही जवळचे बोजे खरसाळी-सच पंड्याकडे ठेवले होते म्हणून बोजा घेणारे दोन्ही कुली माझ्या दिमतीस होते. व तिसऱ्यानें **श्री. नानासाहेबांस** पाठीवर घेतलें होतें. चढण्यास सुरवात केली. ह्या चढावावर एक **भैरवाचें** देऊळ आहे म्हणून ह्या घाटास **भैरवघाटहि** म्हणतात. आदल्या दिवशीं पावसानें बराच त्रास दिला होता परंतु आम्ही गेलों त्या दिवशीं मात्र ऊन पडलें होतें. जों जों बर्फाच्या पर्वताजवळ जावें तों तों हिमालयाचें सौंदर्य वाढतच जातें. बाजूस असलेले डोंगर रुप्याप्रमाणें चकाकत होते. पलीकडे डोंगरावर बर्फ पडलें होतें तेंहि रुप्याप्रमाणें चकाकत होतें त्यामुळें डोळे दिपून जात होते. ह्या दगडांचें तेज आपल्या देशांत आणल्यास नाहींसें होतें, असें "माझी तीर्थयात्रा" कर्ते **श्री. फडके** म्हणतात, परंतु माझा अनुभव तसा नाहीं. मी कांहीं दगड मुद्दाम बरोबर आणले आहेत त्यांचें तेज अद्याप कायम आहे. हा चढाव चढण्यास सुमारें ४ तास लागले. जों जों **जम्नोत्रीचें** देऊळ व उगम जवळ येऊं लागला, तों तों रस्त्याचें काठिण्य वाढतच चाललें. अगदीं देवळाच्या अलीकडे सुमारें अर्ध्या फर्लांगावर एके ठिकाणीं कडा तुटल्यामुळें सुमारें ३ इंच रुंदीचाच रस्ता शिल्लक राहिला होता. तें ठिकाण पाहून तर पोटांत धडकीच भरली. समोर देऊळ दिसत होतें, परंतु त्यांत प्रवेश करितां येतो कीं नाहीं ह्याची शंका वाटूं लागली. कुलींच्या साह्या-य्यानेंच कां होईना, पण रस्ता उतरून पुढें जावें कीं न जावें हा विचारच मला पडला. **श्री. नानासाहेबांस** सबंध प्रवासांत कोणताहि रस्ता उतरण्यास कुलींची मदत घ्यावी लागली नव्हती; परंतु येथें त्यांनीं सुद्धां हात टेकले. व कुलींच्या मदतीनें ते रस्ता उतरून गेले. डाव्या हातास बर्फाच्छादित उंच डोंगर असून उजव्या हातास सुमारें १५।२० पुरुष खोलीवरून यमुना नदी मोठ्या सपाट्यानें वहात होती. सरतेशेवटीं मनाचा धडा करून रस्ता उतरण्यास तयार झालों. एक कुली एका टोकास, दुसरा दुसऱ्या टोकास व तिसरा मध्यें असें तीन कुली रस्ता सोडून उभे राहिले—कुलींस जाण्यायेण्यास रस्त्याची आवश्यकता भासत नाहीं—एकानें लोटलें, मधल्यानें तोल संभाळला व तिसऱ्यानें ओढलें व शीर-सलामत **यमुनोत्तरीस** येऊन सुखरूप पोहोंचलों.

## यमुनोत्तरी.


हें ठिकाण समुद्रसपाटीपासून सुमारें दहा हजार आठशें फूट उंचीवर आहे. त्यामुळें यमुनोत्तरीस येतांना रस्त्यावर फारसें ब्रर्फ पडलेलें नसतें. यमुना नदीचा उगम एका बर्फानें भरलेल्या दरींतून झालेला दिसतो. यमुनोत्तरीच्या पलीकडे बर्फाच्छादित शुभ्र डोंगर आहेत. त्यांवर माणसांस जातां येत नाहीं. जवळच गरमपाण्याचीं ५।७ कुंडें आहेत. त्यांतील पाणी सारखें उकळत असतें. पाणी ज्या दगडांच्या खालून वहातें ते दगड तापून गेलेले असतात. त्याच्याजवळ बसलें म्हणजे थंडीची बाधा फारशी होत नाहीं. ह्या पाण्याची उष्णता फा. है. १९४·७० डिग्री असते, म्हणून ह्यांत बटाटे, तांदूळ, वगैरे जिन्नस फार थोड्या वेळांत चांगले शिजतात. यमुनोत्तरीस पूर्वी दुकानें वगैरे नव्हतीं; परंतु सध्यां वाण्याचीं दोन दुकानें झालेली आहेत. **खरसाळीस** बटाट्यांचें पीक पुष्कळ येत असल्यामुळें येथें रुपयास १२ शेर भावानें बटाटे मिळाले. तांदूळ वगैरेहि मिळाले. आम्ही प्रथम ३ शेर बटाटे घेऊन फडक्याची सैल पुरचुंडी बांधून ती कुंडांत टाकून ठेवली. त्याप्रमाणें तांदूळहि शिजत ठेवले. एका भांड्यांत **यमुनेचें** स्वच्छ पाणी आणून त्या भांड्याच्या गळ्यास दोरी बांधून तें तापविण्यासाठीं कुंडांत सोडलें व त्या पाण्याचा चहाहि बनविला. येथें येणारे लोक चूल पेटविण्याच्या फारसे भानगडींत पडत नाहींत. एक सुमारें ४०।५० यात्रेकरूं उतरतील अशी धर्मशाळा, २।३ पडकीं घरें व यमुनानदीचें लहानसें देऊळ, इतकाच सरंजाम येथें असल्यामुळें बहुधा कोणी येथें वस्ती करीत नाहींत. वस्तीस खरसाळीस जातात. बटाटे, भात व मीठमिरची यांचा फराळ उरकून बिनदुधाचाच चहा पिऊन स्नानाकरितां गेलों. उष्ण झऱ्याचा एक पाट काढून एका कुंडांत आणून सोडला आहे. आजूबाजूची हवा थंड असल्यामुळें त्या कुंडांतील पाणी अंगावर घेण्याइतपत कढत असतें. थंड प्रदेशांत रोज स्नान करणें शक्य नसतें, म्हणून किती तरी वेळ स्नान करीतच रहावें असें वाटतें. परंतु फार वेळ गरम पाण्यांत डुंबल्यानें काय त्रास होतो, ह्याचा पूर्ण अनुभव ठाणें जिल्ह्यांतील **वज्रेश्वरीच्या** गरम कुंडांत स्नान करून घेतला असल्यामुळें थोड्या वेळांतच स्नान उरकलें. तोंच पावसाचीं चिन्हें दिसूं लागलीं, म्हणून लगेच परतलों. येतांना बहुतेक उतार असल्यामुळें व कठीण मानलेलें **यमुनोत्तरी** ह्या ठिकाणची यात्रा पार पडल्यामुळें एक प्रकारची हुषारी वाटत होती. संध्याकाळीं पांचच्या सुमारास खरसाळीस येऊन दाखल झालों. पंड्याची दक्षणा त्याच्या हातांत यमुनोत्तरीसच पडली होती म्हणून तो आमची काळजी न करितां यमु-

नोत्तरीस जाणाऱ्या यात्रेच्या व्यवस्थेस लागला. त्या दिवशीं यात्राहि फार आली होती, म्हणून रात्रीकरितां निवाऱ्याची जागा कोठें मिळेना. सरतेशेवटीं दुकानदारास एका रात्रीचे ४ आणे देऊन एका घराच्या कोपऱ्यांत मोठ्या जिकिरीनें जागा मिळविली. दुसऱ्या दिवशीं ता. १९।५।३१ रोजीं सकाळीं उठून चालण्यास सुरुवात केली. घरीं परत जाण्याची घाई व उतार ह्यामुळें एकदम मुक्कामास खैरात चट्टीवर आलों. कुली दमून गेले, म्हणून त्यांनीं शिऱ्याची मागणी केली. त्यांची मागणी त्यांच्या श्रमाचा विचार करितां मान्य करणें आम्हांस भाग पडलें. त्या बिचाऱ्यांनीं अवघ्या १३ आण्यांत ३ शेर शिरा बनविला. कारण त्यांनीं कांहीं गूळ, रवा, व तूप, एकत्र शिजविलें. आम्हांस तो शिरा कसासाच लागला. कुली म्हणाले आम्हांस तुम्ही करितां तो शिरा आवडत कां नाहीं, पण मिळतच नाहीं. आम्ही हाच शिरा आवडीनें खातों. त्यांचें रोजचें खाणें म्हणजे १॥ शेराच्या पोळ्या व तिखटमीठ घालून तयार केलेलें कसलें तरी कालवण. त्यास तूप तर पहाण्यासहि मिळत नसतें; मग खाण्यास कोठचें? मसालाहि त्यांजपाशीं नसे. अशा कष्टांत त्यास काळ काढावा लागे. एकंदर प्रवासाचा त्या तिघांचा खाण्याचा खर्च फक्त २५ रु. झाला. व आमचा दोघांचा ४० रु. झाला .ता. १९।५ रोजीं ( अलाहाबादच्या ) इर्विंग ख्रिश्चन कॉलेजचे प्रिन्सिपाल **रे. डॉ. सी. हर्बर्ट राइस** हे वाटेंत भेटले. ते सहकुटुंब हातांत मोठ्या काठ्या घेऊन व प्रवासी पोषाख घालून पायींच प्रवास करीत होते. त्यांच्याबरोबर सामानाकरितां ३ कुली होते. कोण,कुठले, काय वगैरे चवकशी करून व हिमालयाच्या शोभेबद्दल थोडेसें बोलून मार्ग चालूं लागलों.तेव्हां अनेक विचार मनांत घोळूं लागले. **गंगायमुनांचा** उगम पाहाण्यास परक्या प्रांतांतील सुशिक्षित लोकांनीं यावें व आमच्याकडच्या सुशिक्षितांनीं पुस्तकांतच डोकीं खुपसून बसावें, व बुद्धिवादानेंच राज्य जिंकण्याचा विचार करावा, ही किती आश्चर्याची गोष्ट आहे! इंग्रजांच्यापेक्षां जास्त बलवान् झाल्याशिवाय आम्हांस त्यांच्यावर मात करतां येणार नाहीं. अर्थात् ते जर ६००० कोसांवर बिनदिक्कत जातात, तर आम्हीं १२००० कोसांवर बिनदिक्कत जाण्याची तयारी केली पाहिजे. सोंवळेंओंवळें धर्म-अधर्म सर्व गुंडाळून ठेवलें पाहिजे; त्याशिवाय भागणार नाहीं. नुसत्या पुस्तकी शिक्षणानें जर देशाची उन्नति होत असती, तर आज पुण्याची तरी उन्नति खात्रीनें व्हावयास पाहिजे होती. कारण **पुण्यास** गल्लोगल्लीं बेकार ग्रॅज्युएट फिरत आहेत.त्यांस घराच्या बाहेर हांकून देऊन देशाची

स्थिति पाहाण्यास भाग पाडल्याशिवाय कांहीं देशाचा फायदा होणार नाहीं. बाहेर पडलें म्हणजे जन्टलमनाप्रमाणें मात्र राहाणी ठेवतां येणार नाहीं. **परंतु गुलाम राष्ट्रांतील** कोणताही मनुष्य स्वतःस **सभ्य गृहस्थ** म्हणवून घेण्याच्या लायकीचा नसतो, ह्याची त्यांस ओळख पटेल. देशस्थिति पाहण्याकरितां आलेला एकही सुशिक्षित मनुष्य मजला वाटेंत आढळला नाहीं. ता. २०।५ रोजीं सकाळीं **खैरात** चट्टी सोडून चालूं लागलों.

## सिमलीचट्टी.

खैरात चट्टीहून निघून ४ मैलांवरील **सिमली** चट्टीवर आलों. येथून **गंगोत्रीच्या** रस्त्यावरील नाकुरी चट्टीपर्यंत नवीन रस्ता तयार केला आहे. पूर्वी **सिमलीच्या** अलीकडील **गंगाणी** चट्टीवरून धाडसी यात्रेकरू उत्तर **काशीस** पहाडी कठीण रस्त्यानें जात; परंतु माझ्यासारखे यात्रेकरू परत **धरासूस** जाऊन तेथून **गंगोत्रीच्या** रस्त्यास लागत. आतां **सिमलीहून** रस्ता झाल्यामुळें २५ मैल हेलपाटा वांचतो.



**गंगानदीवरील लाकडी पूल.**

माझा प्रवास करण्यांतील एक मुख्य नियम आहे, कीं जाणूनबुजून जीव धोक्यांत घालावयाचा नाहीं. त्यामुळें पुष्कळ लोक मला भित्रा म्हणत. परंतु जाणूनबाजून धोक्यांत जीव घालणारे कांहीं लोक प्रवास करतांना जीवास मुकले आहेत. आपल्या कल्पनेप्रमाणें चांगल्या मार्गास लागल्यानंतर मग जर

आकस्मिक संकट आलें, तर मात्र घाबरावयाचें नाहीं. त्यामुळें अनेक संकटांतून मी सुखरूप पार पडलों आहे. **सिमलीहून** डाव्या हातास **गंगोत्रीकडे** रस्ता वळतो. नवीनच रस्ता तयार झाल्यामुळें सिमलीपासून ७॥ मैल गेल्याशिवाय चट्टी लागणार नाहीं, असा तपास लागला होता. रस्ता भयंकर जंगलांतून असून सारखी चढण होती. वाटेंत माणसेंही क्वचित् भेटत. ह्या जंगलांत वाघ असतात म्हणूनही बातमी लागली होती; परंतु आमच्या भेटीस येण्याची मात्र मेहेरबानी त्यांनीं केली नाहीं. हिंस्रपशू जीवाच्या भीतीनें दिवसा फिरत नाहींत व माणसेंही जीवाच्या भितीनें रात्रीं फिरत नाहींत, म्हणून माणसें व हिंस्रपशू ह्यांची गांठ क्वचितच पडते. मात्र गाय, म्हैस, बकरीं वगैरे जनावरें चरत चरत हिंस्रपशूंच्या दिवसाच्या निवासस्थानापर्यंत जातात व प्रसंगीं तीं प्राणास मुकतात. असो. मध्यें चट्टी नाहीं. मुक्कामावर लवकर पोहोंचलें पाहिजे म्हणून मोठ्या कष्टानें चढाव चढत होतों. सुमारें १०॥ वाजले. चढाव बराच शिल्लक होता तोंच कांहीं मंडळी भोजन तयार करण्याच्या कामांत गुंतलेली आढळली. चवकशीअंतीं एका पहाडी मनुष्यानें यात्रेकरूंची गैरसोय जाणून नवीनच चट्टी उघडल्याचें समजलें. चट्टीचें नांव अद्याप ठेवावयाचें होतें. आम्ही तीस " **जंगल-चट्टी** " हें नांव ठेवून तेथें भोजन वगैरे उरकून पुन्हां चालण्यास सुरवात केली. सुमारें एक मैल चढल्यानंतर चढाव पुरा झाला व एका मोठ्या पर्वताच्या शिखरावर येऊन दाखल झालों. पुढें उतार उतरण्यास सुरवात करावयाची असल्यामुळें थोडा वेळ विश्रांति घेतली. बरीच लांब व खोल अशी गंगा नदी, व तिच्या कांठांवर बसलेल्या **उत्तरकाशीं**तील घरें स्पष्ट दिसूं लागलीं; परंतु तीं १४।१५ मैल अंतरावर होतीं. चढावाप्रमाणें उतारही सारखा ३॥ मैल होता. उतरतांना एकदम खालीं घसरण्याची भीति वाटत होती, कारण रस्त्यावर सुरूच्या झाडाच्या काड्या पडल्या होत्या व त्यावरून सारखे पाय घसरत. वस्तीस **सिगोट** येथें पोहोंचलों.

## सिगोट.

येथें एक मोठी चट्टी आहे. उतरण्याची सोय चांगली आहे, परंतु जागेच्या मानानें यात्रा जास्त आल्यामुळें पडवींत पागोळ्यांच्या खालची टाकाऊ जागा आमच्या वांट्यास आली. रात्रीं दुसऱ्या मजल्यावरील मंडळींनीं फेकलेल्या घाणेरड्या पाण्याचें स्नानही झालें; परंतु भांडण करून स्नानाचें पुण्य गमावण्याच्या भानगडींत पडलों नाहीं. कुलीस उघड्यावर झगरीशीं रात्र काढावी

लागली. पाणी फार खोलीवर असल्यामुळें कुलींनीं पाण्याजवळच मुक्काम ठोकला. **श्री. नानासाहेबांचा** तीर्थविधींतील एक वेळच्या उपवासाचा कार्यक्रम शिल्लक राहिला होता तो त्यांनीं त्याच दिवशीं उरकून घेतला, व कुलींनीं माझा एक वार घेण्याचें कबूल केलें होतें, तो वार मी त्याच रात्रीं त्यांच्याकडे लावून घेतला. ता. २१ रोजीं **सिगोटहून** निघून **नाकुरीस** आलों.

## नाकुरी.

येथें **गंगा** नदीचें दर्शन झालें. थोडें पीठ वगैरे खाऊन **गंगोत्रीच्या** रस्त्यास लागलों. **नाकुरीहून** उत्तर काशी ६ मैल लांब आहे. रस्ता फारच चांगला व जवळ जवळ सपाट आहे. यमुनोत्तरीच्या रस्त्यापेक्षां अतिशय सोपी अशी वाट पाहून, आतां कठीण वाट संपली, मजेंत **गंगोत्रीची** यात्रा करून सुखरूप घरीं परत जाऊं, अशी खात्री वाटूं लागल्यामुळें मन अत्यंत प्रसन्न झालें. त्यांतही उत्तर-काशी हें मोठें गांव असून तेथें हलवायाचीं वगैरे दुकानें पोष्ट व तार-ऑफिस आहे अशीही माहिती मिळाली होती. रोजच्या पिठलेंभात व गंगोत्रीचहा ह्यामुळें जीभ कंटाळून गेली होती, तिलाही आनंद झाला. सुमारें ११॥ वाजतां उत्तर-काशीस येऊन सुखरूप पोहोंचलों. व **बाबा काली-कमली**वाल्यांच्या धर्मशाळेंत एक खोली मिळवून मुक्काम ठोकला.

## उत्तर-काशी.

**उत्तर-काशी** हें ठिकाण **गंगा** नदीच्या कांठावर वसलें आहे. **टिहरी** सोडल्यानंतर मोठी सपाटी अशी उत्तर-काशीसच आहे. उत्तर काशीचें क्षेत्रफळ १२ चौरस मैल आहे. वस्ती अर्थातच विरळ आहे. बाजारांत सर्व वस्तू मिळतात. तूप १ रुपायास १४ छटाक, बटाटे १६ शेर ह्याप्रमाणें भाव होते. दूध, दही, पुरी, भाजी वगैरे सर्व जिन्नस मिळत असल्यामुळें येथें स्वयंपाक केला नाहीं. **बाबा कालीकमलीवाल्यांची** सुमारें ३।४ शें माणसें सुखानें राहातील अशी मोठी धर्मशाळा येथें असून शिवाय आयुर्वेदिक औषधालयही आहे. डेप्युटी-कलेक्टर कचेरी, पोलिस-चौकी, सरकारी दवाखाना, अँग्लो संस्कृत हायस्कुल वगैरे संस्थाही आहेत. पोष्टाची मात्र व्यवस्था चांगलीशी नाहीं. एका किराण्याच्या दुकानदाराकडे पोष्टाचें काम आहे. आम्हीं C/o पोष्ट-मास्तर ह्या पत्त्यावर मागविलेलीं कांहीं पत्रें आम्हांस मिळालीं, त्यामुळें घरची खुशाली मात्र समजली; परंतु कांहीं कामाचीं पत्रें त्यानें गहाळ केलीं. त्यास इंग्रजीचें ज्ञान अगदींच थोडें आहे. पगार अवघा १० रु. महिना असल्यामुळें ह्या लोकोप-

योगी संस्थेची फार वाईट स्थिति आहे. येथून **टिहरी**पर्यंत टेलिफोनची तार नेली आहे. तार करावयाची असल्यास येथें पैसे भरून टिहरीस टेलिफोन करितां येतो, व तेथून तार होते असें समजलें. **उत्तर-काशी** हेंच खरें पवित्र क्षेत्र आहे. **काशीविश्वनाथाचें** मूळचें वास्तव्य येथेंच होतें. परंतु सर्वच भक्तांस येथें येणें शक्य नसल्यामुळें त्यांनीं **बनारस** येथें वास केला अशी कथा आहे. तरीही येथें त्यांची वस्ती जाऊन येऊन असतेच. येथें एकादश रुद्रांचें एक मंदिर, तसेंच विश्वेश्वराचें मंदिर वगैरे ठिकाणें पाहाण्यासारखीं आहेत. आसपास बरींच साधु लोकांची वस्ती आहे. त्यांच्याकरितां बरींच अन्नछत्रें येथें आहेत. मोठे शिकलेले साधु येथें वस्ती करून आहेत असें म्हणतात. लोकांचा उपसर्ग पोहोंचूं नये म्हणून, कांहीं साधु गंगेच्या दुसऱ्या तीरावर वस्ती करून राहिले आहेत. म्हणून गंगा उतरण्याकरितां दोरांचा पूल तयार केला आहे. हरिद्वार सोडल्यापासून वर्तमानपत्रांचें दर्शन झालें नव्हतें, तें येथें होईल अशी कल्पना होती परंतु तें घडलें नाहीं. एका गृहस्थाकडून देशांतील चळवळीची थोडीशी माहिती समजली. असो. ता. २२।५।३१ रोजीं सकाळीं **उत्तर-काशी** सोडली.

सुमारें १ मैल गेल्यानंतर एक लहानसें गांव लागलें. गांवांत चांगलीं पक्की बांधलेलीं बरींच घरें असून त्यांत अनेक संन्यासी राहात होते. गांवांत केळीचीं झाडें बरींच असून आजूबाजूची जमिन चांगली सुपीक दिसत होती. कांहीं दिवस स्वस्थ विश्रांति घेण्याला योग्य असें हें ठिकाण दिसलें. ह्यापुढील सर्व रस्ता **गंगानदीच्या** कांठाकांठानेंच गेला असल्यामुळें पुढें पाण्याची अडचण मुळींच भासली नाहीं. सुमारें २ मैल चालून गेल्यानंतर कचोऱ्याच्या फुलांनीं भरलेला एक डोंगर लागला. कचोऱ्याचीं फुलें पाहिल्याबरोबर कोंकण प्रांताची आठवण झाली व त्याचा उपयोग मंगळागौरीकरितांच विशेष प्रमाणांत होत असल्यामुळें मंगळागौरी जेवणें, जाग्रणें, वगैरे लहानपणांतील अनेक गोष्टी डोळ्यापुढून येऊन गेल्या व कांहीं वेळ तरी आपण **हिमालयांत** नसून घरींच आहोंत, असा भास झाला. **गंगोत्री**पासून ३ मैलांवरील

## गंगोरी

चट्टीस येऊन दाखल झालों. येथें ह्या ठिकाणीं **भागीरथी** व **असिगंगा** ह्या दोन नद्यांचा संगम झाला आहे. **गंगोरी**पासून एक रस्ता **डोडीताल** नांवाच्या तलावाकडे जातो. हा तलाव **गंगोरी**पासून सुमारें १६।१७ मैल आहे. पहिल्या ७ मैलांपर्यंत रस्ता साधारण बरा तयार झाला आहे व पुढें तयार करण्याचें काम सुरूं आहे. बर्फाच्छादित डोंगराऱ्या मध्यें २ मैल परिघाचा हा तलाव असल्या-

मुळें देखावा अत्यंत रमणीय आहे. तलाव पहाण्यास जाण्याइतका वेळ नसल्या-मुळें पुढें झटकलों. तेथून तीन मैलावर असलेल्या

**नैताला**

चट्टीवर मुक्काम करण्याचा विचार होता. परंतु लोकाश्रयाच्या अभावीं ती चट्टी उठल्याचें समजलें. म्हणून दुपारच्या मुक्कामास **मनेरी** चट्टीवर गेलों. ह्या चट्टीवर २ दुकानें असून एक **टिहरीच्या** राजाची व दुसरी **ब्रा. का. क.** वाल्यांची धर्मशाळा आहे. वस्ती करण्यास योग्य अशी येथें जागा आहे. परंतु १० मैलांवर मुक्काम करावयाचा नसल्यामुळें

**कुम्हाल्टी**

चट्टीवर मुक्कामास जाण्याचें ठरविलें. परंतु वाटेंत बातमी लागली कीं तेथें " माता कीं बिमारी " म्हणजे देवीचा अजार फार आहे, म्हणून मुक्कामास

**मल्ला चट्टीवर**

गेलों. हें ठिकाण एक जंक्शनच आहे. येथून एक रस्ता **त्रिजुगी नारायणावरून केदारनाथास** जातो. ज्यांस चारहि यात्रा करावयाच्या असतात, ते **गंगोत्रीहून** परत मल्ला चट्टीस येऊन तेथून परस्पर **केदारनाथास** जातात. येथेंच आम्हास प्रथम पालेभाजी मिळाली. चट्टी चांगली असून रात्रीकरितां निवाऱ्याची खोलीहि मिळाली होती. ता. २३।५।३१ रोजीं सकाळीं उठून चालण्यास सुरवात केली तों सुमारें एक मैलावरील

**भटवाडीस**

येऊन दाखल झालों. ह्यास **भास्करप्रयाग** असेंहि दुसरें नांव आहे. येथें एक जंगल इन्स्पेक्टरचा बंगला असून काली क. वाल्यांची धर्मशाळा, दुकान वगैरे सोई चांगल्या आहेत. परत येथपर्यंत यावेंच लागतें म्हणून येथील चौकीदाराच्या ताब्यांत बरोबर असलेले जादा सामान देऊन त्याची पावती घेऊन यात्रेकरू पुढें जातात. भटवाडी सोडून सुमारें १॥ मैल गेल्यानंतर तिबेटी व्यापाऱ्यांचे तंबू मधून मधून दिसून येऊं लागले. तंबूंत दोन लांकडी ठोकळ्यांवर एक फळी टाकून त्यावर चिनी मातीचे पेले ठेवून तिबेटी लोकांचें बायकांमुलांसुद्धां चहा-पान चाललें होतें. कांहीं ठिकाणीं रोट्या भाजण्याचें काम चालू होतें. ह्यांच्या चालीरीती तरी काय आहेत म्हणून चवकशी करण्याकरितां एका तंबूंत शिरलों व **रामसिंग व किसनराव** नांवाच्या दोघां तिबेटी व्यापाऱ्यांची मुलाखत घेतली. त्यांनीं प्रथम खारट चहाचा एक कप माझ्यापुढें ठेविला. **तिबेटी** चहांत साखरे-

ऐवजीं मीठ घालतात व दूध घातल्याशिवायच तो पितात. अर्थात् अशा चहाची मजला मुळींच जरूर न भासल्यामुळें मी तो थोडासा पिऊन बाकीचा टाकून दिला. नंतर ते म्हणाले,

"आम्हांस **तिबेटांत** जाण्यास २ महिने लागतात, अर्थात् जाण्या-येण्यांत आमचे ४ महिने जातात. ४ महिने आम्ही **तिबेटांत** राहतों व ४



**यमुनेच्या कांठचा एक देखावा.**

महिने डेहराडूनला राहतों. इकडून धान्य, साखर, वगैरे माल आम्ही तिबेटांत नेतों व त्याच्या मोबदला लोकर, पश्मिना वगैरे जिन्नस इकडे घेऊन येतों, वहानांच्या कामीं विशेषतः घोड्यांचा उपयोग करितों. मेढरांच्या पाठीवरून सुद्धां माल तिकडे जातो. वर्षांतून ४ महिने रस्ता खुला असतो. इतर वेळीं रस्त्यावर बर्फ असल्यामुळें रस्ता बंद असतो. सध्यां रस्ता खुला झाला असल्यामुळें आम्ही

**तिबेटांत** निघालों आहोंत. आमच्या गांवाहून मानससरोवर जवळ आहे. गेल्या वर्षी आम्ही १२ साधूंना आमच्या बरोबर नेलें होतें. आम्हींच त्यांस खाणें-पिणें पुरविलें. तुम्हीं येत असल्यास चला.

"सुमारें ४ दिवस साधारण रस्ता चालल्यानंतर पुढें मात्र पूर्ण बर्फप्रदेशांतून ६ दिवस चालावें लागेल. त्या प्रदेशांत मनुष्यवस्ती नाहीं. ( त्यास इंग्रजींत No man's Land–निर्जन प्रदेश म्हणतात ). म्हणून त्या प्रदेशांतून फार जपून जावें लागतें. शिधा–सामुग्री सर्व आपल्याबरोबर बाळगावी लागते. तसेंच त्या प्रांतांत चोरांचा फार सुळसुळाट आहे म्हणून आम्ही जमावानें जातों. आमच्यांत दोन भावांत मिळून एक बायको करण्याची चाल आहे. आम्ही हिंदुधर्मी आहोंत वगैरे वगैरे." त्यांनीं शिलाजीत घेण्याबद्दल मला आग्रह केला. पहाडांत भेटणाऱ्या प्रत्येक तिबेटी मनुष्याजवळ शिलाजीत असतें. परंतु सर्वांपासून विकत घेणें शक्य नसतें व तें चांगलेंच असेल अशी खात्री नसल्यामुळें घेण्याचें धाडस करवत नाहीं. त्या उभयतांचे दिलेल्या माहितीबद्दल आभार मानले व चालूं लागलों. वाटेंत **कोल्हापूर** येथील श्री. **नारायणदास** नांवाचे गृहस्थ भेटले. त्यांनीं सदावर्त घेऊन ४ ही धामांची यात्रा अवघ्या १५ रुपयांत केली. जवळ पांघरण्यास एक घोंगडी, अंगांत अंगरखा सुद्धां नाहीं अशा तऱ्हेची कष्टाची यात्रा त्यांना करतांना पाहून त्यांचें फार कौतुक वाटलें. थोडा वेळ मराठींत बोलण्यास सांपडलें म्हणून आनंद झाला. आतांपर्यंत **उत्तरकाशी**पासूनचा रस्ता चांगला होता, अर्थात् पुढेंहि रस्ता तसाच चांगला असेल अशा भ्रमांत होतों म्हणून श्री. **नारायणदासांस** रस्त्याबद्दल विचारलें. ते म्हणाले, "**सुक्की**पर्यंतचा रस्ता **जम्नोत्रीच्या** रस्त्यापेक्षां कठीण आहे, परंतु घाबरूं नका. आतांपर्यंत गेलेली बहुतेक मंडळी सुखरूप परत आली आहेत. तुम्हीही याल." अर्थात् त्यांच्यापेक्षां आमच्याजवळ साधनें पुष्कळ होतीं, तेव्हां आम्हांस घाबरण्याचें विशेष कारण नव्हतें. **कोल्हापुरास** परत जातांना **पुण्यास** मजकडे उतरण्याबद्दल त्यांस आमंत्रण देऊन पुढचा रस्ता धरला व दुपारच्या भोजनास **भुक्की**चट्टीवर येऊन दाखल झालों.

सुमारें ३ वाजतां **भुक्की** सोडून चालूं लागलों. वाटेंत निरनिराळ्या रंगांच्या सुंदर सुवासिक फुलझाडांच्या डोंगरास सुरवात झाली. भुक्कीपासून सुमारें २॥ मैल गेल्यानंतर **गंगणाणी**चट्टी **गंगानदी**च्या पलीकडल्या तीरावर दिसूं लागली व एक रस्ता उजव्या हातास डोंगरावर जातांना दिसला. त्या रस्त्यानें सुमारें १ फर्लांग चढल्यानंतर **ऋषिकुंड** नांवाचें गरम पाण्याचें कुंड लागलें. पुष्कळ दिव-

सांत स्नान घडलें नसल्यामुळें तेथें स्नान केलें. तेथील पाण्याची उष्णता १३२ डिग्री आहे. असें म्हणतात कीं वातरोगी मनुष्यानें ह्या ठिकाणीं रोज २।३ तास नित्य नेमानें १॥ महिना स्नान केल्यास तो रोगमुक्त होतो. पाणी झऱ्यांतून कुंडांत येतें व बाहेरच्या हवेमुळें तें थोडें थंड होतें, म्हणून अंगावर कसेंबसें घेववतें. कुंडांत उतरणें मात्र शक्य नाहीं. जवळच एक देऊळ असून त्यांत पंड्या बसला होता, तो संकल्प सांगून मजला स्वर्गाचा रस्ता मोकळा करून देण्याच्या तयारींत होता; परंतु मी त्याची मदत आभारपूर्वक नाकारली.

मनसोक्त स्नान उरकून खालीं उतरलों. **गंगानदी**वरील पूल ओलांडून **गंगणाणी** नांवाच्या चट्टीवर येऊन दाखल झालों.

## गंगणाणी.

ही चट्टी गंगाकांठावर असलेल्या एका मोठ्या डोंगरसपाटीवर वसली आहे. एक मोठा धबधबा जवळच असून आजूबाजूस घनदाट जंगल आहे. ह्या ठिकाणीं **ललिताप्रसाद** व **हरिप्रसाद पिलभीटवाले** यांची धर्मशाळा चांगली मुक्काम करण्याच्या सोईची आहे. तेथें मुक्काम केला. धर्मशाळेच्या मागें पहाडांतून मालाची नेआण करणाऱ्या व्यापाऱ्यांचे मेंढ्यांचे कळपच्या कळप उतरले होते. सर्व मेंढ्यांची मोजदाद करणें, त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था नीट आहे कीं नाहीं हें पहाणें, रात्रीं त्यास कोणी त्रास देऊं नये म्हणून त्यांच्या सभोंवतीं पडदे लावणें, त्यांच्या करमणुकीकरितां गाणें म्हणणें वगैरे गोष्टींचें निरीक्षण करण्यांत किती तरी वेळ निघून गेला. रात्रीं एका पहाडी मनुष्याची मुलाखत घेतली. तो म्हणाला "आमच्या इकडे इतर रोग नाहींतच म्हटलें तरी चालेल. फक्त एकच रोग—**पेटकी बिमारी**—पोटाचा रोग—आहे. आम्हांस अत्यंत कष्ट करूनहि पोटभर खाण्यास मिळत नाहीं. पूर्वी राजाचें सालीना उत्पन्न १। लाख होतें तें निरनिराळे कर लादून राजानें हल्लीं ९ लाखांपर्यंत वाढविलें आहे. * **इंग्रजाकडे**

---

* **टीप**—त्यानें सांगितलेली माहिती, Indian Year Book, 1915, 1922, 1931 Published by Times of India, Bombay ह्यांत पडताळून पाहिली तों १९१५ ते १९२२ सालापर्यंत संस्थानचें उत्पन्न सालीना ६ लाख होतें तें वाढतां वाढतां १९३१ मध्यें १४ लाख झालें. अर्थात् हें उत्पन्न प्रजेवर नाना प्रकारचे जुलमी कर लादूनच राजानें वाढविलें असले पाहिजे. राजेसाहेब काय लायकीचे असतील ह्याची कल्पना ह्यांच्या पूर्वजांनीं १८५७ च्या **स्वातंत्र्ययुद्धांत इंग्रज**बहादुरांना मदत केली होती ह्या एकाच गोष्टी-वरून वाचकांस करितां येईल.

दाद मागावी तर ते दाद घेत नाहींत. **राजा**विरुद्ध बंड करावयाचें ठरविलें तर मात्र इंग्रज त्यास मदत करण्यास एका पायावर तयार होतील. **इंग्रजांची** खुषामत केल्यामुळें राजास सी. एस्. आय्. सारख्या पदव्या मिळाल्या आहेत व त्याचेंच त्यास भूषण वाटतें, आम्ही काय करावें ? थंडीच्या दिवसांत घराच्या बाहेर पडवत नाहीं. शेतांत पिकलेलें धान्य सरकारसाऱ्यापायीं विकून टाकावें लागतें व थोडेंसें उरतें त्यावर अर्धपोटी राहून कसाबसा जीव जगवतों. बरेच लोक उपासमारीनें मरतात. वस्त्रें विकत घेण्यास पैसा शिल्लक रहात नाहीं हें शिवाय." मी त्यास म्हणालों, "हें पदवीचें वेड आमच्याकडच्या भागांत सुद्धां राजेलोक व श्रीमंत यांस लागलें आहे, परंतु सामान्य जनता सरकारशीं लांगूल-चालन करणारे अगर देशद्रोही ह्या दृष्टीनेंच ह्या पदवीधरांकडे पहाते. एकदां कै. **इतिहासाचार्य राजवाडे** यांनीं आपल्या इतिहाससंशोधनाची माहिती लोकां-पुढें मांडण्याकरितां सभा बोलाविली होती. त्यांनीं आपल्या संशोधित कागद-पत्रांची माहिती लोकांस सांगून प्रसिद्धीकरणास मदत मागितली. तेव्हां प्रसिद्धिलोलूप, सरकार व जनता ह्या दोघांकडूनही मान उपटण्यास हापापलेले एक शेटजी उभे राहिले व म्हणाले, " जर **श्री. राजवाडे** हे मी नांवें सुचवितों ते तीन रावबहादुर पसंत करतील, तेच कागदपत्र छापण्यास तयार असतील, तर मी एकटा ह्या कार्यास ३० हजार रुपये देण्यास तयार आहे." **कै. राजवाडे** तडक उठून म्हणाले, "ज्यांनीं आपल्या हयातीचीं अमोलिक तीस वर्षें सर-कारच्या गुलामगिरींत घालविलीं, अशा हांजीहांजीखोर रावबहादुरांच्या मताप्रमाणें माहिती प्रसिद्ध करण्याकरितां मी जंगलें पायांनीं तुडवून व अनेक हाल सोसून इतिहाससंशोधन केलें नाहीं. माझ्या मताप्रमाणें इतिहासाचें संशोधन करण्याकरितां मजला जरी कोणी मूठभर तांदूळ दिले तरी मी घेईन, परंतु शेटजींचे ३० हजारच काय परंतु ३० लाख रुपयेहि मजला नकोत !" अर्थात् शेटजींचे पैसे शिल्लक राहिले. मात्र त्यांनीं धर्मादायाकरितां काढलेले पैसे **आफ्रिकेंत** रबराच्या मळ्यांत कमी काम झाल्यामुळें हिंदी मजुरांचे व त्यांच्या बायकांमुलांचे हातपाय तोडून टाकणाऱ्या **बेलजमच्या** लोकांच्या मुलां-करितां हिंदुस्तानच्या स्वाभिमानशून्य नागरिकांनीं उभारलेल्या **अवरडे** फंडास देऊन टाकिले, व त्यानंतर त्यांस एक बहुमानाची (?) पदवी सरकारकडून अर्पण करण्यांत आली अशी एक गोष्ट ऐकिली आहे. तुम्ही आतां आपली कैफियत राष्ट्रसंघापुढें मांडली पाहिजे,व त्यास, "एक आम्हांस **इंग्रजांचें** संरक्षण तरी द्या अगर

आमच्या राजास इंग्रजांकडून मिळणारें संरक्षण काढून तरी घ्या, मग आम्ही व आमचें सुजें पाहून घेऊं असें सांगितलें पाहिजे." त्यानें ह्या गोष्टीचा विचार करण्याचें कबूल केलें. ता. २४।५।३१ रोजीं सकाळीं **गंगणाणी** सोडली व **सुक्की**चट्टीचा रस्ता धरला. **गंगणाणी**पासून **सुक्की** सुमारें ८ मैल आहे; परंतु वाटेंत ठिक-ठिकाणीं रस्ता पडला असल्यामुळें चालण्यास अत्यंत त्रास होत होता. **सुक्कीस** जाईपर्यंत **गंगानदी**वरील दोन पूल ओलांडावे लागतात. एक पूल लांकडी आहे, त्यावरील लांकडें कुजल्यामुळें तो उतरणें धोक्याचें आहे. दुसरा पूल तारांचा आहे परंतु त्याच्या तारा इतक्या वाईट आहेत कीं केव्हां तुटून सर्व यात्रा गंगास्तृप्यंतु होईल याचा नियम नाहीं. श्री. **नानासाहेब** म्हणाले " जर घरच्या मंडळींस बरोबर घेतलें असतें तर ती मंडळी येथपर्यंत कशीबशी आली असती; परंतु येथून मात्र निश्चित परतली असती. " सुखरूप पूल पार झालों. पुढें सुमारें १ मैल गेल्यानंतर २ रस्ते लागले, एक पायवाट व दुसरा वहाता मोठा रस्ता. मी सरळ रस्त्यानें गेलों. कुली मात्र पायवाटेनें निघाले. मी धर्मशाळेजवळ जाऊन पोहोंचलों. १५।२० मिनिटें वाट पाहिली. धर्मशाळा **सुक्की** गांवापासून सुमारें पाऊण मैलावर आहे. तिकडे कदाचित् कुली गेले असतील असें वाटून गांवाचा रस्ता धरला; गांवाजवळ जातों तों कुली मागाहून धांवत आला, म्हणून पुन्हां धर्मशाळेंत आलों. जीव अत्यंत थकून गेला होता कारण रस्ता वाईट असल्यामुळें ८ मैलांस ६ तास लागले. **श्री. नानासाहेब** म्हणाले "कुलींनीं मधल्या रस्त्यानें काढलें, परंतु रस्ता कांट्यांनीं भरलेला असल्यामुळें कुली रस्ता चुकल्यामुळें फार त्रास झाला. मोठ्या जिकीरीनें धर्मशाळा गाठली!!"

## सुक्की.

येथें **बाबा का. क. वाल्यांची** सुंदर पक्की बांधलेली धर्मशाळा आहे. **सुक्की** हें गांव **गंगोत्रीच्या** पंड्यांचें गांव आहे. **खरसाळी**प्रमाणें येथें गंगोत्रीच्या पंड्यांची वस्ती आहे. **सुक्की**पासून **खरसाळी**पर्यंत एक पहाडी रस्ता आहे, परंतु तो यात्रेकरूंच्या उपयोगाचा नाहींच. पहाडी लोकांस मात्र त्याचा थोडा उपयोग होतो. भोजन उरकून पुन्हां चालण्यास सुरवात केली. सुमारें एक मैल चालल्यानंतर सर्व देखावा पालटला. जणूं कांहीं पुढें उत्तम देखावा पाहावयाचा होता म्हणून सकाळपासून अत्यंत कष्टाचा प्रवास घडला होता. सभोंवतालीं देवदार वृक्षांनीं पूर्ण भरलेल्या व मधून मधून लहान गांवें वसलेल्या डोंगरांच्या मध्यें सुमारें अर्ध्या मैलाच्या सपाटीवरून गंगानदी अत्यंत

५०२४

शांतपणें वाहात होती. तिच्या पात्रांत शुभ्र पांढरे गोटे दृष्टीस पडत होते. मध्ये मधून लहान लहान बेटेंही दिसत होतीं. गंगानदीस दोन बाजूंनी दोन लहान नद्या ह्याच ठिकाणीं मिळत असल्यामुळें ह्या शोभेत भरच पडली होती. हें ठिकाण समुद्रसपाटीपासून ६००० फुटांवर आहे ह्या ठिकाणीं आल्याबरोबर



**तिबेटांतील सुंदर स्त्री.**

आपण मृत्युलोकांत नसून कोणत्या तरी दिव्य लोकांत आहोंत असा भास होतो. येथून सारखी उतारास सुरवात झाली व **श्यामगंगा** व **भागीरथी** त्यांच्या संगमावर येऊन पोहोंचलों. ह्या ठिकाणास **श्यामप्रयाग** म्हणतात.

श्यामगंगेचे २१३ प्रवाह पुलावरून ओलांडावे लागतात. हे पूल लांकडी तर बनविलेच आहेत, परंतु लांकडें बांधण्यास दोऱ्या सुद्धां राजास मिळाल्या नाहींत ! त्यानें लाकडें एकाशीं एक झाडाच्या वेलींनींच वांधलीं आहेत. काय ही अनास्था !

**श्यामगंगा** ओलांडून पलीकडे गेल्यानंतर २ रस्ते फुटतात, एक पायरस्ता **गंगानदीच्या** पात्रांतून **हर्सिल** येथें जातो व दुसरा नदीच्या कांठावरील डोंगराच्या कडेकडेनें जातो. पहिला रस्ता जवळचा आहे परंतु तो दगडांनीं भरलेला असल्यामुळें आम्ही दुसऱ्या रस्त्यानें गेलों. ह्या रस्त्यावर प्रथम बर्फ लागलें, परंतु बर्फावरील रस्ता त्रासदायक नव्हता. **गंगोत्री—जन्मोत्रीच्या** यात्रेस बर्फाचा त्रास मुळींच होत नाहीं तोच **बदरीकेदारच्या** यात्रेस 'फार त्रास होतो. सुमारें ६ वाजतां **हर्सिल** येथें येऊन दाखल झालों. ह्या गांवांत सर्व वस्ती **तिबेटी** लोकांची आहे, म्हणून येथें आल्याबरोबर आपण **हिंदुस्थानांत** नसून **तिबेटांतच** आहों असा क्षणभर भास होतो. जिकडे तिकडे तिबेटी बायका लोकर पिंजणें, तिच्या दोऱ्या बनविणें, त्यांचीं वस्त्रें विणणें वगैरे कामांत गढून गेलेल्या दिसत होत्या. कांहीं ठिकाणीं लोकरीचीं निरनिराळ्या प्रकारचीं वस्त्रेंहीं विक्रीस ठेवलेलीं आढळून येत होतीं, तर कांहीं वृद्ध स्त्रीपुरुष घराच्या-पुढें फळ्या मांडून आपल्या आयुष्यांतील इतिकर्तव्यता संपली आतां स्वस्थ बसून खाणें हा आपला हक्क आहे, अशा मुद्रेनें मजेंत चहा पीत बसलेले आढळून येत होते. त्यांच्या जवळच आपल्या पुढील आयुष्याबद्दल बेफिकीर असलेल्या लहान मुलांचा दंगा चालूच होता. मला पाहून कोणी तरी नवीन प्रकारचा मनुष्य म्हणून मुलांचा मोठा घोळकाच माझ्याभोंवतीं जमा झाला. मात्र माझ्या हातांत मोठी लांबलचक काठी असल्यामुळें तिच्यापासून आपणांस त्रास पोहोंचणार नाहीं इतक्या बेतानें त्यांनीं यथाशक्ति निरीक्षण केलें व माझ्यासंबंधीं कांहींतरी नक्की कल्पना ठरवून त्यांनीं आपला रस्ता सुधारला. माझ्या मनांत कांहीं दिवस त्या गांवांत राहून **तिबेटी** लोकांच्या चालीरीतींचा अभ्यास करून मग पुढें जावें असें फार होतें. परंतु दिवस अगदीं मोजकेच असल्यामुळें राहाण्याचा बेत रहित करून पुढचा मार्ग धरला. **हर्सिल** हें गांव वृक्षांच्या आडींत बसलें आहे. पुढें सारखी २ मैल झाडीच आहे. पाण्याचे प्रवाह इकडून तिकडे सारखे वाहात असल्यामुळें अनेक पूल ओलांडून **हर्सिलपासून** सुमारें अर्ध्या मैलावरील **हरिप्रयाग** नांवाच्या ठिकाणीं येऊन दाखल झालों.

## हरिप्रयाग.

येथें एक लक्ष्मीनारायणाचें सुंदर देऊळ **गंगेच्या** कांठावर बांधलें असून देवळाभोंवतीं चांगल्या उतरण्यासारख्या खोल्या आहेत. पैकीं एका खोलींत आम्हीं मुक्काम केला. ह्या देवळाजवळच एका **इंग्रजानें** पुष्कळ दिवसांपूर्वी बांधलेला एक मोठा लाकडी बंगला आहे. त्या **इंग्रजानें** कांहीं दिवस वस्ती केली. परंतु एकांतवासास कंटाळून तो **इंग्रज** एक दिवस बंगला सोडून चालता झाला, अर्थात् बेवारशाची इस्टेट म्हणून तो बंगला आतां राजाकडे आला आहे. आपल्याकडे बेवारशाची इस्टेट सरकारांत जमा होते, परंतु बेवारसी मुलांस पोसण्याची जबाबदारी घेण्यास सरकार तयार नाहीं. ती जबाबदारी प्रजेवर. तोच न्याय (?) इकडेही आहे. बंगला सध्यां ओसाड स्थितींत आहे. ता. २५।५।३१ रोजीं सकाळीं थंडी फारच वाजत असल्यामुळें प्रथम **गंगोत्री** चहा बनवून मग चालण्यास सुरवात केली. येथून सुमारें ३ मैलांवर **धराली** नांवाचें गांव लागलें.

## धराली.

हें गांव **गंगानदीच्या** कांठावर वसलें असून येथें **बा. का. क.** वाल्यांची धर्मशाळा व दुकानही आहे. ह्या गांवाच्या आसपास पुष्कळ प्रसिद्ध साधु पुरुषांची वस्ती आहे असें म्हणतात. येथील लोक **नेलंग** खिंडीच्या मार्गानें तिबेटशीं व्यापार करितात म्हणून कैलास मानससरोवराकडे जाणारे यात्रेकरू येथील लोकांस मार्ग दाखविण्याकरितां आपल्याबरोबर घेऊन जातात. **ह्या** ठिकाणींही **गंगोत्रीचे** कांहीं पंडे राहातात व कांहीं **गंगेच्या** दुसऱ्या तीरावरील **मुखामा** गांवींही राहातात. येथून चार मैलांवर **जानव्हीचट्टी** लागली हीसच **जांगलाचट्टीही** म्हणतात. येथें लांकडी पुलावरून **गंगानदी** ओलांडून पार व्हावें लागतें. ह्या ठिकाणीं **गंगानदी** मुद्दाम डोंगर फोडून तयार केलेल्या रस्त्यानें वहात आहे असें स्पष्ट दिसून येतें. **जान्हवीचट्टी** सोडून सुमारें एक मैल गेल्यानंतर गंधकाचा डोंगर लागतो म्हणून त्यावरील जमीन साधारणपणें गरम होती. प्रदेश थंड असल्यामुळें जमिनीच्या उष्णतेचा त्रास मुळींच झाला नाहीं. पुढें सुमारें अर्धा मैल गेल्यानंतर **रास्ता तिब्बतकू** व **रास्ता गंगोत्रीकू**, अशा दोन पाट्या लागल्या. डाव्या हाताचा रस्ता **मोटन** गांवावरून **नेलंग** खिंडींतून **तिबेटांत** जात होता व उजव्या हाताचा रस्ता **गंगोत्रीस** जात होता. कुली वाचतां येत नसल्यामुळें कदाचित् रस्ता चुकून **तिबेटाकडे** जातील म्हणून तेथें कांहीं वेळ थांबून कुली आल्यानंतर चाल-

ण्यास सुरवात केली व **जान्हवी** नदीच्या कांठावर येऊन ठेपलों. **गंगा** नदीच्या दुप्पट **जान्हवीचें** पात्र असून **गंगाच** श्रेष्ठ कां राहिली हें दोन्ही नद्यांचें पाणी चाखून जिभेस कांहीं फरक कळतो कीं काय हें पाहाण्याचा विचार होता; परंतु पात्र फार खोल असल्यामुळें तो विचार तसाच सोडून पूल पार झालो व डोंगर चढण्यास सुरवात केली. **गंगोत्रीच्या** प्रवासांतील कठीण चढाव तो हाच. ह्यास **भैरवघाटी** असें नांव आहे. सकाळीं निघण्यास उशीर झाला होता. व सकाळपासून सुमारें ८ मैल चालही झाली होती. व त्यापुढें हा डोंगर चढण्याची वेळ आली, परंतु मध्यें कोठेंच स्वयपाक करण्याची सोय नसल्यामुळें मोठ्या कष्टानें **भैरवघाटी** चढून सुमारें १२ वाजतां **भैरव** चट्टीवर जाऊन पोहोंचलों. येथें **बा. का. वाल्यांची** धर्मशाळा आहे. पूर्वी पाण्याची मोठी गैरसोय होती परंतु सध्यां एका श्रीमंत बाईनीं लांबून पाणी बांधून आणून येथें एक पाणपोई केली आहे म्हणून यात्रेकरूंची मोठी गैरसोय दूर झाली आहे. धर्मशाळेंत राहाण्यास जागा मिळत होती, परंतु स्वयंपाक करण्यास जागा मिळत नव्हती म्हणून झाडाखालींच स्वयंपाक बनविला. प्रथम आमचा **भैरवचट्टीवरच** मुक्काम करण्याचा विचार होता, परंतु भोजनानंतर तीन तास दिवस आंगावर होता. वरें जें ठिकाण पाहाण्याकरितां इतके कष्ट भोगले त्या ठिकाणापासून अवघ्या ६ मैलांवर स्वस्थ बसणें कसेंसेंच वाटलें. त्यांतही पुढें रस्ता अगदीं सीधा आहे अशी माहिती मिळाली म्हणून **भैरवचट्टी** ३ वाजतांच सोडली. जों जों **गंगोत्रीच्या** जवळ जवळ जाऊं लागलों तों तों फुलझाडांची संख्या वाढत चालली. गंगानदी उजव्या हातास सुमारें २५।३० पुरूष खोलीवरून वाहात होती. तिच्या पलीकडे बर्फानें आच्छादलेले पर्वत दिसत होते. मधून मधून पांढऱ्या शुभ्र हिमनद्या डोंगरावरून **गंगानदीकडे** उड्या घेतांना दृष्टीस पडत होत्या. डाव्या हाताचे डोंगर देवदाराच्या झाडीनें भरलेले असून वाटेंत सारखे लहान लहान ओढे लागत होते. लहान मोठे चढउतार चढत उतरत ता.२५।५।३१ रोजीं संध्याकाळीं सहा वाजतां **गंगोत्रीस** येऊन दाखल झालों. जीव अगदीं थकून गेला होता, परंतु इच्छित गोष्ट सिद्धीस गेल्यामुळें मन मात्र फार उल्हसित झालें होतें.

## गंगोत्री.

**गंगोत्री** हें गंगाकांठावरील सामान्य यात्रेकरूंस स्वल्पकष्टसाध्य असलेलें शेवटचें ठिकाण आहे. ह्या ठिकाणाच्या पुढें कायमची अगर **हंगामी**

सुद्धां लोकवस्ती नाहीं. **गंगोत्री** हें सुमारें १०।१५ घरांचें लहानसें गांव आहे. **यम्नोत्री**पेक्षां मात्र वस्ती जास्त आहे. यात्रेकरूंना उतरण्याकरितां चांगल्या पक्क्या बांधलेल्या तीन धर्मशाळा येथें आहेत. आम्ही मध्यम वर्गांतलि यात्रेकरू होतों. कारण आमच्याबरोबर ३ करंडीवाले कुली होते. दांडीवाले नव्हते. म्हणून आम्हांस साधारण निवाऱ्याची, ओलसर व छपरांतून पाणी अनायासें आंगावर पडूं शकेल अशी खोली मिळाली. ज्यांच्यापाशीं दंडया अगर झंपानें होतीं, पांघरण्यास भरपूर कपडे होते, खाण्याची सोय उत्तम होती, अशा श्रीमंत यात्रेकरूंच्या वांट्यास चांगल्या पक्क्या बांधलेल्या निवाऱ्याच्या सर्व सोयींनीं भरलेल्या अशा खोल्या आल्या. साधू म्हणून लोकाश्रयावर फिरणाऱ्या भिक्षेकऱ्याच्या वांट्यास धर्मशाळेच्या पडव्या आल्या व आंगावर फाटका सुद्धां कपडा पुरेसा नाहीं, पोटभर अन्न खाण्यास मिळत नाहीं, अशा निढळाच्या घामावर उदरनिर्वाह करणाऱ्या प्रामाणिक मजुरांच्या वांट्यास राहिलेली मोकळी जागा आली. काय जगाचा न्याय आहे पहा? वास्तविक त्या मजुरांस हवा आंत न शिरणाऱ्या खोल्या द्यावयास पाहिजे होत्या. श्रीमंत लोक उघड्यावर पडले असते तरी त्यांस पुरेसे कपडे होते. असो. पोहोंचल्याबरोबर प्रथम चहा तयार केला. नंतर **गंगेच्या** दर्शनास गेलों. येथें गंगेचें चांगलें पक्कें दगडी देऊळ बांधलें आहे. आम्ही गेलों ते दिवस **दशाहाराच्या** उत्सवाचे असल्यामुळें आसपासच्या भागांतून पुष्कळ पाहाडी लोक गंगेच्या पालख्या घेऊन गंगोत्रीस येऊन दाखल झाले होते. त्यांचा देवळाभोंवतीं पालखी हिंडविण्याचा कार्यक्रम सुरू होता. नंतर सर्व पहाडी लोकांनीं एकमेकांच्या खांद्यावर हात ठेवून मोठी ओळ तयार केली व ढोलाच्या तालावर नाचत नाचत देवळाभोंवतीं २।३ प्रदक्षणा घातल्या, नंतर पायास चाळ बांधून पहाडी बायकांनीं देवळापुढें बराच वेळ नाचही केला. एकंदर मजा पाहण्यासारखी होती. त्यानंतर संध्याकाळीं गंगेची आरती झाली, त्याही वेळचा देखावा अतिशय आनंदकारक होता. **गंगोत्रीस** तीन किराणा मालाचीं व एक हलवायाचें अशी चार दुकानें आहेत. हलवायांकडून पुरी पकोडी घेऊन खाल्ली व रात्रीं झगरी तयार करून सर्व कपडे आंगावर चढवून झोपीं गेलों.

दुसरे दिवशीं सकाळीं उठल्याबरोबर प्रथम स्नान करण्याचा विचार होता. परंतु मनस्वी थंडी वाजत असल्यामुळें धीर होईना. **गंगोत्री** येथें गंगेच्या पात्राची रुंदी सुमारें ५० फूट असून खोली ३ फुटांपेक्षां जास्त नाहीं. पाणी

अत्यंत थंड असल्यामुळें पहाडी लोकांशिवाय इतर कोणीही आंत उतरून स्नान करीत नव्हता. प्रत्येक जण आंगावर तांब्यानें पाणी घेऊन कसें बसें स्नान उरकीत होता. **श्री. नानासाहेबांनीं** तशाही थंडींत स्नान करून **गंगापूजन**, श्राद्ध वगैरे तीर्थविधि उरकले. मला श्राद्धसंकल्प वगैरेचें कांहीं बंधन नसल्यामुळें मी सर्व सकाळचा वेळ इकडे तिकडे भटकण्यांत खर्च केला. हलवायाचें दुकान असल्यामुळें स्वयंपाक नव्हताच. निघाल्यापासून संपूर्ण एक दिवसाचा विसांवा कधींच मिळाला नव्हता व पुढेंही लवकर मिळण्याचा संभव नव्हता, म्हणून आजचा दिवस मजेंत काढण्याचें ठरविलें. संध्याकाळीं चार वाजेपर्यंत स्नान करावें कीं न करावें ह्याचा मनाशीं सारखा खल चालला होता. परंतु सरते शेंवटीं **श्री. नानासाहेब** म्हणाले पुण्याकरितां नव्हे तर इतके कष्ट सोसलेतच मग स्नानांत तरी किती कष्ट आहेत हें एकवार अनुभवण्याकरितां तरी स्नान करा. तें मात्र मजला पटलें. मग हलवायास चहा तयार करण्यास सांगून स्नानास गेलों व कसे बसे ३।४ तांबे पाणी आंगावर ओतलें. आंग थोडेसें चोळलें, तों सर्व शरीर गार पडण्याची वेळ आली. लगेंच स्नान आटोपलें, कपडे चढविले व चहा घशाखालीं घातला. अशा तऱ्हेनें शपथेला मोकळा होण्यापुरतें स्नान घडलें. संध्याकाळीं गंगेचीं भांडीं भरून पंड्यासमक्ष त्यांची पूजा करून व त्यास संतुष्ट करून त्याचा आशीर्वाद मिळविण्याचा विधि झाला. मी भांडें भरून घेतलें. आशीर्वादाची अपेक्षाच केली नाहीं, अर्थात् दक्षणेचा प्रश्नच संपला. सरते शेंवटीं मी मागितला नसतांही त्यानें माझी यात्रा सुफळ झाल्याचा आशीर्वाद मला बहाल केल्यामुळें, त्याची मागणी नसतांही मी त्यास ४ आणे बक्षीस दिले. त्यानंतर **गंगेच्या**पलीकडच्या तीरावर भोजपत्र व देवदार ह्यांच्या दाट जंगलांत असलेल्या **केदारेश्वराचें** देऊळ पाहण्यास गेलों. प्रथम **गंगानदीवरचा** लांकडी पूल ओलांडला, मग **केदारगंगेवरचा** लाकडी पूल ओलांडला व सुमारें २ फर्लांग चालून देवळाजवळ येऊन पोहोंचलों. ह्या ठिकाणीं **गंगानदी** सुमारें १५।२० फूट उंचीवरून खालीं उडी घेते. तो देखावा पाहण्यास लोकांनीं अवश्य जावें. प्रवाहाच्या खालीं डोहांत शंकराची पिंडी आहे अशी कथा आहे. ठिकाण पाहून परतलों तोंच पावसास सुरवात झाली, म्हणून सर्व कार्यक्रम रहित करावे लागले. खोलींत सर्वत्र गळूं लागलें. व मागील चुकविलेल्या सर्व स्नानांचा वचपा निघाला. तेव्हां धर्मशाळेच्या रखवालदाराकडे गेलों. ह्यास चौकीदार म्हणतात—त्याच्या कानावर आमच्या

निवासस्थानाचें वर्तमान घातलें. परंतु त्याच्या हृदयाला कांहींच पाझर फुटण्याचें लक्षण दिसेना. ओरडाआरडा करून त्याचें कृत्य जगापुढें मांडावें तर पावसामुळें आमचें भांडण ऐकण्यास आपलें ठिकाण सोडून कोणी येण्याचेंही लक्षण दिसेना; तेव्हां सरतेशेवटीं money makes the mare go—ह्या म्हणीप्रमाणें त्याच्यावर द्रव्याचा प्रयोग केला, तेव्हां त्यानें मोठ्या मेहेरबानीनें एक निवाऱ्याची व न गळणारी खोली आम्हांस उघडून दिली. म्हणून दुसऱ्या दिवशीं गंगोत्री जिवानिशीं सोडण्याची आशा वाटूं लागली. नाहीं तर त्या रात्रींच थंड झालों असतों. असो.

**गंगोत्री** येथेंच गंगा गायमुखांतून पडते, असा सर्वसाधारण समज आढळून येतो. परंतु येथें गंगानदीचें पात्र **पुण्याच्या मुठानदी**इतकेंच रुंद आहे. व प्रवाहही उन्हाळ्यांत मुठा नदीचा असतो तितका आहे. गायमुखांतून गंगा येते तें ठिकाण **गंगोत्री**पासून सुमारें १८ मैलांवर व बरेंच उंचीवर बर्फप्रदेशांत आहे. गंगोत्रीची उंची समुद्रसपाटीपासून १०३०० फूट आहे, म्हणून **गंगोत्रीस** बर्फ फारसें नाहीं. पुढें बर्फ असल्यामुळें पुढचा प्रवास कठीण आहे. शिवाय चांगला रस्ता नाहीं. वाटेंत दुकानें नाहींत. शिधा बरोबर न्यावा लागतो व तिकडेही भाद्रपदाशिवाय जातां येत नाहीं, त्यामुळें हजारांत एखादाच यात्रेकरू गायमुखापर्यंत जात असेल नसेल. अगदीं नेहमीं बर्फानें आच्छादिलेल्या प्रदेशांत वनस्पती उगवत नाहींत म्हणून त्या प्रदेशांतील पाण्यांत पानें वगैरे कुजून तें पाणी बिघडत नाहीं. गायमुखावर असें बर्फानें भरलेलें एकादें मोठें सरोवर असावें व त्यांतील भरपूर व शुद्ध पाण्याचा सांठा पाहून तो हिंदुस्थानांतील लोकांच्या उपयोगाकरितां लावण्याची **भगीरथास** इच्छा झाली असावी, म्हणून त्यानें डोंगर फोडून त्या पाण्यास **हिंदुस्थानचा** रस्ता दाखवून दिला असावा असें वाटतें. पूर्वी समुद्र हिमालयापर्यंत पसरला होता असें त्यांत मधून मधून समुद्रांत राहणाऱ्या प्राण्यांच्या हाडांचे सांपळे सांपडतात, ह्यावरून अनुमान निघतें. तो दक्षिणेकडे हटल्यानंतर **हिमालयाच्या** पायथ्याजवळच्या निर्जल प्रदेशास सुपीक करण्याची कल्पना **भगीरथाच्या** डोक्यांत आली असावी, व म्हणूनच त्यानें **गंगानदी** इकडे आणण्याचा प्रयत्न केला असावा अशी कल्पना आहे.

ज्या ठिकाणाहून गंगानदीस पाण्याचा पुरवठा होतो, त्या ठिकाणचें पाणी त्यांत वनस्पतींतील घाणीचा अंशही नसल्यामुळें अत्यंत शुद्ध असतें. तें पाणी **गंगोत्रीपर्यंत** तसेंच वहात येतें. गंगोत्रीच्या पुढेंच गंगा नदीस केदारगंगा

नांवाची पहिली नदी मिळते, अर्थात् तेथून तिचें पाणी बिघडण्यास सुरवात होते. तो पाण्याचा टिकाऊपणा जों जों दुसऱ्या नद्या मिळत जातात तों तों कमी होत जातो व प्रयाग येथें तीस तिच्याइतकीच मोठी **यमुना नदी** मिळाल्यानंतर पुष्कळ दिवस किडे पडल्याशिवाय टिकण्याचा गुण गंगेच्या पाण्यांत राहातच नाहीं. म्हणून अत्यंत शुद्ध असें पाणी **गंगोत्रीस** मिळतें व तेथून तें प्रयागपर्यंत लोक भरतात. **काशीस** गंगा भरण्याची पद्धत नाहीं.

मंगळवार ता. २६।५।३१ रोजीं सकाळीं **गंगोत्री** सोडली. घराकडे जाणारा व उताराचा रस्ता असल्यामुळें भोजन करण्याकरितां एकदम १३ मैल धराली चट्टीवर आलों. गंगाकांठावर गर्द झाडाच्या सांवलींत स्वयंपाक उरकला. येथें **श्री. देवधरस्वामींची** यात्रा पुन्हां एकदां भेटली. कुशलवर्तमान वगैरे झाले. त्यांच्या यात्रेंतील मंडळींचे पुण्याचे निरोप वगैरे टिपून घेऊन चालण्यास सुरवात केली. व वस्तीस **झाला** चट्टीवर आलों. ता. २७ रोजीं **झाला** चट्टी सोडून सुमारें ६ वाजतां निघालों, तों **गंगाणीस** भोजन करून वस्तीस **सुकी** चट्टीवर आलों. **सुकी**पासून रस्ता सारखा ठिकठिकाणीं पडून गेल्यामुळें चालण्यास फार त्रास झाला. वाईट रस्ता चढण्यापेक्षां उतरणें कठीण पडतें. उतरतांना पाय सरून मनुष्य खालीं पडण्याचा संभव असतो. नदीच्या पात्रांत मोठमोठे धोंडे पडले असल्यामुळें व पाणी फार जोरानें वाहात असल्यामुळें सर्व नदी जणूं कांहीं दुधानें भरून चालल्याचा भास होत होता. मात्र पाय घसरून पडल्यास जगण्याची आशा कोणासच नाहीं. एकाला काढावयास दुसरा गेल्यास पहिल्याची व दुसऱ्याची गांठ स्वर्गांतच पडावयाची. ता. २९ रोजीं सकाळीं भोजन करण्याकरितां **मल्ला**चट्टीवर आलों. वाटेंत भटवाडीस आमच्या कुलीस संस्थानच्या एका इन्स्पेक्टरनें आडविलें कारण करारांत दोघांचींच नांवें असून काम तिघे करीत होते. बराच वेळ बोलाचाली झाल्यानंतर त्यानें कुलीपासून ८ आणे घेऊन स्वतःच्या खिशांत टाकिले व कुलीस कायद्याच्या कचाटयांतून मुक्त केलें. पैशाचा काय प्रभाव आहे पहा ! म्हणूनच दुष्कर्में करणारे, परंतु श्रीमंत असलेले लोक अनेक पापें करून कायद्याच्या कचाटयांतून सुटतात व गरीब लोक क्षुल्लक अपराधासाठीं कायद्याच्या पकडींत सांपडतात. असो. वस्तीस **मनेरी** चट्टीवर आलों. जवळच मोठा सुंदर ओढा वहात असल्यामुळें येथें एकदां स्नान उरकलें, व कपडे वगैरे धुतले. ह्या चट्टीवर चांभाराचें दुकान असल्यानें त्याजपासून बूट शिवून घेतला. हिमालयांत चांभार फारसे भेटत नाहींत व चालण्यानें बूट फाटून जातात. अर्थात् तो

भेटल्यानंतर त्याचा उपयोग अगोदर करून घ्यावा. दुसऱ्या दिवशीं ता. ३० रोजीं १२ वाजतां **उत्तरकाशीस** गेलों. हलवायाकडे फराळ वगैरे उरकला. येथें C/o पोस्ट मास्तर ह्या पत्त्यावर पत्रें मागविलीं होतीं. त्यांत एक माझे स्नेही **श्री. निंबवीकर** त्यांचें व वहिणीचें एक अशीं दोनच पत्रें मिळालीं. शाळाधिकाऱ्यांकडे सुटीस जोडून रजा मिळण्याचा अर्ज केला होता. त्याचें उत्तर त्यांनीं रवानाही केलें होतें, परंतु तें मिळालें नाहीं. पत्रें न मिळाल्यामुळें घरचीं खुशालीही नीटशी समजली नाहीं. घरचें पत्र महिन्यापूर्वीचें मिळालें म्हणून काळजी उत्पन्न झाली. परंतु इलाज नव्हता सुमारें ३ वाजतां **उत्तरकाशी** सोडली. १ मैल जातों न जातों तोंच मोठया पावसास सुरवात झाली. वाटेंत थांबण्यास निवाऱ्याची जागा नव्हती. जवळचें सर्व कपडे भिजून चिंब झाले. करंडींत बसणेंही श्री. **नानासाहेबांस** अशक्य झालें. सर्व पाणी करंडींत येऊं लागलें, म्हणून त्यांनींही चालण्यास सुरवात केली. सुमारें २॥ तास पूर्णपणें भिजून व थकून ६ वाजण्याच्या सुमारास **नाकुरीस** येऊन दाखल झालों. **नाकुरीस** सुमारें १५।२० यात्रेकरू उतरण्याइतकी मोठी धर्मशाळा आहे. परंतु आम्ही जाण्यापूर्वीच पावसाच्या त्रासानें सर्व यात्रा धर्मशाळेंत येऊन उतरली होती. जागा शिल्लकच नव्हती. काय करावें ह्या विचारांत पडलों. धर्मशाळेजवळच एक **श्रीसदानंद** नांवाचे ब्रह्मचारी राहात होते. त्यांच्या घरांत जागा असल्याचें समजलें. तेथें वशिल्यानें जागा मिळविली. प्रथम मोठी शेगडी पेटविली व शरीर व आंगावर घेण्यास अत्यंत अवश्यक असे कपडे शेकले. ७।८ कप चहा तयार केला. दूध मिळणें शक्यच नव्हतें. परंतु ब्रह्मचारीबोवांनीं आपल्या जवळचें दूध निरपेक्ष बुद्धीने दिल्याचें दाखवून आमच्या स्वाधीन केलें. अर्थात् त्यास चहाचें आमंत्रण देणें भाग पडलें. चहास येतांना त्यांनीं रानांत उत्पन्न होणाऱ्या फळांनीं भरलेलें ताटही आणून दिलें. अर्थात् मला शंका येऊंच लागली होती कीं, कांहीं तरी भानगड असावी, कारण " अतिस्नेहः पापशंकी. " आम्ही दोघांनीं पोटभर चहापान केलें व शेकत बसलों. ही संधी बरी असें पाहून बुवांनीं आपल्या येथील वास्तव्याचा खुलासा ज्यांत आहे असा कागद पुढें केला. त्यांत ": **नाकुरी** येथें **क्षीरगंगा** व **भागिरथी** यांचा संगम झाल्यामुळें हें फार मोठें पवित्र क्षेत्र आहे, परंतु येथें शंकराचें देऊळ नसल्यामुळें यात्रेकरूंची मोठी गैरसोय होते, ती दूर करण्याचें व गंगेस चांगले घाट बांधण्याचें आम्हीं ठरविलें आहे. ह्या ठिकाणीं स्नान केल्याचें अश्वमेघाचें पुण्य लागतें. मोठमोठया दानशूर



तिबेटांतील एक खिंड.

श्रीमंतांनीं आपल्या लायकीप्रमाणें ह्या कार्यास मदत केली आहे; तरी आपणही

यथाशक्ति मदत करावी अशी विनंति आहे." वगैरे वगैरे मजकूर होता. श्री. **नाना-साहेबांनीं** त्याची यथाशक्ति संभावना केली. परंतु मजपाशीं अनेक अश्वमेधांचें पुण्य सांचलेले असल्यामुळें व तें मी एकाद्या उधळखोर श्रीमंताप्रमाणें खर्चून टाकीत असल्यामुळें स्वतःचे पैसे खर्ची टाकून आणखी पुण्याची भर करण्याचा विचार मीं सोडून दिला. शिवाय पैशाप्रमाणें पुण्य ठेवण्याच्या ब्यांका नसल्यामुळें सर्व बोजा शिरावर वाळगावा लागतो तोही सोसण्याची मनाची तयारी नव्हतीच. असो. ता. ३१।५ रोजीं सकाळीं **नाकुरी** सोडली. पुन्हां नवीन रस्त्यास सुरवात झाली. **नाकुरी**पासून फक्त ३ मैलांवर एक चट्टी आहे. त्यापुढें आणखी ९ मैल गांव नाहीं. म्हणून **धरासूस** मुक्कामास यावें लागलें. रस्ता गंगा किनाऱ्यानेंच आहे. परंतु **गंगानदी** रस्त्याच्या खालीं निदान २०।२५ पुरुष खोलीवरून वाहते. त्यामुळें तिच्या पात्राकडे पाहातांना भीतीच वाटते. वाटेंत पाणी दिसतें परंतु पिण्यास मिळत नाहीं. थंड प्रदेशांतून उष्ण प्रदेशाकडे जात होतो, त्यामुळें हवेचाही त्रास होत होता.

**धरासूहून** एक रस्ता **मसुरीस** जातो; त्याची चवकशी केल्यावर अशी माहिती लागली कीं रस्ता सारखा चढावाचा असून वाटेंत पाण्याचें फार दुर्भिक्ष आहे. दुकानें नाहींत; मात्र रस्ता थोडा जवळचा आहे. परंतु गैरसोईचा रस्ता आम्ही सोडून दिला व वस्तीस **नगूळ** येथें आलों. **नगूळहूनही** एक मधली वाट **मसुरीस** जाते; परंतु तिच्याही भानगडींत पडलों नाहीं. दुसऱ्या दिवशीं सरळ **भलड्याणा** येथें भोजनास आलों. येथें श्री. **कृष्णाजी सखाराम मंगळ-वेढेकर** नांवाचे **बोरीबंदर**वरील पॅसिंजर गाईड भेटले. त्यांजकडून थोडीशी **मुंबई**कडची खबरबात समजली. ते सहकुटुंब यात्रेस निघाले होते. **भल-ड्याणा**हून निघून **मसुरीचा** रस्ता धरला. त्यांतही एक रस्ता चांगला ४।५ फूट रुंद आहे. परंतु तो लांबचा आहे म्हणून आमच्या कुलींनीं जवळची—पगडंडी—पायवाट धरली. **भलड्याणाहून** सारखी चढावासच सुरवात होते. वाटेंत पाण्यानें जीव व्याकुळ झाला. तीन मैलांनंतर एके ठिकाणीं थोडें पाणी मिळालें. वस्तीस

**वंड्यागाऊ**

येथें आलों. येथें **बा. का. वाल्यांची** धर्मशाळा व पाणपोई वगैरे सोई चांगल्या आहेत. परंतु पाणी सुमारें १ मैल लांब आहे म्हणून स्वयंपाकाकरितां पाणी मिळविण्यास फार कष्ट पडले. दुसऱ्या दिवशीं पहाटेस उठून चढण्यास सुरवात केली.

सुमारें ३ मल चढलों. भलड्याणापासून सारखें चढतच होतों, त्यामुळें समुद्र-सपाटीपासून निदान दहा हजार फुटांवर तरी येऊन दाखल झालों असें अशी माझी कल्पना आहे. एकसारखें सात मल चढल्यामुळें जीव थकून गेला. परंतु उंच पदावर येऊन पोहोंचल्यामुळें 'उच्चेषु स्थानेषु पूज्यन्ते' ह्या संस्कृत वचनाप्रमाणें आपण पूजापात्र झाल्याबद्दल एकप्रकारचा आनंदहि वाटला. तेथून सर्व रस्ता डोंगरांच्या कड्यावरून चालला होता. उजव्या हातास बर्फानें भरलेल्या डोंगरांची रांगच रांग लागून राहिली होती व उत्तरेकडील भिंत किती अभेद्य आहे याची पूर्ण कल्पना येत होती. ऊन स्वच्छ पडलें होतें तरीहि ठिकाण फार



तिबेटी स्त्री-पुरुष.

उंच असल्यामुळें थंडीहि वाजत होती. म्हणून त्याचा फारसा त्रास होत नव्हता. सूर्याचे किरण पडल्यामुळें बर्फाचे डोंगर मात्र सारखे चकाकत होते. एकंदर

गंगोत्रीच्या यात्रेंत फार उंचावरून जाणारा व आनंददायक असा हाच रस्ता आहे.

चढण संपल्यानंतर **टिहरीहून मसुरीस** जाणारा रस्ता **भलड्याण्याच्या** रस्त्यास येऊन मिळतो म्हणून पुढें रहदारी सारखी वाढत जाते. तेथून मैलाचे दगड लागण्यास सुरवात झाली. पहिला दगड लागला, त्यावर **मसुरी** २४ मैल असें लिहिलें होतें, म्हणून कांहीं अंदाज बांधितां आला. **भलड्याणाहून मसुरी** किती लांब हें कोणासच नक्की सांगतां येत नव्हतें. निरनिराळ्या माणसांचें निरनिराळें मत पडे. २२ व्या मैलांवर **काणाताल** नांवाचें गांव लागलें' ह्या ठिकाणीं **बा. क. वाल्यांची** धर्मशाळा, दुकान वगैरे सोई चांगल्या होत्या; परंतु आतां घरीं जाण्याची घाई झाली असल्यामुळें पेल्यांचा चहा बनवून आणखी ४ मैलांवर स्वयंपाक करण्यास गेलों, व वस्तीस **धनोल्टी** येथें येऊन पोहोंचलों.

## धनोल्टी

हें **मसुरी**प्रमाणेंच एक हवा खाण्याचें ठिकाण आहे. गांवांत पोष्ट ऑफिस, हलवायाचें दुकान, धर्मशाळा वगैरे सोई असून आजूबाजूस बरेच बंगले आहेत. येथून रात्रीं **डेहराडूनच्या** विजेच्या दिव्यांमुळें फार सुंदर देखावा दिसत होता. दोन दिवस सारखा चढाव चढत होतों. विश्रांति भरपूर घेतली नाहीं म्हणून **धनोल्टीस** येऊन पोहोंचल्याबरोबरच एकदम तापानें गांठलें. उभें रहाण्याची सुद्धां शक्ति राहिली नाहीं, म्हणून तसाच बरींच पांघरुणें अंगावर घेऊन पडलों. रात्रीं ११ वाजतां घाम वगैरे येऊन मोकळा झालों, व पहांटेस ४ वाजतां चालण्यास पुन्हां सुरवात केली. तापामुळें थोडा थकवा आला होता, परंतु घर जवळजवळ येत चालल्यामुळें हुषारी वाटत होती. सुमारें १ वाजतां १५ मैल सारखा चालून **मसुरीच्या** मोटार स्टँडवर आलों. गेल्या वर्षी मसुरी फिरून पाहिली असल्यामुळें गांवांत पहाण्याकरितां शिरलोंच नाहीं. स्टँडवर सर्व प्रकारचें फराळाचें सामान मिळणारीं दुकानें असल्यामुळें तेथेंच यथेच्छ फराळ केला. कुलींचे ठरलेले पैसे व कांहीं थोडें इनाम त्यास देऊन त्यांची रजा घेतली व मोटार सुटण्याची वाट पहात बसलों. **मसुरीहून डेहराडूनला** मोटारी जातात. रस्ता सुमारें २ वर्षांपूर्वींच तयार झाला आहे. जाणाऱ्या व येणाऱ्या मोटारींची गांठ पडून अपघात होऊं लागल्यामुळें सध्यां फार उत्तम व्यवस्था केली आहे. वरून व खालून ठराविक वेळींच मोटारी सोडतात. म्हणून अपघात व्हावयाचे थांबले आहेत. **डेहराडूनहून** संध्याकाळीं ४ च्या सुमारास गाडी निघते. तिनें मध्यें गाडी न बदलतां

**दिल्लीस** जातां येतें. ती गाडी निघून गेली होती. दुसरीनें गेलों असतों तर दोन ठिकाणीं चढण्याउतरण्याचा त्रास व रात्रीचें जाग्रण सोसावें लागलें असतें, म्हणून डेहराडून येथें अडतबाजारांत **लाला नीताराम दीपचंदाच्या** धर्मशाळेंत वस्ती केली, व सकाळीं मोटारनें **सहाराणपूरला** गेलों. तेथें धर्मशाळेंत-**स्वामी विद्यानंद**-पूर्वाश्रमींचे **श्री. काळे**-नांवाचे तरुण बी.ए. झालेले संन्यासी भेटले. त्यांचा **काश्मीरांतील अमरनाथच्या** यात्रेस जाण्याचा विचार होता. मी त्यास त्या यात्रेसंबंधींची ठाऊक असलेली ऐकीव माहिती सांगितली व त्यास माझें **काश्मीरच्या** प्रवासाचें पुस्तक दिलें. फक्त एकच अट सांगितली कीं **अमरनाथाची** यात्रा करून आल्यानंतर मात्र मजला माहिती कळवा. त्यांनीं तें कबूलहि केलें. अद्याप मात्र त्यांजकडून माहिती आली नाहीं. **काश्मीरच्या** दंग्याचा त्रास त्यांस पोहोंचला कीं काय तें समजत नाहीं. **सहाराणपुराहून** गुरुवार ता. ४ रोजीं संध्याकाळीं निघालों, ते शनवारीं पहांटे २ वाजतां **नाशिक** येथें येऊन दाखल झालों. घरचीं सर्व मंडळी सुखरूप असल्याचें पाहून आनंद झाला. ता. ७ रोजीं संध्याकाळीं **पुणें** गांठलें. सर्व प्रवास ज्यांच्यामुळें घडला, त्या **श्री. नानासाहेब जोग** यांचे व ज्यानें त्यांस प्रेरणा केली व अनेक आपत्तींतून वांचविलें, त्या जगन्नियंत्या परमेश्वराचे आभार मानून माझ्या **हिमालयांतील** यात्रांचा पहिला भाग येथें पुरा करितों. दुसऱ्या भागास १९३२ मध्यें सुरवात होईल. वाचकांनीं आतांपर्यंत जसा आश्रय दिला, तसाच पुढें द्यावा अशी त्यांस नम्र विनंति करून मी आपली लेखणी खालीं ठेवतों.

[भाग पहिला समाप्त.]

# माझ्या हिमालयांतील यात्रा.

## भाग २ रा.

**वा**चकांस गेल्या वर्षी आश्वासन दिल्याप्रमाणें मी आपल्या यात्रांच्या दुसऱ्या भागास सुरवात करीत आहे. ह्या भागांत **बद्रीनाथ, केदारनाथ, सिमला, मसुरी, नैनिताल, अलमोरा** व **राणिखेत** ह्या **हिमालयांतील** स्थळांचें वर्णन देण्याचें मीं योजिलें आहे.

१९२९ च्या मे महिन्यांत **काश्मीरची** सफर करून आल्यानंतर **हिमालयांतील बद्रीकेदारची** यात्रा करावी अशी इच्छा झाली. परंतु त्या यात्रेस माणशीं निदान १०० रुपये तरी खर्च लागतो अशी माहिती तिकडे जाऊन आलेल्या लोकांकडून मिळाली होती. प्रपंच भागवून १०० रु. शिल्लक टाकणें मला शक्य नव्हतें; परंतु 'साखरेचा खाणार त्यास देव देणार' ह्या म्हणीप्रमाणें माझी व श्री. **नानासाहेब जोग वकील भिवंडी** यांची गांठ पडून त्यांनीं **बद्रीकेदारच्या** यात्रेस बरोबर येण्याबद्दल विचारिलें. मला मीहि लगेच आनंदानें होकार दिला. एक महिन्यांत सर्व प्रवास उरकणें शक्य नाहीं, म्हणून शाळाधिकाऱ्यांपाशीं सुटीस जोडून एक महिना रजा मागितली, व त्यांनींहि मोठ्या मेहेरबानीनें रजा मंजूर केली. सर्व गोष्टी जमून आल्यामुळें ता. ७ मे १९३० रोजीं **पुणें** सोडून **मुंबईस** गेलों. **हिमालयाच्या** यात्रेस लागणारें सर्व सामान खरेदी केलें—त्याची यादी पहिल्या भागाच्या पहिल्या लेखांकांत आहे ती पुन्हां येथें देत नाहीं.—व ता. ११।५।३० रोजीं **मुंबई** सोडण्याकरितां दुपारीं **कुलाबा** स्टेशनवर जाऊन दाखल झालों. **भिवंडीहून** श्री. **नारायण सदाशिव उर्फ नानासाहेब जोग वकील**, व **श्री गणेश बाळकृष्ण ऊर्फ दादासाहेब गाडगीळ**, माजी चीफ ऑफिसर, **भिवंडी** म्युनिसीपॅलिटी, हे अगोदरच तेथें येऊन माझी वाट पाहात बसले होते. बराच वेळ गाडींत बसावयाचें असल्यामुळें चांगली जागा मिळावी म्हणून आम्हीं **कुलाबा** स्टेशनवर गेलों. **कुलाबा** स्टेशनवरील तारमास्तर श्री. **विनायक दाजी भावे** हे माझे चांगले स्नेही असल्यामुळें

गार्डीत चांगली जागा मिळविणें, तिकीटें काढणें, वगैरे संबंधांत त्यांची आम्हांस फारच मदत झाली. पुढील प्रवासांत लागणारी जरूरीची इतर माहितीही त्यांनीं आम्हांस दिली. ह्या गाडीस, थर्डक्लासचा एक डबा हिंदू रेस्टॉरंट म्हणून असतो; व त्यांत हिंदू पद्धतीचें जेवण मिळतें. परंतु वेळेस १० आणे चार्ज पडत असल्यामुळें आम्हीं त्याचा उपयोग करून घेतला नाहीं. **मुंबई**हून एकदम **कोटद्वारचें** तिसऱ्या वर्गाचें तिकीट खरेदी केलें. **मुंबई** ते **कोटद्वार** अंतर १०४१ मैल असून तिकिटास १५ रु. ७ आणे प्रत्येकीं आकार पडला. स्टेशनवरच आम्हांस **देवप्रयागच्या** पंड्यानें गांठलें. परंतु आम्ही **हरिद्वारच्या** मार्गानें न जातां **कोटद्वारच्या** मार्गानें जाणार, हें समजल्यावर आमचा त्यास फार राग आला. कारण **कोटद्वाराहून** गेल्यास वाटेंत **देवप्रयाग** लागतच नाहीं; त्यामुळें अर्थातच त्याची मिळकत बुडाली. तो आम्हांस म्हणाला, " तुम्ही **हरिद्वार**वरूनच जा. **कोटद्वार**वरून गेल्यास वाटेंत पाण्याचें दुर्भिक्ष असल्यामुळें वाटेंतच मरून जाल." आम्हांस त्याची मिळकत बुडाल्यामुळें तो अशी दहशत घालीत आहे असें त्यावेळीं वाटलें. परंतु पुढें मात्र अनुभव तसाच आला. आम्हीं जादा काळजी घेतल्यामुळें पाण्यावांचून जीव जाण्याची पाळी आली नाहीं इतकेंच. परंतु त्रास मात्र फार झाला. ता. ११-५-३० रोजीं दुपारीं ४॥ वाजतां **मुंबई** सोडली. दिवस उन्हाळ्याचे असल्यामुळें ता. १२ रोजीं दुपारीं गार्डीत फार त्रास होऊं लागला. डबा सर्व तापून गेला होता. पाणी कितीहि प्यालों तरी तहान म्हणून भागेना. तेव्हां एकाद्या स्टेशनवर उतरून ऊन कमी झाल्यानंतर पुढें दुसऱ्या गार्डीतून जावें असें मनांत आलें, व तसें करणें जरूरही होतें. कारण बरोबर असलेल्या दोघांचींहि वयें ५० च्या पुढें गेलीं असल्यामुळें, व इतका उन्हाळा सोसण्याची त्यांस संवय नसल्यामुळें वाटेंत सनस्ट्रोक होण्याचीहि भीति वाटत होती. परंतु गाडीखालीं उतरून होणारी गैरसोय सोसावी कीं थोडा वेळ उन्हाचा त्रासच सोसावा, ह्या विषयाच्या वादास गार्डीतच सुरवात होऊन तो वाद संपण्याच्या सुमारास सूर्यास्ताची वेळ झाली ! तेव्हां आतां रात्रीं **दिल्लीसच** मुक्काम करावा असें एकमतानें ठरवून टाकिलें. ता. १२।५।३० रोजीं रात्रीं ९॥ वाजतां **दिल्लीस** पोहोंचलों. चवकशीअंतीं रात्रीं ११॥ वाजतां एक गाडी **मोरादाबाद** येथें जाते असें समजलें, म्हणून गावांत झोपावयाचें तें गार्डीतच झोपूं असा आम्हीं विचार केला. दोन दिवस पुऱ्या खाऊन कंटाळा आला असल्यामुळें, नंतर मीं स्टेशनबाहेर जाऊन कांहीं भात खाऊन परत आलों. मी येण्यापूर्वीच पुढें जाणारी गाडी स्टेशनवर आल्यामुळें माझ्या सहकाऱ्यांनीं एक रिकामासा डबा पाहून त्यांत सामान

लावून टाकिलें. परंतु नंतर आमच्या लक्षांत आलें कीं डब्यांतील संडास घाण असल्यामुळेंच त्यांत दुसरे कोणीं बसलें नव्हतें. मी त्यांस दुसऱ्या डब्यांत चलण्याबद्दल सुचविलें. पण ते म्हणाले, " आम्ही २ दिवसांच्या प्रवासानें अगदीं थकलों आहों, आतां उठवत नाहीं. कंटाळा आला आहे, वसूं या झालें येथेंच. " अर्थात् मजला संडास साफ करवून घेण्याच्या कामगिरीवर बाहेर पडावें लागलें. गाडी सुटण्यास पाऊण तास अवकाश होता. प्रथम 'कॅरेज् ॲण्ड वॅगन' डिपार्टमेंटच्या लोकांच्या कानावर घाणीची तक्रार घातली. परंतु फर्स्ट व सेकंड क्लासचीच फक्त काळजी घेणें इतकेंच आपलें कर्तव्य आहे, असें समजणारे ते नोकर माझ्या म्हणण्याकडे काय लक्ष्य देतात ! प्रत्येक मोठ्या स्टेशनवर भंगी असतो; परंतु तो फर्स्ट व सेकंड क्लासचे संडासच साफ आहेत कीं नाहींत हें पाहून जातो. थर्ड क्लासकडे जाण्याची त्यास जरूरीच भासत नाहीं. अधिकारीहि थर्ड क्लासचे डबे स्वच्छ आहेत कीं नाहींत, याविषयीं बेफिकीर असतात. आम्हांपैकीं पुष्कळांस हें माहितही नाहीं अगर " मला काय त्याचें " असें म्हणून घाणींतून पुष्कळ लोक तसाच प्रवास करितात. असो. मी लगेच स्टेशन-मास्तरकडे गेलों, तो म्हणाला, 'कॅरेज ॲन्ड वॅगन' च्या मनुष्यास सांगा. मी त्यास सांगितलें कीं, " सर्वांकडे जाऊन नंतर तुमच्याकडे आलों आहे. लवकर संडास साफ करण्याची व्यवस्था लावा. " स्टेशनमास्तर म्हणाला, " आतां लवकरच गाडी सुटेल, तें आतां शक्य नाहीं. " तेव्हां मी त्यास स्पष्टच सांगितलें, " मी ओरडा-ओरडा केल्यास आतां साक्षीदार मिळतील. मी तुम्हांस अगाऊ १५ मिनिटें बजावीत आहे. संडास साफ न झाल्यास मी साखळी ओढून गाडी थांबवीन. " तेव्हां तो ताळ्यावर आला व त्यानें एक मनुष्य पाठवून सर्व डबा साफ करून दिला. ११॥ वाजतां निघालों ते ता. १३।५।३० रोजीं पहांटें ४॥ वाजतां **मोरादाबाद** स्टेशनवर जाऊन दाखल झालों. तेथून गाडी बदलून ५॥ वाजतां निघालों ते **नजिबाबाद** येथें जाऊन, पुन्हां गाडी बदलून सुमारें १० वाजतां **हिमालयाच्या** पायथ्याशीं असलेल्या **कोटद्वार** स्टेशनवर येऊन सुखरूप पोहोंचलों.

## कोटद्वार.

**कोटद्वार** हें **गडवाल** जिल्ह्यांतील व्यापाराचें मोठें ठिकाण आहे. येथें प्रथम मुक्काम करण्याचा विचार होता. परंतु स्टेशनच्या बाहेर येतों तों **हिमालयांतील** प्रदेशांत आणखी १० मैल आंत नेण्याकरितां लॉऱ्या तयार होत्या. तेव्हां 'शक्य तितक्या थंड प्रदेशांत जाऊनच वस्ती करूं, म्हणजे उन्हामुळें आलेला शीण तरी नाहींसा होईल. " असा विचार करून लॉरींतून **कोटद्वार**पासून १० मैलांवर असलेल्या **डोगड्डा** नांवाच्या गांवीं सुमारें ११॥ वाजतां जाऊन पोहों


चलों. **डोगड्डापासून** ९ मैलांवर **लॅन्सडौन** ह्या नांवाचें ठिकाण आहे. त्या ठिकाणीं इंग्रजी फौज असतें. तेथपर्यंत मोटार जाण्यासारखी चांगली सडक आहे. त्या सडकेवरून सारखी रहदारी चालू असते.

## डोगड्डा.

हें ठिकाण **भागीरथी** नांवाच्या एका लहानशा नदीच्या कांठावर वसलें आहे. ह्या ठिकाणीं पोष्ट व तारऑफिस, पोलिसचौकी, धर्मशाळा वगैरे सर्व सोई असून बाजारही साधारणपणें मोठा आहे. आमचा धर्मशाळेंत उतरण्याचा विचार होता, परंतु मोटारमधून उतरतों तोंच **पं. गोविंद प्रसाद शर्मा**, मॅ० व्यवसाय भोजन भाण्डार लिमिटेड, यांनीं आम्हांस गांठलें. त्यांनीं आमची थोडक्या खर्चांत सर्व सोय करण्याचें कबूल केलें. दोन दिवस सारखा त्रास झाला असल्यामुळें खाणावळीची आवश्यकता होतीच, व खाणावळही मोटार-स्टॅन्डजवळच होती, म्हणून तेथें जाऊन बिऱ्हाड लाविलें. येथें राहाण्याबद्दल पैसे द्यावे लागत नाहींत. परंतु खाण्याच्या जिनसांचा आकार मात्र त्यांच्या योग्यतेच्या दुप्पटतिप्पट तरी द्यावा लागतो. पैसे भोजन करण्यावर अवलंबून असतात. जेवण झाल्यानंतर काय किमतीचें भोजन झालें हें म्यानेजर सांगतात व तितके पैसे द्यावे लागतात. त्या बाबतींत तक्रार अगर अपीलअर्ज कोठेंच चालत नाहीं. जेवण अगदींच कमी दर्जाचें म्हणजे तांबड्या तांदुळाचा भात, बिनतुपाच्या पोळ्या, कोरडी व पातळ भाजी व चटणी, इतकेंच असतें. तूप, दूध, दही, ताक वगैरे जिन्नस पाहिजे असल्यास बाजारांतून आणावे लागतात. ह्या जेवणाचा माणशीं आकार ५ ते ६ आणे पडला. भोजनोत्तर विश्रांति घेऊन पुढच्या तजविजीस लागलों.

प्रथम बाजारांत जाऊन बर्फावरून चालण्याकरितां लागणाऱ्या अणकुचीदार काठ्यांची चवकशी केली. परंतु ह्या बाजूनें यात्रा जातच नसल्यामुळें येथें त्यास गिऱ्हाईक नाहीं म्हणून तसल्या काठ्या मिळाल्या नाहींत. व पुढेंही कोठें त्या मिळाल्या नाहींत म्हणून बर्फप्रदेशांतून प्रवास करतांना अतिशय त्रास झाला. आम्ही **कोटद्वारला** येण्याचें कारण आमचा सर्वांचा सर्व प्रवास पायांनीं करण्याचा विचार होता. व **कोटद्वार** ते **केदारनाथ** अंतर १३० मैल आहे, व **हरिद्वार** ते **केदारनाथ** अंतर १४८ मैल आहे. **कोटद्वारहून** १० मैल मोटारनें प्रवास करितां येतो, **हरिद्वारहून** १४ मैल मोटरनें प्रवास करितां येतो. मोटारचा प्रवास वजा करितां **कोटद्वारला** गेल्यानें १४ मैल चाल वांचली; परंतु गैरसोय मात्र २८ मैल चालीइतकी झाली. म्हणून इकडील यात्रा करणाऱ्यांनीं **हरिद्वार-मार्गें** जावें हेंच उत्तम. आम्हांस हें शहाणपण त्रास भोगून मिळवावें लागलें तें

वाचकांनीं बिनत्रासानें शिकावें हें बरें. डोंगड्ड्यासून केदारनाथला जाणारा रस्ता गाड्या चालण्यासारखा नाहीं; म्हणून प्रवास पायांनीं, माणसांच्या पाठीवरील करंडींतून अगर घोड्यावरून करावा लागतो. करंडींतून अगर चालत




प्रवास करणें कमी धोक्याचें असतें. घोड्यावरून प्रवास करणें जास्त धोक्याचें असतें हीहि गोष्ट आमच्या प्रत्ययास मागाहूनच आली. सामानाकरितां फक्त एक

खेचर करण्याचा आमचा विचार होता. परंतु ता. १३।५।३० रोजींच संध्याकाळीं ५ च्या सुमारास श्री. **नानासाहेबांस** प्रवासांतील शिणामुळें व हवाबदलीमुळें फार ताप आला. त्या दिवशीं दुपारीं ४ वाजेपर्यंत हवा फारच थंड व आनंददायक होती. परंतु ४॥ च्या सुमारास एकाएकीं ढग जमूं लागून व पावसास व वादळास सुरवात झाली. घराच्या बाहेर पडणें अशक्य झालें, घरावरील पत्रे उडून गेले, वारा अंगास झोंबूं लागला. **हिमालयानें** आपल्या वास्तविक स्वरूपाची सर्वांस कल्पना अगाऊच आणून दिली. व अशा परिस्थितींतहीं " तुमचा पुढें जाण्याचा विचार आहे काय ?" म्हणून आम्हांस स्पष्टच विचारिलें. संध्याकाळीं श्री. **नानासाहेब** ह्यांच्या तापाचें प्रमाण वाढून तो १०५ डिग्रीपर्यंत गेला. परंतु सकाळीं थोडासा उतरला, तेव्हां पुढें जावयाचें कीं घरीं परतावयाचें असा मीं श्री. **नानासाहेबांस** प्रश्न केला. ते म्हणाले, " घरून यात्रेकरितां निघालों तों यात्रा केल्याशिवाय घरीं परतणार नाहीं. मग जिवाचें कांहींहि होवो. " त्याच सुमारास एक बंगाली जमीनदार आमच्याच खाणावळींत येऊन उतरले. त्यांच्याबरोबर त्यांची वायको व मुलगी असून सामान वगैरे घेण्याकरितां १०।१५ कुली होते. ते आपल्या आईसुद्धां यात्रेस गेले होते. त्यांचें जवळ पैसा भरपूर होता. तरीहि बदरीनाथची थंडी सहन न झाल्यामुळें त्यांच्या आईनें तेथेंच देह ठेविला होता. म्हणून माझ्यापुढें इतक्या वृद्ध झालेल्या गृहस्थांना घेऊन पुढें जावें किंवा सुखरूपपणें परतावें असा प्रश्न उभा राहिला. परंतु सर्वांचा विचार पुढेंच जावें असा पडला. श्री. **नानासाहेबांच्या** आजारामुळें दोन घोडे--खेचरें—ठरविले. त्यांचें **कोटद्वार** ते **गुप्तकाशी**पर्यंतचे सुमारें १०० मैलांचें भाडें ६५ रुपये ठरलें होतें.

**कंडी झंपान** वगैरेही येथून मिळूं शकतें. **कंडी**वाल्याशीं स्वतंत्रपणें करार केल्यास मागाहून घासाघीस होण्याचा संभव असतो. मजूर पुरविणारी कुली एजन्सी नांवाचीहि एक संस्था तेथें आहे व तिच्या शाखा **गढवाल** प्रांतांत सर्व मोठमोठ्या गांवीं आहेत. तिच्या मार्फत प्रवास करणें धोक्याचें नसतें, परंतु त्याबरोबरच तें फार खर्चाचें असतें.

**नेपाळी** लोकांकडून गढवाल प्रांत आपल्या ताब्यात **इंग्रजांनीं** घेतल्यास आज ११६ वर्षें झालीं. परंतु १८१४ ते १९२१ पर्यंत ह्या प्रांतांत गरीब लोकांस जबरदस्तीनें वेठीस धरण्याची पद्धत चालू होती. तिच्याविरुद्ध गरिबांच्या हिताकरितां राज्य करितों म्हणून बढाई मारणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्यांकडे तिकडील लोकांनीं अनेक वेळां दाद मागितली. परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. १९२१

सालीं असहकारितेची चळवळ **महात्मा गांधींनीं** सुरू केल्याबरोबर मात्र ह्या अन्यायाची दाद एकदम सरकारांत लागली. सरकारांस ही वाईट पद्धत बंद करणें भाग पडलें. परंतु सरकार उशिरा शहाणें झाल्यामुळें, प्रत्येक **गढवाली** मनुष्याच्या अंतःकरणांत **महात्मा गांधींना** मात्र कायमचें स्थान मिळालें आणि म्हणूनच गढवाली वीरांनीं **महात्मा गांधींच्या** नांवाचा जयघोष करणाऱ्या निःशस्त्र लोकांवर गोळ्या झाडण्याचें नाकारून स्वतःवर संकट ओढवून घेतलें. त्यामुळें **महात्माजींचें** थोडें तरी उतराई झाल्याचें त्यांस समाधान लाभलें. **श्रीमती खुरशेद बेन** ह्या त्यांस **पेशावर** येथील **तुरुंगांत** भेटावयास गेल्या होत्या त्या वेळीं त्यांनीं **महात्माजींच्या** नांवाचा जयघोष करून त्यांच्या करितांच आम्ही हें सर्व केलें असें स्पष्ट सांगितलें. वेठबिगार बंद झाल्यामुळेंच कुली एजन्सीची स्थापना झाली आहे. हिच्यामार्फत **कँडी, झंपान, खेचर** वगैरे सर्व कांहीं मिळूं शकते. हिची व्यवस्था डेप्युटी कमिशनरमार्फतच चालत असल्यामुळें जरूर असेल त्यानें डेप्युटी कमिशनर **पौडी गढवाल** यांजकडे पत्रव्यवहार करावा,

संध्याकाळीं जामिनदारसाहेब **कोटद्वारला** गेले. त्यांनीं **बद्रीनाथच्या** पंड्यास धर्मादाय म्हणून ५०० रुपये दिले होते. परंतु बरोबर दोन महिने कष्ट करीत फिरणाऱ्या मजुरास एक रुपयापेक्षां जास्त पैसे बक्षिसादाखल देणें त्यांच्या जीवावर आलें! तरीहि आमच्या **महाराष्ट्रांतील** एका मोठ्या सुप्रसिद्ध वर्तमानपत्राचे संपादक म्हणतात कीं, "बाबानों श्रीमंतांवर विश्वास ठेवा, मोठमोठ्या धर्मादाय रकमा तेंच देत नाहींत काय?" परंतु त्या रकमा देण्याचा हेतु गरिबांचें कल्याण व्हावें हा नसून स्वतःचा लौकिक वाढावा हा असतो, हें मुद्दाम वेड पांघरलेल्या ह्या **दरबारी देशभक्तांच्या** डोक्यांत कोण घालूं शकणार? हॉस्पिटलकरितां २० लाख रुपये देणारा **वाडिया** आपल्या गिरणींतील मजुरांच्या पगारांत १ पैची वाढ करण्यास तयार नाहीं; कारण त्यामुळें त्याच्या लौकिकांत भर पडत नाहीं. गरिबांच्या तोंडचा घास काढून संस्था बांधणें हें दरवडे घालून ब्राह्मणभोजन घालण्याइतकेंच पुण्यप्रद आहे. ह्या गोष्टींचा विचार करण्याची बुद्धि आमच्याकडच्या सुशिक्षित म्हणविणाऱ्या लोकांस होईल तो सुदीन म्हणावयाचा!

ता. १४।५।२० गुरुवारीं दुपारीं श्री. **नानासाहेबांस** थोडी हुषारी वाटल्यामुळें सुमारें ४ वाजतां निघण्याचें ठरविलें. एका घोड्यावर माकणीसारख्या दोन बाजूस २ पिशव्या चांगल्या बांधून ठेवल्या, व एका घोड्यावर श्री. **नानासाहेब** बसले. घरून निघतांना दोघांचाहि सर्व प्रवास चालतच करण्याचा

विचार होता. परंतु जेव्हां प्रत्यक्ष प्रवासाची वेळ येऊन ठेपली, तेव्हां मात्र सर्व प्रवास चालत करणें फार कठीण आहे, ही गोष्ट त्यांच्या ध्यानांत आली. कांहीं वेळ श्री. **नाना** व कांहीं वेळ श्री. **दादा** घोड्यावर बसत असत. परंतु सरते-शेवटीं दोघांसहि घोड्यावरून प्रवास करण्याची आवश्यकता भासू लागली. इकडील प्रदेशांत घोड्यावरून प्रवास करणें जास्त धोक्याचें असतें. घोड्याचा उपयोग बहुधा मालाची नेआण करण्याकडे करितात. **हिमालयांतील** रस्ते म्हणजे एका अंगास कडा व दुसऱ्या अंगास दरी असें असल्यामुळें कड्याच्या बाजूनें चालल्यास पाठीवरील मालास कड्याचा धक्का लागून माल खालीं कोसळावयाचा म्हणून माल लादलेल्या घोड्यांना नेहमीं दरीच्या बाजूनें चालण्याची संवय लावलेली असते. माल हलत नसल्यामुळें दरीच्या बाजूनें घोड्यास सुरक्षितपणें प्रवास करितां येतो. परंतु पाठीवर मनुष्य असल्यास व तो हालल्यास एकादे वेळीं तोल जाऊन घोडा अगर स्वार दरींतहि पडण्याचा संभव असतो व असे अपघात झाले असल्याचें आम्हांस मागाहून समजलेंहि. परंतु ती आपत्ति परमेश्वरानें आमच्या वांट्यास आणली नाहीं ही त्याची कृपाच होय. मला मात्र सारखी अपघाताची धास्ती वाटत असे. माझा एक सारखा चालण्याचाच क्रम असल्यामुळें वाटेंत अनेक पहाडी लोक भेटत व मी त्यांज-पाशीं गप्पा मारीत चालत असे. वाटेंत एक सुमारें १४।१५ वर्षांचा पहाडी मुलगा भेटला- तो मला म्हणाला, "मी समोरच्या डोंगरावरच रहातों. मी जातीनें ब्राह्मण आहे. आम्ही मांसाहारी नाहीं. परंतु आमच्या शत्रूंनीं मात्र आम्ही मांसाहारी आहों असें खोटेंच उठविलें आहे. शारदा कायद्याच्या कचाट्यांत सांपडूं नये म्हणून माझ्या वडिलांनीं सुमारें ४।५ महिन्यांपूर्वींच माझी शादी करून टाकली. आम्ही रेल्वे स्टेशनच्या जवळ रहात असल्यामुळें आम्हांस राजकारण बरेंच माहीत आहे." तेव्हां मीं त्यांस **हिंदुस्थानांतील** कोणते पुढारी तुला माहीत आहेत म्हणून विचारिलें. तेव्हां तो म्हणाला, "**पंडित जवाहरलाल, पं. मोतिलाल व महात्मा गांधी** इतकेच पुढारी मला माहीत आहेत." महात्माजींच्या अटके-विषयीं गोष्टी निघाल्या तेव्हां तो म्हणाला.

"जब महात्माजी पकड गये तब हमारे **डुगड्डुमे** और **कुटद्वार** मे कुछ चार दिन का हडताल पड गया." त्याच्यापासून इतरहि बरीच माहिती घेतली. मला तो आपल्या घरीं येण्याबद्दल फार आग्रह करीत होता. मी एकटाच प्रवास करीत असतों तर गेलोंहि असतों कदाचित्, बरोबर दुसरी मंडळी असल्यामुळें जातां आलें नाहीं. संध्याकाळीं ७ च्या सुमारास **डाडामंडी** नांवाच्या ठिकाणीं मुक्कामास आलों.

## डाडामंडी.

हें गांव भागीरथी नदीच्याच कांठीं आहे. येथें सुमारें २५।३० घरांची वस्ती आहे. अम्हास एका दुकानदाराच्या पडवींत उतरण्यास जागा मिळाली. सामान नुसतें उशाशीं ठेवून झोंपण्याचा प्रसंग आला. परंतु सर्व हवाला परमेश्वरावरच टाकून झोंपलो. दुपारीं भोजन उशिरां झाल्यामुळें व बरोबर थोडें फराळाचेंहि असल्यामुळें थोडा फराळ करून व चहा बनवून त्यावरच रात्रीच्या जेवणाचें काम आम्ही भागविलें. संध्याकाळीं ७–७॥ च्या सुमारास बरेच गांवकरी आमच्या चौकशीस आले. कारण हा रस्ता जरी **श्रीनगर(गढवाल**प्रांतांतील–**काश्मीर**प्रांतांतील नव्हे–)ला जातो, व तेथून **बद्रीकेदारला** जातां येतें, तरी यात्रेकरू ह्या रस्त्यानें जात नाहींत. कारण ह्या रस्त्यावर पाण्याचा फार तुटवडा आहे. ह्या रस्त्यानें गेल्यास **अलकनंदा** व **गंगा** ह्यांच्या संगमामुळें मोठें महत्त्व प्राप्त झालेलें ठिकाण **देवप्रयाग** बाजूस रहातें व मोठें पुण्य हातचें जातें. अर्थात् तेवढा स्वार्थत्याग अवघ्या १४ मैलांकरितां कोणता शहाणा यात्रेकरू करील! आल्याबरोबर सर्व मंडळींचा पहिला प्रश्न एकच कीं "बम्बई की हालत क्या है ?" कारण त्या वेळीं मुंबईस कायदेभंगाची चळवळ जोरांत होती व वर्तमानपत्राच्या कायद्यामुळें वरीचशीं वर्तमानपत्रें बंद पडलीं होतीं, म्हणून तेथें बातम्यांचा अत्यंत तुटवडा भासत होता.

वकीलसाहेबांनीं हिंदींत शक्य तितकी माहिती गांवकरी मंडळीस दिली. त्यांनींहि आपल्या प्रांतांतील सत्याग्रहाची माहिती सांगितली. भयाण जंगलांतील पहिलीच रात्र उघड्यावर काढावयाची असल्यामुळें बरोबरच्या मंडळीस लवकर झोंप येईना. बराच वेळ गप्पा मारल्या. सरतेशेवटीं झोंपेनें गांठलें. सकाळीं उठून प्रातर्विधी उरकून चहा वगैरे तयार केला. गांव जरी नदीच्या कांठावर आहे, तरी नदी फार खोलांतून वहाते म्हणून गांवापासून दूर असलेल्या डोंगरावरील पाणी नळानें गांवांत आणिलें आहे, म्हणून पाणी मिळविण्याचा त्रास झाला नाहीं. गांवांत एक लहानसें पोष्ट ऑफिसहि होतें. तेथून घरीं पत्र रवाना केलें. श्री. **नानासाहेबांचा** बहुधा दररोज एक पत्र घरीं रवाना करण्याचा परिपाठ होता. **बद्रीकेदारच्या** बाजूस **गंगोत्रीच्या** बाजूपेक्षां पोष्टाची व्यवस्था फारच चांगली आहे. ता. १५।५।३० सकाळीं ८ वाजतां चालण्यास सुरवात केली. **डाडामंडीहून** सारखी चढावासच सुरवात झाली. चढाव एकंदर ७ मैल होता. अर्थात् श्री. **नाना** हे आजारी म्हणून व श्री. **दादा** हे वयोवृद्ध म्हणून दोघांसहि घोड्यांची आवश्यकता भासूं लागली. परंतु स्वारी करण्यासारखा एकच घोडा असल्यामुळें

फार त्रास होऊं लागला. वाटेंत पाणीहि पिण्यास मिळेना. अशा परिस्थितींत सुमारें ११ वाजतां **द्वालखेल** नांवाच्या गांवीं पोहोंचलों. येथें एकच दुकान असून पाणी बरेंच लांब होतें. बरोबरचा घोडेवाला मुसलमान असल्यामुळें पाणी वगैरे आणण्यास त्याचा उपयोग होत नसे. हिंदू घोडेवालेसुद्धां मिळतात, परंतु तें आम्हांस मागाहून समजलें. **द्वालखेल** हें एक जंक्शनच आहे, कारण **लॅन्स-डौनहून** आणखी एक रस्ता येथें येऊन मिळतो. दुकानांत गरम दूध मिळालें. तें प्याल्यामुळें हुषारी आली. म्हणून भोजनाकरितां पुढच्या मुक्कामावर जाण्याचें ठरविलें. दुसरें, **द्वालखेलपासून** सारखी उतारास सुरवात झाली होती. उतारावर घोड्यावर स्वारी करण्यास सरकारनें कायद्यानें मनाई केली आहे. कारण जर जलद उतरतांना घोड्यास ठेंच लागली, तर स्वार खालीं पडून अपघात होण्याचा संभव असतो. **हिमालयांत** अपघात झाल्यास जीव जगणेंहि कठीण. कारण दरींतून मनुष्य काढणें त्रासदायक व तेथून मनुष्यास हॉस्पिटलपर्यंत नेऊन पोंचाविणें त्याहून त्रासदायक. वाटेंत हॉस्पिटलांची सोयहि फारशी नाहीं. सारखे ६ मैल उतरून दुपारीं एकच्या सुमारास **नयारनदीच्या** कांठावर बसलेल्या **बांगघाट** नांवाच्या गांवीं येऊन पोहोंचलों.

## बांगघाट

**बांगघाट** हें लहानसेंच गांव आहे. ह्याच ठिकाणीं आम्हांस **हिमालयांतील** तारांच्या झुलत्या पुलाचें प्रथम दर्शन झालें. आम्ही प्रवास करीत होतों तो रस्ता पौडीस जाणारे पहाडी लोक व व्यापारी ह्यांच्याच उपयोगांस येत असल्यामुळें रस्त्यावर हिंदुस्थानी ब्राह्मणाच्या खाणावळी मात्र मधूनमधून लागत होत्या. बांगघाट येथेंहि एक खाणावळ होती. तींतच आम्हीं मुक्काम ठोकला. पहाडी जेवण दूधतुपाशिवायच उरकलें. बरोबरच्या मंडळींचे पाय दुखूं लागले होते ते कढत पाण्यानें शेकले. **नयारनदींत** आंघोळ, कपडेधुणें वगैरे कार्यक्रम दुपारीं संथपणें उरकला व रात्रीं तेथेंच वस्ती करण्याचें ठरविलें. संध्याकाळच्या सुमारास **श्रीनगरहून बाबूनंदजी** नांवाचे **श्रीनगर** येथील डी. ए. व्ही. स्कूलमधील शिक्षक तेथें वस्ती करण्यास आले. त्यांच्याबरोबर रात्रभर बऱ्याच गप्पा झाल्या. ते म्हणाले " तुम्ही निष्कारण ह्या रस्त्यानें आलांत, उद्यां तुम्हांस—Hardest possible way—शक्य तितक्या कठीण रस्त्यानें प्रवास करावा लागेल. " परंतु परतणें शक्य नसल्यामुळें आम्ही तयारीनेंच निघण्याचें ठरविलें, बरोबर पाण्याच्या दोन पिशव्या भरून घेतल्या होत्या. रात्रीं झोंपण्यास माणशीं १ आण्याप्रमाणें

खाटा मिळाल्या होत्या. सकाळीं लवकरच उठून चालण्यास सुरवात केली. एकसारखा ७ मैल खडा चढाव होता. चढतांना पाय घसरत. वाटेंत पाण्याचा खडखडाट असून डोंगरावर झाडीहि फारशी नव्हती, म्हणून उन्हाचाहि त्रास होऊं लागला. वाटेंत दोनदोन तीनतीन मैलांवर एकादें दुकान लागे, त्यांत मात्र कांहीं जिन्नस खरेदी केल्यास पाणी प्यावयास मिळे. एक दुकानदार म्हणाला ' हें पाणी मीं डोंगराखालून एक मैलावरून आणिलें आहे. ' **वांगघाट**पासून ९ मैलांवरील **कांसखेत** ह्या चट्टीवर दुपारच्या मुक्कामास आलों. खाणावळींत जेवण झाल्यानंतर १।२ तास विश्रांती घेऊन पुढें जाण्याचा विचार होता. म्हणून वामकुक्षीकरितां अंग टाकिलें. परंतु तेथें माशांचा इतका सुकाळ होता कीं त्या कांहीं केल्यानें डोळ्यासडोळा लागूं देत ना. नुसते हात हालवीत माशा हांकलीत पडण्यापेक्षां चालणेंच बरें, असा पोक्त विचार करून आम्हीं चालण्यास सुरवात केली. रस्ता साधारण सपाटीचा असून सुरूच्या झाडांच्या जंगलांतून गेला असल्यामुळें प्रवास मोठ्या आनंदानें चालला होता. सुरूच्या झाडांचीं लहान लहान पानें व काड्या सर्वत्र पसरल्यामुळें सर्व जमीन तांबूस रंगाची दिसत होती. मध्यें थोडा वेळ पावसानेंहि भेट दिली. संध्याकाळीं ५ च्या सुमारास कांसखेतहून ३ मैलांवर असलेल्या **अधवानी** नांवाच्या गांवीं येऊन दाखल झालों, व धर्मशाळेंत मुक्काम केला. जवळच डाक बंगला होता त्यांतहि मुक्कामास जागा मिळते. परंतु भाडें फार पडत असल्यामुळें त्याचा आश्रय केला नाहीं. दुधाची चवकशी करितां तें येथें मिळालें नाहीं, म्हणून विनदुधाचाच चहा करून घेतला. कारण जसजसें **हिमालयाच्या** अंतर्भागांत जाऊं लागलों तसतसें थंडीचें मान वाढूं लागलें व त्यास तोंड देण्याकरितां चहावांचून मुळींच भागत नाहींसें झालें. रात्रीं मोठा जोराचा पाऊस पडण्यास सुरवात झाली. अतिशय गार वारा वाहूं लागला. परंतु झोंपण्यास निवाऱ्याची जागा मिळाली असल्यामुळें निभावलें. ता. १७-५-३० रोजीं लवकर सकाळीं उठून पुढें चालण्यास सुरवात केली.

**अद्वानी**पासून सुमारें १० मैलांवर असलेल्या पौडी नांवाच्या एका मोठ्या शहरांत आम्ही सुमारें ११ वाजतां येऊन दाखल झालों.

## पौडी.

**पौडी** हें शहर **पौडीगढवाल** नांवाच्या **ब्रिटिशांच्या** अंमलाखालीं असलेल्या जिल्ह्याचें मुख्य ठिकाण आहे. त्यामुळें येथें पोष्ट व तार-ऑफिस दवाखाना, तुरुंग, शाळा, कोर्ट, कचेऱ्या वगैरे सर्व गोष्टी आहेत. समुद्रसपाटीपासून ह्या स्थळाची उंची सुमारें ४५०० फूट असून दुरून डोंगरावरून पाणी

बांधून आणलें असल्यामुळें येथें पाण्याचीहि सोय चांगली झाली आहे. उत्तम हवा, पाण्याच्या सर्व सोयी येथे असल्यामुळें हें ठिकाण उन्हाळ्यांत वस्ती करण्यास फारच चांगलें आहे. हिवाळ्यांत मात्र येथें बर्फ पडतें, त्या वेळीं राहाणें फार त्रासदायक असतें. गांवांत शिरल्याबरोबर प्रथम ब्राह्मणाच्या खाणावळीची चवकशी केली; व **पं. राघवानंद रतुडी** ह्यांच्या खाणावळींत मुक्काम टाकला. खाणावळीच्या वरच्या बाजूसच **पं. भोलादत्त चंडोला** B. A. B. L. नांवाचे वकील रहात असत. दोघेही समव्यवसायी असल्यामुळें आमच्या वकीलसाहेबांची व त्यांची लवकरच गट्टी जमली; व बराच वेळ गप्पा झाल्या. **डुगड्डयाहून** निघाल्यापासून वर्तमानपत्राचें दर्शन नव्हतें म्हणून देशाची कांहींच खबरबात समजत नव्हती. आम्हीं निघालों तेव्हां चळवळ जोरांत असल्यामुळें परत येईपर्यंत इंग्रजांचें राज्य तरी रहातें कीं नाहीं अशी शंका वाटत होती. मात्र इंग्रजी शिक्क्याचे पैसे वाटेंत चालत होते, ह्यावरूनच फक्त इंग्रजांच्या राज्याचें अस्तित्व जाणवत होतें. तेव्हां प्रथम वर्तमानपत्रांतील बातम्यांची चवकशी केली. श्री. **चंण्डोला** ह्यांनीं श्री. जोग ह्यास व्याख्यान देण्याबद्दल विनंति केली, व श्री. **जोग** ह्यांनीं इंग्रजींत व्याख्यान देण्याचें कबूलहि केलें. दिवस सुट्टीचा असल्यामुळें इंग्रजी जाणणारी मंडळी संध्याकाळीं ५ पर्यंत जमविणें फार त्रासदायक वाटूं लागल्यामुळें तो बेत मागाहून रहीत करावा लागला.

दुपारीं भोजनोत्तर वामकुक्षी वगैरे यथास्थित केली. श्री. **जोग** वकीलसाहेबांशीं बोलत बसले. श्री. **गाडगीळ** ह्यांनींहि गांवाची स्वच्छता, सडका, पाणीपुरवठा वगैरे म्युनिसिपल बाबीसंबंधी एका सद्गृहस्थांजवळ चवकशी आरंभली. म्हणून मीहि स्वभावधर्माप्रमाणें मला पाहिजे असलेल्या गोष्टींची चवकशी करण्यास बाहेर पडलों.

वाटेंत अनेक चमत्कारिक गोष्टी दृष्टीस पडल्या. देशोद्धाराकरितां जन्मास आलेल्या स्काऊटकौन्सिलमध्यें चेअरमनची जागा अडवून, पोट बांधून स्काऊटमास्तरचें काम करणाऱ्या स्काऊटमास्तरांससुद्धां पैचीहि सवलत औषधांच्या बिलांत न देणारे व स्वतःस " श्रीमंतांचा डॉक्टर " म्हणवून घेण्यांत भूषण मानणारे एक उन्मत्त डॉक्टर दिसले.

स्वतःच्या मालकीच्या चाळीचा उकिरडा बनवून गरीब बिऱ्हाडकरूंस ह्याच लोकांत नरकाची कल्पना आणून देणारे, म्युनिसिपालिटींत मेंबर म्हणून शिरण्याची हाव धरणारे एक अहंमन्य श्रीमंत आढळलें.

व्यासपीठावर उभे राहून देशोद्धाराच्या लंब्याचवड्या गप्पा मारणारे परंतु गरीब शेतकऱ्याच्या माना कापण्यास सावकारास पैसे घेऊन मदत करणारे एक वकीलसाहेबहि भेटले.

स्वतःच्या जन्मदात्या बापाचें नांव पैशाच्या लोभाखातर सोडून देऊन श्रीमंत बनलेले व घरीं मुलांस शिकविण्याकरितां ठेवलेल्या खाजगी शिक्षकाचे सुद्धां खाडे कापणारे एक सरदारहि आढळले.

स्वतः ५ शें रुपयांचा लठ्ठ पगार खाऊन गरीब बिचाऱ्या दरमहा १५।२० रुपये पगार मिळविणाऱ्या शिक्षकांस जीव तोडून "बाबानों, पैशाचा विचार न करितां आपलें कर्तव्य मनोभावानें करा" म्हणून उपदेश करणारे एक शिष्ट अधिकारीहि पहावयास मिळाले.

परंतु गांव आहे तेथें उकिरडा असावयाचाच असा विचार करून त्या लोकांकडे दुर्लक्ष केलें, व गांवाच्या एका टोंकास असलेल्या गरीब लोकांच्या वस्तींत येऊन दाखल झालों.

जिकडेतिकडे फाटकीं लतकरें अंगावर असलेलीं मुलें खेळत होतीं. थंडीमुळें कपडे सारखे अंगांत घालावे लागतात व त्यांत उवा पडतात. बदलण्यास दुसरे कपडेहि नसतात म्हणून गरीब शेतकऱ्यांच्या बायका अंगांतील कपडे काढून त्यांतील उवा मारीत बसल्या होत्या, व कांहीं ठिकाणीं गव्हाची मळणी चालू होती; हा भाग अत्यंत गलिच्छ दिसला. ज्यांच्या श्रमावर सर्वांनीं जगून चैन करावयाची त्या गरिबांच्या वस्तींतील रस्ते स्वच्छ ठेवण्यास सरकारास सवड नाहीं. ज्यांनीं त्यांस पिळून पैसे काढावयाचे त्या शेटसावकारांची मात्र शक्य तितकी जास्त काळजी घ्यावयाला तें अगदीं तत्पर आहे. काय जगाचा न्याय आहे पहा! परंतु ही स्थिति अशीच चालू ठेवूं असें जर त्या शिष्टांस वाटत असेल तर तो त्यांचा भ्रम आहे, ही गोष्ट मात्र माझ्या ह्या गरीब लोकांशीं झालेल्या मुलाखतींत चांगलीच निदर्शनास आली. गरिबांच्या वस्तींतून निघालों तों चवकशी करीत गांवांतील लायब्ररींत गेलों. **प्रेस आर्डिनन्समुळें** बहुतेक वर्तमानपत्रें बंद होतीं. फक्त Bengali, Calcutta आणि Hindu Herald, Lahore हीं दोनच वर्तमानपत्रें वाचावयास मिळालीं. परत येतांना एका दुकानदाराशीं गप्पा मारीत बसलों. तो म्हणाला," आम्हांस सर्व माल घोड्याच्या पाठीवरून आणावा लागत असल्यामुळें, तो महाग विकावा लागतो. गांवांत एक मिशनऱ्याची व एक **दयानंद** सोसायटीची अशा दोन इंग्रजी शाळा आहेत

मिशनरी आल्यापासून लोकांना बाटविण्यास सुरवात झाली; परंतु दयानंद सोसायटी आल्यानें त्यास थोडा आळा बसला आहे. दयानंद सोसायटीच्या मंडळींनीं सामाजिक सुधारणा लोकांच्या गळ्यांत बांधण्यास सुरवात केली. पूर्वी आमच्याकडे पुनर्विवाहाची चाल नव्हती. मुलांचीं लग्नें फार लवकर करीत असत; परंतु दयानंद सोसायटीच्या मंडळींनीं कांहीं पुनर्विवाह घडवून आणिले आहेत. आतां लग्नाचीहि वयोमर्यादा दिवसेंदिवस वाढीस लागली आहे." इतक्यांत एक प्रेत जातांना दिसलें. तो दुकानदार म्हणाला, " हें प्रेत १० कोसांवरून मंडळींनीं खांद्यावर वाहून आणलें आहे व अजून तें ५।६ मैल तरी जावयाचें आहे. ह्या भागांत आसपास २० मैलांवरील प्रेतें गंगानदीच्या कांठावर मोक्ष मिळण्याकरितां जाळण्याची पद्धत आहे." मला मात्र त्या लोकांच्या धर्मभोळेपणाची, अंधश्रद्धेची व मूर्खपणाची कींव आली. मात्र त्यांच्या चिकाटीबद्दल मी त्यास धन्यवाद देऊन ह्या लोकांच्या चिकाटीचा देशोद्धारास उपयोग करून घेण्याचें जर सुशिक्षितांचा समाज मनावर घेईल, तर किती उत्तम गोष्ट होईल, असा मनाशीं विचार करीत आमच्या खाणावळींत परतलों.

ता. १८।५।३० रोजीं सकाळीं ७ वाजतां पुढें चालण्यास सुरवात केली. सुमारें ४ मैल उतार ४ मैल सपाटी असा रस्ता चालून ११ वाजण्याच्या सुमारास **श्रीनगर** ह्या गांवीं येऊन पोहोंचलों.

## श्रीनगर.

**श्रीनगर** हें **अलकनंदा** नदीच्या कांठावर वसलेलें गढवाल प्रांतांतील पहिल्या दर्जाचें शहर आहे. इ. स. १८१५ पर्यंत हें शहर **टिहरीच्या** राजाची राजधानी होतें. परंतु इंग्रजांनीं **टिहरीच्या** राज्याचा अर्धा भाग आपल्या घशाखालीं घातला, त्याच वेळीं राजधानी येथून उठवून **टिहरीस** न्यावी लागली. पुढें १८७८ पर्यंत **इंग्रजांच्या गढवाल** प्रांताचें मुख्य ठाणें येथेंच होतें; परंतु हें ठिकाण समुद्रसपाटीपासून फारसें उंच नसल्यामुळें चैनींत थंड हवेंत रहाण्यास सवकलेल्या इंग्रज अधिकाऱ्यांच्या डोक्यांत राजधानी हालविण्याचे विचार आले व राजधानी येथून उठवून ९ मैलांवरील डोंगराच्या शिखरावर **पौडीस** नेण्यांत आली. त्याबरोबरच सरकारी कचेऱ्याहि गेल्या, म्हणून गांवच्या वैभवास उतरती कळा लागली. गांव बरेंच मोठें आहे. रस्ते चांगले रुंद आहेत परंतु वस्ती मात्र फार थोडी आहे.

गांवाच्या सभोंवतीं सर्वत्र आंब्याच्या झाडांची दाटी असून उन्हाळा व पावसाळा ह्या दिवसांत येथें हवा फार गरम असते. गांवांत **कमलेश्वर** महादेवाचें

मोठें मंदीर आहे. त्या ठिकाणीं वैकुंठचतुर्दशीस मोठी यात्रा भरते. ' **श्रीनगर** ह्याचा अर्थ देवीचें शहर. ह्या शहरांत पूर्वकालीं कंसमार्दिनी देवीचें मोठें माहात्म्य



डोंगराच्या उतरणीवरील शेतें.

होतें, व तिला मनुष्याचा सुद्धां बळी देत असत. परंतु ज्या शिलेवर मनुष्ययज्ञ करीत ती शिला आद्य **शंकराचार्य** येथें आले त्यावेळीं त्यांनीं नदींत फेकून

दिली. तेव्हांपासून मनुष्ययज्ञाची चाल बंद पडली पण नांव मात्र **श्रीनगर** हें शिल्लक राहिलें आहे. १८९४ मध्यें **अलकनंदेस** मोठा पूर आला होता तेव्हां हें शहर वाहूनहि गेलें होतें. तें पुन्हां बांधलें आहे.

यात्रेकरूंस लागणाऱ्या सर्व प्रकारच्या मालाचीं दुकानें येथें आहेत. गांवांत एक मोठी १००० माणसें उतरतील इतकी **बा. का. क.** वाल्याची धर्मशाळा आहे. तींत एक खोली मिळवून सामान लावलें. गांव मोठें असल्यामुळें खाणावळ असेल असें वाटलें होतें, परंतु चवकशीअंतीं ती नसल्याचें समजलें. इकडे येणारे यात्रेकरू हातानें स्वयंपाक करून खातात. खाणावळींतील अन्न त्यांस चालत नाहीं. शिवाय बाजारांत पुऱ्या वगैरे मिळतातच म्हणून इकडे खाणावळी नाहींत. आमचें भातावांचून अडत असल्यामुळें आम्हांस रोज स्वयंपाक करावाच लागे.

धर्मशाळेंत डोंगरावरून बांधून आणलेल्या पाण्याचा एक मोठा नळ सारखा वाहात असल्यामुळें पाण्याची फार उत्तम सोय झाली आहे. **अलकनंदा**नदीवर स्नानास गेलों. परंतु पाणी फारच गार असल्यामुळें स्नान न करितां कसेबसे कपडे धुवून परतलों. दुकानदाराकडे शिधा घेतल्यास स्वयंपाक करण्यापुरतीं भांडीं मिळूं शकतात, तीं घेऊन स्वयंपाक केला. हाच आमचा हिमालयांतील पहिला स्वयंपाक. स्वयंपाक करतांना झालेल्या चुका डायरींत नोंदून ठेविल्या व दुसऱ्या दिवशीं त्या चुका न करण्याचें ठरविलें, तर नवीनच चुका झाल्या. अशा चुका सुधारीत सुधारीत **हिमालयांत** थोड्या सामानांत, धांवत्या वाऱ्यांत, पडत्या पावसांत, वुरसलेल्या शिध्याचा उत्तम स्वयंपाक बनविण्याच्या शास्त्रांत पारंगत होण्याच्या सुमारासच आमचा प्रवास संपला व आम्ही पुष्कळ कष्टानें मिळाविलेली माहिती विसरण्यासहि सुरवात होऊन आज पुन्हां यात्रेस आरंभ केलेल्या दिवसाइतकेच आम्हीं त्या शास्त्रांत पारंगत राहिलों आहोंत.त्यामुळें ह्या बाबतींत वाचकांस मी जास्त माहिती देऊं शकत नाहीं. संध्याकाळीं संस्कृत पाठशाळा,कन्याशाळा,**गव्हर्नमेंट हायस्कूल** इत्यादि ठिकाणें पाहून पोष्ट व तार–ऑफिसांत गेलों, पत्रांची चवकशी केली. एक पत्र मिळालें, बाकीचीं पत्रें C/O **पोष्ट मास्तर केदारनाथ** ह्या पत्त्यावर पाठवून देण्याबद्दल पोष्ट मास्तरसाहेबांस सांगून धर्मशाळेंत परतलों. रात्रीं श्री. **दादा** यांस एका विंचवानें आपल्या अस्तित्वाची चुणूक दाखविली. थोडा वेळ त्रास झाला, परंतु धर्मशाळेंत औषधांची सोय असल्यामुळें थोडक्यांत निभावलें. रबरी बूट, मेणबत्त्या, सुटे पैसे, आगपेट्या वगैरे जिन्नस येथें खरेदी करून ठेविले. ता. १९।५।३८ रोजीं सकाळीं उठून चालण्यास सुरवात केली. तों ५ मैलांवरील **सुकृता चट्टी**वर येऊन दाखल झालों. **सुकृता**पर्यंतचा प्रवास सकाळीं १० च्या

आंतच करावा. कारण संध्याकाळीं हा रस्ता फार तापतो. ह्या चट्टीवर पाण्याची सोय चांगली आहे. येथें १३ मैलांचे ३॥ रु. देऊन **रुद्रप्रयाग**पर्यंत एक घोडा भाड्यानें ठरविला व चालण्यास सुरवात केली आणि ३॥ मैलांवरील **भट्टीसेरा** चट्टीवर दाखल झालों.

## भट्टीसेरा.

येथें **बा. का. क.** वाल्यांची धर्मशाळा असून तेथें सदावर्त मिळतें. जवळच पाण्याची चांगली सोय आहे. ह्या गांवाजवळ केळींचे बरेच बाग आढळले. येथून १ मैल चढल्यानंतर गंगेचें दर्शन होतें. **छातीखेलपर्यंत** सारखी चढण आहे. डाव्या हातास **गंगा** फार खोलीवरून वहात असून उजव्या हातास सुंदर सुरूचें अरण्य दृष्टीस पडतें व त्यांतूनच रस्ता जातो. चढाव चढल्यानंतर जीव थकून जातो व पाणी फार लांब असतें म्हणून एका दयाळू गृहस्थानें येथें पाणपोई घातली आहे. अशा पाणपोया **बद्रीकेदारच्या** रस्त्यावर सर्वत्र आहेत व यात्रेकरू पाणी पिऊन पाणपोयीच्या मालकास भरपूर आशीर्वाद देतांना आढळून येतात. **छतीखेल**पासून १॥ मैलावरील **खांकरा** चट्टीवर मुक्कामास आलों. येथें एक सुंदर लहानसा धबधबा आहे. त्याचा पाण्याकरितां फार चांगला उपयोग होतो. तेथून तीन वाजतां निघालों, आणि ५ च्या सुमारास **हिमालयाच्या** बर्फाच्छादित शिखरांचें प्रथम दर्शन झालें व तेव्हांपासून त्या बर्फ प्रदेशास आपले पाय केव्हां लागतील ह्याबद्दल विचार सारखे मनांत घोळूं लागले. संध्याकाळीं ५॥ च्या सुमारास **गुलाबराय** चट्टी सोडून अलकनंदेवरील तारांचा झुलता पूल ओलांडून **रुद्रप्रयागच्या बा. का. क. वाल्यांच्या** धर्मशाळेंत येऊन दाखल झालों.

## रुद्रप्रयाग.

रुद्रप्रयाग हें **अलकनंदेच्या** पश्चिमतीरावर वसलेलें पोष्ट व तार ऑफिस व लहानसा बाजार असलेलें ३०।४० घरांचें गांव आहे. यात्रेकरू गांवांत न उतरतां नदीच्या पूर्वकिनाऱ्यावरील **बा. का. क. वाल्यांच्या** धर्मशाळेंत उतरतात. धर्मशाळा नदीच्या अगदीं कांठावर असल्यामुळें धर्मशाळेंतून नदीची शोभा फारच चांगली दिसते. सकाळपासून १८ मैलांची चाल झाल्यामुळें बराच थकवा आला होता, म्हणून दुसऱ्या दिवशीं **रुद्रप्रयागलाच** मुक्काम केला. ता. २०।५।३० रोजीं सकाळीं उठून प्रथम तार आफिसमध्यें गेलों. तार ऑफिस नदीच्या पलीकडील तीरावर धर्मशाळेपासून सुमारें एक मैल लांबीवर आहे. घरची खुशाली गेल्या १० दिवसांत मुळींच समजली नव्हती म्हणून सकाळीं

१० वाजतां रिप्लायपेड तार केली, परंतु तिचें उत्तर संध्याकाळपर्यंतही न आल्यामुळें तारमास्तरांस तार **गुप्तकाशीस** पाठविण्याबद्दल लिहून दिलें. दुपारीं भोजनोत्तर धर्मशाळेजवळच असलेलें श्री. **रुद्रनाथाचें** देऊळ पाहाण्यास गेलों. देवळांत **सच्चिदानंदजी** ह्या नांवाचे एक स्वामी बसले होते, त्यांनीं एक संस्कृत पाठशाळा तेथें काढली असून विद्यार्थ्यांची राहाण्याजेवण्याची व शिकण्याची सर्व व्यवस्था शाळेमार्फतच होते. तिची सर्व योजना त्यांनीं आमच्या पुढें मांडली व मदत करण्याची विनंति केली. श्री. **दादा** व श्री. **नाना** ह्यांनीं यथाशक्ति मदत केली. स्वामीजी म्हणाले, " ह्या प्रांतांतील ब्राह्मणांचा मुख्य धंदा पंडाचारी–भिक्षुकी–हा आहे, परंतु त्याकरितां ब्राह्मणांस यात्रेबरोबर फिरावें लागतें, म्हणून विद्यार्थ्यांस एके ठिकाणीं बसून शिक्षण देण्यास कोणासच वेळ नसतो. इकडील विद्यार्थी शिक्षणाकरितां **लाहोर, बनारस** अशा दूरच्या ठिकाणीं जातात. तिकडील हवा पहाडी हवेपेक्षां फार वाईट असल्यामुळें विद्यार्थ्यांची शरीरप्रकृति बिघडते, म्हणून ह्याच प्रांतांत संस्कृत पाठशाळा स्थापण्याचा आम्ही विचार केला. विद्यार्थ्यांस खर्चास पैसा लागतोच, शिवाय **शिक्षकांस पगारही** द्यावा लागतो. " चौकशी अंतीं असें समजलें कीं प्रथम त्यांना एक बिनपगारी शिक्षक मिळाले होते.

**प्रपंचीं जेवती खाती**
**परमार्थी कां उपवास करती ?**

ह्या समर्थोक्तीप्रमाणें दुपारीं बारा वाजतां नुसता वारा खाऊन व पाणी पिऊन त्याचें पोट भरेना व वेळीं अवेळीं शिक्षकांच्या कर्तव्याबद्दल शिरा ताणून व्याख्यान देऊन स्वकर्तव्यास अगदींच पारख्या झालेल्या पालकांची दृष्टि शिक्षकांकडे वळेना म्हणून अनाठायीं घडणारा हा स्वार्थत्याग बंद करून शिक्षकांनीं पगाराशिवाय काम करण्याचें नाकारिलें. आम्हांस शिक्षक मात्र पूर्वकाळच्या शिक्षकांसारखे पाहिजेत ! पालकांनीं ओझ्यावारी पगार घेऊन शिक्षकांस स्वार्थत्यागाचा उपदेश करावा हे किती धाष्टर्याचें आहे बरें ! असो—

देवळांतून उतरून तसेच खालीं **अलकनंदा** व **मंदाकिनी** ह्यांच्या संगमावर येऊन दाखल झालों. संगमाच्या ठिकाणीं पाण्यास इतकी ओढ आहे कीं संगमांत स्नान करणें म्हणजे मृत्यूस आमंत्रण देणेंच आहे. हरिद्वारप्रमाणे येथें साखळदंडाची सोय होणें अवश्य आहे. पाणी जोरानें वाहात असल्यामुळें नदीची शोभा मात्र पाहाण्यासारखी असते. संगमाजवळून हलूंच नये असें वाटतें.

पाण्याचे पांढरे तुषार ८।१० फूट उंच उडत असतात व सूर्यकिरणांच्या योगानें त्यांत सप्तरंगी इंद्रधनुष्यही मधूनमधून दृष्टीस पडतें. बराच वेळ तेथें बसल्यानंतर धर्मशाळेंत परतलों. बरोबर मेणकापड होतें परंतु हिमालयांतील पाऊसवाऱ्याच्या बरोबर प्रवास करीत असल्यामुळें नुसतें मेणकापड अंगावर घेतल्यास तें उडून जाईल म्हणून येथें शिंप्याकडून खोळी शिवून घेतल्या. **सुकृता** येथील घोडेवाल्याचा करार **रुद्रप्रयाग**पर्यंतच असल्यामुळें **रुद्रप्रयाग** येथून **गुप्तकाशी**पर्यंत ६ रु. स एक कंडीवाला कुली केला.

**रुद्रप्रयाग** येथेंच आम्हांस **पंडा श्यामलाल महादेव प्रसाद त्रिवेदी** ह्यांनीं गांठलें. आम्हीं त्यांस सांगून पाहिलें कीं, " तुम्हीं मुद्दाम आमच्याबरोबर यात्रा करण्याची जरूरी नाहीं. आमच्याजवळ पुस्तकें, नकाशे वगैरे प्रवासोपयोगी सामुग्री भरपूर आहे. रस्ता चुकण्याचा संभव नाहीं, तरी तुम्ही आमच्या पाठीमागून येऊं नका. दुसरी यात्रा पाहा. **केदारनाथास** आम्ही पोहोंचल्यानंतर आम्हांस जी काय दक्षणा द्यावयाची आहे ती तुम्हांस अगर तुम्हीं नांव कळवाल त्यांस देऊं; " परंतु एकादा पंडया न केलेला यात्रेकरू मिळाला कीं त्याच्या बरोबर प्रवास करून त्यास प्रवासांत थोडीशी मदत करून केलेल्या कष्टाचा भलताच मोबदला घेण्यास सवकलेले हे पंडे काय आम्हांस सोडतात ? त्यांनीं आमच्या सांगण्याकडे दुर्लक्ष करून आमच्याबरोबर प्रवासास सुरवात केली. आम्ही त्यास वाटेनें चालण्यास बंदी करूं शकत नव्हतों. ते म्हणाले " तुम्ही काय द्याल तें संतोषानें घेईन ! " परंतु शेवटीं त्यांची निराशा झाली. आमच्यासारखें गिऱ्हाईक त्यांस कधींच मिळालें नव्हतें. असो. ता. २१।५।३० रोजीं **रुद्रप्रयाग** सोडलें.

**रूद्रप्रयाग**पासून दोन रस्ते फुटतात. एक **अलकनंदेच्या** कांठानें कर्णप्रयागला जातो व दुसरा **मंदाकिनीच्या** कांठानें **केदारनाथास** जातो. ज्यांस **केदारनाथास** जावयाचें नसतें ते यात्रेकरूं **कर्णप्रयागवरून बदरीनाथास** जातात. आम्ही **केदारनाथचा** रस्ता सुधारला. **रुद्रप्रयाग** सोडल्याबरोबरच **मंदाकिनीवर** बांधलेला दोरांचा एक पूल लागला. त्या पुलावरून एकवार चालून यावें अशी इच्छा झाली, परंतु प्रत्यक्ष जवळ गेल्यानंतर पुलावर पाऊल टाकणें हें मृत्यूच्या जबड्यांत पाऊल टाकण्यासारखेंच आहे अशी खातरी झाल्यामुळें तो बेत रहीत करून परतलों. त्या पुलावरून पहाडी लोकच प्रवास करूं जाणेत.

**रुद्रप्रयाग**पासून रस्ता **मंदाकिनीच्या** कांठाकांठानेंच गेला आहे. रस्ता फारसा चढउताराचा नाहीं. जों जों **हिमालयाच्या** अंतर्भागांत चाललों, तों तों सुईंधागा मागणाऱ्या पहाडी बायकांमुलांची वाढ होऊं लागली. दुपारीं ११ च्या सुमारास **रुद्रप्रयाग**पासून ११ मैलांवर असलेल्या **मुनी** नांवाच्या चट्टीवर येऊन दाखल झालों. चट्टी चांगल्या प्रकारची असून दुकानांत मालही भरपूर होता. मात्र पाणी थोडें लांब सुमारें १ फर्लांगावरून आणावें लागलें. परंतु ह्या ठिकाणाच्या आसपासचा प्रदेश सपाट असल्यामुळें **मंदाकिनींत** स्नानाची चांगली सोय झाली. गावांत **अगस्तिमुनीचें** एक देऊळ आहे. समुद्र पिऊन टाकणारे सुप्रसिद्ध **अगस्तिमुनी** ह्या ठिकाणीं तपश्चर्या करीत होते, अशी आख्यायिका आहे. **अगस्तिमुनी**हून दुपारीं २ वाजतां चालण्यास सुरवात केली. वाटेंत **मु० नमोळी** पो० **गुप्तकाशी** येथील पं० **गंजाधर** यांचा मुलगा पं० **दामोदर** ह्याची भेट झाली. त्यानें मजला तोंडावरूनच संस्कृत येत असावें अशी कल्पना केली व किन्नामधेयम् अत्रागमनस्य किमोद्देशः । वगैरे प्रश्न संस्कृतमध्येंच विचारण्यास सुरवात केली. प्रश्न समजले, परंतु उत्तरांचें काय करावयाचें ? कशीबशी संस्कृतांत उत्तरें दिलीं. त्याच्या तोंडावरून त्याची निराशा झाल्याचीं स्पष्ट चिन्हें दिसून आलीं. परंतु माझा इलाज नव्हता. बराच वेळ दोघांचें संस्कृतांतच भाषण चाललें होतें. (माझेंही !) परंतु माझें भाषण ऐकण्यास दुसरे कोणी जवळ नसल्यामुळें मी निर्धास्तपणें संस्कृतचे सर्व नियम धाब्यावर बसवून भाषण करीत होतों. व निरंकुशाः कवयः प्रमाणेंच निरंकुशाः प्रवासिनः ह्या नवीन म्हणीचें बीज पेरीत होतों. पं **दामोदर** हे **अगस्तीमुनी** येथील पाठशाळेंत शिकत होते. त्यांची द्वितीयखण्डी मध्यमा नांवाची संस्कृतची परीक्षा पास झाल्याचें त्यांनीं मला सांगितलें. **काश्मीरच्या** प्रवासांत तिकडील संस्कृत'चे पारखे असलेल्या **लोकांस**, 'निरस्तपादपे देशे एरण्डोपि द्रुमायते ।' ह्या संस्कृत म्हणीप्रमाणें मी गार करूं शकलों. परंतु ह्या संस्कृतमध्यें अस्खलित भाषण करणाऱ्या विद्यार्थ्यापुढें मजलाच थिजून जाण्याची वेळ आली. मग मी त्यास तुला इंग्रजी येते काय, म्हणून प्रश्न केला व येत नाहीं असें समजल्यावर ह्या बाबतींत तरी आपण **त्याच्यापेक्षां** श्रेष्ठ आहों, असें त्यास भासवून मनाचें समाधान करून घेतलें असो. पुढें आम्ही वस्तीस **चंद्रापुरीस** गेलों.

## चंद्रापुरी

ह्या ठिकाणींही बरीच सपाटी असून एकावर एक पायऱ्यासारखीं अस-

लेलीं शेतें फार मनोहर दिसतात. जवळच्या डोंगरांतून एक नाला वाहातो, त्याचें पाणी गांवभर खेळविलें आहे व त्यावर ठिकठिकाणीं पाणचक्क्या बसवून दळण्याचें काम सुरू असतें. गांवास पोष्ट ऑफिस असून कापड व सर्वप्रकारचे शिधासामान मिळूं शकतें. दुकानदार म्हणाला येथूनच तुम्ही पांघरण्याकरितां ब्लँकेटें खरेदी करा. परंतु आमच्याजवळ भरपूर कपडे असल्यामुळें आम्हीं तीं खरेदी केलीं नाहींत. तेथें मीं एका भंग्याची मुलाखत घेतली. कारण हिमालयाच्या यात्रेंत निसर्गविधिइतकें दुसरें कोणतें संकट नाहीं. रस्त्याच्या एका बाजूस उंच कडा व दुसऱ्या बाजूस खोल दरी असल्यामुळें प्रसंगविशेषीं रस्त्यावरच बसावें लागतें. त्या वेळीं बायकांचे जे हाल होतात त्यास तर सीमाच नाहीं. जे जिन्नस खाण्याची संवय नाहीं ते अनियमित वेळीं खावे लागत असल्यामुळें, पोट वारंवार बिघडतें. मुक्कामावर उतरल्यानंतर तरी हे हाल चुकत असतील म्हणावें, तर तसेंही नाहीं. चट्टीला आरंभ होण्यापूर्वी एक दोन फर्लांगावरच तांबडें निशाण फडकत असतें व त्याच्या आंतील भागांत घाण करण्याची सक्त मनाई असते. म्हणून मलोत्सर्जनाकरितां फार लांब जावें लागतें. ह्या कारणास्तव मीं भंग्याची मुलाखत घेतली. तो मला म्हणाला, " आम्ही यात्रेच्या सीझनपुरते इकडे येतों. आम्हांस राहाण्याकरितां गांवाबाहेर एक सरकारी झोपडी असते. मी व बायको मिळून आम्हांस २४ रु. पगार मिळतो. निशाणाच्या आंतील भागांत घाण करणाऱ्या यात्रेकरूंकडून आम्ही पैसे घेतों. नाहींतर त्यास चौधरी—पाटीलकडे घेऊन जातों, मग त्यास दण्ड होतो. म्हणून यात्रेकरू आम्हांसच पैसे देतात. आम्ही चार महिन्यांत वर्षापुरती कमाई करतों. मग आठ महिने स्वस्थ बसून खातों. इकडे आम्हांस जमादार म्हणतात." सरकारनें चट्टीच्याजवळ घाण करूं नये असे कायदे केले आहेत. परंतु शौचकूपाची सोय मात्र केली नाहीं. ह्या गोष्टीकडे कोणी यात्रेकरूंचा कैवारी लक्ष देईल काय ? हें गांव चंद्रसिंह नांवाच्या एका राजवंशीयानें वसवून येथें एक विष्णूचें देऊळही बांधलें आहे. म्हणून ह्या गांवास चंद्रापुरी असें नांव पडलें. ता. २२।५।३० रोजीं सकाळीं चंद्रापुरी सोडली, व २॥ मैलांवरील मिरी चट्टीवर येऊन दाखल झालों. ह्या ठिकाणीं भीमानें तपःश्चर्या करण्याकरितां वस्ती केली होती. तेथील भीमसेनाचें दर्शन घेऊन पुढें चालूं लागलों. रस्ता वनश्रीनें अगदीं भरलेला होता. चित्रविचित्र रंगाचीं फुलझाडें जिकडेतिकडे उगवलीं होतीं. त्यांच्या सुवासानें सर्व वातावरण दरवळून गेलें होतें. फार खोलीवरून मंदाकिनी मंदगतीनें वाहातांना दिसत होती. उंच

उंच कडयावरून उडत फिरणारे पक्षांचे थवेच्या थवे दृष्टीस पडत होते. मधून-मधून **हिमालयांतील** मालाची वाहतूक करणाऱ्या मेंढ्याचे कळप रस्ता अडवून टाकीत होते. अशा अनेक गोष्टी चालू असतांच पावसास सुरवात झाली. **कुंडचट्टीवर** थोडा वेळ थांबून गरम दूध पिऊन ताजेतवाने झाल्यानंतर बराच वेळ चढाव चढून दुपारीं १२ च्या सुमारास **गुप्तकाशीस** येऊन दाखल झालों,

## गुप्तकाशी.

**गुप्तकाशी** हें **केदारनाथ**च्या वाटेवरील मोठ्या व्यापाराचें शेवटचें ठिकाण आहे. **कोटद्वार** ह्या रेल्वेस्टेशनपासून घोड्याच्या पाठीवरून मालाची ने-



**केदारपंचायतन.**

आण करणारे व्यापारी आपले घोड्यांचे काफिले घेऊन येथपर्यंत येतात व येथून परत

फिरतात. ह्यापुढें रस्ता वाईट असल्यामुळें मेंढरांच्या पाठीवरून माल नेऊन पुढचा व्यापार चालतो. अर्थात् आमच्या घोडेवाल्याचा व आमचा करार येथपर्यंतच होता. येथें आम्हीं घोडेवाल्यास सोडून दिलें, व पुढच्या प्रवासाकरितां तीन कुली ठरविले. दोघांनीं श्री. **नानासाहेब** व श्री. **दादासाहेब** यांस पाठीवर घ्यावें, व एकानें बोजा घ्यावा असें ठरलें. तिघांस **मैलचोरी**पर्यंत ११५ रु. द्यावयाचे ठराव झाला होता. त्यांच्याशीं करार करून तो गांवच्या चौधरी-पाटलाकडे रजिष्टर करावा लागतो. त्याबद्दल फक्त ८ आणे खर्च येतो. करारांत रस्त्याच्या बाजूस असलेल्या **त्रिजुगी नारायण** व **तुंगनाथ** ह्या ठिकाणांचाही उल्लेख केला होता. तीं ठिकाणें करारांत अवश्य घालावीं, नाहींतर आयत्या वेळीं कुली तिकडे येण्याचें नाकारतात. आरंभीं नुसतें तोंडीं मात्र कबूल करितात. म्हणून आम्हीं त्या ठिकाणांचा उल्लेख करारांत केला होता. हिमालयांत दरिद्री लोकांचें प्रमाण फार मोठें असल्यामुळें कुली पाहिजे त्या ठिकाणीं पाहिजे तितके मिळूं शकतात, म्हणून पुढें एखादे वेळेस कुली मिळणार नाहीं व त्यामुळें खोळांबा होईल अशा समजुतीनें घाबरून जाऊन आरंभींच करंडींत बसण्याकरितां कोणी कुली करूं नये. प्रथम कांहीं दिवस चालून पाहावें. चालणें जमत नाहीं असें वाटल्यास मागाहून कुली करावा. चालण्यानें प्रवासाचा जो आनंद उपभोगावयास सांपडतो, तो करंडींत बसल्यानें उपभोगावयास मिळत नाहीं. कुलींची व्यवस्था लाग-ल्यानंतर देवदर्शनास गेलों. येथें श्री **विश्वेश्वराचें** देऊळ आहे. देवळाच्या समोर दोन कुंडें असून त्यांत गायमुखांतून पाणी पडत असतें. त्यांत स्नान करून नंतर गुप्तदान वगैरे विधी पंड्याच्या सांगण्याप्रमाणें यात्रेकरू करतात. सर्व यात्रा लहानशा कुंडींत स्नान करीत असल्यामुळें पाणी घाण झालेलें असतें म्हणून मी त्यांत स्नान करण्याच्या भानगडींत पडलोंच नाहीं. एका पंड्यानें "क्या गुफतदान किया?" असा प्रश्न विचारला, कारण पण्डयास गुप्तदान देण्याचा विधी यात्रेकरू करीत होते. मी त्यास सांगितलें, "मीं गुप्तदान गुप्तपणें केलें आहे, व त्याची बातमी मी बाहेर फोडणार नाहीं, म्हणून मी तुला कांहीं सांगू शकत नाहीं." देवळासभोंवतीं बा. का. क. वाल्यांनीं धर्मशाळा बांधली आहे. तींत अनेक यात्रेकरूंनीं वस्ती केली होती. त्यांत एका पायानें लंगडा असलेला एक मनुष्य आढळला. तो मला म्हणाला, "**हरिद्वारहून** येथें येण्यास मजला दीड महिना लागला. माझा **बदरीनाथाला**सुद्धां-चालत जाण्याचा-विचार आहे." त्याचा तो विचार ऐकून मी तर थक्कच झालों. परंतु परमेश्वर साहाय्यकर्ता असल्यावर 'मूकं करोति वाचालम्, पंगु लंघयते गिरिम्।' अशा गोष्टी घडतात हेंच खरें. देवदर्शन करून पोष्टांत गेलों. आमची रुद्रप्रयागच्या पोष्टांत आलेली

तार येथें आली होती, ती मिळाली. तारेमुळें घरची खुशाली समजली. गुप्तकाशीपर्यंत बाराही महिने रहदारी असते. पुढच्या भागांत ६ ते ८ महिनेच रहदारी असते. ह्या रस्त्यावर गुप्तकाशीस शेवटचें तारऑफिस आहे, पुढें तार ऑफिस नाहीं. लहान लहान पोष्टऑफिसें मात्र आहेत, परंतु त्यांची व्यवस्था ठीक नाहीं. गुप्तकाशीस बाजार वगैरे मोठा असून राहाण्याकरितां लोकांनीं मोठमोठीं घरेंही बांधलेलीं आहेत. येथें बर्फावरून चालण्याचे गवताचे बूट ४।५ आण्यास एकप्रमाणें मिळत होते. परंतु बर्फावरून आपण कातडी जोड्यानेंही प्रवास करूं शकूं असा एक प्रकारचा आत्मविश्वास मजला वाटत असल्यामुळें मीं ते खरेदी केलें नाहींत व पुढें मात्र पस्ताव्यांत पडलों. ता. २२।५।१९३० रोजीं **गुप्तकाशी** सोडली. सुमारें १॥ मैलावर एक रस्ता उजव्या हातास वळला, तो रस्ता **गुप्तकाशी**च्या समोरच्याच डोंगरावर दिसणाऱ्या **उखीमठास** जात असून तेथूनच पुढें **बद्रीनाथास** जावें लागतें. तो रस्ता सोडून **नालाचट्टी**वर येऊन दाखल झालों. येथून **केदारनाथ** सुमारें २३ मैल आहे. केदारनाथला जाऊन परत येथें यावेंच लागतें. यात्रेकरू निघतांना मार्गांत कदाचित् जरूर लागेल म्हणून बरेंच सामान घेऊन ठेवितों व त्याचा उपयोग सबंध यात्रेंत एकदांही करण्याची वेळ न येतां, त्या सामानास मात्र विनाकारण यात्रा घडते. असें फालतू सामान येथें पाटलाकडे अगर दुकानदाराकडे ठेवून यात्रेकरू पुढें जातात. येथून एकच मैलावर **भेताभट्टी** अगर **नारायणकोटी** ह्या नांवाची चट्टी आहे. येथें पाण्याची वगैरे सोय चांगली असून एक देऊळ व एक पाण्याचें कुंड असल्यामुळें येथील पण्ड्यांनीं त्या कुंडास तीर्थाचें महत्त्व प्राप्त करून दिलें आहे व जे कोणी यात्रेकरू त्यांच्या जाळ्यांत सांपडतील त्यांजकडून दक्षणा उपटण्याचा त्यांचा क्रम अव्याहत चालूच आहे. **नाला** व **भेताचट्टी** वरील देवळांची ठेवण पाहिल्यास तीं बुद्धांनीं बांधलेल्या चैत्यांची बनविलीं आहेत असें वाटतें व ह्यावरून हजारों वर्षांपूर्वीं येथें बुद्धांचें वर्चस्व असून पुढें आद्य **शंकराचार्यांनीं** वैदिकधर्माचा प्रसार येथें केला व तेव्हांपासून चैत्यांचीं देवळें बनलीं असलीं पाहिजेत असें वाटतें. परंतु ह्या गोष्टींचा पूर्ण शोध लावण्यास एकाद्या इतिहाससंशोधकाची जरूर आहे. माझ्यासारखा अनभिज्ञ मनुष्य तेथें जाऊन विशेष काय सांगू शकणार ?

**भेताचट्टी** सोडून पुढें चालण्यास सुरवात केली.येथून चौफेर बर्फाचे पांढरेशुभ्र डोंगर सर्व बाजूंस दिसूं लागतात व जसजसें पुढें जावें, तसतसें ते आपणांस भेटण्यासच आपणाकडे येत आहेत कीं काय, असा भास होतो. व ह्या बड्या पांढऱ्या पायांच्या मोठ्या लोकांच्या भेटींत फारच मोठा आनंद भरलेला असला पाहिजे अशी मनाची

भ्रामक कल्पना होते व एवढे मोठे लोक आपल्या भेटीस येत असतांना आपण त्यांचा अव्हेर कां करावा असेंहा विचार मनांत येतात, व परत येणारे यात्रेकरू त्यांच्या भयानकपणाचें वर्णन करीत असले तरी तिकडे कानाडोळा करावासा वाटतो. कारण मनुष्य हा उपदेशानें शहाणा होणारा प्राणी नसून अनुभवानेंच शहाणा होणारा प्राणी आहे. अर्थात् त्यांच्या भेटीकरितां सपाट्यानें निघालों; परंतु प्रत्यक्ष जेव्हां त्यांची भेट घडून आली, तेव्हां 'दूरतः पर्वता रम्याः ।' ह्या म्हणींची सत्यता पटली. **केदारनाथाहून** परत येणाऱ्या यात्रेकरूंची भेट होऊं लागली. एक यात्रेकरू दुसऱ्या यात्रेकरूस भेटल्या-बरोबर जय केदारनाथजी, जय बदरी विशाल, वगैरे आरोळ्यांनीं एकमेकांनीं एकमेकांचे स्वागत करावयाचें, नंतरचा प्रश्न " कहांसे आतेहो " हा असे; व पुढें जाणारा यात्रे-करू सहाजिक पुढील रस्त्याची माहिती विचारीत असे. परत आलेला यात्रेकरू आपल्या-बद्दल जाणाऱ्या यात्रेकरूचा ग्रह चांगला व्हावा म्हणून रस्त्याच्या कठीणपणाचें रसभरीत वर्णन करून ' असा कठीण प्रवास करून मी तर सुखरूप परत आलों, तुम्ही कसे येतां कोण जाणे ? ' असा भाव दर्शवीत असे परंतु मी मात्र त्यांच्या ह्या सांगण्याबरोबर ह्या महापुरुषापेक्षां शरीरप्रकृति, काटकपणा, वगैरे गुणांत आपण कमी आहों कीं काय, असा आपल्या मनाला प्रश्न करीत असे आणि त्याचें उत्तर अर्थात् पुढील नाहीं, असें येत असल्यामुळेंच प्रवासास आरंभ करीत असे. कारण परत येणाऱ्या यात्रेकरूंत ६ महिन्यांच्या मुलांपासून तों ८० वर्षांच्या म्हाताऱ्यापर्यंत सर्व स्त्रीपुरुषांची भेट होत असे. **भेताचट्टी**-पासून पुढें रस्ता बिकट होत जातो व सृष्टिसौंदर्याची वाढ होत जाते. **भेताचट्टीच्या** जवळचा प्रदेश साधारण सपाट असल्यामुळें चोहोंबाजूंस गव्हाचीं हिरवीगार शेतें दिसून येत होतीं. कांहीं ठिकाणीं गहूं मळण्याचेंही काम चाललें होतें. थंडीचें प्रमाण वाढतें असल्यामुळें आतां कापसाचे कपडे घातलेल्या शेतकऱ्यांच्या ऐवजीं घोंगडीचे जाड कपडे घातलेले शेतकरी भेटत होते. व रस्त्याच्या दोहोंबाजूंस गुलाबाच्या झाडांची गर्दी लागून गेली होती. इतरही मोठमोठे वृक्ष चोंफेर दृष्टीस पडत होते. चार मैल आनंदांत प्रवास करून दोन डोंगराच्या मध्यें मोठ्या जोरानें वाहात असलेल्या एका ओढ्याच्या कांठीं येऊन दाखल झालों. ओढ्याच्या अलीकडे व पलीकडे दोन्ही बाजूंस दोन चट्ट्या असून त्यांस अनुक्रमें **ब्युंगतल्ला** व **ब्युंगमल्ला** अशीं नांवें आहेत. ह्या ठिकाणीं ओढ्याच्या पाण्यावर चालणाऱ्या अनेक चात्या दृष्टीस पडल्या. त्यांत लाकडाचे पढगे, मापें, चेंडू वगैरे जिन्नस पुष्कळ तयार होत होते, व त्यांस किंमतही फार पडत नव्हती. परंतु ओझ्याच्या भीतीनें ते खरेदी करण्याचें धाडस केलें नाहीं. सुमारें १ मैल चढण व पुढें साधारण सपाटी असा ३ मैल प्रवास करून वस्तीस **फाटा** चट्टीवर येऊन

पोहोंचलों. येथें उतरण्याच्या जागेची पंचाईत पडली. कारण संध्याकाळीं स्वयंपाक करीत नसल्यामुळें आम्ही नुसत्या दुधावर भागवीत असूं. ज्याच्याकडे दूध होतें त्याच्याकडे जागा शिल्लक नव्हती, व ज्याच्याकडे जागा होती त्याच्याकडे दूध नव्हतें. वरें त्यास जागाभाडें देऊन जागा मागूं लागलों तर तो म्हणाला भाडें घेण्याची आमची पद्धत नाहीं. मोठ्या जिकिरीनें एकदांची जागा मिळाली. येथें लहानसें पोष्ट आफिस असून " श्री **केदारकीर्ति कार्यालय** " ह्या नांवाचें एक पुस्तकांचें दुकान आहे व त्यांत बदरीकेदारच्या यात्रेसंबंधीं अनेक पुस्तकें, नकाशे वगैरे विकत मिळतात व त्या दुकानाचे मालक आपलीं पुस्तकें पुण्याच्या **चित्रशाळा प्रेस**मधून छापून नेतात हें पाहून तर मला फारच आनंद वाटला. आम्ही दोघे समानधर्मी बनलों. **फाटा चट्टी** ही देवदार वृक्षांच्या झाडींत डोंगराच्या उतरणीवर वसलेली चट्टी आहे. येथें उतरलेल्या ठिकाणावरून लांबवरचा देखावा फार सुंदर दिसत होता. ता. २४-५-३० रोजीं **फाटाचट्टी** सोडून चालण्यास सुरुवात केली. लहानलहान चढउतार चढतउतरत फाट्यापासून पांच मैलांवरील **रामपूर** चट्टीस येऊन दाखल झालों. पाण्याच्या सुंदर झऱ्याच्या कांठावर वसलेली हीही मोठी रमणीय चट्टी आहे. पुढे **त्रिजुगीनारायणाचा** चढाव चढावयाचा असल्यामुळें येथेंच दुपारचा स्वयंपाक बनविला व भोजनोत्तर चालण्यास सुरुवात केली. **रामपूर**पासून सुमारें एक मैलांवर डाव्या हातास एक रस्ता **त्रिजुगीनारायणा**कडे जातो व एक रस्ता तसाच पुढें **केदारनाथाकडे** जातो. आम्ही डाव्या हाताच्या रस्त्यानें निघालों. रस्ता सरासरी दीडदोन फूटच रुंद असून दगडांनीं भरलेला होता. सारखी अडीच मैल चढण आहे. दीड मैलांवर **शाकांबरी** देवीचें देऊळ लागतें. ह्या देवळापासूनही दोन रस्ते फुटतात. डाव्या हाताचा **त्रिजुगीनारायणा**कडे व उजव्या हाताचा **केदारनाथा**कडे जातो. येथून भयंकर दाट जंगलास सुरुवात होते. परतु मधून मधून परत येणाऱ्या यात्रेकरूंची भेट होत असल्यामुळें जंगली जनावरांची फारशी भीति वाटत नव्हती; परंतु अगदीं एकट्यानें ह्या जंगलांतून प्रवास करूं नये हें चांगलें. संध्याकाळीं ५ च्या सुमारास **त्रिगुजी नारायणास बा. का. क. वाल्यांच्या** धर्मशाळेंत मुक्काम टाकिला.

## त्रिगुजीनारायण.

गांवांत हलवायाचीं दुकानें असल्यामुळें दुधाची वगैरे सोय चांगली झाली. धर्मशाळेसमोरच नारायणाचें मंदीर आहे तेथें दर्शनास गेलों. ह्या देवळांत सत्ययुगांत शंकरपार्वतीचा विवाह झाला. त्यावेळीं पेटविलेला अग्नि अद्याप तीन युगें तसाच राहिला आहे असें म्हणतात, व अशा अग्नीस प्रत्येक यात्रेकरूनें कांहींतरी काष्टें अर्पण

करावीं, म्हणून एक पैशास एक ह्या स्वस्त भावानें पण्डे यात्रेकरूस लाकडें पुरवितात. देवळांत शिरलों तों देऊळ सर्व धुरानें भरून गेलें होतें, पण्डे पैशाच्या आशेनें व यात्रेकरू पुण्याच्या आशेनें तसेंच देवळांत जात होते. परंतु मी मात्र माहिती मिळविण्याच्या आशेवर पाणी सोडून तसाच मागें फिरलों तोंच बाहेर पावसास सुरुवात झाली होती. समुद्रसपाटीपासून सुमारें दहा हजार फुटांवर हें ठिकाण असल्यामुळें थंडी तर मनस्वी वाजत होती, त्यांतच पावसानें गांठल्यामुळें इतर भटकण्याचे सर्व कार्यक्रम रद्द करून धर्मशाळा गांठली. चौकीदारानें तिघांकरितां तीन गरम पांघरुणें दिल्यामुळें रात्रीं थंडीचा त्रास बराच कमी झाला. ता. २५-५-३० रोजीं सकाळीं चालण्यास सुरवात केली. सुमारें साडे तीन मैलांचा दगडांनीं भरलेला रस्ता उतरून **मंदाकिनी** आणि **सोन** ह्या दोन नद्यांच्या संगमामुळें **सोनप्रयाग** हें नांव प्राप्त झालेल्या ठिकाणीं येऊन दाखल झालों. येथें एक सुंदर धबधबा असून नदीवर तारांचा झुलता पूल आहे. सभोंवतीं गर्द झाडी असल्यामुळें उन्हाचाही त्रास होत नाहीं. अशा ठिकाणीं एका हलवायानें एक दुकान उघडलें होतें. अर्थात् त्यास आश्रय देऊन ताजेतवाने होऊन चढण्यास सुरवात केली. कारण नुकताच उतार उतरून झाला होता. जगांत ज्याप्रमाणें दुःखामागून सुख, सुखामागून दुःख असें सारखें रहाटगाडगें चाललें आहे, तशीच ह्या प्रवासाची स्थिति आहे. चढण संपली कीं उतारास आरंभ व्हावयाचा व उताराच्या मागोमाग चढाव यावयाचाच. सुमारें एक फर्लांग चढल्यानंतर

## मुंडकटागणेश

ह्याचें दर्शन झालें. नांव सांगितलें नसतें तर ह्यास गणपती म्हणणें शक्य नव्हतें. पार्वतीनें स्नानास बसण्यापूर्वीं आपल्या आंगाचा मळ काढून ज्या मानसपुत्रास जन्म दिला तोच हा गणपती; ह्यानें शंकर परत आल्यानंतर त्यांस स्वतःच्या घरांत शिरण्यास मज्जाव केला म्हणून शंकरानीं त्याचें डोकेंच छाटून टाकिलें, म्हणून ह्यास **मुंडकटागणेश** हें नांव पडलें आहे. येथून पुढें सुमारें एक मैल सारखी चढणच आहे. रस्ता साधारण लहानच असल्यामुळें फार जपून चालावें लागतें. डाव्या हातास उंच कडा असून उजव्या हातास फार खोलीवरून दुधाप्रमाणें पांढरें शुभ्र पाणी असलेली नदी वाहतांना दृष्टीस पडते. नदी इतक्या खोलीवरून वाहाते कीं तिच्याकडे पाहून भीतीच वाटते. नदीच्या पलीकडच्या कांठावरील डोंगरही गर्द झाडींनें भरलेले दिसतात. त्यामुळें श्वापदांची भीति वाटते. आजच्या प्रवासांत एका सापानें मजला दर्शन दिलें. परंतु प्रत्यक्ष भेटीचा योग आला नाहीं. डोंगरावरून पाण्याचे प्रवाह ठिकठिकाणीं वाहात होते. कांहीं ठिकाणीं नेहमींपेक्षां जास्त पाणी पडल्यामुळें रस्ता वाहून गेला होता; तो झाडांच्या खांद्यांनीं

कसावसा तयार केला होता. रस्ता दुरुस्त करण्याकरितां माणसें सारखीं ठेवलेलीं आढळून येत होतीं, तरीहि ह्या रस्त्यांची अव्यवस्था पाहून **इंग्रजांच्या** पब्लिक् वर्क्स खात्याबद्दल थोडासा प्रतिकूल ग्रह झाला. परंतु पुढील सालीं जेव्हां जन्मोत्रीची यात्रा केली व त्या रस्त्यावर रस्तादुरुस्ती करणाऱ्या एकाही मनुष्याची भेट झाली नाहीं, तेव्हां मात्र आपण ब्रिटिश गढवालच्या पब्लिक् व० खात्यास निष्कारण दोष दिला असें वाटलें. यात्रेकरूंकरितां करतां येणाऱ्या जरी बऱ्याच सोयी अद्याप ह्या रस्त्यास व्हावयाच्या आहेत तरीही **टिहरी** संस्थानांतील यात्रेकरूंच्या सोईचा विचार केला असतां ब्रिटिशांचें राज्य आमच्या संस्थानिकांपेक्षां शतपटीनें बरें असें दुःखानें म्हणावें लागतें. व संस्थानें असावीं कीं नसावीं ह्याबद्दल अजून ज्यांस शंका असेल त्यांनें संस्थानी मुलखांतून पायीं प्रवास करावा, म्हणजे हीं संस्थानें एकदम खालसा करावीं असें त्यांचें मत झाल्याशिवाय खात्रीनें राहणार नाहीं.नुसतीं पुस्तकें वांचून मत बनविणाऱ्या बुकांतील किड्यांस मात्र अजून तसें वाटत नाहीं, ह्याचा अनुभव पुण्यास भरलेल्या तरुणांच्या परिषदेंत आला. कारण तेथें संस्थानें खालसा करण्याचा ठराव नापास झाला. असो.—

सुमारें अडीच मैल चालून

## गौरीकुंड

नांवाच्या चट्टीवर पोहोंचलों. सर्व प्रवासांत खाणावळ अशी येथेंच आढळली. खाणावळमुळें स्वयंपाक करण्याच्या कामास रजा दिली. वाटेंत थंडीमुळें रोज स्नान घडत नसे. परंतु येथें ऊन पाण्याचें कुंड असल्यामुळें स्नानाचाही योग आला. गांवांची वस्ती सुमारें २०।२५ घरांची आहे. पण्डे लोक गांवांत शिरल्याबरोबर यात्रेकरूंस घेरतात. ह्या ठिकाणीं एकंदर दोन कुंडांत स्नान करण्याचा विधि सांगितला आहे. पैकीं एक कुंड गार पाण्याचें असून दुसरें कढत पाण्याचें आहे.

दोन कुंडींमध्यें अंतर सुमारें एक फर्लांग आहे. त्यामुळें प्रथम थंड पाण्याच्या कुंडांत स्नान करून तसेंच ओलेत्यानें गरम पाण्याच्या कुण्डाकडे धावणाऱ्या व थंडीनें काकडलेल्या यात्रेकरूंचे थवेच्या थवे दृष्टीस पडत होते.परंतु एकाद्या विजयी वीराप्रमाणें आपण आज फारच मोठी बहादुरी करून पुण्य संपादन केल्याबद्दलची आनंदाची छटा त्यांच्या तोंडावर दिसत होती. मी मात्र तडक गरम पाण्याच्या कुण्डाची वाट धरली. ह्या ठिकाणीं शंकराची बायको गौरी ही स्नान करीत असे म्हणून ह्या कुण्डास **गौरीकुण्ड** म्हणतात.कुण्डाचें पाणी बरेंच गरम आहे म्हणून त्यांत उतरून स्नान करणें शक्य नसतें. तांब्यानें थोडें थोडें पाणी आंगावर घेऊन स्नान करावें लागतें. बराच वेळ स्नानांत घालविला. खाणावळींत भोजन उरकून पुढ चालण्यास सुरवात केली. आरंभीं

चांगलें ऊन पडलें होतें, म्हणून जवळपासच्या डोंगरावरील बर्फ चकाकत होतें. डोंगरावरून वहाणाऱ्या लहानलहान हिमनद्यांचे प्रवाह मनास रमवीत होते. इतक्यांत अभ्रें येऊन पावसाचीं चिन्हें दिसूं लागलीं. हिमालयांत थंडी, वारा, ऊन आणि पाऊस हीं कधीं गांठतील, किती वेळ थांबतील व केव्हां जातील ह्याचा कांहींच नियम नसतो. चढण्यानें जीव हैराण झालाच होता. त्यांतच पावसानें कृपा करण्याचें ठरविलें. परंतु थोडक्याच वेळांत **आरामचट्टी** अगर **जंगलचट्टी** नांवाच्या ठिकाणीं येऊन दाखल झालों. येथें जवळच एक भैरवाचें लहानसें देऊळ असून त्यास पुष्कळ यात्रेकरू फाटक्या चिंध्या वहात असल्यामुळें निरनिराळ्या देशांतील कापडाच्या नमुन्याचें जणूं कांहीं प्रदर्शनच तेथें भरलें होतें. पावसानें आम्ही चट्टी गांठल्याचें व आपला ह्या यात्रेकरूंस भिजविण्याचा बेत सिद्धीस जात नाहीं,हें पाहून पलायन केलें,म्हणून आम्ही पुढें झटकलों. कारण पुढें **रामवाडा** ही चट्टी येणार अशी बातमी मिळाली होती. तेथें रामाचा वाडा असल्यामुळें तेथें हनुमानासारख्या पराक्रमी वानरांची वस्ती असणारच. तेव्हां एकाद्या पराक्रमी वानराची गांठ घेऊन व त्यास इकडच्या तिकडच्या सुरस गोष्टी सांगून वश करून घेऊं व बिगर त्रासानें उडतच त्याच्या पाठीवरून **केदारनाथाचें** व जमल्यास तसेंच **बद्रीनाथाचें**ही दर्शन घेऊन परत येऊं असा बेत मनाशीं ठरवून टाकिला ! परंतु मुक्कामावर पोहोंचतांच निराशाच झाली. चोहोंकडे बर्फच बर्फ असून लहानशा पाण्यानें ओल्या झालेल्या जमिनीवर बांधलेल्या ८।१० झोपड्या आढळल्या त्यांत मुक्काम करणें म्हणजे सकाळीं राम म्हणण्याची पूर्व तयारीच होय, असें वाटल्यामुळें स्वतःच्या शरिरांतील रामास कसोटीस लावण्याचा विचार सोडून एकादी आरामाची जागा मिळविण्याच्या खटपटीस लागलों. पण यात्रेकरूंची गैरसोय जाणून **बा. का. क. वाल्यांनी** येथें एक दुमजली धर्मशाळा बांधली आहे, तींत दुसऱ्या मजल्यावरची एक खोली चौकीदारास चांगल्याच बक्षिसाची आशा लावल्यामुळें मिळाली. तक्तपोशी नुसत्या सुट्या फळ्या टाकून केली होती त्यामुळें खालच्या मजल्यावर उतरलेल्या यात्रिकरूंनीं पेटविलेल्या झगऱ्यांच्या धुरानें खोली भरून गेली होती. आम्हीहि थंडीनें काकडल्यामुळें चौकीदारानें दिलेली शेगडी पेटविली होती. येथें कोळसे मिळण्याची सोय नसल्यामुळें व सर्वत्र बर्फाचें वास्तव्य असल्यामुळें लाकडेच जाळावीं लागलीं व तींही चांगलींच ओलीं होतीं. खोलीच्या बाहेर पडावें तो मनस्वी थंडी. आंत बसावें तों दुप्पट धूर अशा परिस्थितींत तसेच शेगोटीशीं शेकत बसलों. धुरानें त्रस्त झाल्यानंतर कांहीं वेळानें हातमोजे, पायमोजे, विजार, गरम ओव्हर कोट वगैरे सर्व प्रकारचे कपडे घालून खोलीच्या बाहेर पडलों. थंडी वाजत होती परंतु

धुराच्या तडाक्यांतून सुटल्याचें समाधान वाटत होतें. बाहेर पडतों तोंच **केदारनाथाहून** आलेला एक कुली भेटला. पायांत घालावयास त्यास पायतणसुद्धां नव्हतें. थंडीच्या कडाक्यानें त्याचे हातपाय काल्याप्रमाणें गार झाले होते. तो मला म्हणाला, " **केदारनाथाच्या** एका फेरीची आम्हांस दीड रुपाया मजुरी मिळते परंतु जाऊन येण्यास अत्यंत कष्ट पडतात. मजला अद्याप लग्न करावयाचें आहे. परंतु आमच्याकडे लग्न करावयाचें म्हणजे कमींत कमी पांचशें रुपये खर्च येतो. ते पैसे जमविण्याच्या मी खटपटींत आहे. " गरीब लोक श्रीमंतांचें अनुकरण करण्याचा प्रयत्न करितात व संकटांत पडतात म्हणून श्रीमंतांनीं तरी निदान विनपैशांनीं, लग्नें करण्याचा धडा घालून दिला तर कितीतरी गरिबांच्या नाशिबांतील **गुलामगिरी** टळेल. आमच्या कोंकणांतील सावकार कुळास लग्नाकरितां पैसे कर्जाऊ देतात व जन्मभर नौकरी करण्याकरितां त्यांस बांधून घेतात. परंतु बिनपैशानें लग्न उरकण्याचा मार्ग त्यास दाखवीत नाहींत ! ही किती शरमेची गोष्ट आहे ! ! गांवांत प्रत्येक चट्टींत झगरी पेटलेली असून तीवर दूध तापत पडलें होतें. म्हणून एका झगरीवर चहा बनवून सर्वांनीं शेगडीच्या समोंवतीं बसून यथेच्छ चहापान केलें. दुसऱ्या दिवशीं **केदारनाथास** राहाण्याचा विचार **रामवाड्याची** थंडी पाहूनच सोडून दिला. धर्मशाळारक्षकाकडून आंथरण्यास लेप व पांघरण्यास तीन घोंगड्या मिळाल्या म्हणून रात्र साधारणपणें बरी पार पडली. सकाळीं उठल्याबरोबर प्रथम शेगडी पेटवून पाणी तापविलें व नंतर प्रातर्विधि उरकले. बर्फाच्या पाण्यानें प्रातर्विधि सुद्धां उरकणें शक्य नव्हतें. चहापान करून सामान तेथेंच खोलींत ठेवून खोलीस कुलूप घालून चढण्यास सुरवात केली. चढाव सुमारें साडेतीन मैल असून फारच कठीण आहे. एका मैलांत ४।५ वेळां तरी बर्फावरून प्रवास करावा लागे. हिवाळ्यांत हा सर्व प्रदेश बर्फानें भरून जातो. बर्फ पडण्यास साधारणतः कार्तिकापासून सुरवात होते, तें बर्फ सारखे चार महिने पडत असतें. त्यामुळें सपाटीवर १५ ते २०फुटाचें थर सांचतात व दऱ्या तर बर्फानें भरूनच जातात. हें सांचलेलें बर्फ चैत्रापासून थोडें थोडें वितळण्यास सुरवात होते. परंतु प्रदेश फार उंच असल्यामुळें वितळण्याचें काम मुंगीच्या पायानें चालतें. तरीही बर्फ फोडून वाट तयार करून जाणें वैशाखाच्या आरंभींच शक्य होतें म्हणून इकडील यात्रा अक्षयतृतीयेपासून भाऊबीजेपर्यंत फक्त सहामहिनेच असतें. सुरवातीस गेल्यास बर्फाचा त्रास फार होतो. उशीरा गेल्यास बर्फाचा त्रास कमी होतो तर पावसाचा त्रास वाढतो. सुरवातीस पाऊस असतोच, परंतु कमी असतो मिळून त्रासाची बेरीजवजावाकी सारखीच असते. ज्या दऱ्या बर्फानें भरलेल्या असतात त्या उतरत्या असल्यामुळें

त्यांच्या एका बाजूस साधारण एकफुटी पाऊलवाट खोदलेली असतें तीवरून जावें लागतें. सर्व रस्ता **मंदाकिनीच्या** कांठाकांठानें गेला आहे. परंतु **मंदाकिनीचें** पात्र वरून बर्फानें भरलेलें असतें. मधूनमधून कोठें बर्फ वितळल्यामुळें वाहाणारें पाणी दिसतें. बाकी वरती बर्फाचा पापुद्रा असून खालून नदी वाहात असतें. ती डाव्या हातास बर्फानें भरलेली नदी वाहात असतांना बर्फाच्या कड्यावरून प्रवास करणें म्हणजे प्राणसंकट असतें, कारण बर्फावरून पाय घसरल्यास मनुष्य सरळ नदीवरील बर्फाच्या पापुद्र्यावर कोसळावयाचा व पापुद्रा फुटून आंतील गारपाणी वहात असलेल्या वोगद्यांत तो सांपडावयाचाच. अशा मनुष्यास प्रत्यक्ष ब्रह्मदेव वांचवूं शकावयाचा नाहीं मग तेथें माणसाचा पाड काय ? त्या दिवशीं आमचा सामानाचा कुली माझ्या दिमतीस होता, म्हणूनच मी जिवंत परत आलों. एके ठिकाणीं तर मी त्याच्यावर इतका भार टाकिला कीं दोघांचाही जीव जाण्याची वेळ आली होती. परंतु दैव बलवत्तरं म्हणून त्या दिवशीं बचावलों. आंगांत गरम कपडे होते, परंतु पायांत घालण्याकरितां मी बूट घेतला नव्हता. जोडा बर्फावरून घसरे व अनवाणी चालावें तर पाय थंडीनें अगदीं गारठून जात. परंतु जगण्याच्या आशेनें बर्फावरून अनवाणी चालल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. मी जरी इतका त्रासलों होतों तरी माझ्या जवळून हजारों यात्रेकरू अनवाणी, अंगावर फाटकेंतुटके कापसाचे कपडे घातलेले असे प्रवास करीत होते. एकहि यात्रेकरू बर्फावरून पडून दगावल्याचें ऐकिवांत आलें नाहीं. परंतु जाणाऱ्या यात्रेकरूनें त्या रस्त्यावरून तरी आपल्याच घमेंडींत एकट्यानें प्रवास करूं नये, असें माझें मत आहे ज्यांनीं एकट्यांनीं प्रवास केला ते धन्य आहेत व त्यास मी त्रिवार प्रणाम करण्यास तयार आहे. वाटेंत एके ठिकाणीं एकानें चहाचें दुकान उघडलें होतें, व तो एक आण्यास एक पेला विनदुधाचा चहा विकीत होता, तो चहा आम्हांस अमृततुल्य वाटला. सुमारें १० वाजतां **केदारनाथाला** येऊन दाखल झालों.

**॥ तीर्थानाम् परमं तीर्थम् । केदारम् तीर्थमुत्तमम् ॥**

## केदारनाथ.

**केदारनाथ** हें समुद्रसपाटीपासून ११५०० फूट उंचीवर आहे आसपासचा सर्व प्रदेश बर्फानें भरलेला आहे सुमारें एक मैल बर्फाच्छादित सपाटीवरून मार्ग आक्रमण करावा लागला. सर्वत्र बर्फ असल्यामुळें वनस्पतींचा लवलेश नाहीं. गांव सरासरीं ३०।४० घरांचें आहे. गांवात प्रत्येक घरापुढें ४।५ फूट उंच असे बर्फाचे थर होते. व ते फोडून घरांत जाण्याकरितां वाट तयार केलेली असे. हिंवाळ्यांत घरांवर १५ फूट उंचीचा बर्फाचा थर पडतो, त्या मुळें सामान्य मजबुतीच्या घरांचीं छपरें पडून जातात अशीं चार

ज्यांच्या भिंती असून मध्यें वर्फाची रास पडली आहे, अशीं कित्येक घरें दृष्टीस पडत होतीं. ज्यांनीं घरावर पत्रें घातलेले होते त्यांचीं घरें शाबूत होतीं परंतु इतक्या विकट वाटेनें पत्रें वाहून आणणें म्हणजे त्यांस भलतीच किंमत पडते, परंतु ज्यांस चांगलें कूळ भेटे त्यास पत्रें आणणें शक्य झालें होतें. प्रत्येक पंड्याची यात्रेकरूपाशीं घर बांधण्या करितां पैशांची मागणी असे व तेही पैसे थोडेथोडके नसून १०० ते ५०० रु. तरी त्यास पाहिजे असत, व इतके पैसे यात्रेकरूंस देणें शक्य नसल्यामुळें येथील पण्ड्यांनीं गयेप्रमाणें यात्रेकरूंचे हात बांधण्यास नुकतीच सुरवात केली आहे. परत जातांना बऱ्याच यात्रेकरूंनीं पण्ड्यानें हात बांधून पैसे घेतल्याचें सांगितलें. आमचा पण्ड्या आम्हांला म्हणाला, " तुमचे हात बांधले म्हणजे कांहींतरी पैसे निदान १०० रु. तरी द्यावेच लागतील–" हे हात बांधणें म्हणजे हातास फुलांची माळ बांधणें अर्थात् हें नैतिक बंधन आहे. मी त्यास उलट म्हणालों, " एकतर मजला तुमच्या आशीर्वादाची जरूरच नाहीं. त्यांतूनहि कोणी अतिप्रसंग करण्यास आला तर मी त्याच्या एक चांगली बरेच दिवस आठवण राहील अशी श्रीमुखांत देईन." असो. पण्ड्याकडे सामान टाकून देवळा-कडे निघालों वाटेंत **मंदाकिनी** उगम पावतें तें कुंड लागलें. पाणी किती थंड होतें तें लिहिण्याचें कारणच नाहीं. पंड्या त्यांत स्नान करण्याबद्दल सांगूं लागला. मी तें अर्थात् नाकारिलें. पुढें देऊळ दिसलें, देऊळ सर्व दगडी बांधलेलें आहे. देवळांत शिरण्यास माणशीं ३ पैसे कर द्यावा लागतो. तो देऊन गाभाऱ्यांत शिरलों तों तेथें एक ओबडधोबड दगड असून त्याची पूजाअर्चा प्रदक्षणा वगैरे विधि चालले होते. ह्या ठिकाणीं देवाचे धड असून त्याचें डोकें नेपाळांत आहे व त्या ठिकाणास पाशुपतेश्वर म्हणतात. अर्थात् **केदारनाथाची** यात्रा केलेल्या यात्रेकरूनें नेपाळची यात्रा केल्याशिवाय यात्रेचें संपूर्ण पुण्य त्याच्या पदरांत पडत नाहीं. मी १९१७ सालीं प्रथम **नेपाळची** यात्रा केली. नंतर १९३० सालीं केदारनाथची यात्रा करून १९३२ सालीं पुन्हां नेपाळची यात्रा केल्यामुळें सर्व पुण्य माझ्या पदरांत पडलें आहे. आंतबाहेर सर्वत्र यात्रेकरूंची गर्दी असून **केदारनाथकू, पण्डाकू कुछ भोग लगादो**–कांहीं भोजन वगैरे द्या–अशी पंड्याची सर्वत्र वटवट चालू होती. माझ्याशीं जेव्हां त्यांनीं फारच लगट केली तेव्हां मी त्यांस सांगितलें कीं, " कुलींनाच जास्त कष्ट पडले आहेत. सबब त्यांसच काय मला देणें आहे तें मी देईन, तुम्हांस कांहीं एक मिळणार नाहीं. " देवळाच्या माग बर्फानें पूर्ण भरलेला असा डोंगर असून मनुष्यास त्यावर जातां येत नाहीं. अर्थात् केदारनाथ ही मनुष्याच्या आक्रमणाची एक सीमाच आहे. येथून धाडस करून पुढें गेलेला मनुष्य परत येत नाहीं असा समज आहे. पांडव ह्याच रस्त्यानें पुढें गेले ते आजतागायत परत आले नाहींत व पुढें येण्याची आशा दिसत

नाहीं. पंड्यानें उतरण्यास जागा दिली होती, त्याचा मोबदला त्यास भरपूर पावता केला. परंतु तेवढ्यानें त्याचें समाधान होणें शक्य नव्हतें. परंतु आमचाही इलाज नव्हता. पंड्यानें जागा दिली नसती तरी चाललें असतें, गांवांत **बा. का. क.** वाल्यांची व इतर धर्मशाळा उतरण्याकरितां आहेत, हलवायाचीं दुकानें आहेत. कोठेंही चार तास निघाले असते, कारण आम्ही येथें राहण्याकरितां आलोंच नव्हतों. सुमारें एक वाजतां पावसाचीं चिन्हें दिसूं लागलीं. तोंपर्यंत ऊन असल्यामुळें बर्फाची मजा पाहाण्यांत काळ केव्हांच निघून गेला. म्हणून लगेच परत चालण्यास सुरवात केली. पाऊस पडत असतां बर्फप्रदेशांतून प्रवास करावयास नको होता. कारण बर्फावर पाणी पडून पाय घसरूं लागले. हातावर पडलेलें पाणी हवेमुळें एकदम गार होऊन हातही गार पडूं लागले. सर्व रस्ता पाण्यानें भरून गेला. चढण्यापेक्षां उतरणें कठीण झालें. फार काय पण **श्री. नानासाहेबांस** पाठीवर घेतलेल्या कुलीचा पाय सरकला व **श्री. नानासाहेब** खालीं आले. परंतु जवळच्या दगडाचा आश्रय मिळाल्यामुळें ते थोडक्यांत बचावले. मीही मंदाकिनीचें चुकविलेलें स्नान करण्याच्या बेतांत होतों. सर्व कपडे ओले झालेले, चिखलानें भरलेले आंग काकडून गेलेले असे आम्हीं मोठ्या मुष्किलीनें सुमारें पांच वाजतां ता. २६-५-३१ रोजीं **रामवाड्यास** येऊन पोहोंचलों. कपडे शेगोटीशीं वाळवीत चहापान वगैरे करून रात्रीं सुखदुःखाच्या गप्पा मारीत झोंपीं गेलों.

**रामवाड्यास** रामराम ठोकून व चौकीदाराची योग्य बोळवण करून स्नानाकरितां गौरीकुंडावर आलों. पुढें लवकर स्नानाचा संभव नसल्यामुळें गरमपाण्याचें स्नान केलें व फाटाचट्टीवर वस्ती केली. ता. २८।५।३० ला फाटाचट्टी सोडून भेताचट्टीस भोजन उरकून तेथें ठेवलेलें सामान ताब्यांत घेऊन **नाला**चट्टीवर आलों. येथून गुप्तकाशीचा रस्ता उजव्या हातास जातो तो सोडून डाव्या हाताच्या उरवीमठाच्या रस्त्यास लागलों. दीड मैल सारखा उतार उतरून **मंदाकिनी** वरील पूल ओलांडून चढाव चढण्यास सुरवात केली. दुपारची वेळ असल्यामुळें उन्हाचा त्रास फार होत होता; परंतु मध्यंतरी अनेक वेळां पाण्याचे झरे लागले म्हणून चढण चढणें शक्य झालें. चढणीचा रस्ता चांगला ५।६ फूट रुंद होता; परंतु चढण खडी असल्यामुळें व रस्त्यावर बारीक बारीक दगड पसरलेले असल्यामुळें पाय सारखे घसरत व क्षणोक्षणीं रस्त्यावर लोटांगण घालण्याची वेळ येते कीं काय अशी भीति वाटे. कुली कोणतीहि चढण चढतांना पायांतील बूट काढीत नसत. परंतु ह्या चढणीवर त्यांस सुद्धां बूट काढून चालावे लागले व एकदोनदां त्यांचे सुद्धां पाय सरकले. सुमारें दीड मैल चढाव चढून सायंकाळीं पांचच्या सुमारास उरवीमठास पोहोंचलों.

## उरवीमठ.

**उरवीमठ** हें एक महत्त्वाचें ठिकाण आहे. बाणासुराची मुलगी उषा व तिचा नवरा अनिरुद्ध हीं ह्या ठिकाणीं पूर्वकाळीं राहात असत, म्हणून ह्या ठिकाणास उषामठाचा अपभ्रंश होऊन उरवीमठ हें नांव मिळालें आहे. ह्या ठिकाणीं उषा, अनिरुद्ध, मान्धाता इत्यादिकांच्या मूर्तींचीं देवळें आहेत. ओंकारनाथ नांवाचें महादेवाचें देऊळ विशेष महत्त्वाचें आहे, कारण दिवाळीपासून अक्षयतृतीयेपर्यंत ज्या वेळीं केदारनाथाचें मंदिर बर्फामुळें बंद असतें त्यावेळीं केदारनाथाची पूजा ह्या देवळांत होते. **केदारनाथाचे** पुजारी **रावळ** ह्यांचे येथें बरेच उंच उंच वाडे आहेत व थंडीचे सहा महिने रावळांची वस्ती येथें असते. गावांत शिरल्याबरोबर प्रथम पोष्टांत गेलों, पण पत्रें मिळालीं नाहींत. जागेसंबंधीं चवकशीकरितां ज्ञानसिंग नांवाच्या व्यापाऱ्याकडे खोली मिळाली. गावांत हास्पिटल, मिडल स्कूल, संस्कृत महाविद्यालय वगैरे संस्था असल्यामुळें वर्तमानपत्र मिळण्याची आशा वाटली. व शाळेच्या हेडमास्तरसाहेबांकडून अलाहाबादच्या लीडरचे चार पांच अंक मिळविले. त्यामुळें रात्र मोठ्या आनंदांत गेली. येथून पंच केदारपैकीं द्वितिय केदार

## मध्यमहेश्वर

येथें जाण्याकरितां पायरस्ता आहे. अंतर सुमारें २० मैल आहे. परंतु रस्ता अत्यंत वाईट असल्यामुळें व वाटेंत चट्ट्यांचीही चांगली सोय नसल्यामुळें क्वचित् एकादा यात्रेकरू तिकडे जातो. आम्ही अर्थात् तिकडे गेलों नाहीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून पुढें चालण्यास सुरवात केली. रस्ता गर्द झाडींतून व उताराचा आहे. **गणेशचट्टी** अगर **कंथाचट्टी** सोडून उरवी मठापासून ५ मैलांवरील ग्वालिया बगडचट्टीवर येऊन दाखल झालों. येथें एक लहानसा धबधबा असून त्यावर एक पिठाची गिरणी चालू असलेली आढळली. दुकानांत सर्व प्रकारचे खाण्याचे पदार्थ तयार मिळत होते ते खाऊन पाणी पिवून चढण्यास सुरवात केली. येथून सारखी चढावास सुरवात होते. म्हणून कांहीं तरी खाऊन पाणी पिऊन निघावें हें उत्तम. दुपारीं पोथाचट्टीवर भोजन उरकलें. येथून पुढें सारखी चढणच आहे. सर्व रस्ता किर्र झाडींमधून गेला आहे. ह्या रस्त्यानें परत येणारे यात्रेकरू भेटत नाहींत. क्वचित् एकादा पहाडी मनुष्य भेटतो म्हणून बरोबरची मंडळी सोडून चालूं नये हें चांगलें. नाहींतर एकट्याची वाघाशीं गांठ पडावयाची. जंगलामुळें उन्हाचा मात्र त्रास होत नाहीं. मधून मधून रंगबिरंगी पक्षी आपल्या ओरडण्यानें व इतःस्ततः फिरण्यानें मनाची करमणूक करितात. मधूनमधून मुळासकट उपटून पडलेले मोठमोठे वृक्ष आढळून येत होते. कांहीं वृक्षांचे बुंधे दोन तीन

वावांत न मावण्याइतकें मोठे असून त्यांचे शेंडे तर दिसतच नव्हते. वस्तीस बनिया कुंड नांवाच्या चट्टीवर गेलों. **बनियाकुंड** हें गांव सुरूंच्या झाडांच्या जंगलांत बसलें आहे. चारी बाजूंनीं डोंगरांनी वेष्टिलेल्या सपाट प्रदेशांत हें ठिकाण असल्यामुळें फार रमणीय आहे. एक मोठा सुंदर झराही पाण्याकरितां सारखा वाहात आहे. त्यामुळें गांवांत फिरण्याची मोठीं मजा वाटत होती. दुधाची चवकशी करीत एका दुकानदाराकडे गेलों तो तेथें सहकुटुंब राहात होता. इकडील चट्टयांत बहुतेक दुकानदार एकटेच राहातात. मुलें माणसें वगैरे त्यांच्या गांवांत असतात. पोट भरण्याकरितां ते रस्त्यावर दुकान घालून बसतात. अर्थात् चट्टयांवर बायका फारशा पाहाण्यास मिळतच नाहीं. दुकानदाराच्या बायकोनें गळ्यांत तांबडी जाड पोत घातली होती. नाकांत चांगलें चार इंच व्यासाचें वळें होतें व त्याच्या भारानें नाक तुटून जाईल म्हणून त्यास एक लहानशी दोरी बांधून तिचें एक टोंक डोक्यावरील केसास अडकवून टाकिलें होतें. अंगावर चांदीचे दागिने होते. दुसऱ्या दिवशीं पुन्हा चढण्यास सुरवात केली व एक मैलावरील **चोपताचट्टीवर** येऊन दाखल झालों.

## चोपता

हें एकसारखा आठ मैल चढाव चढल्यानंतर येणारें ठिकाण असल्यामुळें येथेंच थंडीचें प्रमाण फार मोठें असतें. गावांत धर्मशाळा आहे तिचा आश्रय बहुतेक यात्रेकरू रात्रीचा करितात. कारण चट्टीवर मिळणारी जागा उघडीच असते. परंतु धर्मशाळेंत खोली मिळूं शकते. येथून गंगोत्री, जम्नोत्री, केदार व बदरी हीं सर्व हिमशृंगें जवळ जवळ दिसतात. येथून सुमारें दोन फर्लांगावरूनच डाव्या हातास **तुंगनाथास** रस्ता फुटतो रस्ता सारखा ३॥ मैलांचा व चढावाचा व कठीण असल्यामुळें येथें कुली बिथरले व आम्हीं वरती येणार नाहीं म्हणून त्यांनीं स्पष्टच सांगितलें. आमचा त्यांजपाशीं जो करार गुप्तकाशीस झाला होता त्यांत **तुंगनाथाचा** समावेश केला असल्यामुळें व आम्हांस पूर्वीच जाऊन आलेल्या यात्रेकरूंनीं तुंगनाथास जरूर जाऊन या म्हणून बजावून सांगितलें असल्यामुळें आम्ही तें ठिकाण पाहूनच पुढें जाण्याचें ठरविलें. ते सामोपचारानें ऐकेनात तेव्हां तक्रार करण्यास गांवांच्या पाटलाकडे निघालों तेव्हांच ते येण्यास तयार झाले. रस्ता दगडांनीं भरलेला असून चढाव कठीण होता व वाटेवर सारखा पाचोळा पडलेला होता. शेंकडा नव्वद यात्रेकरू **तुंगनाथ** कठीण म्हणून **तुंगनाथास** जात नाहींत. म्हणून रस्ता मळलेलाही नव्हता. पायांत जोडे घालूनें चालावें तर पाचोळ्यावरून पाय घसरत व जोडे काढून चालावें तर पायास खडे बोचत. म्हणून खड्यांस त्रासून कांहीं वेळ जोडे घालावे व एकसारखे पाय घसरण्यास त्रासून कांहीं वेळ

अनवाणी चालावें असा क्रम सुरू होता. पुण्यास ज्याप्रमाणें रात्रीं आठ वाजतांच वाड्यांचे दरवाजे वंद करून बिऱ्हाडकरूंस तुरुंगवास भोगावयास लावणाऱ्या घर-मालकांच्या त्रासानें जागा बदलून दुसऱ्या वाड्यांत राहावयास जावें तर घाणेरड्या संडासांच्या नरकवासांत पडण्याची वेळ येते व त्या त्रासानें वाडा सोडून चालावें तर घरमालकिणीच्या छळवादानें जीव गांजून जातो. अशा स्थितींत शेवटीं हे जगच सोडून जाण्याचे विचार उत्पन्न होतात, त्याप्रमाणेंच जवळ जवळ आमची स्थिति **तुंगनाथाच्या** चढावाच्या वेळां झाली व रस्त्यावर वसून उतरणीवरून हा देह खालीं सोडून देऊन त्रासांतून मुक्त व्हावें व स्वर्गलोक गांठावा असें वाटूं लागलें; परंतु लगेच विचार आले कीं आपण गेल्यास **नूतन मराठींतील** आपल्या विद्यार्थ्यांस पायीं प्रवासाची माहिती कोण सांगेल ? कारण प्रत्येक मनुष्यास असें वाटतच असतें कीं माझ्यावांचून जगाचें अडेल ! वस्तुस्थिति मात्र अशी आहे कीं जगाचें कोणाच्या वांचून अडत नाहीं. रथीमहारथी गेले. जगाचें रहाटगाडगें चालूंच आहे. हें सर्व कळतें पण वळत नाहीं. असो. कसाबसा चढतच होतो. **श्री. दादा** व **श्री. नाना** ह्यांना दगडाळ रस्त्याचा त्रास होत नव्हता, परंतु विथरलेल्या कुलींच्या पाठीवर बसून खडकाळ रस्त्यानें जावयाचें असल्यामुळें पाय घसरून त्यांनीं खालीं पाडल्यास काय करावयाचें इतकीच शंका त्यांस वारंवार उत्पन्न होत होती. परंतु तो प्रसंग त्यांजवर आला नाहीं. दुसरें, त्या दिवशीं आकाश निरभ्र होतें. पावसाचा त्रास झाला नाहीं व उन्हाचा त्रास होणें शक्य नव्हतें, उलट त्याची जरुरीच होती. कारण आतांचा वर्फप्रदेशांतून प्रवास चालला होता. डोंगर रंगीबेरंगी गवतानें भरलेला असल्यामुळें एकादा गालिचा पसरल्याप्रमाणें त्याची शोभा दिसत होती. मधूनमधून फूट, अर्धा फूट रुंदीचा रस्ता येई त्यावेळीं मात्र थोडा त्रास होई. सुमारें दोन तास चढून १० वाजतां तुंगनाथास येऊन दाखल झालों. तुंगनाथाच्या पंड्यानें आम्हांस खालींच गांठलें होतें. तो म्हणाला वाट अगदीं सोपी आहे व कुली म्हणत होते वाट अत्यंत अवघड आहे. माझें मत मात्र वाट अगदीं सोपी नसून साधारण अवघड आहे परंतु अशक्य कोटींतील नाहीं असें आहे. माझ्यासारख्यास ती अल्पकष्टसाध्य अशी वाटली, तुंगनाथ हा डोंगराळ प्रदेशांत असलेला एक मोठा डोंगर आहे. म्हणजे हा जणूं कांहीं किल्ल्यांतील बालेकिल्लाच आहे. वरतीं सर्वत्र बर्फ पसरलें होतें, थंडी मनस्वी होती. परंतु बिनदुधाच्या चहाचें एक दुकान असल्यामुळें थंडीचा त्रास थोडा कमी करतां आला. गार पाण्याच्या कुंडांत स्नान करून मोक्ष मिळविण्यापेक्षां कड्याखालीं उडी टाकून मोक्ष मिळविणें जांस्त सुखाचें वाटलें म्हणून स्नानाचा वेत रहित करून तुंग-नाथाचें दर्शन करण्यास गेलों. तुंगनाथाच्या मूर्तीवर पांच मुखवटे बसविले असून

देवाच्या सेवेकऱ्यांजवळ चांदीच्या चौऱ्या, छत्र, अबदागीर, वगैरे सर्व वस्तु पहावयास सांपडल्या. वरतीं यात्रेकरूंच्या सोईकरितां धर्मशाळा असून, हलवायांचीं दुकानेंहि असल्यामुळें तेथेंच फराळ करून पुढें निघालों. उतरण्याचा रस्ता [illegible] बांधल्या सारखा दिसतो. परंतु लहान लहान दगडाचे तुकडे सर्व रस्त्यावर पसरलेले होते. त्यामुळें पाय कापण्याची भीति वाटत होती. पुढें **बदरीनाथा**कडे जावयाचें असल्यामुळें उतरण्याचा रस्ता ज्या रस्त्यानें चढून आलों तो नव्हता. तेथूनच दुसऱ्याच एका रस्त्यानें उतरावें लागतें. त्या रस्त्यानें सुमारें चार मैल उतरून **पांगारवासा**चट्टीवर भोजनाकरितां आलों. रस्ता सर्व घनदाट जंगलांतून गेला असल्यामुळें व वाटेंत पाणीहि विपुल असल्यामुळें चावणाऱ्या माशांचा उपद्रव फार होतो. येथें पाणी आणण्याकरितां गेलों असतां ८।१० माशांनीं पायावर हल्ला करून पायांचा चांगलाच समाचार घेतला. त्या दिवशीं फारसा त्रास झाला नाहीं; परंतु दुसऱ्या दिवशीं पायांना मोठमोठाले फोड येऊन चालणें बंद करावें लागतें कीं काय, अशी भीति वाटूं लगली होती. परंतु त्याही संकटांतून मुक्त झालों. पांगरवाशाहून पुन्हां उतरण्यास सुरवात झाली. सारखी तीन मैल भयंकर जंगलांतून उतरणच होती, जंगल फार भयंकर असल्यामुळें तीन मैलांत एकही चट्टी आढळली नाहीं. नाहींतर बदरीकेदारच्या बाजूंस एक मैलापेक्षां जास्त अंतर दोन चट्ट्यांत क्वचित्‌च असतें. रुद्रगंगा नामक नदीवरील तारांचा पूल ओलांडून मंडळ-चट्टीवर येऊन दाखल झालों.


## मंडळ.

१०।१५ दुकानें असून पक्की बांधलेली धर्मशाळा येथें असल्यामुळें दोन दिवस विश्रांति घेण्यासारखें हें ठिकाण आहे. दोन डोंगरांच्या मध्यें दोन तीन फर्लांग रुंदीच्या सपाटीवर ही चट्टी वसली आहे. नदीचें पाणी अडवून त्याचे पाट काढून नदीच्या पात्रांतच धान्य, भाज्या वगैरेंची लागवड केली असल्यामुळें तारांच्या पुलावरून हिरव्यागार शेतांतून स्वच्छ पाण्याचा तो सपाट्यानें वाहाणारा प्रवाह पाहात बसले असतां उठावेसेंच वाटत नाहीं. चट्टीपेक्षां धर्मशाळेंत दोन दिवस मुक्काम करणें परवडतें. कारण चट्टींत उतरल्यावर दुकानदार सांगेल तो भाव देऊन जिन्नस खरेदी करावा लागतो. धर्मशाळेंत उतरल्यास जिनसाच्या भावाची चार ठिकाणीं चवकशी करून जिन्नस खरेदी करितां येतो. आम्हांस धर्मशाळेंत जागा चांगली मिळाली असून पांघरण्याकरितां दोन ब्लँकेटेंही मिळालीं होतीं. त्यामुळें तो दिवस फार सुखाचा गेला. मंडळपासून पायरस्त्यानें २ मैलांवर अनसूयादेवी ह्या नांवाचें देऊळ आहे. **अत्रि ऋषींची** बायको अनसूया हिनें ह्या ठिकाणीं तपश्चर्या केल्याचा पुराणांतरीं उल्लेख आहे. तेथून पुन्हां पाय रस्त्यानें १२ मैलांवर रुद्रनाथाचें देऊळ आहे. ह्यासच

चतुर्थ केदार म्हणतात. दोन्ही ठिकाणचे रस्ते वाईट असल्यामुळें तिकडे न जातां ता. ३१।५।३० रोजीं मंडळचट्टी सोडून चढण्यास सुरवात केली. दोन मैल सारखा चढाव चढून **गोपेश्वरास** येऊन दाखल झालों.

## गोपेश्वर.

ह्या ठिकाणीं महादेवाचें एक मोठें मंदिर असून विशेष गोष्ट म्हणजे महादेवासमोर अष्टधातूचा एक मोठा त्रिशूळ उभा आहे. हा त्रिशूळ हातानें हालविण्याचा प्रयत्न केला असतां हलत नाहीं. परंतु नुसती करंगळी लाविली असतां, हलतो अशी आख्यायिका आहे. परंतु मी तो हातानेंच हालविला. पाण्याची गैरसोय होती. आमचा व कुलींचा **तुंगनाथाच्या** यात्रेपासून बेबनाव झाला होता. म्हणून आम्ही त्यांच्याशीं बाह्यात्कारीं असहकारिता पुकारली होती. परंतु पुढें मुक्कामास मोठ्या गांवास जाव-



**धराली येथील शंकराचें देवालय.**

याचें असल्यामुळें व तेथें पोलीस स्टेशन यावयाचें असल्यामुळें कुलींनीं झाल्या प्रकाराबद्दल दिलगिरी व्यक्त केल्यामुळें येथून पुढें पुन्हा सहकार्यास सुरवात झाली. येथून दुपारीं भोजनोत्तर लगेच बाहेर पडलों. कारण शनिवार असल्यामुळें पोष्ट लवकर बंद होऊन कदाचित् पत्रें वगैरे मिळणार नाहींत, अशी शंका आम्हांस होती. रस्त्यावर एकही झाड नसून ऊन अगदीं कडक पडलें होतें. सर्व प्रवासांत इतका उन्हाळा कोठेंच भासला नाहीं. पाय चांगलेच भाजून निघाले. सुमारें तीन मैल चालून **अलकेनंदेवरील** तारांचा पूल ओलांडून चमोलीस येऊन दाखल झालों.

## चमोली.

**चमोली** अगर लालसांगा हे **पौडीच्या** खालोखाल **गढवाल** जिल्ह्यांतलें महत्त्वाचें ठिकाण आहे. येथें **डेप्युटी कलेक्टरची** कचेरी असून दवाखाना, धर्मशाळा,



**गंगानदीवरील पूल.**

पोष्ट व तारऑफीस वगैरे सर्व सोयी आहेत. अलकनंदेवरील पूर्वकाळच्या पुलाचा रंग तांबडा असल्यामुळें ह्या ठिकाणास लालसांगा असें नांव पडलें होतें. बा. का. क.

वाल्यांच्या धर्मशाळेंतील सर्व जागा भरल्या असल्यामुळें एका दुकानदाराच्या माडीवर बिऱ्हाड लाविलें. जवळच खाणावळ असल्यामुळें स्वयंपाकाचा त्रास नव्हताच. खाणावळींत कच्च्या विनतुपाच्या पोळ्या व भाजी हाच बेत होता. सुमारें १५ दिवस माझ्या हातच्या उत्तम ( ! ) स्वयंपाकाचा आस्वाद घेऊन श्री. दादा व श्री. नाना कंटाळून गेले होते. तेव्हां त्यांनीं तोंडपालटीकरितां यथेच्छ भोजन उरकलें व मागाहून त्यांना चांगलीच पश्चात्तापाची वेळ आली. मला व श्री. नानांस फारसा त्रास झाला नाहीं. परंतु श्री. दादांस मात्र अमांशानें चांगला पंधरा दिवस ताप दिला. ह्या प्रवासांत अमांश झाला म्हणजे किती हाल होतात ह्याची त्यानें प्रत्यक्ष कल्पना आणून दिली. असो. पायांस माशा चावून फोड आले असल्यामुळें व आमच्या जवळचा कोयनेलचा सांठाहि संपत आल्यामुळें तेथील दवाखान्यांत गेलों. डॉक्टरसाहेब मोठे सज्जन गृहस्थ दिसले त्यांनीं दोन्ही औषधें देऊन विचारपूस करण्यास सुरवात केली. आम्हींहि यात्रेकरूंच्या गैरसोयीबद्दल त्यांजपाशीं चर्चा केली. चट्टीच्या हद्दींत संडास नाहींत व मोकळ्या जागेंत बसण्यास परवानगी नाहीं, म्हणजे आई जेऊं घालीना व बाप भीक मागूं देईना, त्यांतलाच हा प्रकार आहे असें मी त्यास म्हणालों.

ते म्हणाले इतकी चवकशी करणारे यात्रेकरू इकडे येतच नाहींत. गेल्या वर्षी **कौन्सिल ऑफ स्टेटचे** सभासद **यू. रामराव** हे यात्रेस आले होते. त्यांनीं कांहीं प्रश्न **गढवाल**संबंधीं कौन्सिलमध्यें विचारले होते. परंतु पुढें त्यांचें काय झालें तें समजलें नाहीं. कौन्सिल प्रवेश हीच आपल्या आयुष्यांतील इतिकर्तव्यता मानणारे आमदार खासदार निरनिराळ्या अन्यायाबद्दल प्रश्न विचारून त्यांची मनाजोगतीं उत्तरें घेऊन गरिबांच्या गैरसोई दूर करण्याची चिकाटी जर दाखवितील तर त्यांच्याबद्दल लोकांना वाटणारा अनादर बराच कमी होईल. परंतु मानाकरितां हापापलेले, नुसत्या खुर्च्या आडविणारे हे लोकांचे प्रतिनिधि म्हणविणारे सभासद इतका त्रास घेतात कशास ? माझें नांव **काळे** असें समजल्यावर डॉक्टरसाहेबांस फार आनंद झाला. नांव **एम्. जी. काळे** समजल्यावर त्यांनीं लगेच **प्रो. व्ही. जी. काळे** तुमचे बंधूच काय ? तुम्हीही प्रोफेसर आहांत काय ? तुम्ही प्रोफेसर साहेबांस ओळखतां कीं नाहीं,वगैरे बरेच प्रश्न मी जणूं कांहीं त्यांच्या कुळांतीलच कोणी भेटलों अशा भावनेनें केले.कारण डाक्टरसाहेबांचें नांव **बी.डी.काळे** होते. मी त्यांस **प्रो. व्ही. जी. काळे** यांचा माझा नात्याचा संबंध नाहीं. त्यास मींच काय. परंतु पुण्यांतीलच नव्हे तर हिंदुस्थानांतील सर्व लोक ओळखतात व मला तेच काय पण पुण्यांत सुद्धां कोणी ओळखत नाहीं. प्रसिद्धींत पहिला नंबर त्यांनीं पटकाविला आहे, तर अप्रसिद्ध

पुरुषांच्या यादींत पहिलें नांव माझें आहे. ते **फर्ग्युसन कॉलेजचे** प्रोफेसर आहेत तर मी **गोवें प्रांतांतला प्रोफेसर** आहे. कारण मी गोवें प्रांतांत १९२५ सालीं



**गंगोत्रीजवळचें धराली गांव.**

फिरत असतां तिकडील लोक माझी दुसऱ्यास ओळख करून देत असतांना हे पुण्यास शाळेंत प्रोफेसर आहेत असें सांगत असत—गोवें प्रांतांत सर्वच शिक्षकांस प्रोफेसर

म्हणतात, हें मागाहून समजलें.—त्यामुळें गोवें प्रांतांतील लोकांस तरी निदान माझी खरी (?) योग्यता कळल्यावद्दल माझें त्यांच्यावद्दल फार चांगलें मत झालें होतें. मला सुद्धां तुम्हांस पाहून फार आनंद होत आहे. त्यांनीं दिलेल्या औषधावद्दल त्यांचे आभार मानून पोष्टांत गेलों. पत्रें वगैरे मिळालीं. दुसऱ्या दिवशीं ता. १।६।३० रोजीं **चमोली** सोडली.

डोंगराच्या एका वाजूनें व **अलकनंदेच्या** कांठावरून सुमारें दोन मैल सपाट रस्ता चालल्यानंतर

**मठचट्टी** आली.

उतरण्यास फार सोइस्कर असें ठिकाण असून जवळच केळींचे वाग आहेत, इतरही बरीच झाडी आहे. परंतु दोन मैलांवरच थांबावयाचें नसल्यामुळें पुढें चालूं लागलों. येथून पांच मैलांवर **सिय्यासैण** नांवाची चट्टी आहे, तींवर मुक्काम करण्याचें ठरविलें. कारण एक पहाडी म्हणाला " **सिय्यासैण** तो वडा शेर है. "—मोठें शहर आहे—अर्थात् शहरांत कांहीं वेळ तरी थांवणें उक्त होतें. परंतु जाऊन पाहातों, तों इतर गावांत सर्व घरें एक मजलीच असतात, तर येथें दोन घरें दोन-मजली होतीं व वाकीचीं ४।५ एक मजलीच होतीं. मात्र एका दुकानांत कांहीं औषधें वगैरे मिळत असून शिवाय तयार चहाही मिळत होता; परंतु एवढ्याकरितांच ह्या शहरांत थांवावें असें न वाटल्यामुळें पुढें चालूं लागलों. तेथून तीन मैलांवरील पिपलकोटीस मुक्काम टाकला.

## पिपलकोटी,

**पिपलकोटी** हें मात्र एक लहानसें शहर असावें असा भास होतो. येथें सर्व प्रकारची स्टेशनरी, औषधें—देशी व इंग्रजी—भाजी, कापड वगैरे जिनसांचीं दुकानें आहेत. आमच्या वरोवरचे जे जे जिन्नस संपले होते ते ते सर्व आम्ही येथें भरून घेतले. भाजीवाजारांतून सिताफळ–तांवडा भोपळा–खरेदी करून आणिलें. त्यामुळें थोडा आराम वाटला. येथें चावणाऱ्या माशांचा उपद्रव फार होता. हिमालयांत प्रवास करितांना माशा फार त्रास देतात; परंतु ह्या ठिकाणीं त्यांचें प्रमाण अतिशय वाढलें होतें, म्हणून स्वयंपाकाचीं भांडीं एकसारखीं झाकून ठेवावीं लागत. जेवतांना एका हातास माशा हाकलण्याचें काम सारखें करावें लागत होतें. दूर डोंगरावरून पाणी वांधून त्याचा नळ येथें आणिला असल्यामुळें पाण्याची सोय साधारण वरी होती. अलकनंदा नदी सुमारें अर्धा मैल खोलविरून वाहात होती. डोंगरावरून आणिलेलें पाणी असावें तितकें गार नसतें. दिवस उन्हाळ्याचे असल्यामुळें थंडगार पाण्याची

आवश्यकता भासत होती. म्हणून यात्रेकरूंची गैरसोय जाणून एका धर्मात्म्यानें अलकनंदेचें थंडगार पाणी लोकांस मिळण्याकरितां पाणपोई घातली होती. अर्थात् तिचा उपयोग आम्हीं करून घेतला. भोजनोत्तर विश्रांति घेऊन पुढें चालण्यास सुरवात केली. **चमोली**पासून निर्वृक्ष प्रदेशास सुरवात झाली होती, ती अद्याप कायमच होती. डाव्या हातास खोल दरीतून अलकनंदा नदी वाहात असून पलीकडच्या डोंगरावर सारखीं उतरतीं शेतें दृष्टीस पडत होतीं. तीं शेतें नांगरणाऱ्या शेतकऱ्यांकडे व बैलांकडे पाहून मोठें आश्चर्य वाटत होतें. कारण जर एकाद्याचा पाय थोडा घसरला तर त्याचें नखही दृष्टीस पडावयाचें नाहीं.

**पिपलकोटी**जवळ साधारण दोन तीन फर्लांग डोंगर सपाटी आहे. पुढें मात्र चार मैलपर्यंत सपाट प्रदेश नाहीं व वाटेंत चट्टीही नाहीं. संध्याकाळीं ४॥ वाजतां **गरुडगंगा**चट्टीवर येऊन पोहोंचलों. वा. का. क. वाल्यांच्या धर्मशाळेंत मुक्काम टाकला. पुढील चट्टी आणखी तीनच मैलांवर होती. परंतु पावसाचीं चिन्हें दिसूं लागल्यामुळें पुढें गेलों नाहीं.

## गरुडगंगा.

येथें नदीच्या कांठावर एक गरुडाचें देऊळ असून तीर्थांत स्नान करण्याचा विधि सांगितला आहे. मला वाटतें ठिकठिकाणीं तीर्थांची व स्नानाची योजना थंडीच्या त्रासास्तव यात्रेकरू स्नान चुकवून अमंगळ होतील म्हणूनच केली असावी. गरुडगंगेंतील **दगड गरुड** म्हणून घरीं आणण्याची पद्धत आहे. गरुडाचें दर्शन घेतल्यानें पुढें एक वर्षपर्यंत सर्पदंशापासून मनुष्य बचावतो अशीहि कल्पना आहे. येथें पुरी, भाजी, दूध वगैरे खाद्यपदार्थ मिळण्याची सोय चांगली आहे. ता. २।६।३० रोजीं गरुडगंगा सोडून चालण्यास सुरवात केली.

**गरुडगंगे**पासून सुमारें अर्धा मैल गेल्यानंतर थोडे थोडे झाडी असलेले डोंगर आढळण्यास सुरवात झाली. सुमारें २। मैलांवर **गंगणी चट्टी** लागली. येथें पाण्याचें फार दुर्भिक्ष आहे. मात्र कळकाच्या लहानलहान टोपल्या तयार करणाऱ्या घुरडांची येथें वस्ती आहे. त्यांजकडून गंगेच्या कुप्या ठेवण्याकरितां पुष्कळ यात्रेकरूंनीं बुरड्या विकत घेतल्या. येथून दोनच मैलावर **पाताळगंगेचें** दर्शन झालें. नदीचें पाणी साधारण हिरवट रंगाचें असून पात्रांत शुभ्र पांढरे गोटे सर्वत्र पसरले होते. लक्षावधि गांवचें पाणी प्याल्याचा पुरावा आतांपर्यंत मजपाशीं होता व त्याच्या जोरावर मी अमुक इतक्या गांवचें पाणी प्यालों आहे, अर्थात् मलाच जास्त कळतें असें म्हणून वादांत दुसऱ्यास चीत करण्याचा प्रयत्न करीत असे. आतां **भूवैकुंठ**

जो **बदरीनाथ** त्यास जावयास निघालोंच होतों तो काय **पाताळगंगेचें** पाणी चाखल्याशिवाय पुढें जातो? तें पाणी पिऊन तिन्ही लोकींचें पाणी प्यालेल्या **नारदाशीं** बरोबरी करण्याकरितां सपाट्यानें निघालों. वाटेंत एका सापानें दर्शन दिलें; परंतु माझ्यासारख्या गरूडगंगेचें पाणी प्यालेल्या पुण्यपुरुषावर चाल करून जाण्याचें धाडस त्याच्यानें करवलें नाहीं. **पाताळगंगे**पासून दोन मैल प्रवास करून **गुलाब कोटी** चट्टीवर येऊन दाखल झालों.

## गुलाब कोटी.

**गढवाल**च्या राजाच्या वंशांतील **गुलाबसिंग** नांवाच्या एका पुरुषानें ह्या



**श्रीविश्वनाथ मंदीर बाराहाट.**

ठिकाणीं एक सुंदर लक्ष्मीनारायणाचें मंदीर बांधलें आहे. त्याच्या नांवावरून ह्या ठिकाणास **गुलाब कोटी** असें नांव पडलें आहे. येथें एक डाक बंगला असून कुली एजन्सीची शाखाहि येथें आहे. येथें थोडी विश्रांति घेऊन चालण्यास सुरवात केली. बराच वेळ अगदीं निर्जन व निर्वृक्ष प्रदेशांतून प्रवास करून **झडकुला** चट्टीवर येऊन दाखल झालों, तोंच पिवळी जर्द गव्हाचीं शेतें जिकडेतिकडे हालतांना दिसूं लागलीं. मधूनमधून डोंगरावर झाडीहि दिसूं लागली होती. एका झाडाखालीं विसावा घेत बसलों असतां एक शेतकरी समोरून आला. विडी दिल्यामुळें लगेंच ओळख झाली. तो म्हणाला " सावकारचें ५० रु. कर्ज लग्नाकरितां काढिलें होतें

तर सावकारानें ३०० रुपयांची फिर्याद करून घरांतील भांडीकुंडीं जप्त करून नेलीं. मालकीची थोडी जमीन होती तीहि गेली. आतां दुसऱ्याच्या शेतावर मजुरी करून मोठ्या कष्टानें दिवस काढीत आहे. अगदीं लहान असतांना **कोटद्वारला** गेलों होतों. तेव्हां एकदां आगगाडी पाहिली होती. आतां दिवसभर काम करूनहि पोटभर अन्न मिळत नाहीं, पांघरण्यास पुरेसें वस्त्र नाहीं म्हणून कित्येक वर्षांत हें गांव सोडून बाहेर गेलों नाहीं. **महात्मा गांधी** आमच्यासारख्या गरीब शेतकऱ्याकरितां कष्ट करीत आहेत असें ऐकितों; तेव्हां त्यांना त्यांच्या कार्यांत यश यावें अशी प्रार्थना परमेश्वरास रोज करीत असतो. " त्याचा निरोप घेऊन निघालों. कांहीं वेळानें एका व्हिलेज पोष्टमनाची गांठ पडली. तो म्हणाला " आज १२ वर्षें नौकरी करीत आहे. अवघा २० रु. पगार मिळतो. ह्या डोंगरावरून त्या डोंगरावर पत्रें वाटण्यास जावें लागतें. कोठें कणीक १० आणे शेर मिळते, तर कोठें १२ आणे शेर मिळते काय करावें ? " परंतु काय करावें हें मी तरी त्यांस काय सांगणार? ऐकून फार वाईट वाटलें व रस्ता चालण्यास सुरवात केली व वस्तीस **जोशीमठास** येऊन पोहोंचलों.

## जोशीमठ.

हें एक मोठें गांव समुद्रसपाटीपासून सहा हजार फूट उंचीवर **गंधमादन** पर्वतावर वसलें आहे. थंडीच्या दिवसांत साधारणपणें ह्या ठिकाणाच्या पुढें वस्ती नसते. येथून कैलासपर्वताचें शिखर दिसतें. येथून कैलास मानससरोवराकडे रस्ता जातो. अंतर सुमारें १२५ मैल आहे. त्यामुळें **तिबेटांतील** शिलाजीत, चवरगाईचे केस, कातडीं निरनिराळ्या वनस्पति, मणी वगैरे सर्व वस्तु येथें मिळतात. गांव सुमारें २०० घरांचें आहे. पोष्ट व तार ऑफिस, पोलिस हेडक्वार्टर्स, दवाखाना, इत्यादि सर्व गोष्टी ह्या ठिकाणीं आहेत. शंकराचार्यांच्या **हिंदुस्थानांतील** चार मठांपैकीं एक मठ येथें आहे. गादीचे मालक **बद्रीनाथाचे** पुजारी **रावळसाहेब** हेच आहेत. ह्यांचा मुक्काम यात्रेच्या दिवसांत सहा महिने बदरिकाश्रमीं असतो व सहा महिने येथें असतो. **शारदांबेचें** देऊळही येथें आहे. परंतु **शंकराचार्य** नाहींत. आद्य शंकराचार्यांनीं येथें मठ स्थापन करून शिष्य गादीवर बसविला. कांहीं दिवस ही शिष्यपरंपरा चालली होती; परंतु गादीवरील एक शंकराचार्य शिष्यविरहित मरण पावले. अर्थात् ती गादी अनधिकारी लोकांच्या हातांत गेली. बऱ्याच भानगडी पुढें होऊन दण्डीस्वामी नांवाच्या एका विरक्त पुरुषाच्या हातांत ती गादी पुन्हां आली व त्यांस रावळ ही पदवी **गढवालच्या** राजा-

करून मिळाली. परंतु कांहीं दिवसांनीं गढवालचेंच राज्य नेपाळी लोकांनीं जिंकून घेतल्यामुळें रावळ लोक स्वतंत्र झाले. पुढें तो प्रांत इंग्रजांकडे आला. इंग्रजांचें धोरण धर्मांत हात न घालण्याचें असल्यामुळें रावळांस चांगलेंच फावलें. लक्षावधी रुपये हाताशीं असल्यामुळें व कोणी विचारणारा नसल्यामुळें ते जर स्वेच्छाचारी न बनते तरच आश्चर्य. प्रथम त्यांच्या चाहात्यांनीं त्यांस इतर दानाबरोबर आपल्या मुली अर्पण करण्यास सुरवात केली. अर्थात्‌च त्या मुलींचा योग्य तो परामर्ष घेणें रावळ-साहेबांस भागच पडलें. पुढें पुढें ते राजरोसपणें स्त्रिया बाळगूं लागले. सध्यां येथें रावळसाहेबांचे मोठमोठे वाडे असून त्यांत अनेक स्त्रियांसमवेत त्यांचे विलास चाल-तात. **बद्रीनाथास** मी स्वतः रावळसाहेबांची दीड तास मुलाखत घेतली. तिची हकीकत यथावकाश वाचकांस सांगेनच.

येथें शंकराचार्यांच्या खटपटीनें बरीच गावें मठाकडे होतीं व त्यांचे उत्पन्नांतून गरीब यात्रेकरूंचा परामर्ष घेतला जावा, अशी त्यांची इच्छा होती. परंतु रावळसाहे बांनीं त्या गावांचे उत्पन्नांतून आपल्याच आप्तेष्टांस पोसण्यास सुरवात केली. गरीब यात्रेकरूंचे येथें होणारे हाल पाहून **अहमदाबाद** येथील दानशूर **श्री. गोविंद शंकर वेर्ना महाशय** यांनीं बाबा कालाकमलीवाल्यांच्या मार्फतीनें येथें एक मोठी धर्मशाळा बांधून सदावर्ताची सोय केली आहे. त्याच धर्मशाळेंत आम्हीं मुक्काम टाकिला. गावांत **श्रीनृसिंह वासुदेव, श्री दुर्गा** यांचीं देवळें आहेत. तीं पाहून आलों. **कैलासकीर्ति-आश्रम** नांवाचें एक पुस्तकाचें दुकानही आहे. मालकांनीं **संपूर्ण भारततीर्थ**यात्रा नांवाचें पुस्तक लिहिलें आहे तें माहिती-करितां घेऊन ठेवलें. मालक म्हणाले, " तुम्हांस इकडील कांहीं जिन्नस लागल्यास मला कळवा; पाठवीन. " त्याबद्दल त्यांचे आभार मानून निरोप घेतला. ता. ३-६-३० रोजीं सकाळीं **जोशीमठ** सोडलें सारखी उतारास सुरवात झाली. दोन मैल उत-रल्यानंतर अत्यंत वेगानें वाहाणाऱ्या **विष्णुगंगेच्या** पुलावर येऊन दाखल झालों. **विष्णुगंगेचें** पाणी इतकें जोरानें वाहात असतें कीं यात्रेकरूनें पुलावरून जातांना पाण्याकडे पाहूं नये. नाहींतर तो घेरीं येऊन खालीं पडावयाचा, म्हणून पूल पार झाल्यावर पाण्याकडे पाहावें. ह्याच ठिकाणीं **विष्णुगंगा** व **अलकनंदा** ह्यांचा संगम झाला असल्यामुळें ह्या ठिकाणास **विष्णुप्रयाग** हें नांव पडलें आहे. येथून बद्रीनाथपर्यंत **अलकनंदेच्या** दोन्ही कांठावर असलेल्या दोन डोंगरांच्या कडे-कडेनें रस्ता जातो. कधीं ह्या डोंगरावरून तर कधीं त्या डोंगरावरून. त्या डोंगरांस नर व नारायण अशीं नांवें आहेत. विष्णुप्रयागपुढें एक मैलपर्यंत रस्ता अत्यंत खराब

धोंड्यांनीं भरलेला आहे. क्वचित् ठिकाणीं रुंदी कमी होतां होतां एक फुटापर्यंतही आली आहे. पुढें रस्ता गर्द झाडींतून आहे. मधल्या चट्टीस **घाटचट्टी** म्हणतात. ती सोडून **पांडुकेश्वरी** मुक्कामास येऊन पोहोंचलों.

## पांडुकेश्वर.

द्वापारयुगांत **पण्डुराजानें** ह्या ठिकाणीं शिकार करतांना मृगरूपानें आपल्या स्त्रीशीं क्रीडा करणाऱ्या एका ऋषीस बाणांनीं घायाळ केलें. तेंव्हां त्या ऋषीनें त्यास शाप दिला कीं तूं आपल्या स्त्रीशीं विहार करशील तर तात्काळ मरण पावशील. तेंव्हां पण्डूनें येथें तपश्चर्या केली.

भगवान् विष्णूनें प्रसन्न होऊन त्यास वर दिला कीं तुझ्या बायकोस सूर्य, वायू, इंद्र इत्यादिकांकडून पुत्रप्राप्ती होईल. तुला निःसंतानावस्थेंत मृत्यू येणार नाहीं. त्यावेळीं ह्या ठिकाणीं विष्णूच्या मंदिराची स्थापना झाली आहे. व ह्या ठिकाणास **ध्यानबद्री** हें नांव प्राप्त झालें आहे. विष्णूच्या देवळांत प्राचीन काळचे ५।६ ताम्रपट आहेत. त्यांवर ह्या देवळास कोणकोणते गांव इनाम आहेत, हें लिहिलें आहे म्हणतात. पाण्डवांनीं स्वर्गारोहणाच्या वेळीं ह्या ठिकाणीं कांहीं दिवस वस्ती केली होती. गांव साधारण ३०।४० घरांचें आहे. सुमारें दीडशें वर्षांपूर्वीपर्यंत हिवाळ्याच्या दिवसांत **बद्रीनाथांच्या** मूर्ती येथें आणून त्यांची पूजा होत असे. परंतु चैनीस सवकलेल्या पुजाऱ्यांस येथें राहाणें न परवडल्यामुळें त्यांनीं आपलें ठाणें **जोशीमठास** नेलें. आणखी कांहीं दिवस असेच—त्या पुजाऱ्यांच्या वर्तनाची चवकशी केल्याशिवाय गेल्यास—ते पुजारी मूर्ती घेऊन **हरिद्वारला** आल्याशिवाय राहाणार नाहींत. कारण तें रेल्वेस्टेशन असल्यामुळें चैन करण्याच्या अनेक सोयी तेथें आहेत. बाबा. का. क. वाल्यांची धर्मशाळा येथें आहे. त्या ठिकाणीं नांवगांव पत्ता देऊन गरीब यात्रेकरूंस पुढील प्रवासांत पांघरण्याकरितां ब्लँकेटें उधार मिळतात व तीं येतांना परत करावयाचीं असतात. भोजनोत्तर **पण्डुकेश्वर** सोडून चालूं लागलों. सुमारें अर्ध्या मैलावर **शेषधारा** नांवाचा वैष्णव लोकांचा आश्रम लागला. पुढें रस्ता साधारणपणें सपाटच अलकनंदेच्या कांठाकांठानें गेला आहे. **अलकनंदा** उजव्या हातास असून डाव्या हातास, सुंदर लहानलहान झाडांनीं भरलेले डोंगर लागतात. येथूनच प्रथम रस्त्यावर पडलेल्या बर्फावरून प्रवास करावा लागतो. मैलांत सुमारें अर्ध्या फर्लांगापेक्षां जास्त बर्फ नसतें. **पण्डुकेश्वर**पासून तीन मैलावरील **लामबगड** ह्या चट्टीवर संध्याकाळीं चार च्या सुमारास आलों. तेथेंही बाबा का. क. वाल्यांची धर्मशाळा आहे. व तींत **पंडुकेश्वराप्रमाणें**

गरिबांस पांघरुणें मिळण्याची व्यवस्था आहे. परंतु गांव फार लहान आहे मात्र जवळपासचे डोंगर आकाशाशीं स्पर्धा करण्याइतके उंच आहेत. त्या डोंगरांकडे पाहून मनुष्य थक्कच होऊन जातो. पावसाचीं चिन्हें नसल्यामुळें चालूं लागलों सुमारें दोन मैलांवर कैलासपर्वतावरून येणाऱ्या **ऋषिगंगा** नांवाच्या नदीचा व **अलकनंदेचा** संगम आहे. तेव्हां **कैलासपर्वतावर** जाण्याचा योग येईल तेव्हां येवो, परंतु तेथील पाण्याची तरी चव घ्यावी म्हणून जलपान करून पुढें चाललों. डोंगर जवळजवळ निर्वृक्ष दिसूं लागले. कारण बर्फाची सीमा जवळ येत चालली. रस्ता अगदीं खडकाळ व त्रासाचा सुरूं झाला. डाव्या उजव्या हातास समोर सर्वत्र बर्फाच्छादित डोंगर व त्यांच्या पलीकडे दाट धुकें ह्याशिवाय कांहीं दिसेनासें झालें. तेव्हां ह्या धुक्यांत खरो-खरच मनुष्यवस्ती असेल कां, अशी शंका मनास येऊं लागली. तोंच दूर अंतरावर डोंगराच्या पायथ्याशीं **हनुमान चट्टीचें** दर्शन झालें, चट्टीच्या अलीकडे सुमारें २ फर्लांगावर एका डोंगराच्या कडेकडेनें चाललों असतां लहानलहान दगड डोक्यावर कोणीकडून तरी येऊं लागले. तेव्हां माकडेंच कदाचित् दगड मारीत असतील अशी कल्पना केली. कारण चट्टीचें नांव **हनुमानचट्टी** होतें. परंतु पाहातों तों हिरव्या-गार डोंगरावर मेंढ्या चरत होत्या व त्या इकडून तिकडे फिरत असतांना त्यांच्या पायाच्या धक्क्यानें सुटलेले दगड यात्रेकरूंच्या डोक्याकडे गुरुत्वाकर्षणाच्या नियमा-प्रमाणें ओढले जात होते म्हणून जपून चालण्यास सुरवात केली. व सायंकाळीं ५॥ च्या सुमारास **हनुमानचट्टीवर** येऊन दाखल झालों.

## हनुमानचट्टी.

सुमारें १५ घरांची लहानशी चट्टी आहे. याठिकाणीं हनुमानाचें देऊळ आहे. **भीमसेनास** एकदां आपल्या शक्तीचा गर्व झाला होता. तो **अलकापुरीस** जात असतांना मध्यें आपलें पुच्छ टाकून हनुमानानें त्यास अडविलें, तेव्हां भीमानें तें पुच्छ दूर करण्याचा प्रयत्न केला; परंतु तो यशस्वी झाला नाहीं, तेव्हां त्यानें हनुमानाची प्रार्थना केली; व मग त्यानें रस्ता दिला, अशी पुराणांतरीं कथा आहे. त्यावरून ह्या चट्टीस **हनु-मानचट्टी** नांव पडलें आहे. पुढील प्रवास तापदायक असल्यामुळें मारुतीसारख्या शक्तिदेवाची कृपा जरूर पाहिजे. अर्थात् यात्रेकरू येथें थांबून हनुमानाची कृपा संपादन करून पुढें जातात. आम्हींही येथें मुक्काम टाकला. थंडी फार वाजत होती. मोठ्या कष्टानें कमी 'वाऱ्याची-निवाऱ्याची नव्हे—एक खोली मिळविली. झगरीशीं शेंकत कशी-बशी रात्र काढली. येथें **महावीर शिलाजीत कारखाना मु. बागेश्वर जि. अलमोडा** यांनीं येथें एक शिलाजीत विक्रीचें दुकान उघडलें आहे. त्या दुकानाचे

मॅनेजर **श्री० मनोहरलाल साह** यांची मुलाखत घेतली. ते म्हणाले, " आमच्या कारखान्यांत शुद्ध शिलाजीत मिळतें. शिलाजीत खरें कीं खोटें हें **शारंगधर** संहितेंत ११ व्या अध्यायांत ९५ ते ९७ श्लोकांत सांगितलें आहे, तरी तसें तपासून आमच्याकडून शिलाजीत घ्या. येथें आमचे दुकानाची शाखा यात्रेचे सहा महिने असते. शिलाजीत फार गुणकारी आहे. तुम्ही महाराष्ट्रांत त्याचा खप करा. मी तुम्हांस फुकट कैलासच्या यात्रेस नेऊन आणीन. आमच्या **बागेश्वरा**वरून पुष्कळ लोक कैलासला जातात. खाण्यापिण्याची काळजी करूं नका. संस्कृतमध्यें वचनच आहे.—

" **अन्नं ब्रह्मा रसो विष्णुः**
**भोक्ता देवो महेश्वरः।**
**एवं ध्यात्वा च ये भुक्ता :**
**अन्नदोषो न विद्यते** ॥ "

मी त्यांस सवडीनें त्यांच्या म्हणण्याचा विचार करण्याचें आश्वासन दिलें. त्यांच्या दुकानांत—

| | |
|---|---|
| कस्तुरी मृगाचें कातडें | ३ रु० |
| चवर गाईचें ,, | ५ ते १० रु० |
| व्याघ्रांबर | १० ते १२५ रु० |
| कस्तुरी | ३० रु० तोळा. |

ह्याप्रमाणें जिन्नस मिळत होते. त्यांच्या मदतीबद्दल त्यांचे आभार मानून चालण्यास सुरवात केली. पुढें आतां मात्र **बदरीनाथाच्या** यात्रेच्या कठीण प्रवासास सुरवात झाली. येथून सारखी चढावासच सुरवात होते. रस्ता **केदारनाथाइतका** कठीण नाहीं. परंतु लांबीला जास्त आहे. डाव्या हातास **अलकनंदा** पूर्ण वर्फानें भरलेली वहात असून उजव्या हाताच्या डोंगराच्या कडेकडेनें रस्ता गेला आहे. ह्या रस्त्यावर **केदारनाथा**पेक्षां जास्त रहदारी असते. कारण बदरीनाथास निदान तीन रात्रीं तरी वास करावा असें शास्त्र आहे. अर्थात् बरेच यात्रेकरू येथें राहातात. वरती झाडी अगदीं नसल्यामुळें लाकडाचे भारे डोक्यावर घेऊन बायकांचे तांडेच्या तांडे वरतीं चाललेले दृष्टीस पडतात. थंड प्रदेशांत राहात असल्यामुळें गौरवर्ण प्राप्त झालेल्या व भरपूर कष्टामुळें पूर्ण निरोगी बनलेल्या त्या गुलाबी गालांच्या पहाडी स्त्रियांस पाहून, कोणत्याही प्रकारच्या शारीरिक कष्टास पारख्या झालेल्या व मोटारींतूनच फिरण्यांत भूषण मानणाऱ्या, पालींसारख्या पांढऱ्या पडलेल्या मुंबईंतील श्रीमंतांच्या बायकांस इकडे आणून खरें सौंदर्य कसें असतें व तें कसें टिकवावें लागते, हें दाखविण्याचीइच्छा

उत्पन्न झाली. परंतु ह्यामुळें रोग्यांस खोटा सल्ला देऊन त्याच्या घशांत औषधें ओतणाऱ्या डाक्टरांच्या पोटावर पाय येईल व ते मजला ह्या कामांत विरोध करतील अशी भीतिही पण उत्पन्न झाली, तेव्हां ह्या यमराजसहोदरांच्या प्रतिकारास कसें काय तोंड द्यावे, ह्याचा विचार करीत चालूं लागलों. मधूनमधून बर्फप्रदेश येऊं लागले. माझ्या ठरावाप्रमाणें पहाडी लोकाचें सहाय्य घेत घेत, मोठ्या कष्टानें सुमारें ९ वाजतां **बद्रीनाथ** येथील पण्डे. श्री. **रामभरोसे मोतिलाल** ह्यांच्या घरीं मुक्काम टाकला.

## भूलोकींचें वैकुंठ बदरीनाथ.

**बद्रीसदृशम् तीर्थम्** ॥
**न भूतम् न भविष्यति** ॥ १ ॥

अशा तऱ्हेच्या पवित्र ठिकाणीं येऊन दाखल झाल्याबद्दल मनास अतिशय आनंद झाला. आल्यावरोवर पहिलें काम बाजारांतून लाकडें आणून चहा तयार करण्याचें म्हणून प्रथम लाकडें व दूध ह्यांच्या तपासास गेलों. **बद्रीनाथला** हिवाळ्यांत १० ते १५ फूट उंचीचे बर्फाचे थर पडत असल्यामुळें जवळपास सहा सात मैलांत एकही झाड नाहीं म्हणून लाकडें फार लांबून डोक्यावर आणून विकावीं लागतात. अतिशय थंडीमुळें लाकडांची जरूरी फार असते म्हणून तीन दिवसांच्या बेगमीचीं लाकडें खरेदी केलीं त्यांस १२ आणे किंमत पडली. परंतु जगण्याचा प्रश्न महत्त्वाचा असल्यामुळें तितकीही किंमत दिली. दूध सकाळीं मिळालेंच नाहीं संध्याकाळीं एक रुपाया शेराप्रमाणें मिळेल असें दुकानदारानें सांगितलें. कारण तेंही आठ मैलावरून डोंगरावर चढवून आणावें लागतें. म्हणून विनदुधाचा चहा पिऊन बाहेर पडलों. थंडी अतिशय वाजत होती. चार सदरे, गरम जाकीट, गरम ओव्हरकोट, हातमोजे–पायमोजे, गरमटोप्या, इत्यादि कपडे आंगावर चढविले होते तरी ब्लँकेट आंगावर घेण्याइतकी थंडी शिल्लकच होती. प्रथम बाजारांत गेलों. कारण, " आधीं पोटोबा व मग विठोबा. " तेव्हां जिन्नस कोणते मिळतात, स्वयंपाक न करितां काम भागेल किंवा नाहीं, वगैरे गोष्टी मलाच पाहावयाच्या होत्या. कारण पाकाध्यक्ष मीच होतों. बदरीनाथास वस्ती सुमारें शंभर सवाशें घरांची आहे. त्यांत दहापंधरा धर्मशाळा, अन्नछत्रें, सदावर्तें वगैरे, सुमारें पन्नास पंड्यांचीं घरें व पन्नास दुकानें असा साधारण हिशेब आहे. अर्थात् बाजार बराच मोठा होता. हलवायांचीं, आठ दहा दुकानें होतीं. तुपांतील पुरी दहा आणे शेराप्रमाणें मिळत होती म्हणून स्वयंपाकाचा प्रश्न बराचसा सुटला होता. गरीब लोकांकरितां बिनतुपाच्या पोळ्याहीं



श्रीकेदारनाथांचें मंदीर.

सहा आणे शेर भावानें मिळत होत्या. एक चहाचें दुकानही आढळलें. सर्व बाजारांत मला तें दुकान फार आवडलें कारण थंडीनें जीव बेजार झाल्यानंतर मजला पाय त्या दुकानाकडे विन तक्रार ओढून नेत होते. प्रथम फराळ उरकून व चहाचा दुसरा हप्ता पुरा करून मग देवळाच्या चवकशीस लागलों.

## श्री बदरीनाथाचें देऊळ.

हें देऊळ चांगलें चुन्यानें बांधलेलें आहे. सभोंवतीं सुमारें अडीचशें फूट लांबीरुंदीचा कोट असून मध्यंतरीं देऊळ आहे. देवळास मोठा सभामंडप असून आंतील बाजूस काळोखानें भरलेला देवाचा गाभारा आहे. गाभाऱ्यांत, **श्रीबदरीनाथ, नारद, नर, नारायण, कुबेर, गरुड, उद्धव** इत्यादि बऱ्याच मूर्ति दिसल्या. गर्दी फार असल्यामुळें सूक्ष्म अवलोकन करतां आलें नाहीं. मात्र सर्व यात्रेकरूंस उत्तम तऱ्हेनें दर्शन करितां येईल, अशी कांहीं व्यवस्था देवळाच्या व्यवस्थापकांनीं केल्याचें आढळून आलें नाहीं. आंतील भागांत जर चांगल्या उजेडाचे दोन चार दिवे ठेवले असते, तर यात्रेकरूंस दर्शन चांगलें झालें असतें. परंतु देवापुढचा शक्य तितका जास्त पैसा स्वतःच्या चैनीकडे खर्च करण्याची चटक लागलेले देवस्थानांचे व्यवस्थापक इतका त्रास काय म्हणून घेतील. सर्वच देवस्थानांच्या ट्रस्टींच्या कारभाराची चवकशी करून त्यांजवर नियंत्रण ठेवणाऱ्या एकाद्या मंडळाची फार आवश्यकता सध्यां उत्पन्न झाली आहे. हें मंडळ **हिंदुमहासभेनें** नेमावें व त्या मंडळानें चवकशी करून काम समाधानकारक आहे असा दाखला दिल्यानंतरच त्या ट्रस्टींच्या हातांत लोकांनीं आपला पैसा द्यावा. असो. मोठ्या जिकिरीनें देवाचें कसेंबसें दर्शन घेऊन परतलों. तों **गरम पाण्याच्या** कुंडावर आलों. बदरीनाथास तीन दिवस वस्ती करणें ह्या गरमपाण्याच्या कुंडामुळेंच शक्य झालें आहे. कांहीं वेळ भटकल्यानंतर थंडीनें जीव बेजार होई. मग मी कुंडावर येत असे. येथें आसपासचें सर्व वातावरण गरम असल्यामुळें थंडी साफ नाहींशी होई. कांहीं वेळ येथें काढून पुन्हां भटकण्यास जात असे.

## गरमपाण्याचें कुंड.


देवळाच्या पायथ्याशीं एक मोठा सुमारें दोन फूट रुंदीचा व अर्धा फूट खोलीचा गरम पाण्याचा झरा आहे. त्याचें पाणी जोरानें सारखें वहात असतें. तें पाणी हातास चटका बसण्याइतकें कढत असतें. त्या पाण्याचा प्रवाह दूरवर लांब बांधून नेला आहे व त्या प्रवाहास मधूनमधून लहान लहान फाटेही फोडले आहेत. कांहीं फाट्यांनीं कुंडाजवळ असलेल्या पुजाऱ्यांच्या घरांत पाणी खेळविलें आहे. त्यामुळें त्यांच्या घरांतील हवा आंगांत कांहींही कपडे न घालतां बसतां येईल इतकी गरम

झालेली असते. त्यामुळें त्यांस थंड प्रदेशांत राहून उष्ण प्रदेशांत राहिल्याचें सौख्य उपभोगितां येतें. एके ठिकाणीं दोन मोठे नळ बसवून त्यांनीं सुमारें तीन फूट खोलीच्या एका कुंडांत पाणी सोडलें आहे. व नळांस दोन दट्टेही बसविले आहेत. कुंड भरल्यानंतर दट्टे बंद करितात. प्रथम पाणी आंगावर घेणें शक्य नसतें परंतु कांहीं वेळानें तें बाहेरच्या थंड हवेनें आंगावर घेण्याइतपत थंड होतें. मग लोक त्यांत स्नान करितात. पाणी फार थंड होऊं लागल्यास पुन्हा दट्टे सोडतात म्हणजे ते गरम होतें. असा कार्यक्रम सारखा चाललेला असतो. बरेच दिवस चालल्यामुळें शीण आला होता. कपडे धुण्याची व स्नानाचीही वाटेंत चांगलीशी सोय नव्हती. ह्या सर्व गैरसोई येथें दूर झाल्यामुळें बदरीनाथाचे तीन दिवस केव्हांच निघून गेले. स्नान वगैरे करून परतलों. नंतर भोजनाचा प्रश्न, बाजारांतून शिरापुरी वगैरे जिन्नस आणून खाल्ले. परंतु भाताशिवाय समाधान होईना. चवकशी अंतीं देवास भाताचा नैवेद्य रोज दाखवितात व मग तो यात्रेकरूंस वाटतात असें समजलें. सुमारें दोन मण तांदुळांचा भात व बरीच आमटी ह्यांचा नैवेद्य रोज देवास दाखवितात व तो यात्रेकरूंस देतात—फुकट नव्हे हो! ज्याचे जितके पैसे तितका त्यास प्रसाद, कमींत कमी एक रुपाया दिल्याखेरीज प्रसाद मिळत नाहीं व एक रुपायासही सुमारें पावशेराचा भात व पावशेर आमटी इतकाच प्रसाद मिळतो. अर्थात् ह्या कामांत पुजाऱ्यास शेंकडा तीनशें ते चारशें टक्के नफा पडतो. म्हणून अगदीं गरीब यात्रेकरू व कुली ह्यांस हा प्रसाद मिळूंच शकत नाहीं. श्रीमंतांस मात्र मिळतो. परंतु इतका भात करावयाचा, ते तांदूळ निवडतो कोण? अर्थात् त्यांत भातकण खडेगोटे वगैरे मिसळलेले असतात. तेव्हां श्रीमंतांस तो खपत नाहीं. मग त्यांनीं टाकून दिल्यानंतर गरिबांच्या वांट्यास थोडा आला तर न कळे. ही प्रसादाची व देवळाची अव्यवस्था पाहून एकदां ह्या बाबतींत **रावळसाहेबांची** समक्ष मुलाखत घ्यावी अशी इच्छा उत्पन्न झाली. म्हणून प्रथम त्यांच्या कचेरीकडे निघालों. वाटेंत **पंडित एम्. डी. तेवारी असिस्टंट मेडिकल् ऑफिसर ऑफ हेल्थ गढवाल** ह्यांची गांठ पडली. सदरहू गृहस्थ प्रवासांत सारखे दिसत होते. ते आपल्याकडून शक्य तितकी काळजी यात्रेकरूंच्या आरोग्याची घेतच असत तेव्हां त्यांजपाशीं मी आरोग्यासंबंधीं थोडी चर्चा केली. ते म्हणाले सरकारांतून मंजूर असलेल्या पैशांत जितकी काळजी मजला घेतां येईल, तितकी मी घेतच आहे. परंतु ह्या गोष्टींचा विचार करणारे यात्रेकरू इकडे येतच नाहींत. त्यामुळें सरकार जादा पैसा खर्च करण्याच्या भानगडींत पडत नाहीं. इतरही बरीच माहिती त्यांनीं दिली. त्यांचे आभार मानून रावळसाहेबांची कचेरी गांठली. तींत पांच सात कारकून आलेल्या पैशांचा



केदारनाथाजवळील मंदाकिनी नदी.

हिशेब करीत बसले होते. त्यांना वाटलें कीं पैसे देणारे गिऱ्हाईक आलें, म्हणून त्यांनीं निरनिराळ्या पूजेकरितां लागणारी छापील यादी मजला दिली. तींत २५० रुपपांसून खालीं पांच रुपयांपर्यंत किती रुपयांत कोणती पूजा होऊं शकेल, ह्याचें वर्णन केलें होतें. व ह्या पैशांची छापील पावतीही देण्यांत येत होती. कांहींही पैसा ऑफिसांत भरला तरी त्याची छापील पावती यात्रेकरूनें घ्यावी, असा सक्त नियम होता कारण मधल्यामध्यें कारकुनानें पैसे खातां कामा नये. यादीच्या शेवटीं साळसूदपणानें टीपही मारली होती कीं, " आमच्याविरुद्ध उगाच खोट्या कंड्या कांहीं लोकांनीं उठविल्या आहेत त्यांवर कोणीं विश्वास ठेवूं नये. " ऑफिसचा थाट



भूवैकुंठपुरी बदरीनाथ.

पाहून **श्री. रावळसाहेबांच्या** मुलाखतीस गेलों. देवळाच्या जवळच एक मोठ्या उत्तम राजवाड्याप्रमाणें बांधलेल्या इमारतींत रावळसाहेब रहातात. दरवाजावर चांदीच्या काठ्या हातांत धारण केलेले चोपदार उभे होते. त्यांची परवानगी घेऊन आंत गेलों. श्री. रावळसाहेब एका मऊ मखमलीच्या गादीवर बसले होते. समोर निखाऱ्यांनीं भरलेली शेगडी होती. सभोंवतीं दर्शनेच्छु यात्रेकरू व रावळसाहेबांची आश्रित मंडळी बसलीं होतीं. रावळसाहेबांचें वय सुमारें चाळीस वर्षांचें असावें. प्रकृती निकोप, तेजःपुंज असून वर्ण गौर होता. आंगांत अस्सल विलायती गरम कापडाचा कोट, जाकीट, ह्यातांत हिऱ्याच्या आंगठ्या, सोन्याचीं सलकडीं

वगैरे थाट पाहून आश्चर्यचकितच झालों. सभोंवतालचा आश्रितवर्ग नाइलाजास्तव त्यांच्या म्हणण्यास माना डोलवीत होता, तर भाविक यात्रेकरू एका महान् पुण्यवान् पुरुषाच्या भाषणाचा लाभ झाल्याच्या आनंदांतच गर्क झाले होते. मनुष्याची **खरी योग्यता** त्यानें किती पैसा, शक्ति अगर संपत्ति, मिळविली आहे ह्यावर अवलंबून नसून तिचा त्यानें लोकोपकारार्थ किती प्रमाणांत उपयोग केला आहे, ह्यावर अवलंबून आहे.

Value of knowledge culminates in its use.
( De. Garms. )


ह्या तत्त्वाचा अभ्यास करणारे सुशिक्षित लोक सुद्धां जर निव्वळ एकाद्यानें विद्या अगर पैसा संपादन केला म्हणून त्यास मान देतात तर भोळ्या यात्रेकरूंनीं रावळसाहेबांस मान कां न द्यावा?

रावळसाहेबांची निवड करण्याचा प्रकार एकच कीं, गादीवर असलेल्या रावळानें त्याच्या पसंतीस पडेल त्या नंबुद्री ( मलबारकडील ) ब्राह्मणाच्या मुलास आपलें शिष्यत्व पत्करावयास सांगून आपल्या पश्चात् आपलें काम त्यांजकडे द्यावयाचें.— त्या जागेकरितां विद्वत्ता वगैरे कांहीं लागत नाहीं. मग ज्याप्रमाणें मूर्ख संस्थानिकांचीं गाढव मुलें, विद्वान् परंतु हांजीहांजीखोर लोकांचें सहाय्य घेऊन राज्यकारभार करितात, तसेंच हे रावळ चार बुभुक्षित विद्वान् पदरीं ठेवून कार्यक्रम पार पाडतात. त्यांची गादी शिष्याकडे जावयाची असल्यामुळें मुलांबाळांची तरतूद त्यांस स्वतंत्रतेनेंच करावी लागते व त्या करितांच छापील पावत्या सोडून आलेल्या पैशांतील पैनपै आपल्या ताब्यांत घेतात व मग कोणाचीहि पर्वा न करितां मन मानेल तसा खर्च करितात.

मी गेल्याबरोबर त्यांस सांगितलें कीं मी तुम्हांस कांहीं खुलासा विचारण्यास आलों आहे. त्यांनीं खुशाल विचारा म्हणून सांगितल्यावर खालीलप्रमाणें प्रश्नोत्तरें झालीं.

**मी**—आपल्याविरुद्ध लोक ओरड करितात असें आपण म्हणतां तर आपण आपलें वर्तन सुधारण्याचा प्रयत्न कां करीत नाहीं? आपण घेतलेल्या पैशांच्या पावत्या देतां; परंतु खर्च केलेल्या पैशांचा हिशेब यात्रेकरूंस पहाण्याकरितां ऑफिसांमध्यें ठेवीत नाहीं किंवा छापून प्रसिद्ध करीत नाहीं, असें कां?

**रावळसाहेब**—आमच्याविरुद्ध आर्यसमाजी व मुसलमान विशेषतः ओरड करितात. आम्ही पैसे मिळवितों, तें त्यांस पहावत नाहीं. आम्ही सर्व हिशेब **टिहरीच्या महाराजांकडे पाठवितों**. कांहीं **हेटो**सारखे विशेष अधिकार **गव्हर्नरादिकांस** जसे असतात, तसेंच आम्हांसहि आहेत. व त्याबरहुकूम आम्ही



गंगानदीवरील पूल भैरवघाटी.

लोकांस हिशेब देत नाहीं. आमच्यावर ज्यांचा विश्वास असेल त्यानें आम्हांस पैसें द्यावे, नसेल त्यानें देऊं नयेत. दिले असल्यास परतहि देण्यास तयार आहें; परंतु हिशेव मात्र कोणास देणार नाहीं.

हिशेब विचारणारा कोणीच नसल्यामुळें त्यांचें ह्या बावतींत चालतें आहे. नंतर मजला एका बावतींत शंका होती ती त्यांस विचारली.

**मी**—माझे वडील हयात आहेत, व मातुश्री नाहींत. तरी मजला ब्रह्मकपालीं पिंडदान करण्याचा अधिकार आहे किंवा कसें ?

**रावळसाहेब**—तुम्हांस ब्रह्मकपालीं पिंडदान करण्याचा अधिकार आहे. परंतु मी जेव्हां शास्त्राधार सांगा म्हणून त्यांस आग्रह केला तेव्हां त्यांना तो सांगतां येईना. मग त्यांनीं आपल्या एका मनुष्याबरोबर त्यांचे आश्रित **पं. पुरुषोत्तमशास्त्री** यांजकडे मजला जाण्यास सांगितलें. अर्थात् विद्याध्ययनाच्या दृष्टीनेंहि ते निरुपयोगींच ठरलें. सरतेशेवटीं त्यांनीं दिलेल्या मुलाखतीबद्दल त्यांचे आभार मानून पुरुषोत्तमशास्त्र्यांकडे गेलों. त्यांनीं गेल्याबरोबर संस्कृतमध्येंच बोलण्यास सुरवात केली. तेव्हां मी असें कां म्हणून विचारलें. ते म्हणाले—

**न पठेत् यावनीम् भाषाम् ।**
**न गच्छेज्जैनमंदिरम् ।**
**न वदेन्निष्ठुराम् वाणीम् ॥**
**प्राणैः कंठगतैरपि ॥ १ ॥**

“बरें हिंदींत भाषण करावें तर तींतहि बरेच यावनी शब्द येतात व अशा पवित्र ठिकाणीं यावनी शब्दांचा उच्चार करणें योग्य नव्हे.” नंतर त्यांनीं मोडकेतोडके बरेंच संस्कृत श्लोक आधारार्थ सांगून “ तुम्हांसहि ब्रह्मकपालीं पिंडदान करण्याचा अधिकार आहे; फक्त मागाहून तुम्हांस तुमच्या ह्या कृत्यांस वडिलांची परवानगी ( Formal sanction ) मिळविली पाहिजे. ” अर्थात् मी त्यांच्या सांगण्यावरून दुसऱ्या दिवशीं सकाळीं पिंडदान करण्याकरितां ब्रह्मकपालीं गेलों.

## ब्रह्मकपाल.

ह्या नांवाचा एक खडक **अलकनंदेच्या** कांठावर गांवापासून सुमारें अर्ध्या मैलावर आहे. श्राद्धास लागणारे भाताचे पिंड-( देवाच्या प्रसादाच्या भाताचे रुपायाच्या आकाराचे ) देवळापाशींच विकत मिळतात. ते घेऊन घाटावर गेलों. तेथें उपाध्ये होतेच. त्यांस थोडक्यांत सर्व विधी उरकण्याचा मानस कळविला. माझा जरी ह्या विधीवर फारसा विश्वास नसला तरी पूर्वजांचा असल्यामुळें जर ते वाट पहात बसले

असतील तर त्यांस शक्य तर स्वर्गांत पाठवून द्यावें म्हणूनच मी ह्या कृत्यास प्रवृत्त झालों. येथें एकदां पितरांस पिंड दिल्यास ते पुन्हां मृत्युलोकांत येत नाहींत असें शास्त्र आहे. येथें इतरहि मृत शत्रुमित्रांस पिंड देतां येतो. फार काय पण आत्मपिंडहि देतां येतो. म्हणूनच ज्यांस पुत्रसंतान नाहीं असे लोक ह्या यात्रेस येतात कारण त्यांस स्वतःची मुक्ती स्वतःच करून घेतां येते. प्रवासाच्या अनेक सुखसोईमुळें सर्व प्रवास सुखानें करणाऱ्या आमच्यासारख्या यात्रेकरूस सुद्धां जर आपण कांहीं तरी फार मोठें काम केल्याचा पोकळ भ्रम उत्पन्न होतो. तर पूर्वकाळीं ब्रह्मकपालापर्यंत मजल गांठणें म्हणजे किती कष्टाचें असेल ह्याची कल्पनाच करवत नाहीं. अर्थात् इतका पायीं प्रवास करणाऱ्या यात्रेकरूंचे पूर्वज **पाण्याचीं पितरें** असूंच शकणार नाहींत! मग ते स्वर्गास न जातील तरच नवल परंतु पूर्वजांच्या पराक्रमांचा आम्हांस पूर्ण विसर पडला आहे व आमच्या अगदीं सामान्य गोष्टींचीच टिमकी आम्ही फार वाजवूं लागलों आहोंत. मागें एकदां सेकंडक्लासांतून सर्व प्रवास आगगाडीनें करून **हरिद्वारला** गेलेल्या **सांगली-करांच्या** घराण्यांतील* मंडळींचा फोटो **मनोरंजनांत** प्रसिद्ध झाला होता. तो पाहून **शूरवीर पटवर्धनांच्या** घराण्यांत आगगाडीच्या प्रवासानेंच मोठें कृतकृत्य केलें असें मानणारीं प्रजा उत्पन्न व्हावी ना? असें विचार मनांत येऊन फार विषाद वाटला. थंडी फार असल्यामुळें श्राद्धाकरितां कपडे वगैरे काढावे लागत नाहींत. उपाध्याहि कपडे घालूनच सर्व विधी करण्यास सांगतो.

**बद्रीनाथाहून** एक रस्ता **मानस सरोवरास** जातो, त्या रस्त्यावर बद्रीनाथापासून सुमारें दोन मैलांवर **भाणाग्राम** नांवाचें गांव आहे, तेथें जाण्याचा विचार होता. परंतु वाटेंत बर्फ फार असल्याचें समजल्यामुळें गेलों नाहीं. बद्रीनाथ हें समुद्र सपाटीपासून ११५०० फूट उंचीवर आहे व वरतीं सुमारें दोन तीन मैलांची सपाटी आहे व तिचा उपयोग शेतीकडे होतो. म्हणून गांवापासून दूर असलेल्या शेतकऱ्यांच्या वस्तींत गेलों. एक शेतकरी कांहीं तरी विणीत बसला होता; तेव्हां चवकशी करीत त्याच्या झोपडींत शिरलों. तो म्हणाला बायको शेतांत कामास गेली आहे. ती नुकतीच **पंडुकेश्वराहून** आली "पंडुकेसर मे तो बहुत गरमी आहे" तेव्हां तेथें कांहीं पादत्राणांची जरूरी नव्हती. परंतु येथें थोडी थंडी असल्यामुळें तिला पायांत घालण्याकरितां पन्यतण तयार करीत आहे." मी नुकताच **पंडुकेश्वराहून** आलों होतों व तेथें तीन ब्लँकेटें घेऊन माझी थंडी राहात नव्हती, तर शेतकरी म्हणतो तेथें फार गरमी—उन्हाळा—आहे. अर्थात् त्या शेतकऱ्यास इकडे पुण्यांत आणल्यास तो भाजूनच निघावयाचा!



हिमालयांतील एक कठीण कडा.

शेतकरी पुढें म्हणाला, “ आम्हीं येथें बटाटे पेरण्याकरितां येतों. यंदा यात्रा कायदेभंगाच्या चळवळीमुळें फार कमी आहे, म्हणून रुपायास सोळा शेर बटाटे आम्हांस विकावें लागत आहेत. यात्रा पुष्कळ आल्यास आम्हांस चांगला फायदा होतो, जसजसें वर्फ वितळतें तसतसें आम्ही बदरीनाथाच्या पुढच्या गांवीं राहाण्यास जातों व बर्फ पडूं लागल्यावर तें गांव सोडून खालीं खालीं उतरतों. माझी सर्व वर्षांत मिळून तीन चार गावांत वस्ती असते. सर्व ठिकाणीं माझीं घरें आहेत. ” बदरीनाथास इतर जिन्नस महाग असल्यामुळें पुष्कळसे गरीब लोक उकडलेल्या बटाट्यांवर राहातात.

तेथून परतलों तों बाजारांत पंडित **महेशानंदशर्मा** यांच्या दुकानांत आलों. दुकानांत **अलाहाबादचा लीडर** येत असल्यामुळें वाचनाची फार चांगली सोय झाली होती. गावांत पोष्ट व तार ऑफिस असल्यामुळें, येऊन पोहोंचलों त्याच दिवशीं **भिवंडीस** रिप्लायपेड तार केली होती व तिच्या उत्तराची अपेक्षा करीत होतों. परंतु उत्तर मिळालेंच नाहीं. त्यामुळें घरच्या खुशालीबद्दल **श्री. नाना** व **श्री. दादा** ह्यांस काळजी उत्पन्न झाली. मजला मात्र दोन्ही मुलगे, मुलगी, बहीण भाऊ, वडील वगैरे सर्वांच्या खुशालीचें बायकोनें पाठविलेलें पत्र मिळालें होतें. मागाहून घरीं परत आल्यानंतर चवकशी लागली कीं तार भिवंडीस जाण्याऐवजीं तार मास्तरच्या चुकीमुळें पंजाबांतील भिवनीस गेली. तार नाहीं म्हणून काळजी करण्यापासून कांहींच फायदा होण्यासारखा नव्हता. रोज ठराविक प्रमाणांत चालूनच घरीं पोहोंचावयास पाहिजे होतें. म्हणून तीन दिवस वास्तव्य करून पंड्याचा निरोप मागितला. पंड्यानें जास्त पैसे काढण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; परंतु तो साध्य झाला नाहीं. **पं. रामभरोसे** ह्यांस कांहीं वर्षें **मुंबईस** काढल्यामुळें चांगलें मराठी बोलतां येतें. त्यांच्याशीं बराच वादविवाद केला. ते म्हणाले, “ आमचे व का. क. वाल्या मंडळींचें पटत नाहीं. ते श्रीमंत यात्रेकरू भेटला कीं त्याजपाशीं गरिबांच्या सोईकरितां धर्मशाळा वगैरे बांधण्यास पैसा मागतात व त्यामुळें आमच्या पोटावर पाय येतो. आम्हांसच यात्रेकरूंनीं शक्य तितके जास्त पैसे देऊन खूष केले पाहिजे, आमचीं घरें बांधून दिलीं पाहिजेत. आम्ही त्या घरांवर यात्रेकरूंच्या नांवाच्या पाट्या मारून ठेवितों व कांहीं घरांवर—

**पागलपूर निवासी**
**लाला मूरख लालने**
**आपकी मा गधंभीके नामने**
**बदरीनाथ निवासी पंडा**

—

**अक्कलशून्य दासकू यह मकान बांधकर दिया है.**

अशा अर्थाच्या पाट्या आढळल्याही ! माझ्या मतें अशा पाट्या मारण्यापेक्षां जर श्रीमंतांस खरोखरच सत्कर्म करून स्वर्गांत जावयाचें असेल—ही आशा व्यर्थच आहे—तर त्यांनीं ठिकठिकाणीं पाट्या मारून त्यांवर—

**१ पंड्यांपासून सावध राहा.**

**२ फुकटखाऊंस पैसे देऊं नका.**

असा मजकूर लिहावा. गरिबांस पांघरण्याकरितां फुकट व मध्यम स्थितींतील लोकांस थोडें भाडें घेऊन व श्रीमंतांस पुष्कळ भाडें घेऊन पांघरुणें पुरवावीं. तसेंच **सॅनिटोरियमस्** बांधावीं. वाटोवाट खाणावळी उघडाव्या. म्हणजे यात्रेकरूंस यात्रा सुखकर होईल. परंतु त्यामुळें श्रीमंतास पुरेसा लौकिक मिळणार नाहीं त्याची वाट काय ? ता. ४।५।६ जून तीन दिवस वास्तव्य करून ता. ७।६।३० रोजीं सकाळीं **बदरीनाथ** सोडलें.

## हिमालयाच्या पायथ्याकडे.

**बदरीनाथाहून** परत येतांना इच्छित कार्य पार पडल्याबद्दलचें मानसिक स्वास्थ्य, घराची ओढ व उतार ह्या त्रिवेणीसंगमामुळें पाय फार जोरांत काम करीत होते म्हणून मुक्कामास **घाटचट्टीवरच** आलों. चट्टी तात्पुरतीच जंगलाच्या मध्यभागीं व नदीच्या अगदीं कांठावर तयार केली असल्यामुळें प्रत्येक दुकानांतील जागा ओलीचिंब होती; परंतु तीवर चटया पसरल्यामुळें झोपणें शक्य झालें. दुसऱ्या दिवशीं ता. ८।६।३० रोजीं चालण्यास सुरवात केली व **जोशीमठास** सुमारें ९ वाजतां येऊन पोहोंचलों. **श्रीमदाद्यशंकराचार्य** हे पोटभरू संन्याशी नव्हते; त्यांस चैनीची अगर दक्षणेची अपेक्षा नव्हती; हिंदुधर्मवृद्धीची खरी तळमळ त्यास लागलेली असल्यामुळें **निमुचाणा** येथें गरीब शेतकऱ्यांची कत्तल करून नरराक्षस ह्या पदवीस पात्र झालेल्या **अलवारच्या संस्थानिकानें** कितीही मोठी दक्षणा दिली असती तरीही त्यांनीं **राजर्षी** ही पदवी त्यास अर्पण केली नसती. अर्थात् त्यांची वस्तीही प्रापंचिकांनीं गजबजलेल्या गावांत असणें शक्यच नव्हतें, म्हणून चवकशीस लागलों तों जोशीमठाहून परत येतांना डाव्या हातास डोंगरावर सुमारें एक मैल उंचीवर त्यांच्या गादीचें ठिकाण असल्याचें समजलें. म्हणून वाटाड्या करून मी व **श्री. नानासाहेब** त्या ठिकाणीं मुद्दाम गेलों. आपला योगक्षेम सध्यांच्या परिस्थितींत उत्तम चालत असल्यामुळें ह्या ठिकाणाकडे लक्ष देण्याची **रावळसाहेबास** कांहींच गरज

भासत नाहीं. अर्थात् त्यांनीं ह्या ठिकाणाकडे शक्य तितकें दुर्लक्ष केलें आहे. महिन्यांतून एकदां संक्रातीस पूजा करण्याकरितां ब्राह्मण जातो. इतर वेळीं देवास पूजेची आवश्यकता भासतच नाहीं. वरती शंकराचार्यांच्या वेळचीं एक **ज्योतेश्वर महादेव** व दुसरें **भक्तवत्सल भगवान्** अशीं दोन देवळें आहेत. एक लहानशी धर्मशाळा असून पाण्याचा एक सुंदर झराही आहे. सभोंवतीं दाट झाडी आहे. अर्थात् येथून सृष्टीची शोभा फारच चांगली दिसते परंतु मानवी कृत्रिम सौंदर्यास येथें वाव नसल्यामुळें चैनीस सवकलेल्या साधूंस हें ठिकाण पसंत पडत नाहीं. वरतीं शिधा मिळण्याची सोय नाहीं. बेकारयुगास आरंभ झाल्यामुळें नुकताच एक ब्राह्मण कांहीं मिळकतीच्या आशेनें येथें येऊन राहिला आहे. त्यास जाहिरातीची कला अवगत नसावी अगर आपल्या पोटावर पाय येईल म्हणून रावळांनीं त्यांस प्रतिबंध तरी केला असावा. कारण "आद्यशंकराचार्यांचा मठ डोंगरावर आहे त्याचें दर्शन घेऊन जा" अशी पाटी त्यानें रस्त्यावर मारल्यास त्यास कांहीं तरी फायदा झाल्यावांचून राहाणार नाहीं.

आज वाटेंत एक खानदेशांतील **शिरपूरकडचे** सहकुटुंब पायीं प्रवास करणारे शेतकरी भेटले. ते म्हणाले, "जवळ फार थोडा पैसा असल्यामुळें आम्ही खांद्यावर सामान घेऊन प्रवास करीत आहोंत, कुलीस द्यावयास सुद्धां पैसे नाहींत; परंतु **बदरीनाथच्या पंड्यानें** हात बांधून पंचवीस रुपये घेतले तेंव्हां सुफळ दिलें. आतां कसें घरीं जावें," त्यांची हकीकत ऐकून फार वाईट वाटलें. जर त्यांस शिक्षण मिळालें असतें तर खात्रीनें त्यांनीं पंड्यास इतके पैसे दिले नसते. परंतु **हिंदुस्थानांतील** शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा सर्वच घेत आहेत. इंग्रजांनीं ज्यांवाचून मुळींच अडत नव्हतें अशा शेंकडों नवीन नवीन गोष्टी **हिंदुस्थानांत** आणिल्या आहेत परंतु **इंग्लंडमध्यें** साक्षरतेचें प्रमाण शें. ९९ आहे तर हिंदुस्थानांत मात्र तें अजून दहाच्या पुढें जात नाहीं व प्राथमिक शिक्षकांचा हेतुपुरःसर कोंडमारा करण्याचें काम अव्याहत चालू असल्यामुळें तें प्रमाण दहाच्या पुढें जाण्याचीही आशा दिसत नाहीं. **बोल्शेविकांनीं** एका वर्षांत साक्षरतेचें प्रमाण पंधरावरून पासष्टावर नेलें, म्हणून जग विरुद्ध असतांही ते टिकून राहिले आहेत. आमच्या सरकारास व श्रीमंतांस प्रजा साक्षर व्हावयासच नको आहे. प्राथमिक शिक्षणाकरितां किती श्रीमंतांनीं आजवर देणग्या दिल्या आहेत ? लोक सुशिक्षित झाल्यास ह्यांच्या पोटावर पाय येईल, यांना फुकट चरतां येणार नाहीं म्हणून हे लोक असेच वागणार. **औंधसारख्या** प्रगतिप्रिय म्हणविणाऱ्या संस्थानिकाच्या राज्यात सुद्धां प्राथमिक शिक्षकांची व त्यामुळें शिक्षणाची दुर्दशा

आहे. मग **भोर, सांगली, मिरज, इचलकरंजी** ह्यासारख्या इतर परागतिक संस्थानिकांची गोष्टच बोलावयास नको. असो.

त्यांचा निरोप घेऊन चालूं लागलों. रात्रीं वस्तीस **गुलाबकोटीवर** आलों व दुसऱ्या दिवशीं **चमोलीस** वस्तीस जाण्याचा विचार होता, परंतु **चमोलीहून** येणाऱ्या यात्रेकरूंकडून तेथें कालऱ्याच्या आजारास सुरवात झाल्याची बातमी समजल्यामुळें कर्दळीवनांत वसलेल्या **मठचट्टीवरच** मुक्काम केला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं तेथून दोन मैलावरच असलेल्या **चमोलीस** येऊन दाखल झालों. आजाराच्या भीतीमुळें तेथें पाणी पिण्यास सुद्धां जीव धजावत नव्हता. परंतु पोष्टमास्तरांच्या नांवावर पत्रें मागविलीं असल्यामुळें पोष्टांत गेलों. तेथें **श्री. दादा श्री. नाना** यांच्या घरचीं खुशालीचीं पत्रें मिळालीं म्हणून चालण्याचा हुरूप थोडासा वाढला. प्रवासांत घरच्या खुशालीचें पत्र म्हणजे किती आनंदाची गोष्ट असते,ह्याची कल्पना प्रत्यक्ष प्रवास केल्यावांचून येणें शक्य नाहीं. आमच्या बरोबरचे कुलीसुद्धां घरच्या खुशालीकरितां तळमळत असत. परत येतांना त्यांच्या गांवाकडचे कुली मधूनमधून भेटत. **चमोलीस** आमच्या कुलीस त्यांच्या मागून आठ दिवसांनीं गांव सोडलेला एक त्यांचा गांववाला भेटला व त्यानें 'तुझ्या मुलास म्हशीच्या मागें जातांना पाहिलें,' इतकेंच सांगितलें. त्यावर तो कुली बेहद्द खूष झाला व त्यानें माझ्यापासून स्वतःचें वजन खर्च करून एक विडी मागून घेऊन त्यास दिली व वाटेस लाविलें. असो. **बद्रीनाथपासून चमोलीपर्यंत** गेलेल्याच रस्त्यानें परत यावयाचें असल्यामुळें फारसा उत्साह नव्हता; परंतु चमोलीपासून पुन्हां नवीन रस्त्यास सुरवात झाली. रस्ता **अलकनंदेच्या** कांठाकांठानें गेला आहे. मधून-मधून बरीच सपाट जमीनही दृष्टीस पडते. **चमोलीपर्यंत** प्रदेश साधारण थंड असल्यामुळें फारशी झाडी नव्हती. परंतु ह्यापुढचा प्रदेश समशीतोष्ण असल्यामुळें झाडीचें मान वाढत चाललें होतें. मात्र थंड प्रदेशांतून ह्या प्रदेशांत आल्यामुळें हा प्रदेश उष्ण भासत होता व दिवसेंदिवस उष्णतेचें मान वाढत चाललें होतें म्हणून आमच्या अंगावरचे कपडे कमीकमी होत चालले होते व कुलींच्या डोक्यावरील बोजा वाढत चालला होता. कारण निसर्गाचा नियमच आहे. Nothing is produced and nothing is destroyed. ( जगांत नवीन कांहीं उत्पन्न होत नाहीं अगर नाश पावत नाहीं ) फक्त जगांत स्थानपालट होतो. गरीब परंतु हुषार लोकांकरितां परमेश्वर नवीन संपत्ति उत्पन्न करीत नाहीं तर श्रीमंत आईबापांच्या पोटीं मूर्ख मुलांस जन्मास घालून त्यांच्याकडून ती संपत्ति गरिबांस देववितो. चमोलीपासून तीन मैलांवर **मैठाणाचट्टी** लागली. **जों जों दक्षिणेकडे चाललों**

**तों तों परमेश्वरी चमत्कार कमीकमी होत जाऊन त्यांची जागा मानवी चमत्कारांनीं आडविलेली दिसून येऊं लागली.** निरनिराळ्या बरेच दिवसांत दृष्टीस न पडलेल्या वस्तू दुकानांतून दिसूं लागल्या. **मैठाणा** येथें दोन चहाचीं व पानपट्टीचीं दुकानें दिसलीं. अर्थात् त्यांस योग्य तो आश्रय देऊन दुपारच्या भोजनाकरितां मैठाण्याहून तीन मैलांवरील **नंदप्रयाग** ह्या ठिकाणीं येऊन दाखल झालों.

## नंदप्रयाग.

**नंदाकिनी** आणि **अलकनंदा** ह्यांच्या संगमावर वसलेलें हें एक शंभर सवाशें घरांचें गांव आहे. बाजार साधारण बराच मोठा आहे. **हिमालयांत** बहुतेक महत्त्वाच्या ठिकाणीं ज्याच्या शाखा आहेत असा कै. **पंडित महेशानंद शर्मा** ह्यांनीं स्थापन केलेला " **बद्रीनाथ भक्तिरसामृत कार्यालय** " ह्या नांवाचा शिलाजिताचा मोठा कारखाना येथें असून त्याचें हिमालयांतील इतर जिनसा मिळण्याचें दुकानही आहे. ह्या ठिकाणीं पुरातनकाळीं **नंदराज** नामक राजानें मोठा यज्ञ करून **विष्णूचें** मंदिर बांधलें. त्या वेळेपासून ह्या ठिकाणास **नंदप्रयाग** हें नांव मिळालें आहे. तीर्थस्नानाचें महात्म्य मोठें असल्यामुळें व दिवसेंदिवस स्नानाची आवश्यकता जास्त प्रमाणांत भासूं लागल्यामुळें स्नान, भोजन वगैरे कार्यक्रम यथास्थित उरकले. नंदप्रयागजवळ प्रसिद्ध **महात्मा कण्वऋषींचा** आश्रम आहे. त्या कण्वाश्रमाचें नांव ऐकतांच पुण्याच्या **कण्वाश्रमाची** व **गण्वाश्रमाची** आठवण होऊन प्रवासाच्या दुःखाचा थोडा वेळ विसर पडला व किती तरी गोष्टी चित्रपटाप्रमाणें डोळ्यापुढून येऊन गेल्या. नंदप्रयागपासून सात मैलांवर लहानशा वाटेनें गेले असतां एक शंकराचें स्थान लागतें. त्यास **दशमौली महादेव** म्हणतात. ह्या ठिकाणीं **रावणानें** शंकर प्रसन्न होण्याकरितां तपश्चर्या केली होती असें म्हणतात. **दशमौलीचा** अपभ्रंश **दशोली** असा झाला असून त्याच नांवानें इकडील पहाडी लोक त्या ठिकाणास ओळखतात. परत जाण्याची घाई झाल्यामुळें तिकडे न जातां नंदाकिनीवरील तारांचा झुलता पूल ओलांडून पुढें चाललों. सुमारें तीन मैलांवर **सोनला** चट्टी लागली. येथून भातशेतीस सुरवात झाली. हिरवीगर्द शेतें पाहातां पहातां केव्हांच वेळ निघून गेला. वस्तीस **लंगासू**चट्टीवर आलों.

ता. ११-६-३० रोजीं **लंगासूचट्टी** सोडून चालण्यास सुरवात केली. सुमारें अडीच मैलावरील **जैकंडीचट्टी** सोडून सकाळीं नऊ वाजण्याच्या सुमारास **कर्णप्रयाग** ह्या महत्त्वाच्या ठिकाणीं येऊन दाखल झालों.


## कर्णप्रयाग

**पिंडरगंगा** आणि **अलकनंदा** ह्यांच्या संगमावर वसलेलें हें एक फार महत्त्वाचें ठिकाण आहे. महारथी दानशूर राजा **कर्ण** यानें द्वापार युगांत ह्या ठिकाणीं मोठा यज्ञ केला होता. तसेंच सूर्याची आराधना करून त्याजपासून अजिंक्यत्व प्राप्त होणारीं कवचकुंडलें येथेंच मिळविलीं होतीं. त्यामुळें ह्या ठिकाणास **कर्णप्रयाग** हें नांव प्राप्त झालें आहे. पंचप्रयागांतच कर्णप्रयागची गणना असल्यामुळें स्नानमहात्म्य आहेच. डोंगराच्या खालीं फार खोलींवर लोकांचीं स्नानें चाललीं होतीं. परंतु पुढें जाण्याची घाई असल्यामुळें संगमास वंदन करून जवळच असलेल्या **उमादेवीच्या** देवळांत जाऊन आलों. येथें बाजार बराच मोठा आहे. हलवायांचीं, पुस्तकांचीं वगैरे सर्व प्रकारचीं दुकानें येथें आहेत. हॉस्पिटल, पोलीसचौकी इंग्रजी मिडल स्कूल, कुलीएजन्सी-पोष्ट व तार ऑफिस बा. का. क. वाल्यांची धर्मशाळा, इत्यादि सर्व सोयींनीं हें ठिकाण भरलेलें आहे. **जम्नोत्रीगंगोत्रीच्या** यात्रा करून **केदारनाथाकडे** गेलेल्या यात्रेकरूंचें **रुद्रप्रयाग** हें महत्त्वाचें क्षेत्र तसेंच राहून जातें म्हणून ते यात्रेकरू कर्णप्रयागहून एक रस्ता रुद्रप्रयागला जातो, त्या रस्त्यानें परततात तर आदिबद्रीच्या दर्शनाच्या आशेनें कांहीं पुढें **रामनगरच्या** रस्त्यास लागतात. येथून **राणीखेत** साठ मैल आहे. आमचें राणीखेतला जावयाचें ठरलें असल्यामुळें आम्ही रामनगरच्या रस्त्यास लागलों. रस्ता पिंडरगंगेच्या काठाकाठानें जंगलांतून गेला आहे. ह्या जंगलांत वाघ, डुक्कर, वानर वगैरे प्राणी तसेच मधून मधून कस्तूरीमृगही आढळतात, म्हणून पुष्कळ लोक शिकारीकरितां इकडे येतात. लोकरीकरितां मेंढ्याही पुष्कळ लोक पाळतात. त्यामुळें ह्या प्रदेशांतून प्रवास करितांना मेंढ्यांचे थवेच्या थवे दृष्टीस पडतात. ह्या प्रांतांतील पुष्कळ लोक मेंढ्यांच्या पाठीवरून माल वाहून नेऊन **तिबेटशीं** व्यापार करितात. जंगलांत मधूनमधून तांबड्या टोळांचे थवे दृष्टीस पडत होते. त्यांच्या भराऱ्या पहातां पहातां वेळ निघून गेला. व दुपारच्या भोजनास कर्णप्रयागपासून चार मैलांवर असलेल्या **सिमलीस** येऊन दाखल झालों. येथून **पिंडरगंगा** सुटते. म्हणून नदींत जाऊन स्नान उरकलें. आतां उन्हाळ्याचा त्रास होऊं लागला होता. म्हणून स्नान व भोजनानंतर थोडी वामकुक्षी केली. त्या वेळीं वाहाणाऱ्या थंड वाऱ्यावरून सिमली ही **सिमल्याची** धाकटी बहीणच असावी असा भास झाला. दुपारीं तीन वाजतां पुन्हां चालण्यास सुरवात केली. रस्ता गर्द झाडींतून गेला असल्यामुळें व वाटेंत फारसें कोणी भेटत नसल्यामुळें थोडी भीतीच वाटत होती. शिवाय थोडा चढाव होता म्हणून सिमलीपासून सुमारें साडेपांच मैलावरील **उज्ज्वलपूर** चट्टीवर मुक्काम टाकला.

ही चट्टी बरीच लहान आहे शिवाय आमचा संध्याकाळीं स्वयंपाकाचा कार्यक्रम नसल्यामुळें व चट्टीवाल्याकडे दूध शिल्लक नसल्यामुळें चट्टीवाला आमच्यावर फार रागावला. कारण त्याची कांहींच विक्री होण्याचें चिन्ह त्यास दिसेना. बरें राहाण्याबद्दल भाडें देऊं लागलों तर तें तो घेईना. तरीही कशीबशी रात्र त्याच्या चट्टींत काढून पहाटे सव्वा तीन वाजतांच मुक्काम हालविला. व पहाटे पांचच्या सुमारास आदिबदरीस येऊन पोहोंचलो. ह्या ठिकाणीं एक **लक्ष्मीनारायणाचें** देऊळ आहे, त्याचें दर्शन करून पुढें चालूं लागलों. वाटेंत **जंगलचट्टी** सोडून कालामाटी चट्टीवर भोजन उरकलें व चालण्यास सुरवात केली. सुमारें २॥ मैलांवर **ग्वाडगधेरा** नामक चट्टीजवळ आलों. जवळच एक धोंडा उभा केलेला आढळला व त्यावर— From this village 13 men went to the great war; of these one gave up his life. अशी पाटी आढळली. ती पाटी वाचल्यावरोबर **महायुद्धाच्या** काळची रिक्रूटभरती, ती करणारे जुलमी अधिकारी, त्यांनीं केलेला अज्ञानी प्रजेचा छळ, त्यांच्या झालेल्या चवकशा इत्यादि गोष्टी डोळ्यापुढें उभ्या राहिल्या व शेजारी असलेली आगगाडी सुद्धां पाहांण्यास न जाणारे शांतताप्रिय शेतकरी आपलें गांव सोडून कोठल्या कोठें मरण्यास जाण्याकरितां आपखुशीनें तयार होतील ही गोष्टच अशक्य वाटली. गांवाची वस्ती फार तर १३ घरांचीच असेल. म्हणजे घरटीं एक मनुष्य धरून नेला. व इतकें करूनही त्यांची स्थिति सुधारली म्हणावें तर आवळ्याएवढें पूज्य वास्तविक अशीं स्मारकें स्वदेशाकरितां प्राण देणाऱ्यांचीं झालीं पाहिजेत. त्यांचे मोठे पुतळे उभारतां आले नाहींत तरी त्यांच्या नांवानें एकादा दगड बसविल्यासही त्यांच्या आत्म्यास समाधान प्राप्त होईल. व तरुणपिढींत आपण निदान आपल्या गांवास तरी भूषणप्रद होऊं असें वाटूं लागेल व त्यांच्या वंशजांस पूर्वजांचा कित्ता गिरविण्याची इच्छा उत्पन्न होईल. कारकुनीपेशाच्या पुस्तकी शिक्षणाचा उदोउदो करण्याचा काळ संपून गेला आहे, तेव्हां देशभक्तांच्या स्मारकांचा प्रश्न देशहितैषी लोक कधीं हातीं घेणार? ग्वाडगधरापासून सुमारें एक मैलावर **लोहावा** नांवाची नवीनच बांधलेली चट्टी लागली. भरपूर पाणी पक्की बांधलेली धर्मशाळा, हलवायाचें दुकान इत्यादि सोईमुळें दोन दिवस वस्ती करण्यासारखें हें ठिकाण आहे. तुपांतील जिलबी येथें दहा आणे शेराप्रमाणें मिळत होती. परंतु आतां रेल्वे कधीं दिसते असें होऊन गेलें होतें. चालण्याचा अगदीं कंटाळा आला होता. तेव्हां चालवेल तितकें चालावें म्हणून वस्ती करण्यास तेथून एक मैलावर **धुनार घाट** येथें गेलों. ता. १३-६-३० रोजीं धुनारघाट सोडून चालूं लागलों. व सकाळीं नऊच्या सुमारास **मैलचोरी** ह्या ठिकाणीं येऊन दाखल झालों.

## मैलचौरी.

हें **गढवाल** जिल्ह्याच्या सरहद्दीवरचें गांव आहे. **बदरीकेदारच्या** यात्रेकरूंशीं **हारिद्वार** वगैरे ठिकाणीं केलेल्या करारांची हद्द येथपर्यंतच असते. म्हणून पहिल्या कुलींस येथें सोडून द्यावें लागतें. कुलींनीं व आम्ही अनेक सुखदु:खांचे अनुभव बरोबरच घेतले असल्यामुळें त्यांना सोडतांना आम्हांस व त्यांना फार वाईट वाटलें. शिवाय पुन्हां त्यांची व आमची गांठहि पडणें शक्य नव्हतें. म्हणून त्यांचें



**२१००० फूट उंचीचें नीलकंठ शिखर, बदरीनाथ.**

ठरलेले पैसे व यथाशक्ति बक्षीस देऊन त्यांची बोळवण केली. **अलमोडा** जिल्ह्यांतील

दोन घोडेवालेच केले. त्यांनीं दोन स्वाऱ्या व सामान घेण्याचें कबूल केलें. मैल. चौरी येथें माणसांची आवकजावक फार असल्यामुळें वस्तीस जागाच मिळाली नाहीं. म्हणून लगेच १० वाजतांच चालण्यास सुरवात केली. सुमारें एक मैल चढाव चढल्यानंतर **गढवालची** हद्द संपून **अलमोड्याची** हद्द लागली व उतारास सुरवात झाली. तेथून साडेतीन मैलांवर पाण्याच्या चांगल्या सोईची **विजराणी** चट्टी लागली. परंतु आमचा घोडेवाला तेथून अर्ध्या मैलावरील **रामपूर** गांवचा रहाणारा असल्यामुळें त्याच्या आग्रहावरून रामपूर येथें दुपारच्या वस्तीस गेलों. पाण्याचे फार हाल झाले व उन्हाचाहि त्रास झाला. घोडेवाल्यानें स्वतःची सोय पाहिली. रामपूरपासून एकच मैलावर पुढें **हरवेश्वर** नांवाची चट्टी लागली. हें ठिकाण गर्द झाडींत वसलें असून पाण्याचे पाट सर्वत्र वहात होते. वाण्याचीं वगैरे दुकानेंहि होतीं. झाडाच्या सावलींत वनभोजन फार मजेंत झालें असतें; परंतु योग नव्हता येथून दोन मैलावरील चौखुटिया अगर गणाई नांवाच्या ठिकाणीं येऊन दाखल झालों. पुढें एकदम जाण्याचा विचार होता, परंतु पावसानें तेथें वस्ती करणें भाग पाडिलें.

### गणाई.


हें एक सडकांचें मोठें जंक्शनच आहे. येथून एक सडक **पौडीस** गेली आहे. अंतर ६२ मैल आहे. दुसरी **रामनगरास** गेली आहे. तिचें अंतर ६४ मैल आहे. व तिसरी **राणीखेताला** गेली आहे. तिचें अंतर २३ मैल आहे. हें गांव रामगंगेच्या कांठावर वसलें आहे. पूल मोठा प्रेक्षणीय आहे. गांवांत कोणत्याहि श्रीमान् गृहस्थाचें सदावर्त नाहीं. परंतु **अलाहाबादच्या सेवासमितीची** एक शाखा येथें आहे तिच्यामार्फत फार उत्तम कामगिरी चालू आहे. सेवा समितितर्फे लुले, आंधळे, पांगळे इत्यादि भिकाऱ्यांस सदावर्त मिळण्याची व्यवस्था केली आहे. धट्ट्याकट्ट्या भिकाऱ्यास सदावर्त मिळत नाहीं. यात्रेकरूंच्या सुखसोईकरितां सेवासमितीचे स्वयंसेवक झटत असतात. वैद्यकीय मदत व इतरहि माहिती यात्रेकरूंस मिळूं शकते. ह्या गांवाहून मोटारीनें जातां येणारें **राणीखेत** हें गांव अवघ्या तेवीस मैलांवर असूनहि त्या गांवास यात्रेकरूंस जाण्याची सरकारकडून बंदी होती. कारण राणीखेत येथें गोरी फौज असते व तेथें यात्रेकरू गेल्यास गोऱ्या फौजेचें आरोग्य बिघडेल? पण या कृत्यामुळें यात्रेकरूंस ४० मैल जास्त चालावें लागे त्याची वाट काय? ही गोष्ट सेवासमितीच्या कार्यकर्त्यांच्या ध्यानांत आल्याबरोबर त्यांनीं खटपट करण्यास सुरवात केली तेव्हां सरकारकडून वाटेंत पाण्याचे हाल आहेत, यात्रेकरू-

करितां पाहिजे असलेला पोलीस बंदोबस्त नाहीं. असें कारण सांगण्यांत आलें. ज्या सरकारास यात्रेच्या वाटेवर पांचशें मैल पोलीसबंदोबस्त ठेवतां येतो, त्या सरकारास



बद्रीनाथजवळील अलकनंदा नदी.

चोवीस मैल बंदोबस्त ठेवतां येणार नाहीं ही सबब साफ खोटी असल्यामुळें ती वादांत टिकली नाहीं. अर्थात् असलेल्या गैरसोईंची माहिती करून घेऊनहि जर कोणांस त्या रस्त्यानें जाणें असेल, तर त्यानें जावें अशी तडजोड ठरली. सध्यां रस्त्यावर गैर-सोईंचा पाढा वाचलेला जाहीरनामा डि. मॅ. च्या सहीचा लाविलेला असून जेथून दोन रस्ते दोन बाजूस फुटतात त्या ठिकाणीं 'सेवासमितीचा स्वयंसेवक यात्रेकरूंस



पतित पावन श्री बद्रीशपुरी

" बाबांनो, रामनगरच्या रस्त्यापेक्षां राणीखेतच्या रस्त्यावर जास्त गैरसोई आहेत, तेव्हां

**राणीखेताच्या** मार्गानें न जातां **रामनगरच्या** मार्गानेंच जाणें तुमच्या हिताचें आहे. मात्र राणीखेतच्या रस्त्यानें जाण्यास तुम्हांस कायदेशीर हक्क आहे." असें सांगण्याकरितां रात्रंदिवस उभा असतो. आम्हांस त्यानें पहाटे पांच वाजतां सुद्धां सांगितलें. मी मुद्दाम सेवासमितीच्या सेक्रेटरींची गांठ घेतली. त्यांनीं सर्व माहिती अत्यंत नम्रतापूर्वक दिली. मी पुण्याचा रहाणारा असें सांगितल्यावरोबर त्यांना **शिवाजी महाराजांची** आठवण होऊन त्यांनीं महाराजांस नमस्कार केला व "आम्ही शिवाजी महाराजांचा इतिहास वाचला आहे, तो फारच परिणामकारक आहे, असें ते म्हणाले." व आमच्या संस्थेसारखी लोकांच्या प्रत्यक्ष उपयोगी पडणारी एकादी संस्था तुमच्याकडे आहे काय, म्हणून प्रश्न केला. त्या वेळीं १९३२ सालीं "**सन १९५० चें पुणें**" कसें असावें ह्याची **चर्चा** करणारी—१९३२ ची पिढी १९५० साल कसें पाहील ह्यासंबंधीं, आजचें **कर्तव्य** करणारी नव्हे—संस्था निघणार असल्याचें स्वप्न मजला पडलें नसल्यामुळें व कार्य फारच अल्प करून मोठा गाजावाजा करणाऱ्या संस्थांची नामावली फार मोठी असल्यामुळें "आमच्याकडे संस्था पुष्कळ आहेत, परंतु आपल्या सेवासमितिसारखें कार्य करणारी संस्था नाहीं." असें मोठ्या दुःखानें सांगावें लागलें. तेव्हां त्यांनीं तुमच्याकडे आमच्याकडच्यासारख्या संस्थेच्या शाखा सुरू करा, असेंहि सांगितलें. त्या वेळीं त्यांच्या म्हणण्यास सवड सांपडल्यास प्रसिद्धि देण्याचें आश्वासन देऊन त्यांचा आभारपूर्वक निरोप घेतला. दुसऱ्या दिवशीं ता. १४।६।३० रोजीं **गणाई** सोडून चालूं लागलों.

गणाई सोडून चालण्यास सुरवात केली, सारखें महिनाभर चालणें सुरू होतें, जीव अगदीं थकून गेला होता. वाटेंत पाणी मिळण्याची मारामार पडत होती, परंतु लवकरच मोटारची गांठ पडून चालणें बंद होणार हे विचार मनांत येऊन थोडासा हुरूप वाढत होता. मधून मधून चहाचीं दुकानें लागत असल्यामुळें एकसारखें चालणें शक्य झालें होतें. कसेंहि करून त्याच दिवशीं रात्रीं मुक्कामास राणीखेत येथें जावयाचें असा विचार होता. साडेदहाच्या सुमारास गणाईपासून सुमारें ८ मैलांवर बैरती नांवाचें गांव लागलें. ह्या गांवांत चित्रेश्वर महादेवाचें एक देऊळ असून देवळासभोंवतीं धर्मशाळाहि आहे. देऊळ दगडी असून प्रेक्षणीय आहे. जवळच एक प्राथमिक शाळा लागली. मुलें लांकडी पाट्यांवर पांढऱ्या शाईनें लिहीत होतीं. शिक्षकांच्या पगाराचें स्केल विचारिलें तों तें १२ रु. पासून आरंभ करून ३० रु. पर्यंत अखेर इतकेंच असल्याचें समजलें! येथपर्यंत साधारण सपाटीच होती; पुढें दीड मैल चढाव चढून दहा मैलांवर असलेल्या द्वाराहाट नांवाच्या गांवीं येऊन दाखल झालों.

## द्वाराहाट.


अकराव्या शतकाच्या आरंभीं येथें कत्युरी वंशाचे रजपूत राजे राज्य करीत होते व त्यांच्या वेळीं ह्या ठिकाणीं पुष्कळ देवळें बांधलीं गेलीं. त्या देवळांचा आकार तुर्की टोपीसारखा आहे. गांवांत एक कमळांनीं भरलेला तलाव असून त्याच्यासभोंवतीं लहान लहान बरींच देवळें आहेत व त्यांच्या भिंतीवर मनुष्यें, देव, हत्ती इत्यादिकांचीं चित्रें कोरलेलीं आहेत. एका मूर्तीच्या खालीं ११०५ शक (इ. स. १०४८) कोरला असून एका गणपतीच्या मूर्तीखालीं ११०३ (इ. स. १०४५) हा शक कोरला आहे. ह्या देवळांवरून व मूर्तीवरून अकराव्या शतकांत आपल्या देशांतील शिल्पकला किती उर्जितावस्थेला पोहोंचली होती ह्याची साक्ष पटते. ह्या प्रांतावर बरेच दिवस हिंदू राजे राज्य करीत होते. इ. स. १७४४ मध्यें रोहिल्यांनीं मोठी फौज घेऊन ह्या प्रांतावर स्वारी केली होती, त्यावेळीं त्यांनीं द्वाराहाट-च्या जुन्या देवळांचा विध्वंस करून टाकिला होता; परंतु फौजेची पाठ फिरल्या-बरोबर महाराष्ट्रांतील लढवैय्यांनीं ज्याप्रमाणें औरंगजेबाच्या अधिकाऱ्यांस हुस-कावून लावून त्यानें घेतलेले सर्व किल्ले परत घेतले, त्याचप्रमाणें तेथील लोकांनींहि रोहि-ल्यांस पिटाळून लाविलें. ह्यावरून चैनीस सवकलेल्या मुसलमानांस काटक पहाडी लोकांसमोर टिकाव धरितां येत नाहीं हीच गोष्ट सिद्ध झाली. ह्या प्रांतांत मुसलमान फक्त शेंकडा एक ह्या प्रमाणांत आहेत. इ. स. १७९० मध्यें नेपाळचा राजा पृथ्वीनारायण ह्यानें त्यावेळचा राजा चंदराज याच्यावर स्वारी करून त्यास पळवून **नेपाळच्या** लाविलें व सुमारें २५ वर्षें ह्या प्रांतावर राज्य केलें. परंतु इ. स १८१५ च्या सुमारास **वाढत्या साम्राज्याची** इंग्रजांस भीति वाटून त्यांनीं चंदराजाचा दिवाण **हरक-देव जोशी** ह्यास हाताशीं धरून व पहाडी लोकांस भुलथापा देऊन व थोडीशी सैन्याची मदत देऊन त्याच्याच हस्तें गुरख्यांस हकलून दिलें व राज्य आपल्या हातांत घेतलें. प्रथम गुरख्यांच्या वेळीं जमीनमहसूल ७००० रु. होता व इतर करहि सात हजाराजवळ जवळ होते. प्रथम इंग्रजांनीं इतर सर्व करांची माफी दिली व मागाहून ते सर्व हळूहळू बसविले व जमीनसाराहि वाढवून आतां तो अडीच लाखावर नेला आहे !! तरीहि इंग्रज ग्रंथकारास गुरख्यांचें राज्य फार वाईट होतें असें म्हणण्यास शरम वाटत नाहीं. असो. गांवाची लोकसंख्या सुमारें पांचशें असून हॉस्पिटल, पोस्ट-ऑफिस, बाजार वगैरे सर्व गोष्टी येथें आहेत. ख्रिस्तीधर्माची दीक्षा देण्याकरितां येथें एक मिशन असून त्याच्यामार्फत एक शाळाहि चालविली जात आहे. येथें दुकानांत फराळ वगैरे करून पुढें चालण्यास सुरवात केली. सुमारें एक मैल गेल्या-

नंतर डाव्या हातास एक रस्ता फुटतो. तो अलमोड्याहून खैरना नांवाच्या गांवास जातो. येथून अलमोडा २४ मैल असून खैरना ३१ मैल आहे. जर अलमोड्यास चालत जावयाचें असतें तर त्याच रस्त्यानें जाणें जवळ पडलें असतें. परंतु येथून राणीखेत अवघ्या बारा मैलांवर असल्यामुळें तेथें जाऊन तेथून मोटारनेंच अलमोड्यास जाण्याचा बेत केला. सहा मैलांपर्यंत साधारण सपाटीच होती. सृष्टिसौंदर्यांत अलमोडा जिल्हा सुद्धां कमी पडणार नाहीं. ह्या जिल्ह्यांत डोंगरांची उंची फारशी नसून पठारें पुष्कळ आहेत. म्हणून एकाद्या डोंगराच्या माथ्यावर उभे राहिले असतां सभोंवार लहान लहान पक्क्या बांधलेल्या घरांचीं गांवें दृष्टीस पडतात. सातव्या मैलांपासून मात्र चढावास सुरवात झाली. सकाळपासून १७ मैल चालणें झालें होतें म्हणून चढावाचा अतिशय त्रास होत होता. परंतु समोरच्या डोंगरावरील झाडींत राणीखेतमधील बंगले माना वर करून तुमच्या स्वागताची आम्ही तयारी करून आहोंत, लवकर आमच्याकडे या असेंच जणूं कांहीं सुचवीत असल्याचा भास होत होता व त्याच स्वागत-समारंभाचें कल्पनाचित्र डोळ्यांपुढें उभें करून तें पहात पहात दोन मैल चढण चढलों व दिवे लागून गेल्यामुळें **पतकोटली** नांवाच्या गांवीं मुक्काम टाकला. पाणी गांवापासून दीड मैल लांब होतें, अर्थात् आम्ही जर पुराणमताभिमानी यात्रेकरू असतों तर रात्र पाण्याशिवाय काढावी लागली असती; परंतु आमच्यावर तो प्रसंग आला नाहीं, एका मनुष्यास एक आणा दिल्यावर त्यानें एक डबा पाणी आणून दिलें. हालवायाचें एक दुकान तेथें असल्यामुळें नुसतेंच दूध पिऊन **भुकी तो सुखी** ह्या म्हणीची आठवण करून पथारी पसरली; कारण स्वयंपाक करण्याची शक्तीच राहिली नव्हती. दुसऱ्या दिवशीं ता. १५-६-३० रोजीं सकाळीं लवकर उठून चालण्यास सुरवात केली. रस्ता बहुतेक चढावाचा असून गर्द झाडींतून गेला असल्यामुळें चालण्यांत एकप्रकारचा आनंद वाटत होता. रस्त्यावर रहदारीहि पुष्कळ होती. अंतराअंतरावर निरनिराळ्या प्रकारचीं दुकानें लागण्यास सुरवात झाली व शहराच्या जवळ जवळ जात असल्याचीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं. सकाळीं ९ च्या सुमारास राणीखेतला येऊन दाखल झालों.

## राणीखेत.

येथें मोटारचें दर्शन झालें. चालणें संपलें म्हणून जो आनंद झाला त्याचें वर्णन करण्यास माझी लेखणी असमर्थ आहे. सारखें चारशें मैल चालणें सुरू होतें; बरोबर असलेल्या दोन वृद्ध गृहस्थांच्या प्रकृतीची जबाबदारी शिरावर होती, स्वयंपाकाचें व इतर काम करावयाचें होतें व इतकी जबाबदारी 'कशी पार पडते ह्याची सारखी

काळजी वाटत होती. श्री. **नानासाहेब** व श्री. **दादासाहेब** वारंवार बजावीत "तुम्ही स्वतःच्या प्रकृतीची जास्त काळजी घ्या, तुम्ही आजारी पडल्यास आमचे काय हाल होतील ह्याची कल्पनाच करवत नाहीं." ह्या दोन वृद्ध व प्रेमळ गृह



**नैनीताल बोट हाऊस आणि ग्रॅन्ड हॉटल.**

स्थांच्या आशीर्वादानें व परमेश्वरकृपेनें पायीं प्रवासाचा कार्यक्रम निर्विघ्नपणें पार पडला. घरचीं सर्व पत्रें येथें मागविलीं होतीं व माझे पुण्याचे स्नेही **रा. पांडुरंग विष्णु रानडे** यांनीं माझ्या पत्त्यावर आलेलीं सर्व पत्रें व पुण्याच्या एकंदर हाल-हवालीचें पत्र येथील पोष्टमास्तरांच्या पत्त्यावर रवाना केलें असल्यामुळें पुण्याची सर्व हकीकत समजली. मोटारस्टँडजवळ बाजारांत एक **सदरबझार** नांवाचें सब-पोष्ट ऑफिस आहे. मुख्य पोष्ट मोटारस्टँडपासून दीड मैलावर आहे, तेथें चवकशी-करीत गेलों व पत्रें घेऊन आलों. सर्वांची खुशाली वाचून अत्यानंद झाला. नंतर पुढच्या चवकशीस लागलों. धर्मशाळेचा पत्ता लागलाच नाहीं, तेव्हां गांव पाहून अलमोड्यास वस्तीस जावयाचें ठरविलें.

हें गोऱ्या फौजेचें ठाणें असल्यामुळें गोरे शिपाई व त्यांच्या तैनातीस लागणारे काळे नोकर व त्याकरितां लागणारे दुकानदार ह्यांनींच हें सर्व गांव भरलें आहे. गांवाची सामान्यतः लोकसंख्या आठ हजार आहे. उन्हाळ्यांत ती थोडी वाढते तर हिवाळ्यांत कमी होते. हवा फार चांगली असल्यामुळें सिमल्याच्या ऐवजीं येथें

हिंदुस्थानसरकारचें उन्हाळ्याचें ठाणें ठेवण्याचा विचार होता परंतु लष्करी ठाणें अंबाला हें फार दूर पडत असल्यामुळें व ह्या ठिकाणाची समुद्रसपाटीपासून उंची अवघी ५९८३ फूटच असल्यामुळें तो बेत रहित झाला. हें ठिकाण पाहून दुपारीं सुमारें दोन वाजतां मोटारनें अलमोड्यास जावयास निघालों. येथून अलमोडा २९ मैल आहे, माणशीं १ रु. भाडें पडलें, रस्ता वळणावळणांनीं व डोंगराच्या कडेकडेनें गेला आहे. निघाल्याबरोबर पावसास सुरवात झाली. धुक्यामुळें समोरचें एक हातावरचें मनुष्य ओळखण्याची मारामार पडूं लागली, त्यामुळें मोटार घसरून कड्याखालीं तर पडणार नाहींना अशीहि शंका वारंवार येऊं लागली. मोटारचा वेग कमी होत होत ताशीं ८ मैलांवर आला परंतु कोणत्याही प्रकारचा अपघात न होता संध्याकाळीं ६ च्या सुमारास अलमोड्यास येऊन दाखल झालों. गांवांत शिरतांना माणशीं ८ आणे डोई-पट्टी भरावी लागली.

## अलमोडा.

हें अलमोडा जिल्ह्याचें मुख्य ठिकाण असून ह्याची वस्ती सुमारें १० हजार आहे. येथील हवा फारच चांगली आहे. जून महिन्यांत येथील उष्णतामान फक्त ८८ अंश असतें व तें पावसाळ्यांत ७२ अंशावर येऊन हिवाळ्यांत तर ४० अंशापर्यंत उतरतें. मोटारस्टँडजवळच **हिंदुस्थान हॉटेल** नांवाची खाणावळ लागली. दीड रुपाया रोज जेवण्याराहाण्याकरिता मिळून असल्यामुळें प्रवासाच्या श्रमांचा परिहार होण्याच्या दृष्टीनें तीतच मुक्काम टाकला. कपडे पावसानें सर्व भिजून गेले होते, ते वाळवून चहापान करून बाहेर पडलों. जवळच म्युनिसिपल ऑफीस लागलें, तेथें एक स्वयंसेवक हातांत राष्ट्रीय झेंडा घेऊन उभा होता, आतांप्रमाणें त्यावेळीं म्युनिसिपालिटीवर राष्ट्रीय झेंडा लावण्यास कायद्यानें बंदी नव्हती, तरीहि लोकांचे प्रतिनिधी म्हणविणारे म्युनिसिपल सभासद लोकमताला झिडकारून राष्ट्रीय झेंड्याच्या विरुद्धच होते. त्यामुळें रात्रंदिवस स्वयंसेवकांचा पहारा तेथें होता. नंतर बाजारांत गेलों. बाजारांतील रस्ता फरसबंदी असून सर्वप्रकाचीं दुकानें येथें दिसलीं. अलमोड्याहून एक रस्ता तिबेटांत जात असल्यामुळें तिबेटचा सर्व माल येथें मिळतो. गांवांत बरेच तिबेटी व्यापारी आढळतात. **कैलास-मानस सरोवरास** जाणारे यात्रेकरू **अलमोड्याहूनच बागेश्वराहून** पुढें जातात. अलमोडा हें गांव डोंगराच्या उतरत्या पठारावर वसलें आहे. त्यामुळें त्याची उंची ५५०० फुटांपासून ५२०० फुटापर्यंत उतरली आहे. ख्रिश्चन लोकांनीं हिंदूस बाटविण्याकरितां बरीच मिशन्स येथें उघडल्यामुळें स्वामी रामकृष्ण परमहंसांनीं अलमोड्याजवळ मायावती येथें एक

हिंदूधर्म मिशन उघडलें आहे. **स्वामी सत्यदेवाचीहि** वस्ती अल्मोड्यासच असते. गांवांत जुन्या पद्धतीचीं देवळें असून एक आर्यसमाजमंदिरही लागलें. गांवाजवळ एक किल्ला आहे, त्यांत गुरखा फौज असते. इंटर-आर्टसपर्यंत शिक्षण देणारें एक कॉलेज व एक मोठें हायस्कूलही गांवांत आहे. येथून एक पायरस्ता **नैनितालला** जातो. अंतर ३२ मैल आहे; परंतु मोटारची सोय असल्यामुळें दुसऱ्या दिवशीं ता. १६-६-३० रोजीं सकाळीं उठून माणशीं २ रु. भाडें कबूल करून नैनीतालला जावयास निघालों. कालच्यापेक्षां हवा आज चांगली असल्यामुळें रस्त्यावरून आजूबाजूचा देखावा फार चांगला दिसत होता. सुमारें ११ वाजतां राणीखेतला येऊन तेथून लगेच निघालों. नागमोडीप्रमाणें वळणें घेत घेत मोटार चालूं लागली राणीखेतपासून १९ मैलांवर **गरमपाणी** नांवाच्या ठिकाणीं मोटार पाणी घेण्याकरितां थांबली. येथें ३ मैलांवरून पाणी बांधून आणिलें आहे. भाजीपुरींचीं वगैरे दुकानें असल्या-मुळें पोटपूजा करून पुढें चालू झालों व तेथून ११ मैलांवरील **भोवाली** नांवाच्या गांवीं आलों. गांव लहानसेंच परंतु वनश्रीनें भरलेलें आहे. ज्यांना नैनीतालचा खर्च परवडत नाहीं असे व शिकारीची आवड असलेले पुष्कळ युरोपियन लोक येथें येतात. गांवांत युरोपियन लोकांना सोईस्कर अशा पुष्कळ खानावळी आहेत; एक हिंदूंचीहि खानावळ दिसली. चोहों बाजूंस दाट जंगल असलेले डोंगर असल्यामुळें ह्या ठिकाणची हवाही थंडच असते. येथून चार मैलावर **भीमताल** नांवाचा एक सुंदर तलाव पाहण्यासारखा आहे. परंतु कालाभावीं तो पाहण्यास जाण्याचा बेत रहित करून पुढें सटकलों व भोवालीपासून ५ मैलांवर मोटारींतून मी व श्री. नाना खालीं उतरलों, कारण नैनीताल येथें मोटारनें गेल्यास माणशीं एक रुपया कर घेतात व चालत गेल्यास कर पडत नाहीं. उतरलों तेथून दोन मैल चढावें चढल्या-नंतर नैनीताल येणार होतें तेंच मोटारनें १५ मैल चढावें लागलें असतें श्री. दादा सामानासुद्धां मोटारनें गेले. उतरलों त्या ठिकाणीं बोजास सहा आणेप्रमाणें कुलीहि मिळतात. **काथगोदामच्या** मोटारींत बसल्यास भाडें कमी पडलें असतें. ही माहिती मागाहून लागल्यामुळें थोडें नुकसान झालें. चढाव अत्यंत कठीण होता परंतु बरोबर असलेल्या एतद्देशीय मंडळींनीं मदत केल्यामुळें संध्याकाळीं ४ च्या सुमारास नैनि-ताल ह्या निसर्गरमणीय ठिकाणीं येऊन दाखल झालों.

## नैनीताल.

सभोंवतीं उंच उंच डोंगर असून त्यांच्यामध्यें असलेल्या सरोवराच्या कांठा-वर हें गांव वसलें आहे. मोटार उभी राहते त्या भागास **तल्लीताल** हें नांव असून

हिंदुस्थानसरकारचें उन्हाळ्याचें ठाणें ठेवण्याचा विचार होता परंतु लष्करी ठाणें अंबाला हें फार दूर पडत असल्यामुळें व ह्या ठिकाणाची समुद्रसपाटीपासून उंची अवघी ५९८३ फूटच असल्यामुळें तो बेत रहित झाला. हें ठिकाण पाहून दुपारीं सुमारें दोन वाजतां मोटारनें अलमोड्यास जावयास निघालों. येथून अलमोडा २९ मैल आहे, माणशीं १ रु. भाडें पडलें, रस्ता वळणावळणांनीं व डोंगराच्या कडेकडेनें गेला आहे. निघाल्याबरोबर पावसास सुरवात झाली. धुक्यामुळें समोरचें एक हातावरचें मनुष्य ओळखण्याची मारामार पडूं लागली, त्यामुळें मोटार घसरून कड्याखालीं तर पडणार नाहींना अशीहि शंका वारंवार येऊं लागली. मोटारचा वेग कमी होत होत ताशीं ८ मैलांवर आला परंतु कोणत्याही प्रकारचा अपघात न होता संध्याकाळीं ६ च्या सुमारास अलमोड्यास येऊन दाखल झालों. गांवांत शिरतांना माणशीं ८ आणे डोई-पट्टी भरावी लागली.

## अलमोडा.

हें अलमोडा जिल्ह्याचें मुख्य ठिकाण असून ह्याची वस्ती सुमारें १० हजार आहे. येथील हवा फारच चांगली आहे. जून महिन्यांत येथील उष्णतामान फक्त ८८ अंश असतें व तें पावसाळ्यांत ७२ अंशावर येऊन हिवाळ्यांत तर ४० अंशापर्यंत उतरतें. मोटारस्टँडजवळच **हिंदुस्थान हॉटेल** नांवाची खाणावळ लागली. दीड रुपाया रोज जेवण्याराहाण्याकरितां मिळून असल्यामुळें प्रवासाच्या श्रमांचा परिहार होण्याच्या दृष्टीनें तींतच मुक्काम टाकला. कपडे पावसानें सर्व भिजून गेले होते, ते वाळवून चहापान करून बाहेर पडलों. जवळच म्युनीसिपल ऑफीस लागलें, तेथें एक स्वयंसेवक हातांत राष्ट्रीय झेंडा घेऊन उभा होता, आतांप्रमाणें त्यावेळीं म्युनिसिपालिटीवर राष्ट्रीय झेंडा लावण्यास कायद्यानें बंदी नव्हती, तरीहि लोकांचे प्रतिनिधी म्हणविणारे म्युनिसिपल सभासद लोकमताला झिडकारून राष्ट्रीय झेंड्याच्या विरुद्धच होते. त्यामुळें रात्रंदिवस स्वयंसेवकांचा पहारा तेथें होता. नंतर बाजारांत गेलों. बाजारांतील रस्ता फरसबंदी असून सर्वप्रकारचीं दुकानें येथें दिसलीं. अलमोड्याहून एक रस्ता तिबेटांत जात असल्यामुळें तिबेटचा सर्व माल येथें मिळतो. गांवांत बरेच तिबेटी व्यापारी आढळतात. **कैलास-मानस सरोवरास** जाणारे यात्रेकरू **अलमोड्याहूनच बागेश्वराहून** पुढें जातात. अलमोडा हें गांव डोंगराच्या उतरत्या पठारावर वसलें आहे. त्यामुळें त्याची उंची ५५०० फुटांपासून ५२०० फुटापर्यंत उतरली आहे. खिश्चन लोकांनीं हिंदूस बाटविण्याकरितां बरींच मिशन्स येथें उघडल्यामुळें स्वामी रामकृष्ण परमहंसांनीं अलमोड्याजवळ मायावती येथें एक

हिंदूधर्म मिशन उघडलें आहे. **स्वामी सत्यदेवाचीहि** वस्ती अलमोड्यासच असते. गांवांत जुन्या पद्धतीचीं देवळें असून एक आर्यसमाजमंदिरही लागलें. गांवाजवळ एक किल्ला आहे, त्यांत गुरखा फौज असते. इंटर–आर्टसपर्यंत शिक्षण देणारें एक कॉलेज व एक मोठें हायस्कूलही गांवांत आहे. येथून एक पायरस्ता **नैनिताललला** जातो. अंतर ३२ मैल आहे; परंतु मोटारची सोय असल्यामुळें दुसऱ्या दिवशीं ता. १६-६-३० रोजीं सकाळीं उठून माणशीं २ रु. भाडें कबूल करून नैनीताललला जावयास निघालों. कालच्यापेक्षां हवा आज चांगली असल्यामुळें रस्त्यावरून आजूबाजूचा देखावा फार चांगला दिसत होता. सुमारें ११ वाजतां राणीखेतला येऊन तेथून लगेच निघालों. नागमोडीप्रमाणें वळणें घेत घेत मोटार चालूं लागली राणीखेतपासून १९ मैलांवर **गरमपाणी** नांवाच्या ठिकाणीं मोटार पाणी घेण्याकरितां थांबली. येथें ३ मैलांवरून पाणी बांधून आणिलें आहे. भाजीपुरीचीं वगैरे दुकानें असल्यामुळें पोटपूजा करून पुढें चालू झालों व तेथून ११ मैलांवरील **भोवाली** नांवाच्या गांवीं आलों. गांव लहानसेंच परंतु वनश्रीनें भरलेलें आहे. ज्यांना नैनीतालचा खर्च परवडत नाहीं असे व शिकारीची आवड असलेले पुष्कळ युरोपियन लोक येथें येतात. गांवांत युरोपियन लोकांना सोईस्कर अशा पुष्कळ खानावळी आहेत; एक हिंदूंचीहि खानावळ दिसली. चोहों बाजूंस दाट जंगल असलेले डोंगर असल्यामुळें ह्या ठिकाणची हवाही थंडच असते. येथून चार मैलावर **भीमताल** नांवाचा एक सुंदर तलाव पाहण्यासारखा आहे. परंतु कालाभावीं तो पाहण्यास जाण्याचा बेत रहित करून पुढें सटकलों व भोवालीपासून ५ मैलांवर मोटारींतून मी व श्री. नाना खालीं उतरलों, कारण नैनीताल येथें मोटारनें गेल्यास माणशीं एक रुपया कर घेतात व चालत गेल्यास कर पडत नाहीं. उतरलों तेथून दोन मैल चढावें चढल्यानंतर नैनीताल येणार होतें तेंच मोटारनें १५ मैल चढावें लागलें असतें श्री. दादा सामानासुद्धां मोटारनें गेले. उतरलों त्या ठिकाणीं बोजास सहा आणेप्रमाणें कुलीहि मिळतात. **काथगोदामच्या** मोटारींत बसल्यास भाडें कमी पडलें असतें. ही माहिती मागाहून लागल्यामुळें थोडें नुकसान झालें. चढाव अत्यंत कठीण होता परंतु बरोबर असलेल्या एतद्देशीय मंडळींनीं मदत केल्यामुळें संध्याकाळीं ४ च्या सुमारास नैनिताल ह्या निसर्गरमणीय ठिकाणीं येऊन दाखल झालों.

## नैनीताल.

सभोंवतीं उंच उंच डोंगर असून त्यांच्यामध्यें असलेल्या सरोवराच्या कांठावर हें गांव वसलें आहे. मोटार उभी राहते त्या भागास **तल्लीताल** हें नांव असून

त्याच्या समोर सरोवराच्या दुसऱ्या कांठावर असलेल्या भागास **मल्लिताल** हें नांव आहे. उतरलों तोंच जोराच्या पावसास सुरवात झाली; कपडे भिजून चिंब झाले. तरी श्री. दादा व श्री. नाना ह्यांस मोटारस्टँडवर बसवून राहाण्याकरितां जागेच्या शोधास लागलों; अगदीं घाणेरड्या लहान लहान खोल्यांचें रोजीं ३ रु. भाडें सांगत. **हिमालय हॉटेल-इंपिरिअल हॉटेल** ह्यांमध्यें चवकशी केली तरीहि थर्ड क्लास खोली तीन :रुपये रोजाखालीं नव्हती. मल्लीतालवर धर्मशाळा आहे असा पत्ता लागला परंतु तें एक मैल लांब होतें व खोली न मिळाल्यास दोन मैल फुकट हेलपाटा पडणार म्हणून तिकडे जाण्याचा बेत रहीत केला. मग **कूर्मांचल** भोजनालय नांवाच्या खाणावळींत चवकशीस गेलों, मॅनेजरसाहेबास बदरीकेदारच्या यात्रेहून आल्याचें सांगितल्यामुळें त्यांनीं अगदीं लहानशी २ माणसांस मोठ्या कष्टानें झोपतां येईल अशी खोली रोज एक रुपाया भाड्यानें दिली, तींत एक खाट असल्यामुळें दोघांस खाटेखालीं पाय सोडून व एकास खाटेवर अशी सोय लावून घ्यावी लागली. येथें खाणावळीचे दर मात्र अगदीं थोडे म्हणजे माणशीं वेळेस चार आण्यांपासून आहेत. दुसऱ्या दिवशीं सकाळीं धर्मशाळेच्या तपासाकरितां व बाजार वगैरे पाहाण्याकरितां बाहेर पडलों. सरोवरांतून नावेनें माणशीं दोन आणेप्रमाणें पैलतीरास जातां येतें, परंतु माणसें जमेपर्यंत वाट पहावी लागते. म्हणून सरोवराच्या कांठाकांठानेंच निघालों. कांठावर पक्की सडक सरोवराच्या सभोंवतीं बांधली आहे. सरोवराची खोली जास्तींतजास्त ९३ फूट आहे. आकार लंबवर्तुळाकार असून पाणी हिरवट रंगाचें व पिण्यास निरुपयोगी आहे. समुद्रसपाटीपासून सरोवर ६५३३ फूट उंचीवर आहे. इतक्या उंचीवर असलेलें गोड्या पाण्याचें सरोवर पृथ्वीतलावर दुसरें नाहीं असें म्हणतात. सभोंवताच्या टेकड्यांची उंची ७ हजारांपासून नऊ हजार फुटांपर्यंत आहे व त्यांवर ठिकठिकाणीं बंगले बांधले आहेत. त्यामुळें श्रीमंतांस एका बंगल्यांतून दुसऱ्या बंगल्यांत जातांना कित्येक वेळां ४।५ मैलहि प्रवास करावा लागतो व त्याकरितां प्रत्येक बंगलेवाल्याजवळ ५।६ माणसांनीं ओढावयाचें एकाद दुसरें रिक्षा नांवाचें वहान असतेंच. जूनमध्यें येथलि उष्णतामान जास्तींत जास्त ८५ अंशापर्यंत जात असल्यामुळें संयुक्त प्रांतांच्या गव्हर्नराचा उन्हाळ्यांत मुक्काम येथें असतो. हिवाळ्यांत येथील लोकवस्ती आठ हजार असते ती उन्हाळ्यांत सोळा हजारापर्यंत वाढते. इ० स० १८३९ पर्यंत ह्या तलावाचा उपयोग शेजारच्या डोंगरावर राहणाऱ्या मेंढपाळांच्या मेंढयांस पाणी पिण्याकरितांच होत असे. परंतु पुढें येथें वस्ती वाढण्यास सुरवात झाली व इ. स. १८४२ पासून युरोपियन लोक येथें येऊन राहूं लागले. मात्र हें

प्रेक्षणीय स्थळ पुष्कळ दिवसांपासून लोकांच्या माहितींत असावें असें वाटतें. कारण सुप्रसिद्ध चिनी प्रवासी ह्यु एन् स्यांग ह्यानें त्या ठिकाणास भेट दिल्याचा उल्लेख त्याच्या प्रवासवर्णनांत आहे. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धांत घाबरलेल्या इंग्रजांनीं दडून बसण्याकरितां ह्या ठिकाणचा उपयोग केला होता. पिण्याकरितां झऱ्याचें पाणी बांधून आणून तें एंजिनानें वरतीं चढविलें आहे. मल्लीताल येथें युरोपियन व्यापाऱ्यांचीं मोठमोठीं दुकानें आहेत. सभोंवतालचा भाग पाहून येण्याकरितां २ तासास १ रु., ४ तासास १॥ रु. अशा भावानें घोडेहि मिळूं शकतात. मल्लीताल येथें नैनीदेवीचें देऊळ असून देवळाजवळ एक धर्मशाळाहि आहे. उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळें



नैनीताल-मोठा बाजार व सरोवर.

धर्मशाळेंतील सर्व खोल्या भरून गेल्या होत्या व आंत डोकावून पाहिलें तों बहुतेक जागा श्रीमंत लोकांनींच आडविल्या होत्या. गरीब लोक पडवींत उघड्यावर अगर पावसांत झाडांखालीं पडले होते. मल्लीताल पाहून एका टेकडीवर चढलों ती टेकडी देवदार वृक्षांनीं भरलेली असून शिवाय तीवर निरनिराळ्या रंगीबेरंगीफुलांनीं भरलेलीं लहानलहान झाडेंहि जिकडे तिकडे दिसत होतीं. वाटेनें श्रीमंत लोकांचे बंगले लागत होते. प्रत्येक बंगल्यासभोंवतीं सुंदर बागा असून त्यांत चित्रविचित्र रंगाचीं फुलझाडें आढळून येत होतीं; तो देखावा पाहतां पाहतां दिवे लागून गेले व त्या दिव्यांचें प्रतिबिंब जेव्हां टेकडीच्या पायथ्याशीं असलेल्या सरोवरांत दिसूं लागलें, तेव्हां तर टेकडीवरून हलूंच

नये असें वाटूं लागलें; परंतु रात्र होईल म्हणून तसेंच परतलों व दुसऱ्या दिवशीं (ता. १८।६।३० ) सकाळीं मोटारनें निघून तेथून २२ मैलावर असलेल्या काथगोदाम ह्या स्टेशनवर येऊन दाखल झालों.

## काथगोदाम.

हें रोहिलखंड कुमाऊन रेल्वेवरील मोठें स्टेशन आहे. पूर्वी येथें काथाचा मोठा व्यापार चालत असे. सध्यां ह्या ठिकाणाहून नैनीताल, राणीखेत, अलमोडा वगैरे ठिकाणीं मोटारी जात असल्यामुळें मोटारींचे पुष्कळ कारखाने येथें आहेत. येथून आगगाडीनें निघून संध्याकाळीं पांच वाजतां काशीपूर येथें दाखल झालों.

## काशीपूर.

पूर्वकाळीं काशीपूर हें फार मोठें शहर होतें. ह्याची लांबीरुंदी अनुक्रमें १२ व १० मैल होती. सध्यां मात्र हें एक लहानसें शहर आहे. येथील उदयराज हिंदू हायस्कूलचे हेडमास्तर श्री. **त्र्यंबक महादेव जोग**, एम्. ए. एल्. टी. हे श्री. नानासाहेब जोगांचे आप्त असल्यामुळें त्यांच्याकडेच मुक्काम केला. यात्रेच्या श्रमानंतर महाराष्ट्रीय पद्धतीच्या आदरातिथ्याचा लाभ झाल्यामुळें चांगलाच श्रमपरिहार झाला. तापांतून उठल्यानंतर जशी मनुष्याची परिस्थिति होते तशीच कांहीं अंशीं माझी स्थिति झाली होती. त्यांनीं आम्ही फार कष्ट करून आलेलों म्हणून आमची फार चांगली व्यवस्था ठेविली होती. रोज कांहीं तरी मेजवानीचा बेत होता. जीभ तर काय तयारच होती परंतु प्रवासाचे रोजचे श्रम सुटल्यामुळें कोठ्याची निरनिराळे पदार्थ पचविण्याची तयारी नव्हती; परंतु तो विचार अगोदर सुचला नाहीं व पुढें मात्र त्रास झाला. तेथें ३ दिवस मुक्काम करून त्यांचे आभार मानून रामनगर येथें गेलों.

## रामनगर.

हें ठिकाण काशीपुराहून रेलवेनें १७ मैल आहे. शेंकडा ८० यात्रेकरू **बदरीनाथाहून** परत रामनगरास येतात. तशाच पहाडांतील सर्व वस्तू येथील बाजारांत येतात. मोठा व्यापार लाकडांचा आहे. गांवाजवळ रामगंगेस बंधारा बांधून गंगेच्या पाण्याचा कालवा काढला आहे. येथें सेवासमितीतर्फे फार उत्तम काम चाललें आहे. सेवासमितीनें एक दवाखाना चालविला असून गरीब यात्रेकरूंस समितीतर्फे २ वेळां फुकट जेवणही मिळूं शकतें. रामनगराहून आगगाडीनें निघून काशीपूर, मोरादाबाद इत्यादि स्टेशनावर गाडी बदलून ता. २१।६।३० रोजीं **हरिद्वारला** येऊन दाखल झालों. येथें माझी प्रकृति एकाएकी बिघडली म्हणून मला धर्मशाळेंतच पडून राहावें

लागलें. श्रम न करितां जादा खाण्यानें पोट बिघडलें, तेव्हां ३।४ रुपये खर्च करून औषधें, इंजेक्शन वगैरे सर्व उपाय करून २ दिवसांत सुटका करून घेतली व जिभेस आळा घातला. श्री. दादा ह्यांस घरीं परत जाण्याची घाई असल्यामुळें ते आम्हांस हरिद्वार येथेंच सोडून काशीकडे निघून गेले. बरोबर बरेच दिवस प्रवास केल्यामुळें ते परत गेले त्या दिवशीं फार वाईट वाटलें. दुसऱ्या दिवशीं हृषिकेश पाहून ता. २३।६।३० रोजीं आगगाडीनें डेहराडूनला गेलों. धर्मशाळेंत सामान ठेवून मोटारनें **मसूरीस** जाण्यास निघालों. येथून ६ मैलांवर हिमालयाच्या पायथ्याशीं **राजपूर** नांवाचें गांव आहे; तेथपर्यंतच पूर्वी मोटारनें जातां येत असे. परंतु नुकताच २।३ वर्षांपूर्वीं राजापूर ते मसुरी मोटाररस्ता झाला आहे. डेहराडूनपासून मसूरीचें माणशीं भाडें १ रु. पडलें. मोटार गांवापर्यंत जात नाहीं. ३ मैल अलीकडे उभी राहाते; पुढचा रस्ता अद्याप तयार व्हावयाचा आहे, पायरस्त्यानें गेल्यास राजपुराहून मसुरी ७ मैल आहे.

## मसूरी.

सुमारें २ मैल चढल्यानंतर बाजारास सुरवात झाली. ह्या बाजारास लांडूर बझार असें नांव आहे व ह्याच नांवाचें पोष्टआफिसही आहे. आम्हीं गेल्याबरोबर धर्मशाळेची चवकशी केली तोंच बाजारांतच सनातनधर्म,--धरमशाळा नांवाची धर्मशाळा लागली. धर्मशाळेंत सनातनधर्मीय हिंदूस ३ दिवस फुकट राहूं देतात. एक देऊळहि धर्मशाळेंत आहे. जागा मोठ्या जिकिरीनें मिळते. परंतु मिळते मात्र निश्चित. धर्मशाळेंतलि खोलींत सामान टाकून व खोलीस कुलूप लावून बाहेर पडलों. नैनितालला जशी सरकारी अधिकारी व त्यांच्याशीं **लाळघोटेपणा** करण्याकरितां येणारे **श्रीमंत व संस्थानिक** यांची गर्दी येथें नाहीं त्यामुळें हें ठिकाण शांत वाटतें. सभोंवतीं सर्व टेकड्यावर दाट झाडींत असलेले शेंकडों बंगले दृष्टीस पडतात. येथें विशेषतः व्यापारधंदा करून थकलेले लोक विश्रांतीकरितां येतात. ह्या ठिकाणाची समुद्रसपाटीपासून सुमारें ७००० फूट उंची आहे. ह्या ठिकाणास Queen of the Hill-Stations म्हणजे " हवाशीर डोंगरी ठिकाणांची राणी " हें नांव आहे. वस्ती उन्हाळ्यांत सुमारें १६००० असून ती आसपासच्या सोळा मैल टापूंत वसली आहे. **महात्मा गांधी** मसुरीस एकदां प्रकृतिस्वास्थ्याकरितां गेले होते. त्या वेळीं तेथलि रहिवाशांनीं त्यांस १० हजारांची थैली अर्पण केली होती, गांवांत, आर्यसमाजमंदिर, बेंगाली लायब्ररी वगैरे अनेक संस्था असून फारच उत्तम बांधलेलें **टिळक मेमोरियल लायब्ररी** नांवाचें वाचनालय आहे. त्यांत कांहीं वेळ वाचण्यांत घालविल्यानंतर चौफेर फिरून परतलों; तों डॉ. **व्ही. जी. मंत्री** यांचा दवाखाना

लागला. महाराष्ट्रीय नांव पाहिल्यावरोबर दवाखान्यांत चढलों. डॉक्टरसाहेबांनींही महाराष्ट्रीय म्हणून बरीच आस्था दाखविली. ते येथें दांताचा दवाखाना चालवितात. त्यांचा एक दवाखाना लखनौस आहे, परंतु सीझनमध्यें श्रीमंत गिऱ्हाइकें इकडे येतात म्हणून तेही आपलें आसन हालवून इकडे येतात. सर्व ठिकाणीं टेलिफोन आहेत. त्यांचा धंदा बरा चालतो. एका महाराष्ट्रीयानें ह्या प्रांतांत आपलें बस्तान चांगलें बसविल्याचें पाहून आनंद झाला. त्यांजकडून बरीच माहिती घेऊन परतलों तो डेहराडूनला येऊन तेथून दुसऱ्या दिवशीं मोटारीनें **सहाराणपूरला** गेलों व तेथून आगगाडीनें आंबाल्याहून कालकास्टेशनवर येऊन पोहोंचलों. येथून **सिमल्या**कारितां लहान गाडीनें प्रवास करावा लागतो. रात्रीची वेळ असल्यामुळें लोक पुष्कळ असून प्रत्येकास झोंपण्यापुरत्या जागेची जरूर भासत असल्यामुळें त्रास झाला. वास्तविक त्या गाडीचा प्रवास दिवसा करावयास पाहिजे होता; परंतु ' **रात्र थोडी सोंगें फार** ' ह्या म्हणीप्रमाणें शक्य तितक्या लवकर प्रवास उरकणें असल्यामुळें तसेंच रात्रीं निघालों. झोंपण्यास जागा नसल्यामुळें रात्र जागूनच काढावी लागली. रेल्वे लाइन अडीच फूट रुंदीची असून डबेही लहान असतात. धुराचे फवारे सोडीत व चढून दम लागत असल्यामुळें जणूं कांहीं उसासे टाकीत गाडी चालली होती. कोळशाचे बारीक कण हवेंत जिकडेतिकडे पसरले होते. म्हणून बाहेर तोंड काढण्याची सोय नव्हती. एकतर तोंड काळें होणार व डोळ्यांत कण गेल्यामुळें चोळून डोळे लाल होणार, अर्थात् जागरणाच्या त्रासांत ह्या लालीची भर पडल्यास चेहरा भीतिदायक वाटल्याशिवाय कसा राहील ! अस्तु.

इतर डोंगरीं ठिकाणें व **सिमला** ह्यांत एक फरक असा आहे कीं, इतर ठिकाणीं गाडीनें जावयाचें असल्यास चढावयास सुरवात झाल्याबरोबर सारखा चढावच चढावयाचा असतो. परंतु सिमला हें सपाट प्रदेशापासून हिमालयाच्या आंत साठ मैलांवर असल्यामुळें पहिले पंचवीस मैल **कालक्या**पासून **कुमारहट्टी**पर्यंत गाडी समुद्रसपाटीपासून ५१८० फुटांपर्यंत चढते, पुढें ती खालीं उतरण्यास सुरवात होते, ती ८ मैलपर्यंत **सोलोन ब्रुअरी**पर्यंत उतरते. पुन्हां १ मैल चढून पुढें **फंडा घाट**पर्यंत ४ मैल उतरते व मग जी चढावयास सुरवात होते ती मात्र **सिमल्या**-पर्यंत सारखी चढत असते. अर्थात् चढ-उताराचा प्रवास फारच आनंददायक असतो. वाटेंत अनेक पूल व १००।१२५ बोगदे आहेत. रेलवे लाइन एकावर एक पायऱ्या सारख्या बांधलेल्या दिसतात. बंगले तर किती आहेत त्याची गणतीच करितां येत नाहीं. **धरमपूर** स्टेशनपासून **कसावली**

ह्या प्रसिद्ध हवा खाण्याच्या व सेंट्रल रीसर्च इन्स्टिटयूट ही संस्था असलेल्या ठिकाणा-



लांढूर--बझार, मसूरी.

पर्यंत मोटारी मिळतात. अंतर ८ मैल आहे. एक लहानसा घोडे वगैरे जाण्यासारखा रस्ता कालक्याहून कसावलीपर्यंत आहे. अंतर ९ मैल आहे. परंतु आगगाडी व

मोटारची सोय झाल्यापासून त्या रस्त्यानें फारसें कोणी जात नाहींत. कसावलीची उंची समुद्रसपाटीपासून ६३२२ फूट आहे. पहाटे ५॥। वाजतां गाडी **तारादेवी** नांवाच्या-सिमल्याच्या अलीकडील ७ मैलावरील--स्टेशनवर आली व लगेच मोठमोठ्या चोपड्या हातांत घेतलेले ८।१० इसम गाडींतील प्रत्येक डब्यांत एक ह्याप्रमाणें शिरले व प्रत्येक उतारूचें नांव, गांव, पत्ता, येण्याचा उद्देश, सिमल्यास उतरण्याचें ठिकाण व किती दिवस अंदाजी राहाणार तें वगैरे सर्व माहिती त्यांनीं टिपून घेतली. सिमल्यास उतरण्याचें ठिकाण आम्हीं कांहींच मुक्रर केलें नव्हतें. परंतु जेव्हां त्यांनींच आमच्या दरिद्री वेषाकडे पाहून '**सनातन धर्ममंदिरांत**' काय ? म्हणून पृच्छा केली, तेव्हां होय सांगून मोकळे झालों ते सर्व इसम सरकारच्या **सी. आय. डी.** खात्यांतील होते. सिमल्यास अखिल हिंदुस्तानांतील सरकारी अधिकारी व संस्थानिक येत असल्यामुळें व सर्वांचाच कारभार जुलमी असल्यामुळें प्रत्येकांस आपल्या जीवास कोणी धोका देईल अशीं भिती वाटते. म्हणून कोणी खून वगैरे तर करण्यास आला नाहींना अशा शंकेनें सर्वांची त्या स्टेशनवर व नंतर ते उतरले असतील तेथें सारखी चवकशी असते. इतका त्रास घेण्यापेक्षां ह्या जुलमी लोकांनीं आपल्या वर्तनांत सुधारणा केली तर चालणार नाहीं काय ? पण **बुर्बोन राजे शहाणे होण्याचा जसा संभव नव्हता तसाच हेहि** वेळींच **शहाणे होण्याचा संभव दिसत नाहीं. असो.**

## सिमला.

ता २६।६।३० रोजीं सकाळीं ७ वाजतां सिमल्यास येऊन दाखल झालों. शेंकडों हाटेलांचे एजंट आपल्या नांवांचीं कार्डें घेऊन गिऱ्हाईकें गांठण्याकरितां फिरत होते. परंतु आमच्याकडे पाहून कार्डें देण्याकरितां पुढें केलेले हात त्यांनीं आवरून धरिले. ज्यांना मुळींच गिऱ्हाइक मिळालें नव्हत अशा दोन चार धाडसी एजंटांनीं कार्ड वगैरे खर्ची न टाकतां उगाच विचारून पाहिलें. परंतु त्यांच्या अपेक्षे-प्रमाणेंच उत्तर मिळाल्यामुळें त्यांनीं पाय मागें घेतला.


आमच्याजवळ फारसें सामान नव्हतेंच. कारण बिनजरूरीचें सामान आम्हीं **काल-कपास** स्टेशनमास्तरच्या ताब्यांतील **क्लोकरूमध्यें** ठेवूनच आलों होतों. अर्थात् सामान डोक्यावर घेऊन स्टेशनच्या बाहेर पडलों व तारादेवी स्टेशनवर मिळालेल्या माहितीवरून सनातन धर्ममंदिराच्या चवकशीस लागलो. तेव्हां स्टेशनवर उगाच फिरत असलेला एक इसम ठिकाण दाखविण्याकरितां बरोबर येण्यास तयार झाला. सुमारें १ मैल चढउतार झाल्यानंतर मंदीर आलें तेव्हां मंदिरांत जागा आहे किंवा

नाहीं ह्याची चवकशी करण्याकरितां तो इसम देवळांत गेला. देवळांतलि पुजाऱ्यानें तो इसम मुसलमान आहे हें चटकन ओळखलें व त्याच्या दोन श्रीमुखांत देऊन त्यास देवळा बाहेर घालविल व तो माझ्याही आंगावर धावून आला; परंतु मी हिंदू आहे ही खात्री करुन दिल्यामुळें बचावलों. त्यानें मजला २।४ शेलक्या शिव्या हासडून देवळाबाहेर घालविलें व पाण्यानें प्रोक्षण करून आम्हीं आक्रमण केलेला सर्व रस्ता शुद्ध केला.

आमच्या शिवाशिवीच्या कल्पना किती मूर्खपणाच्या आहेत ह्याचा अनुभव पदोपदीं येतो. पुण्यांत एका देवळाच्या पंचाची जागा अडवून त्या देवळांत अस्पृश्यांस येण्यास मज्जाव करणारे एक शिष्ट राजरोसपणें अहिंदूच्या हातचें भोजन करण्याकरितां गव्हर्नराच्या बंगल्यावर जातात व सत्यसनातनी म्हणून मिरवतात; कां आहे कीं **मूर्खांचा बाजार !**

आपल्या इकडून तिकडील प्रांतांत गेलेल्या लोकांस पंजाबांतील हिंदू व मुसलमान पोषाखावरून ओळखतां येत नाहींत. त्यांचा पोषाख जवळजवळ सारखाच असतो; फक्त हिंदूंचे कान टोंचलेले असून त्यांत डूल असतात त्यावरून हिंदू ओळखता येतात. दुसरें पंजाबांतलि लोक मारामारीवर फार लवकर येतात. देऊळ सार्वजनिक असल्यामुळें शेंकडों लोक येत जात होते. मारामारीच्या भानगडीमुळें गर्दी जमली तेव्हां एका इंग्रजी जाणणाऱ्या गृहस्थास श्री. नानासाहेबांनीं आपली केस फार व्यवस्थितपणें समजावून दिली. त्यांचें वकिली भाषण व पेशा ह्यामुळें मग मात्र आमची दाद लागली व मोठ्या जिकिरीनें आम्हांस राहण्याकरितां एक खोली फुकट मिळाली. आम्हीं सिमल्यास तीन दिवस मुक्काम केला होता. जवळच पंजाबी हिंदूंच्या २।४ खाणावळी असल्यामुळें व त्यांत ३।४ आण्यांत पोटभर जेवण मिळत असल्यामुळें आमच्या ३ दिवसांच्या सिमल्याच्या वास्तव्याचा खर्च अवघा दोन रुपये झाला. **सिमल्याच्या** हॉटेलांतून उतरल्यास रोजीं कमींत कमी माणशी ७ रुपयांपासून १८ रुपयांपर्यंत आकार पडतो. सिमला हें **उधळखोर संस्थानिकांचें** वास्तव्याचें ठिकाण असल्यामुळें चैनीकरिता लागणाऱ्या, बागा, रेसेसची मैदानें, नाटक व सिनेमाचीं थिएटरें, नाचण्याच्या जागा, क्रिकेटची मैदानें, टेनिस कोर्ट; चैनीच्या वस्तूंचीं दुकानें वगैरे सर्व गोष्टी येथें आहेत. मात्र कांहीं २।४ विशिष्ट लोकांस गांवांतून मोटारीनें जातां येते. बाकीच्या लोकांस रिक्षांतून अगर चालत जावें लागतें. पुण्यासारख्या शहरांतून जशी ठिकठिकाणीं घाण सांचलेली दृष्टीस पडते तशी येथें दृष्टीस पडत नाहीं, कारण मोठमोठ्या अधिकाऱ्यांस सुद्धां पायीं चालावें लागत

असल्यामुळें चालतांना ती घाण सहजच त्यांच्या नजरेस येते. पुण्यास ज्यांना घाण दूर करण्याचें सामर्थ्य आहे असे लोक मोटारींतून जात असल्यामुळें घाण त्यांच्या नजरेसच पडत नाहीं, त्यामुळें ती दूर करण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं. सर्वांनीं पायींच चाललें पाहिजे असा नमुन्याकरितां कांहीं दिवस जर म्युनिसिपॅलिटीनें कायदा केला तर पुण्याची घाण लवकरच नाहींशी होईल. **परमेश्वरी अवकृपेमुळें** ज्यांस मोटार अगर टांगा ठेवण्याची ऐपत आहे असेच श्रीमंत लोक म्युनसिपॅलिटींत जास्त असल्यामुळें त्यांजकडून असा कायदा पास होण्याची आशाच नाहीं. राशियांत याचकरितां श्रीमंतांचा **मत** देण्याचा सुद्धां हक्क काढून घेतला आहे. मग निवडणुकी-



**बर्फ पडल्यानंतर दिसणारा मसुरीचा देखावा.**

करितां उभे राहण्याचा प्रश्नच बाजूस राहिला. जो पायांत घातल्याशिवाय रस्त्यानें चालत असेल त्यास कोणता रस्ता उखडला आहे कोठें घाण पडली आहे हें कळणार; गाडींतून जाणारांस कळणें शक्यच नाहीं.

रस्त्यावर कागद टाकण्याकरितां सुद्धां ठिकठिकाणीं लहान लहान करंड्या ठेवलेल्या आढळल्या. रस्ते अगदीं स्वच्छ होते, व सार्वजनिक संडास तर नमुनेदार होते, दर १०-१५ मिनिटांनीं पाण्याचा मोठा लोंढा सर्वत्र वाहात येऊन संडास साफ होत. ज्यांच्या राजकारणाचा डाव सध्यां **कुजत** पडला आहे—म्हणजे ज्यांच्या राजकारणास सरकार अगर जनता कोणीच किंमत देत नाहीं—अशा **तृतीयपंथी** लोकांनीं उगाच शुष्क वादविवादाकरितां सिमल्याचे हेलपाटे मारण्यापेक्षां तेथें जशी

स्वच्छता दिसली तशी स्वच्छता गांवाच्या म्युनिसिपॅलिटीकडून करून घेण्याचा प्रयत्न करावा. म्हणजे राजकारण संन्यासाचें दुःख थोडें कमी होईल. व कांहीं तरी लोकोपयोगी काम केल्याचें मानसिक समाधान लाभेल.

सिमला हें लहान लहान ५-६ टेकड्यांवर वसलें आहे. त्यामुळें एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाणें म्हणजे २ मैल चढणें व दोन मैल उतरणें अशा तऱ्हेनें सिमला संपूर्ण पहाण्यास एक महिना लागेल. म्हणून फक्त नमुन्याकरितां एक दोन बागा, कांहीं क्रीडांगणें वगैरे आम्हीं पाहिलीं. शिपायास कांहीं चिरिमिरी देऊन असेंब्ली हॉल पाहिला. 'गरीब शेतकऱ्यांच्या घामाच्या पैशाचा विनियोग शुष्क वादविवाद करण्याकरितां असलेल्या टोलेजंग इमारती बांधण्यांत व तेथें जाणाऱ्या शिष्टांस भत्ते देण्यांत व्हावा ना!' असे विचार सहजच मनांत येऊन गेले परंतु '**भवितव्यता बलीयसी**' म्हणून पुढें चालूं लागलो. नंतर सेक्रेटरीएटची इमारत पाहाण्यास गेलों. चवकशीकरितां श्री. **जोगळेकर** नांवाचे महाराष्ट्रीय गृहस्थ तेथें असल्याचें समजलें; त्यांची भेट घेतली. त्यांनीं शिपाई बरोबर देऊन सर्व इमारत दाखविण्याची व्यवस्था केली. सरकारी नौकरी करणारे सुमारें १०-१५ महाराष्ट्रीय तेथें सहकुटुंब राहात असल्याचें समजलें. संध्याकाळीं त्यांनीं भोजनाचें आमंत्रणहि दिलें परंतु तें आम्हीं साभार नाकारिलें.

सिमला व त्याच्या आसपासचा भाग हा अनेक लहान लहान संस्थानिकांच्या ताब्यांत होता परंतु त्यांत एकजूट नसल्यामुळें त्यांच्या भांडणांचा फायदा गुरख्यांनीं घेऊन तो प्रांत आपल्या ताब्यांत आणिला. परंतु **जगांतील राजांच्या आपसांतील कलहाचा फायदा घेण्याचा मक्ता ज्यांस दिला आहे** अशा इंग्रजांस ही गोष्ट कधींच रुचणें शक्य नव्हतें. ते फक्त संधीची वाट पहात होते. युरोपांत जोंपर्यंत **नेपालियन** धुमाकूळ घालीत होता व **रशियाच्या** स्वारीचा इंग्रजांस धाक होता तोंपर्यंत ते स्वस्थ बसले. परंतु नेपोलियनचा जोर कमी झाल्याचें पाहून पूर्वीच्या राज्यास मुकलेल्या कांहीं संस्थानिकांस हातीं धरून इंग्रजांनीं **गुरख्यास** ह्या प्रांतांतून घालवून दिलें व आपल्या उपयोगी प्रदेश स्वतःकडे ठेवून बाकीचा त्या संस्थानिकांस दिला. शिवाय त्या संस्थानिकांच्या संरक्षणाची हमी घेऊन त्यांजवर **खंडण्या लादल्या**. सिमल्याची लोकसंख्या दिवसेंदिवस जास्त वाढत चालल्यामुळें इंग्रजांस जास्त प्रदेशाची आवश्यकता भासूं लागली व इंग्रजांची गरज **पतियाळच्या महाराजानें** पुरवल्यामुळें अर्थात् त्यांचें प्रस्थ इंग्रजांच्याकडे वाढत

चाललें. त्यामुळें तो संस्थानिक किती **जुलमी** बनला आहे, ही गोष्ट **जगजाहीर** आहे.

पूर्वकाळीं ह्या प्रांतांतील शेतकऱ्यांस उत्पन्नाचा सहावा हिस्साच कर द्यावा लागत असे. आतांसारखा सरकारला वाटेल तितका कर द्यावा लागत नसे. म्हणून त्या काळीं प्रजा राजास देवाप्रमाणें मानीत असे.

इंग्रजांनीं जेव्हां कांहीं गांवें आपल्याकडे घेतलीं त्यावेळीं तेथील जमीनदारांनीं उत्पन्नाचा **सहावाच हिस्सा** जमीनमहसूल घेणार असल्यास तुमच्या ताब्यांत येतो नाहीं तर तयारी नाहीं असें ठासून सांगितलें. इंग्रजांस भांडण करण्यास **सवड** नसल्यामुळें त्यांनीं तें पत्करलें. पुढें संस्थानी मुलखांत सारावाढ झाली परंतु इंग्रजांनीं आपलें वचन पाळलें. इंग्रजांचें संरक्षण मिळाल्यामुळें हिंदुस्थानांतील सर्वच **संस्थानिक फारच शेफारले आहेत**. इंग्रजी मुलखापेक्षां संस्थानी मुलखांत सारावाढ जास्त आहे. हें संस्थानिकांच्या कैवाऱ्यांनीं एकवार डोळे उघडून पहावें म्हणजे आपण गरीब संस्थानी प्रजेच्या दृष्टीनें किती **शिक्षेस पात्र** आहोंत हें त्यांस कळेल.

**१८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धांत** इंग्रजांना सिमल्याचा-प्राणभयानें पळून आलेल्या गोऱ्या लोकांस आश्रयस्थान म्हणून उपयोग झाला. कसावलीच्या संरक्षणास ठेविलेल्या **गुरख्यांची तुकडी बिथरून सिमल्याच्या रोखानें** निघाल्यामुळें इंग्रजावर मोठा कठीण प्रसंग आला होता परंतु ते त्यांतून निभावले.

( Punjab Mutiny Report 1857. )

इ. स. १८१९ मध्यें लेफ्टे. रोज नांवाच्या एका इंग्रजानें सिमल्यास पहिली झोपडी बांधली. १८२६ सांत लॉर्ड ॲम्हर्स्ट हा ग. ज. प्रथम उन्हाळ्यांत सिमल्यास गेला व पुढील व्हॉइसरायांनीं त्याचा कित्ता गिरविला. मोठ्या लष्करी छावण्या मीरत व अंबाला ह्याही सिमल्यापासून नजीकच असल्यामुळें तेथें राहाणें इंग्रजांस सुरक्षितपणाचें वाटलें.

सिमल्याची समुद्रसपाटीपासून उंची ७०८४ फूट असून उन्हाळ्यांत सिमल्याची कमाल लोकसंख्या ९० हजारापर्यंत असते. कालक्याहून मोटारची सडक सिमल्यापर्यंत आहे; अंतर ५१ मैल आहे. सिमल्याहून एक रस्ता काश्मीर मधील **लद्दाक** अगर **लेह** ह्या गांवास गेला आहे व एक रस्ता तिबेटांतून **यार्कंद**पर्यंत गेला आहे. हे रस्ते पहाडी असल्यामुळें ते बारीकच आहेत व ते हिवाळ्यांत बंद असतात; परंतु उन्हाळ्यांत त्या मार्गानें पुष्कळ व्यापार चालतो. व्हाइसरायच्या बंगल्यानें बरीच जागा व्यापिली आहे. आंत शिरकाव होणें कठीण असल्यामुळें बंगल्या-

सभोंवतीं एक प्रदक्षिणा घालून बाहेरूनच बंगल्याचें निरीक्षण केलें. बाजारांत कांहीं दुकानें थेट मुंबईच्या कोटांत आहेत तशीं होतीं. कायदेभंगाची चळवळ जोरांत सुरू असल्यामुळें व्याख्यानें मिरवणुकी इत्यादि कार्यक्रम यथाक्रम चालू होते.

ता २८।६।३० रोजीं सिमला सोडून **आंबाला, मीरत, दिल्ली, अलीगड कानपूर, अलाहाबाद,** वगैरे गांवास भेटी देत देत कटणीस आलों. येथील सुप्रसिद्ध सिमेंट फॅक्टरीचे हेड् क्लार्क श्री. **माधव श्रीनिवास भानप,** *B. Sc.* यांचा व श्री. **नानांचा** फार परिचय असल्यामुळें एक दिवस त्यांच्याकडे मुक्काम टाकून ता. ३।७।३० रोजीं **बीन्यावरून सांचीस** आलों. स्टेशनवर खाणावळ वगैरे कांहीं नाहीं. तरी प्रथम सांचीचा स्तूप पाहून आलों. हा स्तूप स्टेशनपासून सुमारें पाऊण मैलावर आहे.



**सिमल्यांतील माल नांवाचा मोठा बाजार.**

हा स्तूप व आजूबाजूचीं इतर कोरीव कामें हीं अशोकाच्या वेळचीं आहेत. सुप्रसिद्ध चिनी प्रवासी **फा हैन** यानें ह्या ठिकाणीं **शाची** नांवाचें फार मोठें राज्य होतें, असें लिहून ठेविलें आहे. स्तूप पाहून परतलों तों पावसास सुरवात झाली होती; परंतु जवळपास खाणावळ अगर दुकान कांहींही नव्हतें: म्हणून स्टेशनपासून सुमारें दीड मैलावर असलेल्या गांवाचा रस्ता धरला. गांवाचे पाटील—मोतिलाल पटेल—ह्यांस यात्रेचें वृत्त कथन करितांच त्यांनीं शिधा वगैरे फुकट

दिला. मग तो स्टेशनवर आणून पोर्टरास थोडे पैसे देऊं करून त्याच्याकडून शिजवून आणून खाल्ला व संध्याकाळच्या गाडीनें बसून ता. ७।७।३० रोजीं कल्याण वरून **पुण्यास** दाखल झालों. सर्व मंडळी सुखरूप असल्याचें पाहून फार आनंद झाला.

---

# हिंदुस्थानची आशा नेपाळ.


त्रैलोक्यानां गरिष्ठोयम् नेपाल इति सर्वतः ।
द्वीपानां चैव सप्तानां जम्बूद्वीपो महत्तमः ॥
तस्मिश्चैव गरिष्ठं च वाराणसि स्थलं महत् ।
तस्माच्चतुर्गुणं ज्ञेयं श्रेष्ठं क्षेत्रं च कामदम् ॥
भुक्तिमुक्तिप्रदं साक्षात् पशुपतिस्थलं महत् ।
जम्बुद्वीपे पुरौ द्वौहि रुद्रेणाधिष्ठते निशम् ।
काशी पशुपती चैव तयोः पाशुपतावर ॥

हिमखंड अध्याय ५७.

इंग्रज अजिंक्य ही कल्पना उराशीं बाळगून बसणाऱ्या लोकांच्या डोळ्यांत अंजन घालणाऱ्या ज्या अनेक गोष्टी **हिंदुस्तानच्या** इतिहासांत आहेत त्यांत पहिली इ. स. १७७९ मध्यें इंग्रजांची मराठ्यांनीं **काल्याच्या** लढाईंत उडविलेली धुळधाण व इंग्रजांनीं नामुष्कीनें मराठ्यांपासून मेहेरबानीनें परत **मुंबईस** जाण्याकरितां मिळविलेली सवलत ही असून दुसरी गोष्ट म्हणजे **नेपाळच्या १८१५** सालच्या लढाईंत इंग्रजांचा झालेला पूर्ण पराजय ही आहे. तेंव्हां इंग्रज अजिंक्य आहेत असें वाटल्यास मुसलमानांनीं समजून त्यांच्याशीं लाळघोटेपणा करावा परंतु इंग्रजांना खडे चारून स्वतंत्र राहिलेलें एकच एक नेपाळचें हिंदुराज्य जोंपर्यंत पृथ्वीतलावर आहे, तोंपर्यंत हिंदू लोकांस तरी तसें समजण्याचें कारण नाहीं. अशा तऱ्हेचें जगांतील एकच एक स्वतंत्र हिंदुराज्य प्रत्येक स्वातंत्र्येच्छु हिंदूनें जरूर पाहिलें पाहिजे असें मला वाटतें. तो योग मला दोनदां म्हणजे इ. स. १९१७ व इ. स. १९३२ सालीं आला.

१९१६ च्या नवंबरांत खिशांत पैही नसतांना **काशीच्या** रोखानें चालण्यास सुरवात करून १९१७ च्या जानेवारींत **काशी** गाठली. तेथें एक दिवस अन्नछत्रांत बातमी लागली कीं कांहीं मंडळी नेपाळच्या यात्रेस जाण्याचा विचार करीत आहेत. तेंव्हां मला पण इच्छा झाली. एक ब्ल्यांकेटाची गरम कफनी शिवून घेतली "रसी लोटा


कंबल सोटा और पाव मे जूता" हीं साधूंस लागणारी सर्व सामुग्री बरोबर होतीच. सोट्याची अडचण होती; परंतु काशीच्या पायी प्रवासांतील माझे सहप्रवासी **श्री. घारपुरे** B.A. (सध्यांचे **परमहंस प्रज्ञानेश्वर यती**) यांनीं आपला सोटा देऊन ती दूर केली. व **बनारस, छपरा, सोनपूर मुझफरपूर, शिगौली** ह्या गांवांवरून कांहीं चालत कांहीं रेल्वेनें असा **रक्सौलला** पोहोंचलों. दुसऱ्या वेळीं **मुंबईहून कलकत्ता** मेलनें निघून मोगलसराईस उतरलों व तेथून गार्डी बदलून पाटण्यास गेलों व पाटण्याहून गंगानदींतून बोटीनें दीघाघाटावरून निघालों. गंगानदीचें पाणी संथ



**बालाजी खेड्याचें दृश्य.**

असल्यामुळें प्रवास अत्यंत आनंददायक वाटला. सुमारें दोन तास प्रवास करून पैलतीरावरील **पिलझा** घाटावर आलों व तेथून आगगाडीनें सोनपुराहून **रक्सोलला** आलों. दुसरा प्रवास **श्री. नानासाहेब जोग** ह्यांच्या कृपेनें घडला. मी त्यांजबरोबर वाटाड्या म्हणून होतों शिवाय ठाण्याहून श्री. **दामोदर भास्कर पटवर्धन** शिरस्तेदार डि. कोर्ट ठाणें, नांवाचे सहकुटुंब प्रवासास निघालेले गृहस्थ आमच्यावरोबर होते. म्हणून मजला स्वयंपाकाचा त्रास पडला नाहीं. **रक्सौल** येथें **अहमदाबादच्या न्यू हायस्कूलचे** हेडमास्तर **श्री. नारायण गणेश लेले** हेही भेटले त्यामुळें प्रवासास फारच मजा आली.

**नेपाळ** हें स्वतंत्र राज्य असल्यामुळें त्यांत शिरण्याकरितां आरंभीं तेथील राजाची परवानगी काढावी लागते व ती सहसा मिळत नाहीं; परंतु महाशिवरात्रीस तेथील सुप्रसिद्ध देवस्थान **पाशुपतेश्वर** ह्याची मोठी यात्रा भरत असल्यामुळें तीस मात्र सरसहा. सर्वांस परवानगी मिळते. पहिल्या वेळीं गेलों तेव्हां यात्रा सोडण्याबद्दल परवानगी आली नव्हती म्हणून **रक्सौलला** तीन दिवस थांबावें लागलें. तेव्हां **काशींतील** अन्नछत्रांत जेवणारी व भांग गांजाचें सेवन करणारी बरीच मंडळी भेटली. अनोळखी मुलखांतला प्रवास तेव्हां सोबत असावी म्हणून त्यांच्या घोळक्यांत शिरलों रोज एक पैशाची दोन मडकीं विकत आणून त्यांत सर्वांचा स्वयंपाक करावयाचा व नंतर मडकीं फेकून द्यावयाचीं असा कार्यक्रम होता. परंतु त्यांच्यापुढें




**बालाजी हिथिस.( नेपाळ. )**

भांगगांजाशिवाय दुसरें ध्येय नसल्यामुळें त्यांची संगत सोडून दिली व परवानगी मिळाल्यावर एकट्यानेंच चालण्यास सुरवात केली. रक्सौलपासून सुमारें दोन मैलांवर **वीरगंज** हें गांव लागलें. हें गांव नेपाळच्या हद्दींत येतें. रस्ता सपाटीचाच आहे. हिमालयांतील पाण्याचे पाट सर्वत्र वहात असल्यामुळें आजूबाजूची सर्व जमीन सुपीक दिसत होती. मधूनमधून लहानलहान गांवें लागत; परंतु त्यांचा मला फारसा उपयोग होत नसे. कारण नेपाळांत वर्षांतून एकदांच यात्रा जाण्यास परवानगी असल्यामुळें १०।१२ घरांच्या गावांत तीन चार हजार पाहुणे मंडळी येत. शिवाय दिवस

थंडीचे व प्रदेश थंड म्हणून प्रत्येकास निवाऱ्याच्या जागेची आवश्यकता वाटत असे, श्रीमंत यात्रेकरू घरवाल्याकडून माणशीं चार आण्यांपासून आठ आण्यांपर्यंतही भाडें देऊन जागा घेत. मजला तें शक्यच नसल्यामुळें उघड्यावरच पडण्याची वेळ येई. एकदां एका खेडेगावांत रात्रीचा वस्तीस गेलों. घरांत फुकट जागा मिळणें शक्यच नव्हतें; परंतु **गरजवन्तास अक्कल नाहीं** ह्या म्हणीप्रमाणें लाज बाजूस ठेवून एका शेतकऱ्यास म्हटलें कीं, " तुझ्या घरांत ज्या तूं बऱ्याच मेंढ्या ठेविल्या आहेस त्यांतील एकादी बाहेरच्या अंगास बांधलीस तर मला रात्रभर झोंपण्यास कशी तरी जागा होईल. घाण पत्करेल परंतु थंडी नको. परमेश्वर तुझें कल्याण करील." तो म्हणाला " मेंढी घराबाहेर बांधल्यास वाघ तिला घेऊन जाईल व माझें नुकसान होईल; त्यापेक्षां तुम्हीच बाहेर झोपा. " त्याचें म्हणणें खरेंही होतें. कारण मेंढी नेल्यास त्याचें प्रत्यक्ष नुकसान होतें. मला वाघानें नेल्यास त्याचा कांहींही तोटा होण्याचा संभव नव्हता. अर्थात् मला बाहेरच पडावें लागलें. मी एकटाच बाहेर नव्हतों. हजारों लोक बाहेर पडले होते त्यांत मी एक होतों. परंतु स्वार्थ कोणास सुटला आहे ! माझा रोजचा साधारण कार्यक्रम असा असे कीं सकाळीं उठून चालण्यास आरंभ करावयाचा. संध्याकाळपर्यंत सारखे चालावयाचें, प्रदेश थंड चोहोंबाजूनें जंगल म्हणून चालण्याचा विशेष त्रास होत नसे. फारच भूक लागल्यास एकाद्या पैशाचे पोहे खरेदी करावयाचे, वाटेंत गोड, गार पाणी मुबलक मिळत असे. संध्याकाळीं चारच्या सुमारास ओढ्याच्या अगर झऱ्याच्या काठीं मुक्काम टाकावयाचा. हिमालयाच्या पायथ्याशीं व टेकड्यांवर झाडी पुष्कळ असल्यामुळें जंगलांतून लाकडें आणून होळी तयार करावयाची. वाटेंत राजानें ठिकठिकाणीं सदावर्तें—कोरडा शिधा फुकट मिळण्याचीं ठिकाणें—उघडलेलीं असल्यामुळें व त्यांत पोटभरीचे तांदूळ मिळत असल्यामुळें ते तांदूळ लोटयांत घालून व त्यांत पाणी घालून त्या होळींत ठेवून द्यावयाचे. कांहीं वेळानें भात तयार होई. तो ओल्या फडक्यावर काडीनें उकरून घेऊन तिखटमीठ व पाणी ह्यांशी तो भात खावयाचा. भरपूर श्रम, स्वच्छ हवा, चांगली भूक ह्यामुळें तो भात अतिशय चविष्ट लागत असे व त्या अन्नावर मजला सर्व नेपाळचा प्रवास पायीं करितां आला. इंग्रजींत म्हटलें आहे. It is not what you eat, but it is what you digest makes you fat, अर्थात् मनुष्य जें खातो त्यानें तो सशक्त होत नसून जें तो पचवितों त्यानें तो सशक्त होतो. जर चांगल्या खाण्यानेंच सशक्त होतां येतें तर सर्व श्रीमंत लोक गरिबांपेक्षां जास्त सशक्त झाले असते. परंतु ह्याच्या उलट

स्थिति दृष्टीस पडते. **श्रीमंतांपेक्षां गरीबच जास्त सशक्त** असतात. ही गोष्ट लक्षांत घेऊन जर हे भोजनाच्या वेळीं पंक्तिप्रपंच करून रौरवनरकांत पडावयास जाणारे **नीच संस्थानिक** नुसता रामोत्सव किंवा गणेशोत्सव वा नारायणसंकीर्तन न करितां आपल्या वर्तनांत सुधारणा करतील तर किती चांगलें होईल बरें! परंतु मग यमाच्या राज्यांतील रौरवनरक बंद करावा लागेल त्याची वाट काय? भोजनोत्तर उघड्यावर तसेंच झगरीशीं एकदां पाठ व मग पोट शेकत पडावयाचें. सकाळीं उठून चालण्यास सुरवात करावयची. नेपाळांत गांजावर कर नसल्यामुळें ह्या



**श्रीगुह्येश्वरी माई.**


यात्रेस साधू लोक पुष्कळ येतात. कारण ब्रिटिश राज्यांत गांजा १० आणे तोळा मिळतो तर नेपाळांत तोच पैशास पांच तोळे मिळतो मग कोणता गांजेकस नेपाळांत जाण्याची इच्छा करणार नाहीं! मी एकटाच एका लोट्यावर प्रवास करणारा नव्हतों; तर दुसरेही हजारों लोक होते व एका टोळींतील ४ जणांचें सामान चोरीस गेल्यामुळें ५ माणसें एका तपेलीवर प्रवास करीत होतीं व मी त्यांजकडे पाहून मोठ्या आनंदानें स्वतःच्या मालकीच्या एका लोट्यावर मार्ग आक्रमण करीत होतों. मी स्वतः प्रयत्नांची शिकस्त करून नंतर माझ्यापेक्षां कमी भाग्यवान लोकांकडे पाहून स्वस्थितीबद्दल समाधान मानण्यास शिकलों असल्यामुळें माझा काळ सुखांत जातो. सध्यां **रक्सौल**पासून २४ मैलपर्यंत नेपाळच्या राजानें **नेपाळ गव्हर्नमेंट**

**रेल्वे** नांवाची रेल्वे बांधली आहे, माणशीं सव्वा सहा आणे भाडें पडतें. तिकीट ऑफिस **रक्सोल** स्टेशनजवळच असून तेथें पासपोर्टही फुकट विनायासें मिळू शकतो. रेल्वेनें **अमलेखगंजला** उतरल्यावर **भीमफेडी**पर्यंत मोटारलाऱ्या मिळू शकतात. गर्दी अतिशय असल्यामुळें सामान वगैरे चोरीस जाण्याची फार भीती असते व लारींत व गाडींतही जागा मिळण्यास फार त्रास पडतो.

**अमलेखगंज**पर्यंत रस्ता साधारण सपाट आहे. पुढें मात्र डोंगराळ प्रदेशास सुरवात होते. **भीमफेडीस** पासपोर्टची तपासणी होते व पहिले बदलून दुसरे पासपोर्ट मिळतात. भीमफेडीस एक चांगली बांधलेली धर्मशाळा आहे तींत कशीबशी भांडणतंटें करून जागा मिळविली. गांव बरेंच मोठें आहे. येथून पुढें चढण्यास सुरवात होते. मोटारचा रस्ता संपल्यामुळें चालत अगर कुलीच्या पाठीवरील करंडींतून अगर चार माणसांनीं उचलावयाच्या खटोली नांवाच्या वहानांतून प्रवास करावा लागतो. पूर्वीच्या प्रवासांत कुलींशीं देण्याघेण्याचा करार स्वतःच करावा लागत असे. आतां सरकारनें निरख ठरवून टाकिले आहेत त्यामुळें श्रीमंत यात्रेकरूंची सोय झाली; परंतु कुलींच्या पोटावर पाय आला. कारण कुलींस २० मैल पाठीवर मनुष्य वाहून नेण्याबद्दल अवघी ३ रु. मजुरी मिळते. खटोलीवाल्यास २ रु. ६ आणे मिळतात. परराज्य, स्वतःच्या राजाचें स्वतंत्र राज्य, प्रजासत्ताक राज्य व श्रमजीवी सत्ताकराज्य, ह्या चार प्रकारच्या राज्यव्यवस्थेपैकीं पहिल्या तिहींतही कामकऱ्यांस सुख लागत नाहीं ह्याचा प्रत्यक्ष अनुभव ह्या प्रवासांत येतो. सुमारें ३० हजार यात्रा होती तरी कुलींचें काम अगदीं थोड्या पैशांत करण्याकरितां त्या यात्रेस पुरून उरण्याइतके कुली हजर झाले होते. फाटक्या तुटक्या व अपुऱ्या कपड्यांवरून त्यांच्या दारिद्र्याची कल्पना सहज येई. कोकणांतील एका जिल्ह्यांतून फिरत असतां एका लहानशा गावांत **खादी वापरून** कांग्रेसचे निःसीम भक्त म्हणविणारे एक सावकार आढळले. ते म्हणाले " आमच्या जिल्ह्यांत जे फक्त तीनच सुताची वर्गणी देणारे कांग्रेसचे वर्गणीदार आहेत, त्यांत मी एक आहे. " तेव्हां अशा **महापुरुषाचें** दर्शन घडल्याबद्दल मला फार आनंद वाटला; परंतु चवकशी अंतीं असें समजलें कीं गृहस्थ अतिशय कवडीचुंबक आहेत. पोटीं पुत्रसंतान नाहीं. इष्टेट जावई वकील आहे त्यास ठेविली आहे; **नव्याकाळासारखें** कांग्रेसच्या चळवळीची माहिती देणारें, राष्ट्रीय वर्तमानपत्र घेण्यास सुद्धां तयार नाहींत. कुळांकडून त्यांच्या पोराबाळांची दयामाया न करितां खंड वसूल करितात व नुसते मांडीवर मांडी टाकून बसल्यानें प्रतिष्ठा मिळणार नाहीं म्हणून जुन्याकाळाच्या यंत्राचा चरखा बनवून सूत काढतात.


कां आहे कीं नाहीं देशभक्ति? अशा लोकांचा भरणा कांग्रेसच्या चळवळींत फार झाल्यामुळें मजूर पुढाऱ्यांचा कांग्रेसवर विश्वास नाहीं, अशा पुढाऱ्यांची कांग्रेसमधून हकालपट्टी झाली पाहिजे. असो. कुलींची व्यवस्था लावून चढण्यास आरंभ केला. नेपाळच्या वाटेंत महत्त्वाचे असे दोनच पर्वत आहेत. पहिल्याचें नांव **शीसा गढी** वं दुसऱ्याचें **चंद्रागढी**. एक एक डोंगर चढण्यास जवळ जवळ चार तास लागतात व त्यावरील रस्तेहि मुद्दामच चांगले बांधले नसल्यामुळें एकदां तरी पाय घसरतो. म्हणून नेपाळबद्दल "**जाये नेपाल तो फुटे कपाल**" अशी म्हण प्रचालित आहे. प्रत्येक गढीवर शिबंदी आहे. अर्थात् हल्ला करणाराला चार तास चढून किल्ला सर करणें जवळ जवळ अशक्य आहे. शिवाय नेपाळी लोकहि फार सशक्त आहेत. माझ्यासारख्यास चढाव नुसता चढणें म्हणजे प्राणसंकट वाटत होतें तर तोच चढाव नेपाळी मजूर पाठीवर मनुष्य घेऊन चढत होता. अर्थात् अशा लोकांपुढें इंग्रजांचा टिकाव कसा लागणार? इतकेंहि करून नेपाळी मजूर काय खातो विचाराल, तर तीन वेळां नुसता भात! दोन गढ्या उतरून यात्रेकरू **थानकोटला** येऊन पोहोंचला म्हणजे तेथून पुन्हा नऊ मैल **काटमांडू**पर्यंत मोटारलॉरी मिळते. भीमफेडीपासून थानकोट सुमारें २० मैल आहे. इतकाच प्रवास सध्यां पायीं करावा लागतो म्हणून आतां ही यात्रा फार सुखाची झाली आहे. पहिला सर्व प्रवास मजला रक्सौलपासून देवपाटणपर्यंत पायांनींच करावा लागला. लॉरीनें यात्रेकरू **पशुपतिनाथाच्या** देवळाजवळ येऊन पोहोंचतो. देवळाच्या आसपास बऱ्याच धर्मशाळा आहेत. व साधारण शंभर सव्वाशें घरांची वस्ती आहे. थोडे पैसे खर्च केले असतां कोठें तरी जागा मिळूं शकते. पहिल्या वेळीं मी गेलों त्या दिवशीं फुकट जागा कोठेंच न मिळाल्यामुळें एका भिंतीस एक मोठा कोनाडा होता, त्यांत मांडी घालून मजला रात्र काटावी लागली आणि ह्याकरितांच ह्या ठिकाणांस काटमांडू हें नांव प्राप्त झालें असावें असें वाटलें. दुसऱ्या दिवशीं मात्र लांबरुंद बिछाने पसरून स्वतःचीच सोय पहाणाऱ्या दोन यात्रेकरूंशीं भांडण करून जागा मिळविली. सामान चोरीस जाण्याची भिती फार असल्यामुळें तें पाठीवर घेऊनच सर्वत्र हिंडावें लागे. कपडे फाटकेच होते; परंतु "गरिबाचें गेलें घोंगडें व गरीब पडलें उघडें" ह्या म्हणीप्रमाणें त्यांसहि जपावें लागे. अंगांत कफनी असल्यामुळें सदावर्तें (कोरडा शिधा) पुष्कळ मिळत व तीं देऊन रोटीवाल्याकडून रोट्या घेऊन खात असें. त्या वेळीं आठ दिवस **काटमांडूंत** काढिले. शेवटच्या दिवशीं राजा सर्व साधूसंतांची संभावना करितो, म्हणून ऐकिलें होतें. तेव्हां ती मजा पहाण्यास गेलों. गोसावी, बैरागी

ह्यांचीं नांवें आपल्या नांवांपेक्षां भिन्न असतात व ते आपल्या नांवानंतर बापाचें नांव



श्रीपशुपतिनाथ मंदीर.

न सांगतां गुरूचें सांगतात. शिवाय त्यांचे पुष्कळ प्रकार आहेत. परंतु मला ह्यापूर्वी नांवांची फारशी अडचण पडली नव्हती. कारण मी आपलें नांव " **मोरेश्वर देव ब्रह्मचारी** " असें सांगत असे; परंतु तेथील कार्याध्यक्षानें एका ब्रह्मचारी नांव सांगणाऱ्या साधूस विचारिलें "तुम् कौन ब्रह्मचारी है ?" तो म्हणाला " हम् चैतन्य ब्रह्मचारी है ." इतकें ऐकल्यावर त्याचें समाधान झाल्याचें दिसलें. मी फक्त " प्रयोगाच्या सोईसाठीं " पोषाखांत फरक केला होता. मजला ब्रह्मचाऱ्यांचे प्रकार किती, यांची लक्षणें काय, वगैरे कांहींच माहिती नव्हती. परंतु प्रसंगास तोंड दिलेंच



विहारस्तूप, पाटण ( नेपाळ. )

पाहिजे म्हणून मला त्यानें विचारल्यावर मी सुद्धां चैतन्य ब्रह्मचारी म्हणून ठोकून दिलें. कारण वाटाघाट करण्यास सवडच नव्हती. मी कफनी घालून फिरत असे. बहुधा देवळांत उतरत असे. कांहीं जिज्ञासू ब्रह्ममायेच्या घोटाळ्याचे प्रश्न मला विचारीत. परंतु मजला त्यांतील कांहींच भानगड माहीत नसल्यामुळें मी स्मित हास्य करून व गंभीर मुद्रा धारण करून व वरती आकाशाकडे बोट करून " ये सब जाननेवाला परमात्मा तो उपर है, हम् कुछ जानते नहि. " असें खरेंच सांगून

आपला लीनपणाच व्यक्त करीत असे. पहिला प्रवास मी स्वतःच्या ज्ञानांत भर पडल्यास पहावी म्हणून केला होता. परंतु दुसरा प्रवास मी मिळविलेली माहिती शक्य तर मराठी वाचकांस देतां आल्यास द्यावी म्हणून केला होता. **पशुपतिनाथाचें मंदीर** ज्या भागांत आहे, त्या भागास **देवपाटण** म्हणतात. देवळांत पंचमुखी शाळुंका असलेली **शंकराची** पिंडी आहे. देवळापुढें सुमारें १०।१५ फूट उंचीचा **नंदी** असून सभोंवती शेंकडों लहान लहान शंकराच्या पिंड्या आहेत. देवळाजवळून **बागमती** नदी संथपणें वहात असल्यामुळें नदीच्या कांठावरून फार सुंदर देखावा दृष्टीस पडतो. **देवपाटण**पासून **काटमांडू** सुमारें ३ मैल लांब आहे. देवपाटणपासून १०।१२ मैलांच्या अंतरावर निरनिराळ्या दिशांस **भातगांव, नीलकंठ** ह्या ठिकाणीं अनुक्रमें **श्रीदत्त** व **श्रीशेषशायी भगवान्** यांचीं पवित्र स्थानें आहेत. जाण्यास माणशीं आठ आणेप्रमाणें मोटारी मिळत होत्या.

दुसऱ्या वेळीं **देवपाटण** येथें ५ दिवस मुक्काम होता. एक दिवस देवपाटणपासून दीड मैलांवर असलेल्या **बुद्धनाथ** नांवाच्या ठिकाणीं गेलों. **गौतमबुद्धाचें** फारच मोठें प्रेक्षणीय देऊळ येथें असून देवळाच्या सभोंवतीं सर्व बौद्ध लोकांची वस्ती आहे. देवळाच्या सभोंवती "**ॐ मणिपद्मेहम्**" ह्या मंत्राचीं शेंकडों चक्रें लावलेलीं असून प्रत्येक भाविक यात्रेकरू तीं फिरवून मगच देवळांत प्रवेश करीत असे. तीं चक्रें फिरविल्यानें मनुष्य पापमुक्त होतो, असा बौद्ध लोकांचा समज आहे. **भातगांव** येथें जुन्या काळाची लांकडावर कोरींव काम केलेलीं सुंदर घरें पुष्कळ आहेत. इतरहि बऱ्याच गोष्टी पहाण्यासारख्या आहेत; परंतु तितका अवधि नसतो.

**काटमांडू** ही नेपाळ प्रांताची राजधानी असून शहराची लोकसंख्या सुमारें ५० हजार आहे. येथील राजास **महाराजाधिराज** ही पदवी असून मुख्य प्रधानास **महाराज** ही पदवी आहे. तेथील लोक त्यांस अनुक्रमें पांचसरकार व तीनसरकार ह्या नांवानें संबोधितात. सेनापतीस एक सरकार म्हणतात. राजा राज्यकारभारांत जवळ जवळ मुळींच लक्ष घालीत नाहीं. सर्व काम प्रधानच पाहातो. म्हणजे ही स्थिति आपल्या महाराष्ट्रांतील सातारचे राजे व पेशवे ह्यांच्यासारखीच कांहीं अंशीं आहे. प्रधानाचा अंमल एकतंत्री असला तरी त्याचा प्रयत्न मात्र लोककल्याणाचा आहे. पुष्कळ दिवस काटमांडूस पाण्याची व्यवस्था नीटशी नव्हती ही गोष्ट प्रधानजींच्या ध्यानांत आल्यावरोबर त्यांनीं पन्नास हजार रुपये खर्च करून पाणी बांधून आणिलें. त्यास **भीमधारा** म्हणतात. व इतर सल्लागार पाण्यावर कर बसवा म्हणून आग्रह करीत असतांही त्यांनीं कर बसविला नाहीं. नाहींतर आमच्या

महाराष्ट्रांतील धर्माचें ढोंग माजवून उगाच नारायण नामाचा जप करीत बसणारा एक **संस्थानिक** पहा. तो एकदां मोठ्या फिकिरींत पडला होता. जवळच्या लोकांनीं काळजीचें कारण विचारिलें तर त्यानें सांगितलें, " भिकबाळीकरितां मोतीं खरेदी करावयाचीं आहेत तीं तांबडी झाक मारणारीं खरेदी करूं कीं जांभळी झाक मारणारीं खरेदी करूं, त्याचा निश्चय होत नाहीं. किंमतही अवघी १८।२० हजार रु. आहे. तेव्हां असल्या कमी किंमतीच्या मोत्यांची भिकबाळी घालून **मुंबईच्या ब्राह्मणसभेच्या** पानसुपारीस गेलों, तर **मुंबईचे लोक** काय म्हणतील ! त्याच संस्थानिकास लोकांनीं पाण्याची फार गैरसोय होते, पाण्यावांचून लोक तडफडतात




**शेषशायी विष्णु, बालाजी ( नेपाळ ).**

तेव्हां पाणी बांधून आणा म्हणून सांगितलें; तर तो म्हणतो " मीं घातलेल्या भांडवलावर शेंकडा सहा टक्के व्याज सुटेल,अशी हमी देत असल्यास मी पैसे खर्च करितों." पैसे जणूं कांहीं यानें घाम काढूनच मिळविले आहेत. ह्यावरून एका कवीनें म्हटल्याप्रमाणें " ब्रह्मा मूर्ख महा म्हणोनि विभवा देई अशा गाढवा " हेंच खरें ठरतें. असो.

प्राथमिक शिक्षणापासून विश्वविद्यालयीन शिक्षणापर्यंत सर्व शिक्षण मोफत आहे, परंतु सक्तीचें नाहीं. खरें पाहिलें असतां प्राथमिक शिक्षणाकरितां फी पडते, म्हणून शेतकऱ्यांचीं मुलें शिकत नाहींत असें नसून त्यांस दारिद्र्यामुळें शेतकाम सोडून शिक्षणास वेळच मिळत नाहीं. तेव्हां ह्यांचें दारिद्र्य कमी कसें होईल

ह्याची उपाययोजना करून शिक्षण सक्तीचें केल्याशिवाय साक्षरतेचा प्रश्न सुटणार नाहीं. परंतु " शिक्षण सक्तीचें करून त्यावर जुलूम कसा करावा " असा खोटाच बहाणा सरकार व संस्थानिक करितात. इतर शेंकडों प्रकारचे जुलूम करतील; परंतु ज्यांत शेतकऱ्यांचें हित आहे, असा जुलूम मात्र करणार नाहींत. प्रजेस पारतंत्र्यांत ठेवणारें सरकार पानस्वातंत्र्याच्या मात्र आड येऊं शकत नाहीं! असो. दुय्यम व विश्वविद्यालयीन शिक्षण जरी मोफत आहे, तरी छप्पन लाख वस्तीच्या **नेपाळ प्रांतांत** अवघें एक हायस्कूल असून त्यांत सरासरी पांचशें विद्यार्थी शिकत आहेत. दरसाल सुमारें २० विद्यार्थी मॅट्रिकची परीक्षा पास होतात व दरवर्षी चार



**पाटणा येथील मच्छिंद्रनाथ मंदीर.**

ग्रॅजुएट येथील **त्रीचंद्र कॉलेजमधून** बाहेर पडतात. हें कॉलेज **पाटणा युनिव्हर्सिटीस** जोडिलें आहे. कॉलेजांतील विद्यार्थ्यांची संख्या ६० असून त्यांस शिकविण्याकरितां २० प्रोफेसर आहेत. कॉलेजच्या मालकीचीं कांहीं शेतें असून त्यांत शेतकीचें शिक्षण देण्याची व्यवस्था नुकतीच केली आहे. मी १९१७ सालीं गेलों होतों, तेव्हां तेथें कॉलेज नव्हतें, तें नुकतेंच उघडलें आहे. इंग्रजांचें आक्रमण परतवून शंभर वर्षे झालीं तरी राजास शिक्षणाची महती समजली नव्हती. आतां इंग्रज फार पुढें गेल्यावर हे जागे झाले आहेत. त्यामुळें जरी स्वातंत्र्य आहे, तरी राजा नेहमीं

राज्य कसें टिकेल ह्याबद्दल साशंक आहे. तीस लाख अमेरिकनांनीं अमेरिकेंतून इंग्रजांस हुसकावून लाविलें, तर जगांत नांव कमावलेले छप्पन लाख गुरखे ४ लाख इंग्रजांस भिऊन आहेत. हा प्रजेच्या अज्ञानाचाच परिणाम नव्हे काय? सुशिक्षितांचें प्रमाण फार थोडें असल्यामुळें अर्थातच वाचनालयें नाहींत. फक्त जुन्या हस्तलिखित ग्रंथांचें एक मोठें ग्रंथसंग्रहालय येथें आहे व त्यांतील ग्रंथांचा अभ्यास करण्याकरितां **इटली, फ्रान्स, हंगेरी** इत्यादि देशांतील विद्वान् लोक येतात. **हिंदुस्थानांतील** पंडितांचें! वा सुशिक्षितांचें!! आजपर्यंतचें सामान्यतः ध्येय–म्हणजे शक्य तोंवर नौकरी व सरतेशेवटीं हरीहरी–हेंच असल्यामुळें भलते उद्योग करण्यास त्यांस सवडच नाहीं. अर्थात् ते इकडे येतात कशास? दे० भ० **कृ. प्र. खाडिलकर** हे **नेपाळांत** जाऊन आले आहेत व ज्वलत् जहाल दे० भ० **विनायकराव सावरकर** व दे० भ० **गणेशपंत सावरकर** ह्यांनीं **नेपाळ**संबंधीं शक्य तितकी जास्त माहिती मिळवून प्रसिद्ध केली आहे. त्यांच्याशिवाय इतर किती सुशिक्षितांनीं **नेपाळ** स्वतंत्र कां, आम्ही परतंत्र कां, त्यांच्या स्वातंत्र्याचा आम्हांस काय उपयोग करून घेतां येईल, इत्यादि गोष्टींचा विचार आजवर केला आहे? सध्यां देशांत सुशिक्षितांची बेकारी माजली आहे, जर हे बेकार लोक **नेपाळांत** जाऊन तिकडील प्रजेस साक्षर करण्याचा उद्योग करितील तर त्या प्रजेचा हिंदुस्थान-दास्यविमोचनाच्या कामीं उपयोग झाल्याशिवाय खात्रीनें राहाणार नाहीं. इंग्रजी शिकून कोट, पॅन्ट, कॉलर ह्या **हिंदुस्थानच्या** दृष्टीनें अगदीं कुचकामाच्या गोष्टी आम्हीं उचलल्या; परंतु त्यांचा देशाभिमान, चिकाटी, लाज सोडून काम करणें इत्यादि गोष्टी मात्र उचलल्या नाहींत. असो.

**लष्कराचा लोककल्याणाकडे उपयोगः— हिंदुस्थानांतील** लष्करी खातें म्हणजे हिंदुस्थानच्या लोकांच्या डोक्यावर त्यांच्याच खर्चानें ठेवलेली एक धोंड आहे, तर **नेपाळचें** लष्करी खातें हीं नेपाळच्या लोकांस अत्यंत उपयोगी अशी संस्था आहे. त्या खात्यास राष्ट्रीय उद्योगशाळा हेंच नांव जास्त शोभतें. कारण नेपाळांत कांहीं विशिष्ट जातींतील १८ ते २० ह्या वयांतील लोकांस ३ वर्षें लष्करी शिक्षण सक्तीचें आहे, तर आमच्याकडे त्या वयांतील विद्यार्थ्यांस व्यायामाची सक्ती करणें सुद्धां राज्यकर्त्यांस पसंत नाहीं. शिवाय लष्करांतील लोकांस नुसतें राइट लेफ्ट करून बसून खावयास न घालतां रोजची कवाईत झाल्यानंतर त्यांजकडून आगगाडीचे रस्ते, मोटारींचे रस्ते, ओव्हर हेड ट्रालींचे मार्ग, नद्यांवरील पूल, सार्वजनिक इमारती बांधणें वगैरे कामें करून घेतात. त्यामुळें सुतारकाम, लोहारकाम, गवंडी-

काम इत्यादि कोणत्या तरी कामांत बुद्धिमान् सैनिक तीन वर्षांच्या अवधींत तयार होतो. तीन वर्षांनंतर सैन्यांत राहाणें न राहाणें सैनिकाच्या मर्जीवर असल्यामुळें तो



बुद्धनाथमंदीर बुद्धभुवन.

लष्करी नोकरी सोडून इतर उद्योगधंदे करून आपलें पोट चांगल्या तऱ्हेनें भरूं शकतो. **हिंदुस्थानांतील** मिजासखोर इंग्रजी शिपायास हिंदी लष्करी शिपायाच्य

पांचपट खर्च लागतो. तशी परिस्थिति नेपाळांत नाहीं. म्हणून नुकतेंच तेथील राजानें लष्करी शिपायांच्या पगारांत शेंकडा पन्नास वाढ केली आहे. इंग्रज सरकारनें जर नेपाळच्या सैनिकांप्रमाणें हिंदुस्थानांतील सैनिकांस कामास लाविलें, तर सध्यां बिकट झालेला जमाखर्चाचा प्रश्न सहज सुटेल व लोकांच्या डोक्यावरील कराचा बोजा कमी होईल; परंतु तशी इच्छा पाहिजे. Where, there is a will there is a way—इच्छा आहे तेथें मार्ग आहे. परंतु इच्छाच नाहीं त्यास कोण काय करणार! झोपेलल्याला जागें करितां येईल परंतु झोंपेचें सोंग घेतलेल्यास जागें कोण करणार! पुष्कळ सैनिक **बागमती** नदीस घाट बांधीत असलेले आढळून आले.

## नेपाळांत महाराष्ट्रीय.

**नेपाळांत** महाराष्ट्रीय लोकांचीं ८।१० कुटुंबें आहेत. **नेपाळांत** महाराष्ट्रीय जाण्याचें कारण **श्रीमदाद्यशंकराचार्य** ज्या वेळीं नेपाळांत **श्रीपशुपतिनाथाच्या** दर्शनास गेले होते, त्यावेळीं तेथील देवाची पूजा तद्देशीय ब्राह्मणांकडे असल्याचें त्यांस आढळून आलें. तद्देशीय ब्राह्मण मांसाहारी असतात तेंव्हां निदान देवाचा पुजारी तरी मांसाहारी नसावा, म्हणून तेथील राजास सांगून **श्रीपशुपतिनाथाच्या** पूजेकरितां नर्मदेच्या दक्षिणेकडील ब्राह्मण पुजारी नेमण्याची तेथिल राजास त्यांनीं आज्ञा केली व धर्मगुरूंची आज्ञा त्यानें शिरसा वंद्य मानून दक्षिणेंतून पुजारी आणण्याची व्यवस्था केली. सध्यां देवांस चार पुजारी आहेत. मुख्य पुजारी श्री. **व्यंकटरामशास्त्री** नांवाचे कानडी गृहस्थ असून त्यांच्या मदतीस श्री. **नारायणशास्त्री गुर्जर** श्री. **विष्णुशास्त्री बावडेकर** व श्री. **नाटेकर** हे तीन महाराष्ट्रीय आहेत, शिवाय इतर देवळांतूनही मधूनमधून महाराष्ट्रीय पुजारी आहेत. कारण **राजा कालस्य कारणम्** अगर **यथा राजा तथा प्रजा** हा न्याय ह्याही कामांत आहेच. कांहीं महाराष्ट्रीय सरदार लोकांच्या मुलांस धार्मिक शिक्षण देण्याच्या कामावर आहेत. मिळून बरीच मंडळी येथें आहेत. श्री. **हळबे, पाठक, करमरकर** इत्यादि दुसरेही महाराष्ट्रीय गृहस्थ येथें, असल्याचें समजलें. विशेष गोष्ट म्हणजे श्री. **दामोदर सच्चिदानंद जोशी** नांवाचे एक महाराष्ट्रीय जहागिरदारही येथें आहेत. त्यांचे एक पूर्वज फार दिवसांपूर्वी नेपाळच्या यात्रेस आले होते. त्या वेळीं नरदेवी नांवाच्या देवीस मनुष्याचा बळी देण्याची चाल नेपाळांत चालू होती. परंतु ही नरहत्या त्या गृहस्थांस न पाहवल्यामुळें त्यांनीं राजास नरमेधाऐवजीं पशू बळी दिल्यास चालतें, असा शास्त्राधार काढून दाखविला; परंतु कदाचित् आपण नरमेध न केल्यास देवीचा

आपणावर कोप होईल असें राजास वाटलें, परंतु कोप न होण्याची जबाबदारी त्या गृहस्थानें घेतल्यामुळें त्या वर्षी होणारा नरमेध थांबला. व पुढें देवीचा कोप झाल्याचें कांहींच चिन्ह राजास न दिसल्यामुळें राजानें त्या ब्राह्मणास एक दिवसांत चालून जाईल तितकी जमीन जहागीर म्हणून देण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें प्रथम त्या ब्राह्मणास वीस हजारांची जहागीर दिली. दिवसेंदिवस ती कमी करीत चालले आहेत तरी




नेपाळांतील एक कठीण पूल.

अजून त्यांजकडे सहा हजार रुपये वार्षिक उत्पन्नाची जहागीर आहे. तेथील महाराष्ट्रीय घरांत शुद्ध मराठी बोलतात, इतकेंच नव्हे तर त्यांस मोडी सुद्धां चांगलें लिहितां वाचतां येतें व लग्नसंबंधाकरितां त्यांस महाराष्ट्राकडेच धाव घ्यावी लागते.

**नेपाळांतील राज्यव्यवस्थाः—नेपाळांत प्रधान** अनियन्त्रितपणें राज्य करितो. नुकतीच " **कायदे-सुधार-मंडळ** " ह्या नांवाची एक सभा प्रधानानें स्थापन केली आहे; परंतु तिचें स्वरूप आमच्या इकडील कायदे कौन्सिलांप्रमाणेंच वादविवाद सभेच्या पलीकडे गेलें नाहीं. त्यामुळें लोक राजाच्याविरुद्ध एक चकार शब्द सुद्धां बोलत नाहींत. अर्थात् वर्तमानपत्रांचें अस्तित्वच तेथें नाहीं. एक " **गुरखा** " नांवाचें सरकारी वर्तमानपत्र निघतें. राजा व प्रधान हे राज्यकारभार चांगला करितात ह्याबद्दल मुळींच वाद नाहीं; परंतु सध्यांच्या लोकशाहीच्या युगाचा विचार करितां राजा कितीही चांगला असला तरी जर तो प्रजेचा सल्ला राज्य-कारभारांत घेत नसेल तर प्रजा त्यावर नाराज असते. राजास आपल्या विरुद्ध कोणीही बोललेलें खपत नाहीं. म्हणून राजकीय बाबतींत कोणासही कांहीं प्रश्न विचारला कीं त्याच्या तोंडास खीळ बसे. कारण न जाणों आपण राजासंबंधीं कांहीं बोलतों हें राजास कळल्यास आपणांस काय त्रास होईल कोण जाणें. मीठ, कापड, धान्य ह्या गरिबांस लागणाऱ्या मुख्य पदार्थांवर कर नाहींत. गुरचरणीवर कर नाहीं. कातडीं कमाविण्याचा व रंगविण्याचा एक कारखाना राजानें काढिला आहे. राज्यांतील बेकारांची सोय व्हावी म्हणून नेपाळच्या सरहद्दीवर असलेल्या **पूर्नीम** जिल्ह्यांत **मोरंग** गांवीं सरकारच्या ताब्यांत असलेली पडित जमीन लागवडीस काढली आहे व ती लागवड करणाऱ्यास आरंभीं लागणारी मदत सरकारांतून मिळते. पहिलीं चौदा वर्षें सारा माफ आहे, त्यामुळें कोणास बेकार रहावें लागत नाहीं. ह्या कामांत सुद्धां राजानें आतांपर्यंत लक्षावधि रुपये खर्च केले आहेत. आमच्या इकडील **नादान संस्थानिकांप्रमाणें** गरीब प्रजेवर जुलूम करण्याकरितां इंग्रज लोकांस खूष करण्याच्या कामीं राजाचा पैसा खर्च होत नसल्यामुळें त्यास ह्या सर्व गोष्टी करितां येत आहेत. सध्यांच्या **महाराजांनीं** पांच वर्षें प्रयोग म्हणून फांशीची शिक्षा रद्द केली आहे; पूर्वीं दंडही फार करीत असत; तेंही प्रमाण कमी केलें आहे. मात्र गोवध करणारास फांशीच दिलें जातें. देशभाषेस उत्तेजन यावें म्हणून " **मातृ-भाषासुधारकमंडळ** " ह्या नांवाच्या मंडळाची स्थापना केली आहे. मुलांचेंच शिक्षण मागासलेलें असल्यामुळें मुलींचें शिक्षण फारच मागासलें आहे. सध्यां फक्त कांहीं मुली प्राथमिक शाळेंत शिक्षण घेत आहेत. दुय्यम व विश्वविद्यालयीन शिक्षण घेण्यास मुलींनीं अद्याप सुरवात केली नाहीं. राज्यांत मुसलमानांची संख्या फार थोडी आहे; परंतु त्यांसही स्वतंत्र प्रजाजनांचे हक्क आहेत. त्यांच्या मुलांस उर्दू भाषेचें शिक्षण फुकट मिळण्याची सोय राजानें केली आहे. राजाची इच्छा इंग्रजांशीं मैत्री

ठेवण्याची असल्यामुळें त्याचा **हिंदुस्थानच्या** लोकांस आज प्रत्यक्षतः उपयोग



श्रीपशुपतिनाथ आर्यघाट.

होण्यासारखा नाहीं. परंतु प्रसंगीं राजा हिंदुस्थानाच्या लोकांस उपयोगीं पडल्याशिवाय राहाणार नाहीं असें नेपाळच्या पूर्वेतिहासावरून वाटतें. कारण १८५७ च्या स्वातंत्र्य-युद्धांत **श्रीमंत नानासाहेब पेशवे** हे **नेपाळ** सरकारच्या आश्रयास गेले व राजानें त्यांस आश्रयही दिला. त्यांजबरोबर शेवटचे **बाजीरावसाहेब** यांचें कुटुंब **श्री. काशीबाई** ह्याही होत्या व त्यांचा मुक्काम काटमांडूचाच **थापाथैली** म्हणून एक भाग आहे तेथें होता. त्या इ. स. १८९७ सालीं वयाच्या ५३ व्या वर्षी वारल्या. त्यांच्याकरितां व **श्री. नानासाहेबांच्या** बायकांमुलांकरितां त्या वेळचे **नेपाळचे राजे जंगबहादुरसिंग** ह्यांनीं एक लहानशी जहागिरी तोडून दिली होती. **नेपाळच्या** राजानें **नानासाहेबांच्या** बायकांमुलांस आश्रय दिल्याबद्दल इंग्रजांस तक्रार करण्यास जागा नव्हती. परंतु **कानपुरास** इंग्रजांच्या बायकामुलांची कत्तल करणाऱ्या **नानासाहेबांवर** त्यांचा फार राग होता. तेव्हां त्यांस आपल्या ताब्यांत देण्याबद्दल त्यांनीं राजास कळविलें. त्यावर राजानें इंग्रजांस कळविलें कीं मी नानासाहेबांस माझ्या राज्यांतून घालवून दिलें आहे. त्यानंतर नानासाहेबांचा दिवाण नेपाळच्या राजाकडे जाऊन सांगूं लागला कीं " **नानासाहेब** वाटेंत वारले, " त्यांची रक्षा मीं आणिली आहे तरी ती मजला **काशीस** गंगेंत टाकण्याबद्दल इंग्रजांची परवानगी आणून द्यावी. " इंग्रजांनीं परवानगी दिली; परंतु नानासाहेब वारले ह्याबद्दल आणखी पुरावा मागितला परंतु तो पुरावा देणारा दिवाणाशिवाय दुसरा कोणीही नव्हता. तेव्हां इंग्रजांचा संशय दुणावला व त्यांनीं नानासाहेबांचा तपास करून त्यांस आपल्या ताब्यांत देण्याबद्दल भुणभुण पुन्हां लावली. त्यावर **नेपाळचे महाराज जंगबहादुरसिंग** ह्यांनीं कळविलें कीं, नानासाहेब आमच्या राज्यांत नाहींत. तुम्हांस तसें वाटत असल्यास तुमचे लोक आमच्याकडे पाठवा आमचे लोक त्यांज-बरोबर देतोंच तपास लागल्यास ठीकच. परंतु नच लागल्यास आम्हांस निष्कारण त्रास देण्याबद्दल तुम्हांस कांहीं मुलूख तुमच्या राज्यापैकीं आम्हांस द्यावा लागेल. अर्थात् नानासाहेबांस राजाचा आधार असल्यामुळें ते सांपडणार तर नाहींतच परंतु मुलख मात्र गमावून बसावा लागेल, हें जाणून इंग्रजांनीं तो नाद सोडून दिला. त्यानंतर बैराग्याच्या वेषानें कित्येक वर्षें **नानासाहेब** नेपाळांत होते व त्यांच्या व **महाराजांच्या** गांठीभेटीही गुप्तपणें होत असत असें सांगतात. ह्यासंबंधांत बरीच माहिती मला Constable and Co. Ltd. London यांनीं Nepal by Percival and Landon किं.४२ रु. ह्या प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांत वाचावयास मिळाली. १८१६ सालीं **शिगौली** येथें नेपाळशीं झालेल्या तहाप्रमाणें इंग्रजांचा फक्त

वकील नेपाळच्या दरबारीं रहावयाचें ठरलें होतें; परंतु इंग्रज स्वतःचा दुर्लौकिक होऊं नये म्हणून इतर त्यांच्या ताब्यांत असलेल्या संस्थानांतील अधिकाऱ्याप्रमाणें त्या वकिलास **रेसिडेंट** ह्या नांवानें संबोधित असत व त्याच्या राहाण्याच्या ठिकाणास रेसिडेन्सि म्हणत असत. परंतु १९२३ सालीं नेपाळच्या राजानें आपली नापसंती ह्या गोष्टीबद्दल इंग्रजांस कळविली व इंग्रजांना तें मान्य करावें लागून इतर स्वतंत्र राष्ट्रांत असलेल्या इंग्रजांच्या वकिलास ज्याप्रमाणें (British Envoy) **ब्रिटिश एन्व्हॉय** ह्या नांवानें संबोधतात, त्याच नांवानें नेपाळच्याही वकिलास संबोधूं लागले व त्याच्या राहाण्याच्या ठिकाणाचे रेसिडेन्सी हें नांव जाऊन **ब्रिटिश लिगेशन** हें नांव त्यास मिळालें. खरा राजा रेसिडेंट असून संस्थानिक त्याच्या हुकमाचा ताबेदार असतो. हिंदुस्थानांतील परतंत्र संस्थानास रेसिडेन्सी असते व तींत संस्थानिकाचे कायदे न चालतां **ब्रिटिश हिंदुस्थानांतील** कायदे चालतात. हिंदुस्थानांतील इतर संस्थानिकांस प्रत्येक गोष्ट रेसिडेंटाच्या मर्जीप्रमाणें करावी, लागते तर **नेपाळांत** ब्रिटिश एन्व्हॉयला राजाच्या परवानगीशिवाय आपलें ठिकाण सोडतां येत नाहीं. असा दोहोंमध्यें जमीन अस्मानाचा फरक आहे. इतर संस्थानिक सालिना-सार्वभौमत्वाबद्दल इंग्रजांस खंडणी देतात, तर स्नेहसंबंध कायम राहावा म्हणून इंग्रज दरसाल नेपाळच्या राजास दहा लाख रुपये खंडणी देतात. अशा संस्थानांत ज्या-प्रमाणें व्यापार, धर्मवृद्धि इत्यादि मिषानें इंग्रज हिंदुस्थानांत आले तसे कसल्याना कसल्या मिषानें तरी हिंदुस्थानांतील लोकांनीं जाऊन तेथील लोकांस जागृत कर-ण्याचें काम कां करूं नये ? नेपाळांत **शिवरात्री**नंतर ५।१६ दिवसांपेक्षां जास्त दिवस राहूं देत नाहींत; परंतु **काटमांडू** जवळ **मुक्तेश्वर, दामोदरकुंड** वगैरे ठिकाणें आहेत तीं पाहाण्यास जाण्याचा विचार असलेल्या यात्रेकरूंस आणखी महिना दीड महिना राहाण्यास परवानगी मिळते. कारण तिकडील प्रदेश फार थंड असल्यामुळें फाल्गुनांत तो बर्फानें भरलेला असतो. चैत्राच्या अखेरीस तिकडे जाण्यास साधारण-पणें वाट तयार होते. अर्थात् दीड महिन्यांत बरेच उद्योग उरकतां येतील; परंतु इच्छा पाहिजे ! **काटमांडूस** भिवंडी येथील **वे. शा. सं. नरसिंह गोपाळ किंजवडेकर शास्त्री** यांची गांठ पडली. त्यामुळें परत येतांना बरीच करमणूक झाली. त्यांचा व माझा पायीं प्रवास करितांना बऱ्याच विषयांवर वादविवाद झाला. त्यांचा सर्व भर शास्त्रांत कोणत्या गोष्टी सांगितल्या आहेत ह्यावर असे, तर काल-मानाप्रमाणें कसें वागलें पाहिजे, ह्या गोष्टीवर माझा भर असे. एकंदरींत फार मजेंत प्रवास **रक्सौल**पर्यंत झाला. तेथून आगगाडीनें **पाटणास** जाऊन व एक दिवस

**पाटणा** पाहून नंतर मी एकटाच **गयेस** गेलों. **श्री. नानासाहेब** व **शास्त्रीबोवा नैमिषारण्य** पहावयास गेले. माझी रजा संपल्यामुळें **गया** पाहून **मुंबई मेलनें** परतलों तों ता. १५।३।३२ रोजीं **पुण्यास** येऊन निघाल्यापासून सुमारें १७ दिवसांनीं कामावर येऊन रुजूं झालों. १९३२ सालचा प्रवासखर्च **श्री. नानासाहेब** ह्यांनीं सोसल्यामुळें व परीक्षा जवळ आली असतांही मोठ्या मेहेरबानीनें भरपगारी रजा शाळाधिकाऱ्यांनीं दिल्यामुळेंच ही यात्रा पुन्हां घडली. तेव्हां **श्री. नानासाहेब**, शाळाधिकारी व त्यांस प्रेरणा देऊन सर्व यात्रा सुखरूपपणें पार पाडणारा परमेश्वर, यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. सवडीनें माझ्या पायीं **काशीयात्रेची** माहिती वाचकांस देण्याचें आश्वासन देऊन वाचकांचे आभार मानून हें प्रवासवृत्त पुरें करितों.

---

## उत्तर हिंदुस्तानांतील प्रवासांत लागणारे कांहीं हिंदी शब्द.

| मराठी. हिंदी. | मराठी. हिंदी |
|---|---|
| आगपेटी–दिया सलाई | आंबट–खाटा |
| ओढा–गधेरा | भाडें–किराया |
| मीठ–नमक | साखर–चीनि |
| तांदूळ–चावल | कणीक–आटा |
| डाळीचें पीठ–बेसन | मजुरी–मजदूरी |
| बटाटा–आलू | खोली–कमरा |
| पाणी–जल | थंडी–जाडा |
| ऊन–धूप | पाऊस–वर्सा |
| रस्ता–रास्ता | घर–मकान |
| चढाव–चढाई | उतार–उतराई |
| सरळ–सीधा | चिंच–इमली |
| तूप–घी | तांबडा भोपळा–सीताफळ |
| पोष्ट ऑफिस–डाकघर अगर डाकखाना | जिल्हा–जीला |
| वर्तमानपत्र–अखबार | अजारी–बिमार |
| ताप–बुखार | सकाळ–सवेरा, सुबह |
| रात्र–शाम | चालत–पैदल |
| स्वयंपाक–रसाई | शौचकूप–टट्टी |



## नेपाळचे मुख्य प्रधान.

जनरल युद्धसमशेरजंग बहादूर राणा नेपाळचे सर सेनापती व मुख्य प्रधान म्हणून हे नुक्तेच गादीवर आले आहेत. त्यांचा हुद्दा मुख्य प्रधान असा असला तरी नेपाळचे खरेखुरे अधिकारी तेच आहेत. त्यांचा जन्म १८७५,त झाला. त्यांचें सर्वप्रकारचें लष्करी शिक्षण झालें असून ते कर्नलपासून जनरलपर्यंत चढत गेले आहेत. त्यांनीं विलायतची सफर केली आहे. त्यांची कारकीर्द लोकहिताची होईल, अशी अपेक्षा करण्यास मुळींच प्रत्यवाय नाहीं.

# नेपाळसंबंधीं कांहीं जरुरीची माहिती.

**म**हाराष्ट्रांतून **नेपाळच्या** यात्रेस जाणाऱ्या यात्रेकरूंनीं प्रथम **काशी** ( **बनारस** ) **छपरा, सोनपूर, मुजफरपूर, शिगौली** त्या गांवावरून **रक्सौलला** जावें, अगर **अलाहाबाद, मोगलसराईवरून पाटणा** जंक्शनवर उतरावें. तेथून **गंगानदींतून पिलझाघाटावरून सोनपुरास** जावें व पुढें **रक्सौलला** जावें. रक्सौलशिवाय **नेपाळांत** शिरण्यास दुसरा मार्ग नाहीं. **रक्सौल** गांवांत एक मोठी धर्मशाळा आहे. रक्सौलहून **नेपाळ गव्हर्नमेंट रेल्वेच्या** गाड्या २।३ तासांच्या अंतरानें सुटत असतात. गेल्याबरोबर गाडींत जाऊन बसल्यासही चालतें. **पासपोर्ट** म्हणजे नेपाळी चिवट कागदाचा एक रुपाया एवढा तुकडा मिळतो. तो मिळविण्यास कांहीं त्रास पडत नाहीं. एक मनुष्य पासपोर्ट **फुकट** वाटण्याकरितां बसलेला असतो. मात्र ज्यानें त्यानें आपला पासपोर्ट जपून ठेवावा; एकाजवळ- सर्वांनीं आपले पासपोर्ट देऊन ठेवूं नये, मध्यें तपासणी होते व पासपोर्ट जवळ नसल्यास त्रास होतो.

रक्सौलपासून **अमलेखगंज**पर्यंत आगगाडी आहे. परंतु तींत मालाच्या उघड्या डब्यांत बसून प्रवास करावा लागतो. रक्सौलपासून **भीमफेडीपर्यंत** मोटारगाडीही मिळूं शकतें परंतु तीं फार महाग पडते. गाड्यांतून गर्दी फार होऊन सामान चोरीस जाण्याची भिती असते. म्हणून शक्यतर काशीपासून रक्सौलपर्यंतचा प्रवास इंटरक्लासनें करावा. त्या रेल्वेवर जी. आय. पी.च्या थर्डक्लास इतकेंच भाडें इंटर क्लासला पडतें. **अमलेखगंज**पासून ही मालाच्या विनबाकांच्या उघड्या लॉरींतूनच **भीमफेडी**पर्यंत प्रवास करावा लागतो. व ती लॉरी माणसांनीं इतकी भरतात कीं हातपाय हालविण्यास जागा राहात नाहीं. **भीमफेडीस** पुढच्या प्रवासाकरितां मजूर मिळतात; प्रथम चालत प्रवासास सुरवात करून चालणें जमत नाहीं असें आढळून आल्यानंतरही वाटेंत कुली मिळूं शकतात. म्हणून प्रथम पायीं प्रवासास सुरवात करावी हें बरें.

**भीमफेडी**पासून **शीसागढी** चढण्यास सुरवात होते. सुमारें १॥ मैलावर पाण्याचा झरा लागतो. तेथें फराळाचीं दुकानें असतात. तेथें फराळ करून चढावयास सुरवात करावी. सारखे ३।४ तास चढावें लागतें. म्हणून पुरी कोणी केली? ब्राह्मण कीं क्षत्रिय! अशा शंका काढून उगाच शरीर शिणवूं नये. **मनुष्य राष्ट्रधर्मी**

**चनल्याशिवाय त्यास प्रवास सुखकर होणार नाहीं.** पुढें पाण्याची थोडी टंचाई आहे तरीही राजानें पाण्याची सोय वाटोवाट केलेली असते. सुंठगूळ-मिश्रित **सरबत** व थंडगार पाणी वाटण्याकरितां माणसें ठेवलेलीं असतात.सरबत तर फारच चांगलें रुचकर व हितकर असतें. तें प्याल्यानें जर थोडेंसें पाप लागलें तर तें **श्री. पशुपतीच्या** दर्शनानें जळून खाक होतें. पुढें १२ मैलांवर सारखीं गावें लागतात. जागा मिळेल तेथें वस्ती करावी. **भीमफेडी**पासून पुढें **चंद्रागढीच्या** पायथ्यापर्यंत **चीसापानी, कुलीखानी, मार्खु** आणि **सितलांग** हीं गावें मुख्य आहेत. सितलांगहून **चंद्रागढी** चढून उतरेपर्यंत गांव नाहीं. उतरल्याबरोबर **थानकोट** येतें; येथून मोटारलॉरी मिळते.

यात्रिकरूंत खिसेकापूंचा भरणा मोठा असतो. कांहीं साधारण गबाळ्या यात्रेकरूंचे कमरेचे कसे सुद्धां चोरांनीं चोरले आहेत म्हणून पैशास जिवापलीकडे जपले पाहिजे. नाहीं तर फार वाईट परिस्थिति येते. इकडून नेपाळांत मनिऑर्डर होत नाहीं. इन्शुअरनें पसे मागवावे लागतात; अर्थात् त्याकरितां १०।१५ दिवस मोडतात.

नेपाळात नोटा नेल्यास फार फायदा होतो. १० रुपयांच्या नोटीचे १०। रु. रोकड देण्याकरितां ठिकठिकाणीं सराफ बसलेले अससात. नेपाळांत **वनगाईची** कातडीं, **रुद्राक्ष** वगैरे जिनसा पुष्कळ व स्वस्त मिळतात. कातडीं इकडच्या लोकांस फार आवडतात परंतु ओझें आणणें त्रासदायक असतें. तेंव्हां विचार करून कातडीं आणावीं. नेपाळांत कस्तुरीहि ३०।३५ रु. तोळ्यापासून मिळते परंतु ती चांगल्या माहितगारामार्फत घ्यावी, नाहींतर फसण्याचा संभव असतो.

## कैलास व मानससरोवर यात्रा.

पुष्कळ वाचक ह्या यात्रेची माहिती विचारतात व कित्येक तर " खरेंच कांहो ! **हिमालयांत मानस** नांवाचें सरोवर आहे ! " म्हणून पृच्छा करितात अर्थात् त्यांच्या करिता बऱ्याच पुस्तकांतून व लोकांच्या तोंडून मिळवलेली सामान्य माहिती वाचकांकरितां देत आहे.

**मानस** नामक सरोवर व **कैलास** नांवाचा पर्वत हिमालयओलांडून पलीकडे तिबेटांत गेल्यानंतर आहे. हिमालय ओलांडतांना साधारणपणें कमींत कमी १६००० फूट उंचीच्या खिंडींतून पार व्हावें लागतें व त्या खिंडी वर्षांतून सुमारें ८।९ महिनें प्रवास करण्यायोग्य नसतात. फक्त **जुलै, आगष्ट, सप्टेंबर,** मध्यें त्यांतून पार व्हावें लागतें,अवेळीं थंडी सुरू झाल्यास व लवकर परत न आल्यास खिंडी बंद होत

व तिबेटांतच ८।९ महिने काढावे लागतात. **गंगोत्री** व **बदरीनाथ** येथून पुढें कैलासकडे जातां येतें. वरेच तिबेटी व्यापारी ह्या रस्त्यानें तिबेटांत जातांना भेटतात त्यांच्या सोबतीनें जावें हें बरें. बदरीनाथास कैलासला जाणारे यात्रेकरू भेटतात. **तिबेटी** व्यापारीही थोडे पैसे दिल्यास आपल्या बरोबर नेतात. जवळ पैद्दी नसलेल्या साधूंनीं तिबेटी व्यापाऱ्यांकडे भिक्षा मागूनही यात्रा केल्याचे दाखले आहेत. **गंगोत्री व बदरीनाथच्या** पुढें सुमारें ८।१० दिवस निर्मानुष प्रदेशांतून ( No man's land ) प्रवास करावा लागतो. थंडीमुळें वनस्पतीही वाढत नाहींत, म्हणून लांकूडफाटे व शिधासामुग्री व वस्तीकरितां तंबू बरोबर घ्यावे लागतात. बदरीनाथ व गंगोत्रीहून **कैलास**ला गेल्यास चढाव कमी चढाव लागतो कारण **बदरी** व **गंगोत्री** पर्यंत मनुष्य चढलेलाच असतो परंतु अंतर फार चालावें लागतें. जवळचा रस्ता **अलमोड्याहून** बागेश्वरावरून आहे. अंतर थोडें परंतु चढाव फार मोठा आहे. मोठ व्यापार ह्याच रस्त्यानें चालतो. हिंदु लोकांस सरहद्दीवर आंत शिरण्याकरितां सहज परवानगी मिळते. इंग्रजांस बहुधा मिळतच नाहीं. फक्त सरकारी कामगिरीवर असलेल्या इंग्रजांसच **तिबेटांत** येऊं देतात. वाटेंत चोरांचा उपद्रव फार असतो. परंतु सोबत असली म्हणजे भिती नसते. एक रस्ता **काश्मीर**मधून व एक रस्ता **जोशीमठा**वरून गेला आहे. त्या यात्रेस सालीना फार तर १००।१२५ लोक जात असतील. ह्या यात्रेवर मराठींत तयार झालेलें नवीन पुस्तक नाहीं. हिंदींत १ **स्वामीसत्यदेव** यांचें "**मेरी कैलास यात्रा**" व २ म्हैसूरच्या महाराजाबरोबर गेलेल्या श्री **साधू वनमालीदास** B. A. LL. B. यांनीं कैलासच्या यात्रेवर पुस्तक लिहिलें आह. तें पुस्तक कोणाही जिज्ञासूस ते खालील पत्त्यावर पत्रव्यवहार केल्यास फुकट पाठवितात.

**शांति कुटीर नर्मदातट**. पोस्ट शिनोर स्टेट बडोदा.

**सोलापूर** येथील श्री. **जनार्दन विद्याधर कर्वे** यांनीं ता. १,८ व १२ एप्रील १९३२ च्या केसरींत कैलास मानस सरोवरावर लेख लिहिले आहेत, ते जिज्ञासूंनीं पहावें अगर ती यात्रा करून आलेले पुण्याचे डॉ० **नरहर गोपाळ सरदेसाई** L.M.&S. यांस भेटावें. मात्र जिवाची आशा सोडून यात्रेचा विचार करावा. बर्फ प्रदेशांतून प्रवास " युद्धस्य वार्ता रम्या " प्रमाणें प्रत्यक्ष करणं कठीण आहे. शेकडा नव्वद परत येतात. परंतु आपला नंबरच १० त आल्यास तयारी करून जावें हें उत्तम. **अलमोडा, धराली, जोशीमठ** इत्यादि ठिकाणीं माहितगार लोक व मजूर मिळूं शकतात. एकंदर ८।९ रस्त्यांनीं हिमालयांतून पलीकडे तिबेटांत जातां येतें.

श्रीमत्-स्वामी
सत्यदेव परिव्राजक.



स्वामीजींनीं पैशांशिवाय पृथ्वी प्रदक्षिणा करून अमेरिकेंत २३०० मैल पायांनीं प्रवास केला आहे. त्यांचें वाङ्मय वाचूनच सदरहू लेखकास प्रवास करण्याची स्फूर्ति झाली आहे. त्यांचा आश्रम अलमोडा येथें आहे.

## बदरीकेदार व गंगोत्रीजम्नोत्रीच्या यात्रेकरूंस कांहीं सूचना.

( १ ) शक्य तितके जास्त गरम कपडे बरोबर घ्यावें.

( २ ) पोळी व तूप खाण्याची संवय असल्यास व वाईट तूप चालत नसल्यास चांगल्या तुपाचा डबा बरोबर घ्यावा. वाटेंत कणीक सुद्धां चांगली मिळत नाहीं. तूप तर फार वाईट मिळतें. वाईट तूप चालेना म्हणून विनतुपाच्या पोळ्या खाऊन पोट बिघडल्यामुळें एक गृहस्थ त्या यात्रेंत कालऱ्यानें वारले. गरिबांनीं भात खाण्याची संवय करावी म्हणजे तुपाचा प्रश्न पडणार नाहीं.

( ३ ) शक्यतोंवर एकदांच भोजन करावें. कानास फडकें बांधून चालावें म्हणजे थंडी बाधणार नाहीं.

( ४ ) एक लहानसा अल्युमिनियमचा तांब्या एका लहानशा डब्यांत खाण्याचे कांहींतरी पदार्थ ( लाडू, शंकरपाळे, चिवडा वगैरे ) कागद, पेन्सिल, चाकू इत्यादि जिन्नस जवळ नेहमीं बाळगावे.

( ५ ) हिमालयांत जों जों अंतरभागांत जावें तों तों दुर्मिळ पदार्थांची यादी वाढत जाते व मग आपणांस लागल्यास दुसऱ्यापाशीं मागावें लागतात. औषधें मुख्य मुख्य म्हणजे कोयनेल, मेंथाल, तपकीर, शौच्यास साफ होण्याचें व बंद होण्याचें, इसानोफेल, जखमेवर लावण्याकरितां आयोडिन वगैरे जवळ बाळगावीं परंतु तीं जवळ आहेत ह्याची **वाच्यता** करूं नये. गरजू दिसल्यास द्यावें. परंतु आपणांपाशीं किती आहे हें सांगूं नये. आमच्या बरोबर एक गृहस्थ चालत होते त्यांजपाशीं कोयनेल होतें. परंतु आमच्या जवळ पुष्कळ आहे ह्याची बातमी आमच्या अज्ञानामुळें त्यांस समजली त्याचा फायदा त्यांनीं घेऊन ते रोज आमच्याजवळ कोयनेल मागूं लागले व सरतेशेवटीं आमच्या जवळचा सांठा संपला व ते स्वतःजवळच्या कोयनेलसह आम्हांस सोडून चालते झाले व आम्ही अडचणींत पडलों. हिमालयांत मागणाराची मागणी पुरी करण्याचें मनांत आणल्यास कुबेर सुद्धां दरिद्री होईल.

( ६ ) पैसे कमरेस कसा बांधून त्यांत ठेवावेत. ५ अगर १० च्या नोटा व ४०।५० रुपये सुटे जवळ बाळगावे. कुलीच्या करंडींतून कांहीं जिन्नस चोरीस जात नाहीं परंतु मी मात्र सर्व पैसे स्वतःजवळच ठेवीत असे.

( ७ ) सकाळीं एकदांच जास्तींत जास्त १०।१२ मैल चालून नंतर ताजा गरम स्वयंपाक करून विश्रांती घेणाऱ्या यात्रेकरूंस आजारी पडण्याची मुळींच

धास्ती करण्याचें कारण नाहीं. सकाळसंध्याकाळ चालणें सर्वांस मानवत नाहीं.

( ८ ) बदरीकेदारपेक्षां जम्नोत्री—गंगोत्रीकडे गैरसोई जास्त आहेत. परंतु सध्यां व्यापारमंदीचा काळ असल्यामुळें ठिकठिकाणीं नवीन नवीन दुकानें उघडत आहेत.

( ९ ) जुन्या चालीरितीस चिकटून असलेले हेकट स्वभावाचे लोक, रोगी, अशक्त, म्हातारे, इत्यादि लोकांस बरोबर घेऊन शक्यतर प्रवास करूं नये. त्यानें प्रवास सुखकर न होतां दुःखकर होतो. बायकांची सोबतही टाळावी. मात्र मधून मधून चार चार मैलांत पाण्याचा थेंब दृष्टीस पडत नाहीं. अशा वेळीं निसर्गतः डोळ्यांतून पाणी काढण्याच्या कलेंत वाकबगार अशा बायकांचा थोडासा उपयोग होतो ! एकंदरींत फायद्यापेक्षां तोटाच जास्त.

( १० ) यात्रेस केव्हां निघावें ह्यासंबंधीं एकमत नाहीं तरी शक्यतर लवकर म्हणजे अक्षय्य तृतीयेस हरिद्वार सोडावें. लवकर निघाल्यास वर्फाचा त्रास होतो व उशिरां निघाल्यास पावसाचा त्रास होतो. उशिरां निघाल्यास वर्फावरून चालत प्रवास करण्याची इच्छा अतृप्त राहाते व पावसानें जीव बेजार होतो. परंतु वर्फावरून घसरून अपघात होण्याची भीति राहात नाहीं, तरी आपल्या शक्ती-प्रमाणें करावें. लवकर निघणें माझ्या मतें चांगलें.

## गंगोत्री.

सदरहु गाणें, आर्यभूषण छापखान्यांत छापिलें असून ते ह्या पुस्तकांत घाल-ण्यास श्री, अनंत विनायक पटवर्धन यांनीं परवानगी दिल्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे गाणें बायकांचें आहे अर्थात् गणयमक, मात्रा ऱ्हस्व दीर्घ इत्यादि भेदातीत आहे तें बायकाच म्हणूं जाणेत, पुरुषांनीं ह्या भानगडींत न पडावें हें बरें. ह्या उपर वाचकांची मर्जी.

( चाल—कौरव पांडव सगर तांडव )

॥ हरिद्वार हें द्वार हरीचें प्रथम करुनियां तीर्थविधी ॥ पिंडदान आणि ब्राह्मण-भोजन गंगापूजन यथाविधी ॥ गंगाद्वारें कुशावर्ते बिल्वतीर्थ दळ धार सुधी ॥ तिथुनि करुनिया प्रयाण सारे हृषिकेशाची मज लागी ॥ तपोवनीं ते भरत लक्ष्मण पाहतां हरती आधीव्याधी ॥ शिवकोटीचा मुक्काम दुसरा पुढें लागि चाळिसी नदी ॥ झपा-ट्याहुनें जन हे येती टेरीची ती वाट सुधी ॥ मग उत्तर काशी नयनीं पाहिली पुढें । तेथें पिंडदान मानवा कदाचित् घडे ॥ शत जन्मांतरींचे कामिश सर्वहि झडे ॥ दर-

कोशी चालतां भय्यारी दृष्टीस पडे ॥ हा राम घाटी नऊ कोसाची चढ उतारो बहू असे ॥ गंगोत्री केदार बद्री नारायण पाहूं चला कसे ॥ हिमालयाचे सुंदर वारे गार शरीरा लागतसे ॥ ( बा ) गार शरीरा लागतसे ॥ गंगोत्री केदार बद्री नारायण पाहूं चला कसे ॥ १ ॥

प्रभातकाळीं मुखमार्जन जन करुनि पंथालागीं लागतसे ॥ कोणी झंपा कोणी करंडे कोणी ओझीं नेती असे ॥ कुठे चढाव, कुठे उतार, कुठे मार्ग सोपाहि असे ॥ पत्र पुष्प फल मूल तरुवर पर्वत गगना चुंबित दिसे ॥ ठायिं ठायिं जळ पुष्कळ सुंदर शिंकाळीचें काम नसें ॥ देवदारुतरु दाट लागले जसे बगीचे रम्य दिसे ॥ सर्प व्याघ्र आणि वृश्चिक श्वापद यांची भीति लवही नसे ॥ वस्तु कुणाची कुठे पडो पण चोर तया स्वप्नीं न पुसे ॥ चाल ॥ तेथें निवास स्थळु तर रात्रीं करितलि वर्नी भारी ॥ काष्ठ फुकाची तापत बसती जसे कसे ॥ घरधनी जागृती स्वप्नसुषुप्ति कोणी भजन नंदी गात बसे ॥ गंगोत्री ॥ २ ॥

अहिल्याबाईचे पुण्य न वर्णवे धर्मशाळा ह्या बांधिल्या किती ॥ असंख्य शिंके सांगे झूले त्यावरुनि येती जाती ॥ छपर घाटी बहुत चढाई खालि पाहतां नेत्रे फिरती ॥ पाऊल वाट कठीण मोठी भय वाटे फाटे छाती ॥ सुखी जाहला धरारी वरुनि धान्य खरेदी बांधुनी नेती ॥ सात दिवस पुढें अन्न मिळेना म्हणूनी जन संग्रह करिती ॥ भैरवघाटी चढूनी दर्शन भैरवनाथाचे घेती ॥ पूर्व पुण्य तें फलासि आलें गंगोत्री नेत्री पाहाती ॥ चाल ॥ तेथें आचार्य स्वामिचे मर्यादास्थान ॥ बारा सूर्य तीर्थी प्रथम करुनिया स्नान ॥ भगिरथ शिलेवर करिती पिंडदान ॥ स्थापिक मूर्तिचें करिती पूजन ॥ त्रिरात्र राहुनी आज्ञा वंदुनी निघती जन अति उल्हासानें ॥ ३ ॥ गंगोत्री, इ. ॥

गिंडी तांब्या चंबु घागर गंगाजळ तीर्थे आणिती ॥ श्रीनगरीचे राजदूत ते भय्यारीत ते हाशिल घेती ॥ दरकुची दरकुची चालुनी प्राणी कठोर ग्रामाते येती ॥ तेथुनी वृद्ध केदाराचें भाविकजन दर्शन घेती ॥ शिवासाठीं देवी भिल्लीण झाली ॥ म्हणूनी ग्राम भिल्लीण म्हणती सायुज्य पोळ्याची दांडी ॥ बर्फाची नाहीं गणती ॥ त्रिजुगी नारायणाशीं पाहातां अती आनंदें जन होती ॥ नाभिपासुनी त्रिमूर्तीच्या अखंड जलधारा वाहती ॥ अमृत रुद्र कुंडीं वाहनी पावक विलयातें जाती ॥ असे परम रमणीय स्थळ तें दुजें नसें भूवरती ॥ पार्वतीच्या लग्नाचा अग्नी धूम्र अद्यापी जळती ॥ तद्भस्मातें भाळीं रेखिता ब्रह्मराक्षस पळताती ॥ चाल ॥ श्रीराम

सांब नारायण नमि माता ॥ झिलमिल्या पाटण पुढें साठ्यावरीं जाता ॥ हर्षती जन गणपतीचे पद नमिता ॥ मुंरकुट्या गणेशा नमुनी पुढें जातां ॥

गौरी कुंडींत तप्त उदकीं वाहतां माहेरघर सुख भासे ॥ गंगोत्री ॥ ४ ॥ गौरी कुंडी जन शित कुंड जन शित कुंड नाहतां तरती ॥ स्वयंभू शंभू स्वस्त्रीसहीत देवाचें दर्शन घेती ॥ पिंडदान आणि ब्राह्मणभोजन गंगापूजन जन करीती ॥ तेथुनी करूनिया प्रयाण सारे भिमकुंडा लागीं येती ॥ बर्फ अतिशय शीत वाजतां पूर्वज मनुजा आठविती ॥ मंदाकिनीचें स्नान करितां सुरवर सुमनें वर्षती ॥ संध्या तर्पण दान करुनिया नर केदाराला जाती, गंध पुष्प आणि पुंडे मेल्यांचे भस्म शिवाला अर्पिती ॥ रेतउदक आणि उदक तीर्थ ठेऊनी निरहारें राहती ॥ त्या योगानें परम मात्र ती हृदयीं वाटे शिवमूर्ति ॥ साहवा दिवस राहुनी तिथें सप्तम दिवशीं जन निघती ॥ गौरी कुंडीं करुनी पारणें सकल व्रतें साफल्य होतीं ॥ चाल ॥ तेथेंच महापंथाची आहे वाट ॥ ऐकुनिया चालती यात्रा घनदाट ॥ तांबानी चौकी बसविली आडवाट ॥ कुणी देह त्यागितां बंदी घाली लाट ॥ देह त्यागितां जन्मूनी प्रतिपृथ्विपति प्राणि तो होत असे ॥ गंगोत्री ॥ ५ ॥

तेथुनी निघतां नारायण कोटी पाहुनिया गुप्त काशी ॥ उरवी मठ पुढें तुंग पाहतो बहुत चढाइ आकाशीं ॥ षोडश कोशी चढ उतारे दुर्लभ दर्शन प्राप्त्याशीं ॥ गोपेश्वर पुढें अलकानंदनंदा यात्रा आली सांग्याशी ॥ क्षेत्रपाळ पुढें चरी उलंघुनी हणमंताच्या गंगेशीं ॥ पिंपळचटी गरुड गंगा गणेश गंगा रम्य जशी ॥ गंडिकेश्वरी सुवर्ण मूर्ती पृथ्वीविरी नाहीं ऐशी ॥ धर्म स्थापितां लक्ष्मीनारायण दर्शन घेतां हो त्यांशी ॥ चाल ॥ पाहा सुवर्ण रेषा ऋषि गंगा । तेथें स्नान करितां पाप जाय भंगा ॥ सरस्वतीनदीच्या उलंघुनी सांगा। कल्याण कुटीची बहुत रम्य जागा ॥ पर्वत शिळापासूनि शिखरें पाहतां अतिशय मन हर्ष ॥ गंगोत्री ॥ ६ ॥

वामभागीं नरनारायण नारद तिथें असती कीं ॥ सव्यभागीं श्रीकुबेर उद्धव अक्रुर सज्जन वसती कीं ॥ मध्यभागीं श्रीबद्रनारायण त्रिमुर्ती या साजिती कीं ॥ तडीतातसे मेखळा भूषणें रत्नजडीत किती शोभती कीं ॥ मंदिल सुंदर अखंड ज्याचा दिपवाळीच्या ज्योती कीं ॥ गरुडधन मार्कंड पायीं मार्कंड ब्रह्मशीळा त्या असती कीं ॥ पंचशिळेच्या मध्ये निरंतर प्रसाद सर्वदा सेविती कीं ॥ तत प्रसादी ब्रह्मकपालीं पिंडदान जन करिती कीं ॥ पुन्हा पिंड नाहीं उर्वी विरुनी पूर्वज मोक्षा जाती कीं ॥ इंद्रधारा वसुधारा केशव प्रयाग दृष्टी

ग्रा. क्र. ........

पाहतां कीं ॥ देवकी वसुदेव आहे जेथें तप केलें त्यांनीं तां कोरी ह्या युगानें रामकृष्ण प्रभू उदरीं ज्याच्या जन्मती कीं ॥ चाल ॥ ह्या स्थलीं आहे ऋषींचे निजस्थान । क्षण मात्र राहे त्या होय तत्त्वज्ञान ॥ प्रत्यक्ष सुरांचें ज्याला दर्शन ॥ अति आनंदें जन करिती प्रस्थान, साहामहिने राहूनी तेथ सुरपुजा षणमासाते ॥ गंगोत्री ॥ ७ ॥

नंदप्रयागीं नंद गंगातप केलें त्या नंदानीं ॥ कर्णप्रयागीं तप केलें रविनंदानीं ॥ रुद्रप्रयागीं कायवदावा महिमा मतिमंदांनीं ॥ श्रीनगराहूनीं पुढें चालतां सिताकुटी श्री वंदोनी ॥ गोविंद कुटीमध्यें तप आचरलें प्रत्यक्ष गोविंदांनीं ॥ देवप्रयागीं आली यात्रा नाचतगातीं आनंदानें ॥ दशरथानीं तप आचारलें गंगाआलक नंदानी ॥ व्यासगंगेचें आरक्त पाणी विजयी घाटी उलंघुनीं ॥ मन भंगाचित भंगा पाहतां गेलें निजमन रंगुनी ॥ पाहाडांतिल स्त्री पुरुष भाविक अती लंपट आनंदानी ॥ पाषाणाचीं सदनें. सारीं दिप तसे त्यांच्या सदनी कांच भूषणें स्त्री पुरुषाला कंबल वसनें परिधानें ॥ तेथुनि सारा पर्वत सरला देव भूमि सांगानी ॥ निरहारी निरंतर राहातां जैसे योगी योगानीं ॥ राजगिरा कुठीचीं भाजी भक्षिती भोजन भागांनीं ॥ बा वैरागड चालता मार्ग क्रमिला लक्ष्मणझोला उलंघुनी ॥ प्रभुबर मौला ऋषिकेशनां मुनीं हरिद्वारीं आला मेळा ॥ ही यथामतीनें वर्णिलें प्रभुला हेरंबात्मज तन मन धन साष्टांगि तो वंदितसे ॥ ८ ॥ जोशीमठाचे दर्शन करुनी विष्णुप्रयागीं जातीं कीं ॥ विष्णु प्रयागीं स्नान करूनी घाटचटी राहतीं कीं ॥ उठूनी प्रातःकाळीं सारे नारायणाला जाती कीं ॥ गंगोत्री ॥८॥

---

## हिमालयांतील सदावर्ते.

हिमालयांतील यात्रा करण्याची इच्छा असून ज्यांस पैशाचें पाठबळ नाहीं अशा लोकांस वाटेंत १० ते १५ मैलांच्या अंतरावर ठराविक शिधा मिळण्याची व्यवस्था कै. वासी बाबा श्री. का. क. वाले रामनाथ यांनीं केलेली आहे. कोणत्या गांवास काय शिधा मिळतो ह्याची यादी सोबत जोडलीच आहे. कोणत्याही गरीब यात्रेकरूस हृषीकेश येथें १०८ श्री. बा. का. क. वाल्याच्या पंचायती क्षेत्रांत ठिकठिकाणच्या सदावर्तांत शिधा मिळण्याबद्दल चिठ्ठया मिळतात प्रथम. कसा प्रवास करावयाचा ह्याचा विचार करून तो रस्ता सांगावा म्हणजे त्या रस्त्यावरलि सदावर्तांच्या चिठ्या मिळतात. रस्ता अगोदर विचार करून कायम करावा. मागाहून बदलतां येत नाहीं. प्रत्येक सदावर्तांच्या नांवाची चिठ्ठी निरनिराळी असते. तसेंच

नुसत्या शिध्यावर भागत नाहीं कांहीं तरी पदरमोड करावी लागते व बरोबर १० ते १५ रु. स्वतःचे असल्याशिवाय चिठ्ठया देत नाहींत. किती रुपये किमानपक्षीं पाहिजेत ह्याचा खुलासा अगाऊ पत्र पाठवून मागवावा. परंतु १५ पेक्षां जास्त बहुधा लागत नाहींत. पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा.

**श्री. १०८ बाबा कालींकमलीवाले रामनाथजी,**
पंचायती क्षेत्र, मु० पो० हृषीकेश.
जि० डेहराडून ( यू. पी. )

---

अ. नंबर — गांवाचें नांव — देणाराचें नांव. — किती देणार तें

१ ( १ ) सत्यनारायण श्रीमान् शेट महादेव लालजी सोमाणी चिडावा, आटा -॥- डाळ ८= तूप १ तोळा व मीठ मिरची,

( २ ) ,, पंचायती आयुर्वेदिक औषधालय.

२ ( ३ ) हृषीकेश पंचायती क्षेत्रांतून साधूंस भोजन, शिधा घेणारास—आटा -॥- डाळ ८= तूप १ तो. मीठमिरची लाकडें.

( ४ ) ,, आयुर्वेद औषधालय, आयुर्वेदपाठशाळा, संस्कृत पाठशाळा व अनाथालय.

( ५ ) ,, श्री. शेट बीजरावजी शिवदत्तरामजी रा. कलकत्ता. रोज १० साधूंस भोजन.

( ६ ) ,, ,, ,, घनश्यामदास जमानाधर मित्री, रा. चूरू. रोज ७ साधूंस भोजन.

( ७ ) ,, ,, ,, जवाहरमलजी मुरलीधर माखुमजी, ( आसाम ) रोज ५ साधूंस भोजन.

( ८ ) ,, ,, ,, श्रीकृष्ण वल्लभप्रसाद नारायणसिंहजी रामी बीघा ( पाटणा ) रोज ३ साधूंस भोजन.

३ ( ९ ) लक्ष्मणझूला ,, ,, रामनिरंजन बद्रीदास कालीडिया, रा. पाटणा. वर जातांना आटा १ शे. बटाटे -।- तूप १ तो. गूळ ८- व मीठ, परत येतांना आटा -॥- डाळ ८= तूप १ तो.

४ (१०) महादेवसैण ,, ,, भगवानदासजी सीताराम पोद्दार, रा. बिसाऊ, आटा -॥= डाळ ८= तूप १ तो. मीठ मिरची.

५ (११) व्यासघाट ,, ,, बालकृष्णदासजी फहतेलाल राठी, धामणगांव (वऱ्हाड) आटा ।।≈ डाळ ८≈ तूप १ तो.

६ (१२) देवप्रयाग ,, ,, गौरीशंकरजी गोयंदका रा. खुर्जा, गंगोत्रीस जाणाऱ्यांस आटा १। शे. डाळ -।- तूप १ तो. मीठ मिरची.

(१३) ,, ,, ,, लक्ष्मणदास सूरजमल जाटिया, रा. खुर्जा. आटा -।।≈ डाळ ८≈ तूप १ तो. मीठ मिरची.

७ (१४) श्रीनगर ,, ,, मोहनलालजी हिराचंद सराफ रा. कलकत्ता, आटा -।।≈ डाळ ८≈ तूप १ तो. मीठ मिरची लाकडें १।श.

(१५) ,, ,, ,, धर्मार्थ आयुर्वेदिक औषधालयांत औषधें.

८ (१६) भट्टीसेरा ,, ,, ललिताप्रसादजी वेंकटाबिहारीलालजी बजाज, मुरादाबाद, आटा -।।- डाळ ८≈ तूप १ तो. मीठ मिरची

९ (१७) रुद्रप्रयाग ,, ,, मोहनलालजी चिरंजीलाल बाघला, हाथरस आटा -।।- मीठ.

१० (१८) अगस्तमुनी ,, ,, हिरालालजी मुरारीलाल गोटेवाले, दिल्ली. आटा -।।- डाळ ८≈ तूप १ तोळा.

११ (१९) गुप्तकाशी ,, ,, कन्हय्यालालजी खंडेलवाला, गुडा. आटा -।।- डाळ ८≈ तूप १ तोळा.

१२ (२०) रामपूरचट्टी ,, ,, गोरखरामजी साधूराम खुर्जा, आटा -।।- डाळ ८≈ मीठ व लांकडें.

(२१) ,, ,, पंचायती क्षेत्रातर्फे ५ दिवसांकरितां पांघरण्यास घोंगडी ब्लांकेट वगैरे जातांना परत करणें.

१३ (२२) त्रिजुगिनारायण श्रीमान् शेट लक्ष्मीनारायणजी भगवानबक्स, मोमाणी, मालाखर, आटा ।।≈ डाळ व बटाटे ८≈ तूप १ तोळा, मीठ व लाकडें ८-

१४ (२३) गौरीकुंड श्रीमान् शेट आज्ञाराम मेघराजजी राठी, धनौरा (वऱ्हाड) आटा -।।- मीठ.

१५ (२४) रामाबाडा ,, ,, लच्छीराम चूडीवाले दलाल मुंबई, आटा -।।≈ डाळ ८≈ तूप १ तोळा, मीठ मिरची. वर जातांना गूळ ८- चाहा.

१६ (२५) केदारनाथ ,, ,, अनंतरामजी केदारनाथ केजडीवाल, कलकत्ता. २१ साधूंस रोज भोजन.
(२६) ,, ,, ,, जयरामदास भाकचंदजी, धामणगांव ( वऱ्हाड ) आटा -॥≈ डाळ ८≈ तूप १ तोळा, मीठ मिरची लाकूड, गूळ ८~ चहा ६ मासे.
(२७) ,, ,, ,, हजारीमलजी सोहनलाल रोज १० साधूंस भोजन.
(२८) ,, ,, ,, महादेवप्रसाद मुरारका, दिल्ली. थोडी खिचडी ( डाळ व तांदूळ )
(२९) ,, ,, ,, हुकुमचंद हरिदत्तराय,रांची, आयुर्वेदिक औषधालय.
(३०) ,, ,, ,, सनेहीराम जवाहिरमल, कलकत्ता. ६ मासे चहा, गूळ ८~ दिव्याची सोय.
(३१) ,, ,, ,, सनेहीरामजी डुंगरमल तनसुखिया [ आसाम ] १० साधूंस रोज भोजन.
१७ (३२) रामबाडा ,, ,, बसन्तलालजी घनःश्यामदास कलकत्ता. आटा -॥≈ डाळ ८≈ तूप १ तोळा, मीठमिरची गूळ ८~ चहा.
१८ (३३) उरवीमठ ,, ,, जीवनरामजी शिवबक्स झाझरिया, कलकत्ता. आटा -॥- मीठ.
१९ (३४) तुंगनाथ ,, ,, शिवनारायणजी महादेवलाल,हौरा. आटा -॥- मीठ.
२० (३५) चमोली ,, ,, नंदकिशोरजी श्रीराम झंझनुवाले, विसाऊ आटा -॥≈ डाळ ८≈ तूप १ तोळा, गूळ ८~ चहा ६ मासे, लाकूड, मीठ, मिरची.
२१ (३६) गरुडगंगा ,, ,, मोहनलालजी रामचंद्र डागा, जलपाईगोडी, (जलपैगुरी) आसाम,वरती जातांना आटा -॥- मीठ.
२२ ( ३७ ) जोशीमठ श्रीमान् पं. गोपाळ शंकर बेणीशंकरजी भचेच रिटायर्ड हे. कलेक्टर अहमदाबाद आटा -॥- मीठ.
२३ ( ३८ ) पांडुकेश्वर श्रीमान् शेट गोरखरामजी साधूराम–खुर्जा–आटा -॥- मीठ.
( ३९ ) ,, पंचायती क्षेत्रातर्फे बर्फाच्या थंडीपासून बचाव होण्याकरितां, ७ दिवसांनीं परत करण्याच्या बोलीनें वांट्यास येईल तें पांघरूण.

२४ ( ४० ) हनुमान चट्टी श्रीमान् शेट–सुगनचंदजी गोविंदराम–कलकत्ता–गूळ ८–
चहा ६ मासे.

२५ ( ४१ ) श्रीबद्रीनाथ ,, ,, जमनादासजी जीतमल पोद्दार–नागपूर–( कांहीं पंचायती ) आटा -॥= डाळ ८= अगर बेसन ८– तूप १ तोळा, गूळ ८– चहा ६ मासे लाकडे ३ पैसे मीठ.

( ४२ ) ,, ,, ,, जमनादासजी जिवराज खिचडी १ दिवस.

( ४३ ) ,, ,, पंडित चेतरामजी गोपीचंद–पतन कुहाला–खिचडी रोज ५ शेर.

( ४४ ) ,, ,, शेट नानकचंदजी जगंनाथ–रंगून–रोज २१ साधूंस भोजन.

( ४५ ) ,, ,, ,, जीवन रामजी संतलाल–रंगून रोज १० साधूंस भोजन.

( ४६ ) ,, ,, ,, मोतीलालजी रामलाल जालान,–कुष्टिया ( आसाम ) खिचडी १ दिवस.

( ४७ ) ,, पंचायती आयुर्वेदिक औषधालय.

( ४८ ) ,, श्रीमान् शेट हरिदत्तरायजी नंदलाल-रंगून-११ साधूंस भोजन रोज.

( ४९ ) ,, ,, ,, रामस्वरूपजी भतिया शेट नारायणदास गोपाळदास फर्मचे मालक-कानपूर-५ साधूंस रोज भोजन.

( ५० ) ,, पंडित रघुनाथ प्रसाद गणेशजीचे चिरंजीव रामसर खिचडी १ शेर रोज.

२६( ५१ ) लामबगड श्रीमान्शेट रायबहादुर कस्तुरचंदजी विश्वेश्वरदास डागा दिवाणबहादुर-विकानेर. आटा -॥= डाळ ८= अगर बेसन ८– मीठ मिरची, लाकडें ८१ कढत पाणी.

२७( ५२ ) कुम्हारचट्टी राय हजारीमल दुधवाले बहादुर आटा -॥= डाळ ८= तूप १ तोळा, मीठ मिरची लाकूड.

२८( ५३ ) पपिल कोटी श्रीमान् शेट मोतीलालजी राधाकृष्ण बागला आटा -॥= डाळ ८= तूप १ तोळा मीठमिरची.

२९ ( ५४ ) नंदप्रयाग ,, ,, विश्वेश्वर लालजी रामेश्वर चूरूवाले-मटकीना ( बर्मा ) आटा -॥- डाळ ८= तूप १ तोळा मीठ मिरची.

३० ( ५५ ) कर्णप्रयाग राजा ललता प्रसाद पिलभिट आटा ॥= डाळ ८= तूप १ तोळा मिठ मिरची लांकडें

३१ ( ५६ ) मानस सरोवर

तकला कोट पंचायतीतर्फे साधूंस सतू–गंगोत्री नं. २

## गंगोत्री नं. २.

३२ ( ५७ ) धनोल्टी श्रीमान्शेट जीवनलालजी चुन्नीलाल अहमदाबाद आटा -॥- व मीठ
३३ ( ५८ ) काणाताल ,, ,, ईश्वररामजी धर्मचंद सिन्धानिया–अमृतसर–आटा ॥= डाळ ८= तूप १ तो. मीठ मिरची.
३४ ( ५९ ) भलिडयाना ,, ,, रामचंद्रजी जवाहिरमल टीवडे–जबलपूर आटा -॥- मीठ.
३५ ( ६० ) धरासू ,, ,, सूरजमलजी शिवदयाल बांजोरिया–कलकत्ता--आटा ॥= डाळ ८= तूप १ तोळा मीठ व मीरची.
३६ ( ६१ ) गंगाणी ,, ,, खेमराज श्रीकृष्णदासात्मज रावसाहेब रंगनाथ श्रीनिवास श्रीवेंकटेश्वर
३७ ( ६२ ) जमनाचट्टी ,, ,, प्रेमसाध्यक्ष–मुंबई-आटा -॥= डाळ ८= तूप १ तोळा व मीठ.
३८ ( ६३ ) जन्नोत्री ,, ,, दुर्गाप्रसादजी सूरतराम खेमका–दिल्ली आटा ॥= डाळ ८= तूप १ तोळा. मीठ व मिरची.
३९ ( ६४ ) उत्तर काशी पंचायती मुंबईतर्फे आटा -॥= डाळ ८= तूप १ तोळा, मीठ व मिरची
( ६५ ) ,, श्रीमान्शेट रुपलाल चमनलाल मित्री-चुरू भोजन.
( ६६ ) ,, ,, गोपीराम गोविंदराम तापाडिया-कलकत्ता-भोजन १५ साधूस.
( ६७ ) ,, पंचायती आयुर्वेदिक औषधालय.
४० ( ६८ ) भटवाडी–श्रीमानशेट इंद्रलाल विश्वंभरसहाय कवार्डी-मिरत आटा -॥- डाळ ८= तूप १ तो. मीठ
४१ ( ६९ ) सूक्की ,, ,, मोहकमचंद खेमका यांची धर्मपत्नी आणि मातुश्री चिरंजीवी छोटेलाल दिल्ली आटा-॥= डाळ ८= तूप १ तोळा मीठ व मीरची.
४२ ( ७० ) धराली श्री. शेट ... आटा -॥= डाळ ८= तूप १ तोळा मीठ व-मीरची.
४३ ( ७१ ) भैरव घाटी ,, अमृतलालजी दामोदरजी अहमदाबाद आटा -॥= डाळ ८= मीठ व मीरची.
४४ ( ७२ ) ,, ,, जयदयाळजी वासुदेवजी नंदलाल–कलकत्ता आटा -॥= डाळ ८= अगर बटाटे ८= तूप १ तोळा मीठ व मिरची.

४५ ( ७३ ) गंगनानी श्रीमान् राजा ललता प्रसादजी- पिलभिट–आटा -॥।- डाळ ८=
तूप १ तोळा मीठ व मिरची
हें सदावर्त ब्रह्मचारी राजारामजी हरिप्रसाद यांच्या प्रेरणेवरून उघडलें होतें.
४६ ( ७४ ) स्याली श्रीमानशेट साहू जगन्नाथजी रामस्वरूप–पिलभिट–आटा ८=
डाळ ८= व मीठ.
४७ ( ७५ ) वुड्ढाकेदार ,, साहू रामस्वरूप–पिलभिट–आटा॥= डाळ ॥=
तूप १ तोळा, मीठ व मिरची.
४८ ( ७६ ) गुतू ,, रामरिखदासजी जयरामदास हिंमतसिंह–दुमका–
आटा -॥।- मीठ व मिरची.
४९ ( ७७ ) पवांली ,, भगवानदास गोकुलदास–मुंबई–आटा -॥- मीठ.
५० ( ७८ ) मंगूका मांडा श्रीमानशेट लछमनदास खुशीराम- देवबंद–आटा -॥- मीठ.

## सपाट प्रदेशांत नं. ३

५१ ( ७९ ) कनखल श्रीमान् शेट नेतारामजी बद्रीदास बंका–मलसीसर–१५
विद्यार्थ्यांस भोजन.
५२ ( ८० ) हरिद्वार ,, ,, गुरुदयाळजी गंगाबकस खेमका–रामगढ–
साधू व विद्यार्थ्यांस अन्न.
५३ ( ८१ ) कुरुक्षेत्र पंचायतीतर्फे साधूंस व ब्राह्मणास भोजन.
५४ ( ८२ ) प्रयागराज ,, ,, ,,
५५ ( ८३ ) काशी ,, ,, ,, असीघाटावर.
५६ ( ८४ ) दवाखाने, दहा ठिकाणीं—बद्रीनाथ, केदारनाथ, श्रीनगर, उत्तरकाशी, हृषीकेश, सत्यनारायण, डेहराडून, हरिद्वार, सहारणपूर, दिल्ली.

पत्ता–**श्री १०८ बाबा कालीकमलीवाले रामनाथजी,**
पंचायती क्षेत्र, मु. पो. हृषीकेश.
जि. डेहराडून ( यू. पी. )

**टीप**—वरील सदावर्तें व दवाखाने वगैरे संबंधींच्या माहितीचें पत्रक बा.क. वाले यांच्या संस्थेमार्फत मिळूं शकतें. त्यांचा पत्ता वरतीं दिलाच आहे. ह्याशिवाय इतर सदावर्तें वगैरे आहेत परंतु त्यांची माहिती जोडतां आली नाहीं.

—

# हिमालयाच्या यात्रांतील चट्ट्यांची माहिती.

## हरिद्वार ते गंगोत्री–जम्नोत्री क्रमांक १.

| अ. नं | चट्टीचें नांव. | मागील चट्टीपा. अंतर | हरिद्वार पासून अंतर | मार्ग विवरण व विशेष गोष्टी. |
|---|---|---|---|---|
| १ | हृषीकेश | १४ | १४ | रेल्वे स्टेशन हरिद्वारपासून मोटार |
| २ | मूनीकीरेती | १ | १५ | |
| ३ | नरेंद्रनगर | १० | २५ | मोटारची सडक पाय रस्त्यानें ५ मैल |
| ४ | फकोट | १० | ३५ | मध्यंतरीं लहान चट्ट्या आहेत. |
| ५ | नागणी | ९ | ४४ | ,, ,, |
| ६ | चमूआ | ११ | ५५ | ,, ,, |
| ७ | टिहरी | १० | ६५ | ,, ,, |
| ८ | सराई | ५॥ | ७०॥ | रस्ता सपाट आहे |
| ९ | भल्डयाणा | ६ | ७६॥ | ,, ,, ,, |
| १० | छाम | ५ | ८१॥ | ,, ,, ,, |
| ११ | धरासू | १० | ९१॥ | येथून उजव्या हातास गंगोत्री व डाव्या हातास जन्मोत्रीस रस्ता फुटतो. |
| १२ | कल्याणी | ४॥ | ९६ | चढाव व पाण्याचा अभाव. |
| १३ | गेंवला | ५. | १०१ | मार्ग सरळ. |
| १४ | सिलक्यारी | ५ | १०६ | मार्ग सरळ पुढें रस्ता वाईट, मधल्या रस्त्यानें जाऊं नये. |
| १५ | राडीधार | ५ | १११ | येथून उतारास सुरवात होते. |
| १६ | डंडालगाऊ | २ | ११३ | उतार. |
| १७ | सिमली | २ | ११५ | येथून एक रस्ता उजव्या हातास उत्तर-काशीकडे गेला आहे. |
| १८ | गंगाणी | २ | ११७ | येथून पुढील रस्ता फार आल्हादकारक आहे. |
| १९ | खेरात | २ | ११९ | रस्ता सरळ. |
| २० | जगन्नाथ | ३ | १२२ | १ मैल चढाव, पुढें २ मैल सपाट. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २१ | जमनाचट्टी | १ | १२३ | सपाट चट्टी फारच लहान. |
| २२ | ओझरी | २ | १२५ | एक मैल चढाव पुढें सपाटी ह्या रस्त्यांतील अत्यंत रमणीय प्रदेश. |
| २३ | डडोटी | २॥ | १२७॥ | दोन मैल सपाट, अर्ध मैल सपाट. |
| २४ | राणागाऊ | २ | १२९॥ | अर्धा मैल चढाव पुढें सपाट. |
| २५ | हनुमानचट्टी | २ | १३१॥ | रस्ता सपाट. |
| २६ | खरसाळी | ४॥ | १३६ | तीन मैल सपाट दीड मैल चढाव. एक रस्ता डाव्या हातास तिसऱ्या मैलावर फुटतो तो मार्केडेयतीर्थावरून पुढें जम्नोत्रीस जातो. |
| २७ | जम्नोत्री | ५ | १४१ | सर्व चढाव फार त्रासदायक परंतु वनश्रीनें भरलेला. |

## गंगोत्री क्रमांक २.

### जम्नोत्रीहून परत २५ मैल गेलेल्या रस्त्यानेंच येणें.

| अ. नं | चट्टीचें नांव. | अंतर दोन चट्ट्यांत | अंतर जम्नोत्रीहून | मार्ग विवरण व विशेष गोष्टी. |
|---|---|---|---|---|
| १ | सिमली | २५ | २५ | वर्णन मागें आलें आहे. |
| २ | जंगलचट्टी | ४ | २९ | दीडमैल सरळ, पुढें दीडमैल चढाव पुढें उतार, लहान चट्टी. |
| ३ | सिगोट | ४ | ३३ | प्रथम चढाव, नंतर जंगल व पुढें सारखा उतार. |
| ४ | नाकुरी | ३ | ३६ | सपाटी व पुढें उतार. हें ठिकाण धरासूहून गंगोत्रीस जाणाऱ्या रस्त्यावर आहे. |
| ५ | उत्तर काशी | ६ | ४२ | सपाट गंगाकांठानें |
| ६ | गंगोरी | ३ | ४५ | ,, ,, |
| ७ | नैताला | ३ | ४८ | ,, ,, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | मणेरी | ४ | ५२ | ,, ,, |
| ९ | कुम्हाल्टी | ४ | ५६ | ,, ,, |
| १० | मल्लाचट्टी | २ | ५८ | येथून एक रस्ता उजव्या हातास केदारनाथाकडे जातो. |
| ११ | भटवाडी | २ | ६० | मधून मधून रस्ता पडलेला असतो. |
| १२ | भुक्की | ६ | ६६ | रस्ता चढउताराचा आहे. |
| १३ | गंगणाणी | ३ | ६९ | दोन मैलानंतर उजव्या हातास डोंगरावर ऋषीकुंड नांवाचें गरम पाण्याचें कुंड आहे. |
| १४ | लोहारी नाग | ४ | ७३ | मार्ग दगडाळ व चढउताराचा. |
| १५ | सुखी | ५ | ७८ | चढाव बराच आहे. |
| १६ | झाला | ३ | ८१ | १ मैल चढाव, पुढें उतार, चढून गेल्यावर अत्यंत चित्ताकर्षक स्वर्गीय देखावा दृष्टीस पडतो. |
| १७ | हर्सिल | २ | ८३ | तिबेटी लोकवस्तीचें गांव. |
| १८ | हरप्रयाग | १ | ८४ | सपाटी. |
| १९ | धराली | २ | ८६ | ,, तिबेटांत जाण्यास कुली मिळतात. |
| २० | जांगला | ४ | ९० | सपाट व मनोरंजक. |
| २१ | भैरोघाटी | २॥ | ९२॥ | दीड मैल सपाट पुढें चढाई. |
| २२ | गंगोत्री | ६॥ | ९९ | साधारण चढउतार. |

## गंगोत्रीहून परत मसूरी क्रमांक ३.

| अ. नं. | चट्टीचें नांव. | अंतर दोन चट्ट्यांत | अंतर गंगोत्री पासून | मार्ग विवरण व विशेष गोष्टी. |
|---|---|---|---|---|
| १ | गंगोत्री. | | | नाकुरीपर्यंत क्रमांक २ प्रमाणें परत. |
| २ | नाकुरी | ६३ | ६३ | ,, ,, ,, |
| ३ | डुंडाचट्टी | ३ | ६६ | वस्ती करण्यासारखें ठिकाण. |
| ४ | धरासू | ९ | ७५ | मध्यें वस्तीस जागा नाहीं येथून एक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | रस्ता मसुरीस परंतु तो फारसा वाहता नाहीं. |
| ५ | भल्डयाणा | १५ | ९० | वर्णन क्रमांक १ मध्यें आहे. |
| ६ | बंड्यागाऊ | ६ | ९६ | बहुतेक सर्व चढाव पाण्याचा अभाव. |
| ७ | काणाताल | ७ | १०३ | तीन मैल चढाव पुढें सपाटी. |
| ८ | धनोल्टी | ७ | ११० | साधारण चढउतार. |
| ९ | मसुरी | १५ | १२५ | धनोल्टी ते मसूरी रस्ता सारखा वाहाता असल्यामुळें वाटेंत पाणी व दुकानें सारखी मैलामैलावर लागतात. रस्ता साधारणतः उतार. |
| १० | डेहराडून | २६ | १५१ | मसुरीहून डेहराडूनला मोटारनें जातां येतें व येथून पुढें रेल्वेनें परत. |

## कोटद्वार ते केदारनाथ, क्रमांक ४.

| अ. नं. | चट्टीचें नांव. | मागील ठिकाणाहून अंतर | कोटद्वाराहून अंतर | मार्ग विवरण व विशेष गोष्टी. |
|---|---|---|---|---|
| १ | कोटद्वार | | | मुंबईहून १०४१ मैल रेल्वेनें. |
| २ | डुगड्डा | १० | १० | कोटद्वारहून मोटारचा रस्ता. |
| ३ | डाडामंडी | ६ | १६ | पायरस्ता साधारण सपाटी. |
| ४ | द्वारीखाल | ६ | २२ | साधारण ४ मैल सपाट २ मैल चढाव. |
| ५ | बांगघाट | ७ | २९ | बहुतेक सर्व उतार. |
| ६ | कलेथ | ३ | ३२ | फारच कठीण चढाव. |
| ७ | कांसखेत | ६ | ३८ | साधारण चढउतार. |
| ८ | अधवानी | ३ | ४१ | साधारण सपाट. |
| ९ | पौडी | ९ | ५० | साधारण उतार |
| १० | श्रीनगर | ८ | ५८ | सर्व उतार. |
| ११ | सुकृता | ५ | ६३ | सरल रस्ता. |
| १२ | भट्टीसेरा | ३ | ६६ | ,, ,, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | छातखाल | १ | ६७ | रस्ता सर्व चढावाचा. |
| १४ | खांकरा | २॥ | ६९॥ | सर्व उतार. |
| १५ | नरकोटा | २॥ | ७२ | १ मैल चढाव पुढें सरळ. |
| १६ | गुलाबराय | ४ | ७६ | १ मैल चढाव. १ मैल उतार पुढें सपाट. |
| १७ | रुद्रप्रयाग | १ | ७७ | उतार. |
| १८ | छतोली | ५ | ८२ | साधारण सपाट. |
| १९ | तिलबाडा | १ | ८३ | ,, ,, |
| २० | मठचट्टी | १ | ८४ | ,, ,, |
| २१ | रामपूर | -॥- | ८४॥ | ,, ,, |
| २२ | अगस्तिमुनी | ३॥ | ८८ | रस्ता मंदाकिनीच्या कांठानें आहे. |
| २३ | सौन्डी | २॥ | ९०॥ | ,, ,, |
| २४ | चांदापुरी | १॥ | ९२ | पुष्कळ सपाट जमीन. |
| २५ | भिरी | २॥ | ९४॥ | भीमाचें दर्शन करणें. |
| २६ | कुण्ड | ३॥ | ९८ | रस्ता साधारण सपाट व थोडा उतार. |
| २७ | गुप्तकाशी | ३ | १०१ | थोडा चढाव पुढें सपाट. |
| २८ | नाला | १॥ | १०२॥ | सपाटी. |
| २९ | भेता | १॥ | १०४ | येथें जादा सामान ठेवावें; रस्ता सपाट. |
| ३० | व्युंग तुला | १ | १०५ | उतार. |
| ३१ | व्युंग मला | १ | १०६ | चढाव. |
| ३२ | मैखंडा | २ | १०८ | चढाव साधारण. |
| ३३ | फाटा | २ | ११० | साधारण चढ उतार. |
| ३४ | रामपूर | ५ | ११५ | ,, ,, |
| ३५ | त्रिजुगी नारायण | ६ | १२१ | २॥ मैल सपाट पुढें डाव्या हातच्या रस्त्यानें ३॥ मैल चढाव. |
| ३६ | सोनप्रयाग | ३॥ | ११८॥ | त्रिजुगीवरून परस्पर मुख्य रस्त्यावर येणें. उतार. |
| ३७ | गौरीकुंड | २॥ | १२१ | एक मैल चढाव पुढें सपाट. |
| ३८ | रामवाडा | ४ | १२५ | दगडाळ रस्ता मधून मधून चढाव. |
| ३९ | केदारनाथ | ५ | १३० | रस्ता सर्व चढाव व बहुतेक वर्फाच्छादित. |

# केदारनाथ ते बदरीनाथ क्रमांक ५.

| अ. नं. | चट्टीचें नांव. | अंतर दोन चट्ट्यांत | अंतर केदारनाथ पासून | मार्ग विवरण व विशेष गोष्टी. |
|---|---|---|---|---|
| १ | केदारनाथ | | | |
| २ | नाला | २७ | २७ | गेलेल्या मार्गानेंच परत. |
| ३ | उरवीमठ | ३ | ३० | दीड मैल उतार दीड मैल कठीण चढाव. |
| ४ | कंथाचट्टी | ३ | ३३ | दोन मैल साधारण चढाव पुढें उतार. |
| ५ | ग्वालियाबगड | २ | ३५ | उतार पुढें चढावयास सुरवात. |
| ६ | पोथीवासा | ३॥ | ३८॥ | चढाव दाट जंगलांतून रस्ता. |
| ७ | बनियाकुंड | २ | ४०॥ | ,, ,, |
| ८ | चोपता | २ | ४२॥ | येथून मुख्य रस्ता सोडून डाव्या हातास तुंगनाथाकडे रस्ता वळतो. |
| ९ | तुंगनाथ | ३॥ | ४६ | सर्व चढाव परत उतरणें भुलकन चट्टीवर. |
| १० | भुलकन | ३॥ | ४४ | उतार. |
| ११ | पांगरवासा | ३ | ४७ | घनदाट जंगलांतून उतार. |
| १२ | मंडल | ४ | ५१ | बहुतेक उतार, रम्य ठिकाण. |
| १३ | गोपेश्वर | ५ | ५६ | साधारण चढउतार. |
| १४ | चमोली | ३ | ५९ | बहुतेक उतार परंतु झाडी नाहीं. |
| १५ | मठ | २ | ६१ | साधारण सपाटी. |
| १६ | सिय्यासैण | ४ | ६५ | दुकानें आहेत. |
| १७ | पिपलकोटी | ३ | ६८ | १ मैल उतार. २ मैल चढाव. मोठा बाजार. |
| १८ | गरुडगंगा | ४ | ७२ | साधारण सपाटी. |
| १९ | पाताळगंगा | ४ | ७६ | दोन मैल साधारण चढाव पुढें उतार. |
| २० | गुलाबकोटी | २ | ७८ | साधारण चढाव. |
| २१ | हेलंग | ३ | ८१ | अर्धा मैल चढाव पुढें सपाट. |
| २२ | झरकुला | ४ | ८५ | ,, ,, |
| २३ | जोशीमठ | ३ | ८८ | सपाटी व थोडा उतार. |
| २४ | विष्णुप्रयाग | २ | ९० | उतार. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २५ | घाटचट्टी | ४ | ९४ | रस्ता दगडाळ सामान्य चढ उतार. |
| २६ | पांडुकेशर | २ | ९६ | ,, ,, |
| २७ | शेषधारा | -॥- | ९६॥ | |
| २८ | लामबगड | २॥ | ९९ | रस्ता सपाट. |
| २९ | हनुमान चट्टी | ४ | १०३ | ,, ,, |
| ३० | बद्रनाथ | ४ | १०७ | १ मैल सपाटी पुढें ३ मैल कठीण चढाव. |

## बद्रीनाथ ते राणीखेत, क्रमांक ६.

| अ. नं. | चट्टीचें नांव. | अंतर दोन चट्ट्यांत | अंतर बद्रीनाथपा. | मार्गविवरण व विशेष गोष्टी. |
|---|---|---|---|---|
| १ | बद्रनाथ | | | येथून चमोलीपर्यंत गेल्या रस्त्यानें परत. |
| २ | चमोली | ४८ | ४८ | रस्ता अर्थात् बराच उतार. |
| ३ | मैठाणा | ४ | ५२ | उतार |
| ४ | नंदप्रयाग | ३ | ५५ | रस्ता साधारण सपाट व उतार. |
| ५ | सोनला | ३ | ५८ | ,, ,, |
| ३ | लंगासू | ३ | ६१ | ,, ,, |
| ७ | जयकंडी | २ | ६३ | ,, ,, |
| ८ | कर्णप्रयाग | ५ | ६८ | ,, ,, |
| ९ | सिमली | ४ | ७२ | रस्ता सपाट व उतार. |
| १० | सिरोली | २ | ७४ | सोपा चढाव. |
| ११ | भटोली | २ | ७६ | चांदपूरचा जुना किल्ला. |
| १२ | उज्ज्वलपूर | २ | ७८ | रस्ता जंगलांतून आहे. |
| १३ | आदिबदरी | ४ | ८२ | रस्ता सपाट आहे. |
| १४ | खेती | ३ | ८५ | कठीण चढाव. |
| १५ | जंगलचट्टी | १॥ | ८६॥ | ,, ,, जंगलांतून रस्ता. |
| १६ | कालीमाटी | २॥ | ८९ | कठीण उतार. |

स्थळ ...
सं. ........
ता. ........

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | ग्वाडगधेरा | ४ | ९२ | उतार. |
| १८ | धुनारघाट | १ | ९४ | सपाट रस्ता. |
| १९ | सैंजी | २ | ९६ | ,, |
| २० | मेल चौरी | ३ | ९९ | येथून नवे कुली करावे लागतात. |
| २१ | सेमल खेत | २॥ | १०१॥ | थोडा चढाव पुढें उतार. |
| २२ | बिजराणी | २ | १०३॥ | उतार. |
| २३ | रामपूर | -॥- | १०४ | ,, |
| २४ | हरवेश्वर | १ | १०५ | चांगली चट्टी. |
| २५ | दिगोटी | १ | १०६ | सपाटी. |
| २६ | गणाई | १ | १०७ | मोठी चट्टी. |
| २७ | बैरती | ८ | ११५ | मोठी चट्टी, धर्मशाळा. |
| २८ | द्वाराहाट | २ | ११७ | मोठे गांव सर्व सोई. |
| २९ | पतकोटली | ७ | १२४ | पांच मैल सपाटी पुढें दोन मैल चढाव. |
| ३० | राणीखेत | ६ | १३० | साधारण चढउतार. |

हरिद्वार ते श्रीनगर, कर्णप्रयाग ते रुद्रप्रयाग, गणाई ते रामनगर इत्यादि रस्त्यांनीं सुद्धां पुष्कळ यात्रेकरू प्रवास करितात; परंतु त्या रस्त्यांनीं मी प्रवास न केल्यामुळें त्याचें वर्णन दिलें नाहीं. त्या रस्त्याच्या माहितीचीं पुस्तकें हरिद्वार येथें बुकसेलरांकडे ३।४ आणे किंमतीस पाहिजे तितकीं मिळतात. ब्रह्मचारी चक्रधरशर्मा ह्यांच्या बदरीकेदार यात्रावर्णनांत माहिती जास्त चांगली असते व तें हिंदींत व इंग्रजींतही छापलें असल्यामुळें यात्रेकरूंस जास्त उपयोगीं पडतें.

---

## निरनिराळ्या ठिकाणांतील सामान्य अंतर.

| | | | |
|---|---|---|---|
| हरिद्वारपासून | बदरीनाथ | ( देवप्रयागावरून ) | १८३ मैल. |
| ,, | केदारनाथ | ,, | १५० ,, |
| ,, | गंगोत्री | ,, | १९३ ,, |
| ,, | जम्नोत्री | ,, | १६६ ,, |
| जम्नोत्रीहून गंगोत्री | | | ९९ ,, |
| गंगोत्रीहून केदारनाथ | | | १२३ ,, |
| केदारनाथाहून बदरीनाथ | | | १०१ ,, |

बदरीनाथाहून राणीखेत १२९ ,,
,, रामनगर १६४ ,,

## आमच्या प्रवासांची तारीखवार रोजनिशी.

## बदरीकेदार यात्रा कोटद्वारमार्गें.

ता.

११।५।१९३० कुलाबा मुंबई दुपारीं ४ वा. सोडली.
१२।५।३० दिल्ली. रात्रीं ८ वा. पों. १० वा. निघालों.
१३।५।३० कोटद्वार सकाळीं ८ वा.
,, ,, ,, डुगड्डा सकाळीं १० वा.
,, ,, ,, ,, वस्ती.
१४।५।३० ,, सोडून वस्ती डाडामंडी ५ मैल.
१५।५।३० बांगघाट वस्ती १३ मैल.
१६।५।३० कांसखेत दुपारीं ९ मैल.
,, ,, ,, अदवानी संध्याकाळीं वस्ती ३ मैल.
१७।५।३० पौडी ८ मैल.
१८।५।३० श्रीनगर ९ मैल.
१९।५।३० रुद्रप्रयाग १८ मैल.
२०।५।३० ,, वस्ती.
२१।५।३० अगस्तिमुनी ११ मैल दुपारीं.
,, ,, ,, चंद्रपुरी वस्ती ४ मैल.
२२।५।३० गुप्तकाशी ९ मैल.
२३।५।३० फाटाचट्टी ९ मैल.
२४।५।३० त्रिजुगी नारायण ११ मैल.
२५।५।३० रामवाडा १० मैल.
२६।५।३० केदारनाथ जाऊन परत रामवाडा १० मैल
२७।५।३० रामपूर व फाटाचट्टी १५ मैल.
२८।५।३० भेता व उखीमठ ११ मैल.
२९।५।३० ग्वालियाबगड व बानिया कुंड ११ मैल.
३०।५।३० तुंगनाथ, पांगरवासा, मंडल १४ मैल.

३१।५।३० गोपेश्वर, चमोली ८ मैल.
१।६।३० पिपलकोटी, गरुडगंगा १३ मैल.
२।६।३० गुलाबकोटी, जोशीमठ १६ मैल.
३।६।३० पांडुकेश्वर हनुमानचट्टी १५ मैल.
४।६।३० श्रीबदरीनाथ ४ मैल.
५।६।३० ,, वस्ती.
६।६।३० वस्ती बदरीनाथ.
७।६।३० घाटचट्टी १३ मैल.
८।६।३० जोशीमठ गुलाबकोटी १६ मैल.
९।६।३० पिपलकोटी मठचट्टी १७ मैल.
१०।६।३० नंदप्रयाग, लंगासू १५ मैल.
११।६।३० सिमली उज्जलपूर १७ मैल.
१२।६।३० कालीमाटी, धुनारघाट १६ मैल.
१३।६।३० मैलचोरी रामपूर गणाई १३ मैल.
१४।६।३० द्वाराहाट पतकोटली १७ मैल.
१५।६।३० राणीखेत, अलमोडा ६ मैल चाल; पुढें मोटार २९ मैल.
१४।५।३० ते १५।६।३० पायीं प्रवास.
१६।६।३० अलमोडा, नैनीताल मोटार ७४ मैल.
१७।६।३० नैनीताल वस्ती.
१८।६।३० काथगोदाम २२ मैल मोटार पुढें रेल्वेनें, वस्ती काशीपूर.
१९।६।३० रामनगर जाऊन परत काशीपूर.
२०।६।३० काशीपूर सोडून गार्डीतून मोरादाबाद.
२१।६।३० वस्ती हरिद्वार.
२२।६।३० ,, ,,
२३।६।३० डेहराडून.
२४।६।३० मसूरीस जाऊन परतवस्ती डेहराडून.
२५।६।३० सहाराणपूर.
२६।६।३० सकाळीं कालक्यावरून सिमलावस्ती.
२७।६।३० सिमला.
२८।६।३० अंबाला कॅन्ट व सिटी, मिरत.

२९।६।३० दिल्ली, अलीगड.
३०।६।३० कानपूर.
१।७।३० अलाहाबाद.
२।७।३० कटनी सिमेंट फॅक्टरी.
३।७।३० बीना सांची मॉन्युमेंट.
४।७।३० भोपाळ खांडवा.
५।७।३० नासिक.
६।७।३० कल्याण व पुणें.

## गंगोत्री व जम्नोत्री.

४।५।३१ बॉम्बे सेंट्रल रात्रीं सोडलें.
५।५।३१ रात्रीं गाडींत.
६।५।३१ दिल्ली हरिद्वार.
७।५।३१ हरिद्वार वस्ती.
८।५।३१ हृषीकेश नरेंद्रनगर १० मैल.
९।५।३१ फकोट जाजुआ १८ मैल.
१०।५।३१ चमुआ व पुढें ४ मैल मिळून १६ मैल.
११।५।३१ टिहरी वस्ती ६ मैल.
१२।५।३१ भलब्याना १२ मैल.
१३।५।३१ छाम, नगुळ, धरासू, १५ मैल.
१४।५।३१ गेवला सिलक्यारी १६ मैल.
१५।५।३१ डंडालगाऊ खैरात १३ मैल.
१६।५।३१ ओझरी राणागाऊ ११ मैल.
१७।५।३१ खरसाळी ७ मैल.
१८।५।३१ खरसाळीहून जम्नोत्री जाऊन परत वस्ती खरसाळी १० मैल.
१९।५।३१ ओजरी, खैरात, १७ मैल.
२०।५।३१ सिमली जंगलचट्टी, सिगोट १२ मैल.
२१।५।३१ नाकुरी उत्तर काशी ९ मैल.
२२।५।३१ मणेरी व मल्लाचट्टी १६ मैल.
२३।५।३१ भुकी गंगणाणी ११ मैल.

२४।५।३१ सुखी व हरप्रयाग १५ मैल.
२५।५।३१ भैरवघाटी व गंगोत्री १५ मैल.
२६।५।३१ गंगोत्री वस्ती.
२७।५।३१ धराली झाला १८ मैल.
२८।५।३१ सुखी गंगाणाणी १२ मैल.
२९।५।३१ मल्ला, मणेरी १७ मैल.
३०।५।३१ उत्तर कांशी, नाकुरी १६ मैल.
३१।५।३१ धरासू, नगूण, १७ मैल.
१।६।३१ भलळ्याणा, बंडालगाऊ, १६ मैल.
२।६।३१ काणाताल, धनोल्टी, १६ मैल.
३।६।३१ मसूरी डेहराडून मसुरीपर्यंत पायीं पुढें मोटार-डेहराडून.
४।६।३१ सहाराणपूर व रात्रीं गाडींत.
५।६।३१ रात्रीं गाडींत.
६।६।३१ नासिक.
७।६।३१ पुणें.

## नेपाळ.

२६।२।३२ मुंबई रात्रौ सोडली.
२७।२।३२ मोगलसराई रात्रौ सोडली.
२८।२ ३२ सकाळीं पाटणा रात्रीं गाडींत मुझफरपूर.
२९।२।३२ वस्ती रक्सौल.
१।३।३२ " भीमफेडी.
२।३।३२ " कुलीखानी.
३।३।३२ " पाशुपतेश्वर देवपाटण.
४।३।३२ ते ७।३।३२ ".
८।३।३२ वस्ती सितलांग.
९।३।३२ भीमफेडी.
१०।३।३२ रक्सौल.
११।३।३२ पाटणा.
१२।३।३२ गया.

१३।३।३२ गया रात्रीं गाडींत बसलों.
१४।३।३२ गाडींत.
१५।३।३२ सकाळीं कल्याण व नंतर पुणें.

## ज्यांस वहानांच्या सहाय्यानें प्रवास करावयाचा आहे त्यांच्या करितां खर्चाचा तपशील.

| | १ माणसाचा. रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| रेलवे, कुलाबा ते कोटद्वार. | १५– | ७– | ० |
| मोटार, कोटद्वार ते डुगड्डा. | ०– | ६– | ० |
| खेचर, डुगड्डा ते गुप्तकाशी. | ३२– | ८– | ० |
| घोडा, श्रीनगर ते रुद्रप्रयाग. | १– | १२– | ० |
| कंडी, रुद्रप्रयाग ते गुप्तकाशी. | ३– | ०– | ० |
| कुली, गुप्तकाशी ते मैलचौरी | ५७– | ८– | ० |
| घोडा, मैलचौरी ते राणीखेत. | ४– | ५– | ० |
| हिमालयांतील वहानें. | ११४– | १४– | ० |
| मोटार, राणीखेत ते अलमोडा. | १– | ८– | ० |
| टोल ” | ०– | ८– | ० |
| मोटार, नैनीताल. | २– | ०– | ० |
| भोजन फराळ वगैरे २ महिन्यांचा माणशीं सरासरीं खर्च. | ३३– | ०– | ० |
| टोल मसुरी | १– | ८– | ० |
| मोटार, सहाराणपूर, | १– | ८– | ० |
| सामान, टोप्या, मेणकापड, ब्याटरी, पिशव्या हातमोजे पायमोजे वगैरे | १५– | ०– | ० |
| सहाराणपूर ते परत अजमासें | १५– | ०– | ० |

नकाशे, फोटो, धर्मादाय, सरसकट माणशीं साधारणपणें २०० रु. पाहिजेत.
प्रवास २ महिने.

नेपाळच्या प्रवासास अजमासें ७५ रु. माणशीं
गंगोत्री जम्नोत्रीस ” १५० ” ”

# काश्मीर व म्हैसूरच्या प्रवासासंबंधीं लोकमत.

**माझा काश्मीरचा प्रवास किं. ८ आणे.**

**केसरी**—( २९-११-१९३० )। " ह्या पुस्तकांत झुलतापूल, तरत्या बागा, निर्मळ निर्झर, रमणीय रमणी इत्यादि तत्रस्थ सौंदर्यसंपन्न ' वस्तु ' दृष्टीस पडतात. त्याचप्रमाणें गवताचीं पायतणें, ब्लँकेटावरील जेवण, शीतोष्णाचें सुखदुःख इत्यादि प्रकारहि वाचावयास सांपडतात. काश्मीरांत राजा हिंदू असून व एके काळीं सर्व वस्ती हिंदूंची असून आतां हिंदूंचें प्रमाण शें १० वर उतरलें आहे. ह्या शोचनीय स्थितीची लेखकानें केलेली चिकित्सा विचारप्रवर्तक आहे.

**परीक्षक डे. व्ह्. ट्रा. सोसायटी, पुणें—**

पुस्तक सर्वांस विशेषतः तरुणांस उपयोगी आहे. उपयुक्त वाङ्मयांत ग्रंथास स्थान देणें योग्य आहे.

**ज्ञानप्रकाश पुणें, ता. ( १७-१०-१९३० ).**

ह्या प्रवासवर्णनाप्रमाणें प्रवास करणाराचा वृत्तांतहि मनोवेधक व कौतुकास्पद आहे. त्यांनीं अवध्या ५० रुपयांत काश्मिरचा प्रवास केला, म्हणून गरिबाला काश्मिरचा प्रवास कसचा झेंपतो असें म्हणून निराश होणारांस काळे यांचें उदाहरण निःसंशय प्रोत्साहक ठरण्यासारखें आहे. " प्रवासासंबंधींचे माझे कांहीं विचार " हें प्रकरणहि प्रत्यक्ष प्रवास केलेल्या गृहस्थांचे अनुभव ह्या दृष्टीनें मननीय आहे.

**रत्नाकरः—**

प्रवासाची हौस असून गरिबीच्या सबबीवर ज्यांनीं ती दाबून ठेविली असेल किंवा आगगाड्या, मोटारी इत्यादि शीघ्रगामी वहानांनीं प्रवास करण्यापेक्षां तो पायांनीं करण्यानेंच प्रवासाचे फायदे कसे पदरीं पडतात हें ज्यांना समजून घ्यावयाचें असेल अशा अगदीं थोड्या पैशांत प्रवास करूं इच्छिणाऱ्यांना हें प्रवासवृत्त फारच उपयुक्त वाटेल.

**Mahratta, Poona ( 2-11-1930 ).** Tha most outstanding feature of the book is that it contains a description of the trip in the cheapest way. He has described the details of his peregrinations and of the experiences he had had of the life of the people there, with deep insight and in a simple but touching style.

**अभिनव भारत, नागपूर ( २८–११–३० )—**

लांबच्या प्रवासाची आवड समाजांत निर्माण करण्यास ह्या पुस्तकाचा बराच उपयोग होईल.

**प्राथमिक शिक्षण, जानेवारी १९३१ पुणें—**

" काश्मीर हें हिंदुस्थानचें नंदनवन आहे, अशी आख्यायिका आपण ऐकतों, याची खात्री हें प्रवासवर्णन वाचल्यानें झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

**शालापत्रक पुणें, डिसेंबर १९३०—**

श्री. काळे यांचा काश्मीरचा प्रवास मुख्यतः पायींच झाल्यामुळें व त्यांना गरिबांशीं गप्पागोष्टी करून त्या भागांतील खरीखुरी माहिती काढून घेण्याची हातोटी साधलेली असल्यामुळें हें पुस्तक वाचल्याबरोबर काश्मीरच्या समाजस्थितीचें व तेथील चालीरीतींचें चित्र यथातथ्य पुढें उभें राहातें. प्रवास करणाऱ्यानेंच स्वतःच्या साध्या व सोप्या भाषेंत जी माहिती दिली आहे त्यांत खराखुरा जिवंतपणा प्रत्ययास येतो.

**यशवंत,** ( मार्च १९३१ ).

पुस्तकाचें बाह्यांग उठावदार असून प्रस्तुत पुस्तक वाचीत असतां प्रवासी गृहस्थ हा आपला मित्रच आहे किंबहुना आपण त्याजबरोबर प्रवासास निघालों आहों असा वाचकांस भास होतो. रा. काळे यांनीं जागोजागची सर्व माहिती मोठ्या रसिकतेनें वर्णिली आहे. यामुळें पुस्तक हातीं घेतल्यावर तें पूर्ण वाचल्याशिवाय खालीं ठेवतां येत नाहीं. भाषासरणी सुलभ, आकर्षक आणि नैसर्गिक आहे. एकंदरींत ग्रंथ मनोरंजक झाला असून तो आश्रयास पात्र झाला आहे. प्रवेशपरीक्षेच्या ( मॅट्रिकच्या ) विद्यार्थ्यांस हें पुस्तक लाविल्यानें त्यांचा फायदा होणार आहे.

**बलवंत** ( १०-१२-३० )-पुस्तकांतील लेखनशैली साधी व मनोरंजक असल्यामुळें आमूलाग्र वाचून होईतों तें हातचें सोडवत नाहीं.

**परशुरामभाऊ कॉलेज त्रैमासिक.**

श्री. काळे यांनीं हें पुस्तक अत्यंत काळजीनें लिहिलें आहे. पुस्तक एकदां वाचायला लागलें कीं संपवून खालीं ठेवावें असें वाटतें व आपणसुद्धां एकदां काश्मीरांत जाऊन यावें अशी इच्छा मनांत उत्पन्न होते. निरनिराळ्या स्थळांचीं वर्णनें, आपणांला अपरिचित असलेल्या लोकांच्या स्वभावाचें, चमत्कारिक रीतीभातींचें वर्णन, निरनिराळ्या ठिकाणची व्यवस्था, तेथील सांपत्तिक स्थिति वगैरे वगैरे गोष्टींनीं हें पुस्तक परिपूर्ण आहे.

**आनंद ( १९३० नोव्हेंबर ).** काश्मीरच्या रमणीय प्रदेशाच्या प्रवास लेख-

कानें पायीं केल्यामुळें सृष्टीचें मनोहर स्वरूप त्याला आस्थेवाईकपणानें पाहातां आलें. प्रवासांत तऱ्हतऱ्हेचे अनुभव आले, आणि सहनशीलता, धैर्य, कल्पकता इ० गुण कसास लागले. ह्या दृष्टीनें हें प्रवासवर्णन अत्यंत वाचनीय आहे. यांत ठरीव ठशाच्या हकीकती नाहींत.

**स्फूर्ति, ( डिसेंबर १९३० )—**

रा. काळे यांच्या लेखनशैलींत त्यांचें व्यक्तित्व ठिकठिकाणीं दिसून येत असल्यानें इतरांच्या प्रवासलेखांपेक्षां ह्या पुस्तकांत नावीन्य व चटकदारपणाहि अधिक आहे.

**फर्ग्यूसन व विलिंगडन कॉलेज त्रैमासिक, ( डिसेंबर १९३० )—**

निरनिराळ्या लोकांचे आचारविचार व त्यांच्या देशविषयक व समाजाविषयक कल्पना यांची श्री. काळ्यांनीं केलेलीं वर्णनें मनोरंजक तशींच उद्बोधक आहेत. प्रवासासंबंधींचे त्यांचे विचार मननीय आहेत. अशा प्रवासांची राजकीय व भाषाविषयक भिन्नतेनें विभक्त झालेल्या भारताच्या एकीकरणाला मदत होईल अशी आशा आहे.

# आमची म्हैसूरची सफर किंमत ४ आणे.

**केसरी–( १.२।१२।१९३१ ).**

श्री. काळे यांच्या वर्णनांत विशेष हा कीं, मध्यम स्थितींतील मनुष्यास ज्याच्याजवळ पुंजी अल्प असेल त्यालाहि प्रवास कसा करितां येईल ह्याची माहिती दिलेली असते. द. हिंदुस्थानांत म्हैसूर राज्य प्रेक्षणीय समजण्यांत येतें. त्याचें वृत्त श्री. काळे यांनीं या पुस्तकांत चांगल्या प्रकारें दिलें आहे. प्रसंगानुरोधानें देखाव्यांचीं अनेक चित्रेंहि दिलीं असून सोबत म्हैसूरचा नकाशा देऊन पुस्तक दर्शनयि व वाचनीय केलें आहे.

**संस्थानी स्वराज्य–( २५।१२।१९३१ ).**

निरनिराळ्या ठिकाणचें वर्णन थोडक्यांत पण चटकदार रीतीनें केलें आहे. म्हैसूरसंस्थानासंबंधीं कांहीं उपयुक्त माहिती शेवटीं दिली आहे. म्हैसूरचा प्रवास करूं-इच्छिणारांनीं "मार्गदर्शक" म्हणून जवळ बाळगावें त्यामुळें त्यांचा प्रवास 'सुखकर' होईल.

**ज्ञानप्रकाश ( ९।१०।१९३१ ).—**

श्री. काळे यांच्या काश्मीरच्या प्रवासाप्रमाणेंच हेंही पुस्तक सरस व चटकदार झालें आहे. प्रजेचा पैसा स्वतःच्या चैनीकरितां खर्चून प्रजेस अन्नाला मोताद करणाऱ्या इतर संस्थानिकांनीं म्हैसूरची स्थिति लक्षांत घेऊन आपली वागणूक ठेवावी असा जो इषारा श्री. काळे यांनीं दिला आहे तो समपर्क नाहीं, असें कोण म्हणेल ?

**परशुरामभाऊ कॉलेज, त्रैमासिक.—**

म्हैसूरप्रांताची सफर श्री. काळे यांनीं गाडी, मोटार व टांगा यांतून केली, पण त्यांनीं प्रवास कसाही केला तरी त्यांची निरीक्षणशक्ति फार उत्तम असल्यामुळें म्हैसूरप्रांताचेंही त्यांनीं फार बारकाईनें वर्णन दिलें आहे. म्हैसूरसंस्थान किती उत्तम आहे हेंही त्यांनीं फार चांगलें दाखविलें आहे. म्हैसूरचें वर्णन फारच चांगलें आहे. आणि तें काश्मीरच्या प्रवासाइतकेंच मन गुंगवून टाकितें.

**शालापत्रकः**—गरिबी प्रवासाच्या आड येत नाहीं, ह्याचें रा. काळे हें एक उदाहरणच आहे.

**स्फूर्ति, आक्टोबर १९३१.—**

रा. काळे यांच्या लेखांत एक प्रकारचा खुमासदार जिव्हाळा आढळून येतो त्यामुळें त्यांचीं प्रवासवर्णनें बोधक व रंजक वाटतात. घरबसल्या म्हैसूर प्रत्यक्ष पाहून आल्याचा वाचकांस भास होतो. थोडक्या वेळांत इच्छा असल्यास दूरदूरचा प्रवास करणेंही सुलभ होतें.

**रत्नाकर, १९३२ फेब्रुवारी.—**

श्री. काळे हे एक सूक्ष्म दृष्टीचे प्रवासी असून त्यांनीं या पुस्तकांत आपल्या म्हैसूरच्या सफरींची हकिगत मनोरंजक रितीनें दिली आहे. पुस्तक आकर्षक झालें आहे.


**मुलांचें मासिक.**

कित्येक ठिकाणीं ऐतिहासिक बाजूचें दिग्दर्शन केलें असल्यानें पुस्तकाची मनोवेधकता व उपयुक्तता वाढली आहे.


**आनंद, नवंबर १९३१.**

पुण्याचे प्रवासपटु श्री. काळे यांनीं हें प्रवासवर्णन लिहिलें आहे. म्हैसूर संस्थानांतिल प्रेक्षणीय स्थळांचीं वर्णनें वाचकांस चित्ताकर्षक वाटतील. हें पुस्तक प्रवासाविषयीं स्फूर्ति उत्पन्न करील यांत शंका नाहीं.

---


सतलज
सिंधु
सिमला
जम्नोत्रि
गंगोत्री
बद्रीनाथ
नंदादेवी
पर्वत
केदारनाथ
विष्णुप्रयाग
काल्का
रुद्रप्रयाग
अंबाला
डेहराडून
हृषीकेश
देवप्रयाग
लक्ष्मण
झूला
लॅन्सडौन
राणीखेत
हरद्वार
अलमोरा
कोटद्वार
नजिबाबाद
काथगोदाम
महारणपूर
मिरत
लालकुवा
मोरादाबाद
रामपूर
बरेली
दिल्ली
शाहाजहानपूर
सितापूर
अलिगड
कासगंज
हाथरस
वृंदावन
मथुरा
तुंडला
आग्रा
इटावा
बायना
लखनौ
कानपूर
गंगापूरकडे
ग्वाल्हेर
झांशी
गंगा
यमुना

चित्रशाळा प्रेस पुणें


स्केल
१ इंचास ६४ मैल सुमारे
रेलवे
सडक
पायवाट
श्री काळे यांनीं पाहिलेलीं ठिकाणें
पायवाट
Prepared for Mr Kale, by
G. S. Nimbavikar. Oct. 1932
धवलगिरी
गुरखा
नेपाळगंज
निलकंठ
भातगांव
देवपाटण
काटमांडू
ललितपट्टण
पाशुपतेश्वर
थानकोट
भिमफेडी
अमलेखगंज
गोंडा
नरकटियागंज
बेटिया
रक्सौल
सगौली
गोरखपूर
अयोध्या
फैजाबाद
मुझफरपूर
बांकीपूर
गंगा नदी
पाटणा
काशी उर्फ बनारस
प्रयाग उर्फ अलाहाबाद
मोगल सराई
कलकत्त्याकडे
गया

REFBK-0005024

REFBK-0005024